प्लासीची शोककथा

विठ्ठल वामन हडप



— 'स्वातंत्र्यभारत' इतिहासकथा —

प्लासीची शोककथा

विठ्ठल वामन हडप

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

प्रथमावृत्ति : जून १९५७

किंमत दीड रुपया

वेष्टणचित्र : दीनानाथ दलाल

प्रकाशक : रघुनाथ गणेश आगटे,
आदर्श वाङ्मय प्रकाशन करितां,
सातारा.

मुद्रक : र. भ. निगुडकर,
मुद्रणस्थळ : प्रकाश मुद्रणालय,
३९५/४ सदाशिव, पुणे २

संपादकीय निवेदन

स्वातंत्र्यभारत ही भारताच्या स्वातंत्र्याची सप्तखंडात्मक इतिहासकथा चांगलें लिहितां वाचतां येणारे प्रौढ साक्षर वाचक आणि शालेय जगांतील विद्यार्थी यांच्यासाठीं मुख्यतः आहे. या सातही कथा प्रसंगनिष्ठ आहेत. **प्लासीची शोककथा** (सन १६०० ते १७५७), **५७ची समरदेवता** (सन १७५७ ते १८५८), **बंगालची सत्यकथा** (सन १८५८ ते १९११), **जालियनवाला बाग** (सन १९११ ते १९२०), **दांडीयात्रा** (सन १९२० ते १९३२), **नऊ ऑगस्टचा अखेरचा लढा** (सन १९३२ ते १९४७), आणि **स्वतंत्र नवभारत** (सन १९४७ ते १९५०) अशा सात इतिहासकथांत हा भारताच्या स्वातंत्र्याचा गेल्या साडेतीनशें वर्षांचा इतिहास पूर्ण होत आहे.

भारताच्या या विराट स्वातंत्र्यसमराला जगांतील इतर देशांच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत विशेष महत्त्व आहे. कारण सत्याचरण आणि अहिंसा या उदात्त तत्त्वांना जागरूक राहून स्वातंत्र्यसमर लढणारें आणि विजयी होणारें भारत हेंच जगाच्या पाठीवरील पहिलें महान् राष्ट्र होय. त्यामुळेंच भारताला जगांतील सर्व सुधारलेल्या, महाबलाढ्य व शस्त्रास्त्रसंपन्न राष्ट्रांतही विश्वशांतीचा महान् प्रेषित या नात्यानें अत्यंत मानाचें व आदराचें स्थान प्राप्त झालें आहे.

स्वतंत्र भारताच्या तरुण पिढीचा हा हक्काचा वारसा आहे. हा वारसा मिळविण्यापेक्षांही चालविणें व तो राखणें अधिक जोखमीचें आहे. त्या थोर जबाबदारीची जाणीव करून देणारा हा भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास उगवत्या तरुण पिढीला ह्या महान् स्वातंत्र्यलढ्याची केवळ धावती, ढोबळ, सरधोपट परंतु सुगम व सत्य अशी ओळख करून देईल अशी आशा आहे.

ह्या 'स्वातंत्र्यभारत'च्या संपादकीय शैक्षणिक कार्यांत चि. यशवन्त हडप, एम्.ए., डी.एड्., यांच्या सहकार्याचा त्याच्या शालेय उपयुक्ततेच्या दृष्टीनें बहुमोल उपयोग झाला आहे.

लेखक

विषयानुक्रम

'स्वातंत्र्यभारत'ची नान्दी

भारतांत आपण, आपले, आणि परके कोण ?

' प्लासीची शोककथा ' ही भारताच्या स्वातंत्र्यसमराची सांगोपांग तोंडओळख करून देण्यासाठीं संकल्पिलेल्या ' स्वातंत्र्यभारत ' या सप्तखंडात्मक इतिहासांतील पहिली इतिहासकथा होय.

रूढार्थानें व सर्वसाधारण ऐतिहासिक दृष्टीनें विचार केला तर परकीयांचें राजकीय प्रभुत्व भारताच्या राशीला आलें, तेव्हांच भारत खरा परतंत्र झाला. तें पारतंत्र्य झुगारून देऊन स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं भारताला बद्धपरिकर व्हावें लागलें, तो भारताच्या स्वातंत्र्यसमराचा प्रारंभ होय.

पण भारत म्हणजे तरी कोण आणि काय ? सुजला-सुफला-मलयजशीतला सस्यश्यामला भारतभूमि हा भारत ? कीं स्वतःचें रक्त आणि घाम ओतून भारतमातेला सुजला-सुफला-सस्यश्यामला अशा वैभवाप्रत पोहोंचविणारे भारतपुत्र व भारतकन्या हा भारत ? कीं त्या जनतेवर भलीबुरी हुकमत गाजविणारे राजेमहाराजे हा भारत ?—तर भारताची जनता हाच भारताचा मानबिंदु. त्या मानबिंदूवर नजर ठेवून आपणाला भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास अभ्यासायचा आहे.

तसें पाहतां भारतावर हजारों वर्षांपूर्वींपासून इ. सनाच्या पंधराव्या शतकापावेतों बाहेरून एकसारखीं कितीतरी आक्रमणें झालीं. भारतांत अगदीं आरंभीं एके काळीं जेव्हां केव्हां ' सबै भूमि गोपालकी ' असें भारताचें स्पृहणीय जीवन असेल, एथें कोणी कुणाचा धनी आणि कोणी कुणाचा चाकर नसेल, अशा इतिहासपूर्व अवस्थेंतील भारत हाच एका अर्थी खरा स्वतंत्र भारत म्हणतां येईल. त्यानंतर भारतावर द्रविडांचें आक्रमण झालें. नंतर आर्यांचें आक्रमण झालें. परंतु हे भारताच्या स्वातंत्र्यावर घाले असें रूढ इतिहास मानीत नाहीं.

आर्यांनंतरही शक, हूण, गुर्जर अशा अनेक परकीय टोळ्यांचें भारतावर आक्रमण झालें, व कांहीं काल संघर्षही झाले. हे सारे पाहुणे जे जे आले, त्यांच्या आरंभींच्या वागणुकींतील भलेंबुरें आपणाला या ठिकाणीं दिव्यावातीनें शोधीत बसायचें नाहीं. परंतु पाहुणे आले, ते घरासारखे झाले; घरच्यांशीं समरस होऊन एकदिलानें राहिले.

तीच अवस्था मुसलमानांचीही. गेलें तें उदक आणि राहिली ती गंगा अशा थोर मनानें व वास्तवतापूर्ण दृष्टीनें आपण विचार केला, तर भारतावरील मुसलमानी आक्रमण हेंही परक्यांचें आक्रमण म्हणून आपणाला उठल्यासुटल्या लेखतां येणार नाहीं. अगदीं कांहीं थोडे मुसलमान आक्रमक सोडले, तर बाकी जे भारतांत आले, ते भारतांत राज्यकर्ते जरी झाले, तरी ते शक्य तोंवर मिळूनमिसळून वागण्याचा प्रयत्न करीत राहिले. हिंदुधर्म निराळा, मुसलमानी धर्म निराळा. हिंदूंचे देवधर्म, जातिभेद, वर्णभेद, सोवळेंओवळें वगैरे अनेक कुंपणें जीं हिंदुसमाजासभोंवार होतीं—व अजूनही आहेत !—त्या कुंपणांच्या आंत हिंद्वेतरांना प्रवेश नव्हता. तिथें कांहीं इलाज नव्हता.

परंतु एरव्हीं मुसलमानांनीं भारतांत जरी राज्यवैभव आणि साम्राज्य-वैभव मनमुराद उपभोगिलें, तरी देशांतली संपत्ति देशांतच राहिली. राज्यकर्त्यांनीं ती परक्या देशांत लुटून नेली नाहीं. अशा प्रकारें बाहेरून भारतांत आलेले 'घरासारखे पाहुणे' जे भारत हेंच आपलें घर समजून राहिले, ते परके नव्हत. तेच आम्ही सारे हिंदु-मुसलमान—सारे भाई भाई.

परंतु पंधराव्या शतकापासून डच-पोर्तुगीज-फ्रेंच-इंग्रज हे जे भौतिक सुधारणांत पुढारलेले परके युरोपियन लोक भारतांत आले, ते पूर्वींच्या सर्वांपेक्षां अगदीं निराळे. भारत हें त्यांना आपलें घरसें कधींच वाटलें नाहीं. त्यांचीं घरें तिकडे दूर यूरोपांत त्यांच्या त्यांच्या देशांत होतीं. आयाबाया नागवायच्या आणि सटव्या जागवायच्या म्हणतात

तसें त्यांनीं बाहेरचें जग लुबाडून इतर देश आपलीं राखीव कुरणें बनवावीं, आणि त्यांची सर्वतोपरी पिळणूक करून तेथील सर्व संपदा लुबाडून नेऊन आपल्या देशांत आपल्या हवेल्यांवर सोन्याचीं कौलें घालावीं, अशी लुटारूंची त्यांची वृत्ति. असे लोक हे भारतांत परके होत.

भारत आणि इंग्रज

त्या चोर-दरोडेखोर-लुटारूंच्या वाटेनें जाऊन भारताचें घबाड घशांत टाकतां टाकतां ते परके लोक आपापसांतच भांडत. अशा तीव्र भांडाभांडींत आणि युद्धांत इंग्रजांनीं बाकीच्या साऱ्या यूरोपियन प्रतिस्पर्ध्यांना भारतांतून चंबूगवाळें घेऊन एकदांचें काळें करायला लावलें. आणि सारा भारत हें आपलें राखीव कुरण बनवून सोडलें. पोर्तुगीज, फ्रेंच यांची नांवापुरती सत्ता भारताच्या कानाकोपऱ्यांत अपवादादाखल राहिली, तरी विशाल भारताच्या दृष्टीनें ती हिशेबीं धरण्याजोगी अतिशय महत्त्वाची बाबशी उरली नाहीं.

हा प्रकार इ. स. अठराव्या शतकांतला. सत्राव्या शतकाच्या आरंभकालीं इंग्रज आपली व्यापारी ईस्ट इंडिया कंपनी उभारून भारतांत व्यापारासाठीं म्हणून आला. तो भल्याबुऱ्या उपायांनीं धूर्तपणानें आपला जम बसवतां बसवतां इ. स. १७५७ मध्यें प्लासी-(बंगाल) च्या लढाईंत भारताचा प्रभु होऊन बसला. बंगालचा नबाब प्लासीच्या लढाईंत हरला; म्हणजेच भारत हरला. स्वातंत्र्य गमावून बसला. तो इंग्रजाचा अंकित झाला.

प्लासीची जी लढाई प्रत्यक्ष झाली, ती बंगालचा नबाब आणि इंग्रज म्हणजे कंपनीसरकार यांच्यांत झाली. पराजय झाला तोही बंगालच्या नबाबाचा. राज्यकर्तेपणाच्या दृष्टीनें पाहिलें, तर सर्वतोपरी नकर्त्या व दुबळ्या नबाबाचा. नबाब हरला म्हणजे भारत हरला हें कसें ? ही गोष्ट ऐकायला कानांना कशीशीच लागते खरी. एवढा मोठा खंडप्राय

भारत. बंगाल हा भारताचा एक प्रांत. त्या बंगालचा नकर्ता दुबळा नबाब हरला म्हणजे भारत हरला तो कसा ?

परंतु कधीं कधीं सत्य हेंच कल्पितापेक्षां चमत्कृतिपूर्ण असतें. बंगालचा नबाब तेव्हां कसाही असला तरी तो दिल्लीच्या बादशहाचा दिवाण होता. तोही बादशहाला गुंडाळून ठेवून स्वतः झालेला दिवाण. हा दिवाण बादशहावर कुरघोडी करून बसतो, यावरून आपणाला तेव्हांच्या बादशाहीची ठोकळ कल्पना करतां येते.

बादशहाची दिवाणी म्हणजे एक प्रकारें बादशहाची लगाम अथवा वेसणच ती. ती ज्याच्या हातीं त्याच्या हातीं बादशहा. मराठे तेव्हां 'घोड्यावर' होते खरे. त्यांचाही बादशहावर पगडा होता खरा. तेव्हां मराठे नबाबाप्रमाणें वेंजीं उतरलेलें मोतीं ठरले नव्हते. ती अजून झांकली मूठ होती. ती पानिपतावर उघडून फुकी ठरायला अजून पांच वर्षें अवकाश होता. मराठे आणि इंग्रज यांचा संघर्ष जोरांत प्रत्यक्ष सुरू झाला नव्हता. त्यामुळें मराठ्यांच्या देशव्यापी दराऱ्याची इंग्रजां-पुढें कसोटी लागायची होती.

दिल्लीची मोगल बादशाही पडत–कोसळत मावळत होती. आणि मराठ्यांची सत्ता उगवून तिच्यावर पोसून माध्यान्हीं येऊं लागली होती. या दरम्यान इंग्रज लोक व्यापारी वाण्यानें भारताच्या समुद्रकिनाऱ्या-वर उतरले. त्यांनीं जहांगीर बादशहाच्या दरबारांत शिरकाव करून घेतला. मद्रास व सुरत एथें त्यांनीं आपल्या वखारी घातल्या. हें सारें तेव्हां अर्थातच मोगल बादशहाची दाढी कुरवाळून, मुंगी होऊन साखर खाणें चाललें होतें. मद्रास शहर इंग्रजांनींच सन १६३९ मध्यें वसविलें. इंग्रजांच्या पूर्वीं भारतांत आलेले तसलेच पट्टीचे दर्यावर्दी पोर्तुगीज मुंबईसारखीं कांहीं मोक्याचीं ठिकाणें व्यापून मांड मांडून बसले होते. परंतु ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी. पोर्तुगीज व इंग्रज दोघेही सुधारत चाललेल्या नव्या जगांतील प्रतापवान दर्या-

वर्दी साहसी खरे. परंतु भारतांत इंग्रज पोर्तुगीजांना शेराला सवाशेर ठरले. सन १६६२ मध्यें इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजानें पोर्तुगालमधील ब्रॅगांझा परगण्यांतील कॅथरीन नांवाच्या राजकन्येशीं लग्न केलें. त्या वेळीं मुंबई बेट राजाला आंदण-हुंडा म्हणून मिळालें.

कुठें पोर्तुगाल, कुठे इंग्लंड, कुठें भारत व कुठें मुंबई बेट. मुंबई कोण वसवतो! कोण कशी बळकावतो! कोण कुणाला आंदण देतो! इंग्लंडच्या राजानें भारताशीं व पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्यासाठीं इंग्लंडांत स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीला तें बेट इनामलिलावावारी मातीमोलानें अगदीं थोडीशी किंमत घेऊन विकून टाकलें. मुंबईचें व्यापारी महत्त्व धूर्त इंग्रज व्यापारी कंपनीला जसें कळत होतें, तसें पोर्तुगालच्या राजाला कुठें कळत होतें? दिल्लीच्या बादशहासारखीच जवळ जवळ जगांतील राजे लोकांची—सरंजामशाहीची सद्दी तेव्हां संपत आली होती. राजांचें एका काळीं गाजणारें राजेपण आतां ऐतिहासिक वस्तुसंग्रहाच्या कपाटांत ठेवण्याच्या फक्त मोलाचें होऊं लागलें होतें.

हा सारा मामला जेव्हां दिल्लीला अखेरचा पराक्रमी मोगल बादशहा औरंगजेब हा सत्ता गाजवीत होता तेव्हांचा. म्हणजे सन १६५९ ते १७०७ च्या दरम्यानचा. तेव्हांच कंपनीकर इंग्रजांनीं धूर्त कावळेनजरेनें भारतांतील मोगल बादशाहीच्या सामर्थ्याचा आढावा घेतला. त्यांनीं पाहिलें कीं जगाला प्रगतिपथानें ओढीत नेणाऱ्या काळाच्या प्रवाहांतील लाटांच्या तडाक्यांनीं मोगल बादशाहीचा पाया एकेका चिऱ्यानें ढांसळतो आहे. ती संधि साधून कंपनीकर इंग्रजांनीं भारतांत मुसंड्या मारीत हातपाय पसरण्याला सुरुवात केली. इंग्लडांतून कंपनीचीं लढाऊ जहाजें ती दंडेली योजूनच भारतांत आलीं. त्यांनीं औरंगजेब बादशहाच्या राज्यावर पूर्वेकडे बंगालमध्यें आणि पश्चिमेकडे सुरत येथें हल्ले केले. पाय रोवले.

मोगल बादशाहीचा चढउतार

दिल्लीला औरंगजेब बादशहा झाला; आणि मोगल बादशाहीचा सारा नूरच पालटला. फुलाच्या पाकळ्या गळाव्या आणि वास उडून जावा, तशी मोगल बादशाहीची गत तेव्हां होऊं लागली. बादशहा अकबर हा सर्व मोगल बादशहांतला सर्वतोपरी थोर व विश्वविख्यात बादशहा तर खराच. त्याच्या कारकीर्दींत तर मोगल बादशाहीच्या वैभवशालीपणाचा कळसच झाला. त्याच्या निधनाबरोबरच मोगल बादशाहीला घरघर लागली म्हटलें तरी चालेल.

अकबरानंतर त्याचा मुलगा जहांगीर हा बादशहा झाला. त्याच्या राज्यकारभारांत वाखाणण्याजोगें कांहीं नसेल. परंतु कलाकुसर, चित्रकला, उद्यानें, फूलबागा असलीं सौंदर्यलेणीं त्याच्या पुरस्कारांतून निर्माण झालीं. काश्मिरांत श्रीनगरजवळचा शालिमार बाग, निशात बाग, ह्या अत्यंत आल्हाददायक व नयनमनोहर बागा त्यानेंच उभारल्या.

जहांगीरनंतर त्याचा मुलगा शहाजहान हा बादशहा झाला. याच्या कारकीर्दींत एका अर्थानें मोगल साम्राज्याचें ऐश्वर्य अगदीं शिगेला जाऊन भिडलें. पण त्याबरोबरच मोगल बादशाहीच्या नाशाचीं बीजेंही पेरलीं गेलीं व तीं उगवून वाढूं लागलीं. मोगल बादशहांचें इतिहास-विख्यात मयूरसिंहासन, आग्रा येथील त्रिभुवनसुंदर ताजमहाल, अशीं अलौकिक वैभवशाली सौंदर्यदर्शनें त्यानेंच भारताला घडविलीं. पण बाकी काय ? धर्माच्या बाबतींत तर तो अनुदारपणानें वागलाच. परंतु तेवढ्यावर त्याचा बेदरकार अनुदारपणा थांबला नव्हता. त्याच्या राज-वटींत दक्षिण भारत आणि गुजराथ या प्रचंड भूप्रदेशांत भयंकर दुष्काळाचा कहर गुदरला. तरी तेथील लोकांना जगविण्यासाठीं त्यानें कांहींही केलें नाहीं. एकीकडे त्याच्या संपत्तीचे आणि वैभवाचे ढिगारे वाढत होते, तर दुसरीकडे त्याच्या रयतेचें दारिद्य आणि दैन्य कडे-लोटानें वाढत होतें.

मोगल बादशाहीचें सौंदर्यवैभव शहाजहान बादशहाच्या कारकीर्दींत केवळ भौतिक वैभवाच्या दृष्टीनें अगदीं कळसाला पोहोंचलें खरें. परंतु त्या सौंदर्याच्या आणि वैभवाच्या मागें काय होतें ? तर गरिबी आणि उपासमार यांनीं गांजलेली रयत. रयतेनें जबर करभार देऊन बादशहापाशीं मयूर सिंहासन, ताजमहाल अशा अपार वैभवशोभेसाठीं संपत्तीचे पर्वत उभे केले खरे. पण ते कशा स्थितींत ? तर तेव्हां रयतेला डोकें टेकायला कुडमातीच्या धड झोंपड्याही पुरेशा नव्हत्या. शेतीची आबाळ, दुष्काळ यांमुळें रयतेची उपासमार होत होती. राज्यकारभार तेव्हां सर्वस्वीं बादशहाच्या लहरीनुसार चाले. तेव्हां बादशहाची अथवा त्याच्या सुभ्यांची, अशा बड्याबड्यांची हांजी हांजी करून मर्जी संपादन करणें हें खरें थोर कार्य व बहाद्दुरी. आणि त्यांची गैरमर्जी संपादन करणें हा तेव्हां सर्वांत मोठा भयंकर गुन्हा ! आणि त्या गुन्ह्याला शिक्षाही तशाच भयंकर असत. अकबर बादशहाचा दयाळूपणा, धार्मिक उदारता, सहनशीलता, लोककल्याणकारी राज्यकारभार, या गोष्टी आतां गतकालाच्या इतिहासांत जमा झाल्या होत्या. बेदाद मोगल राजवटीच्या बेबंदपुरींत रयतेच्या असह्य असंतोषाला वाचा फुटण्याचा काळ जवळ येत होता.

ह्या जनतेच्या उफाळत्या विफल आकांक्षांना आणि असंतोषाला जबरदस्तीनें आळा घालून अस्मानी सुलतानी गाजविणारा औरंगजेब बादशहा गादीवर आल्यापासून तर रयतेच्या जीवनाचा उन्हाळा तापायला सुरुवात झाली. वडील आणि आजोबा यांच्या ठायींच्या किमान चांगुलपणाचा वासवाराही त्याच्या ठायीं नव्हता. तो एक अगदीं साध्या राहणीचा व कडेलोटानें इस्लामी धर्मवेडा माणूस होता. त्यानें सत्तालोभाच्या आणि विशेषत: धर्मवेडाच्या भरांत हिंदूंना सर्वतोपरी अगदीं तरवारीच्या धारेवर धरलें होतें. पूर्वी मुसलमान राज्यकर्त्यांनीं हिंदूंवर बसविलेला परंतु दरम्यान हा जुलूम रयतेवर नको अशा बुद्धीनें मोगल

बादशहांनीं वसूल करणें थांबविलेला ‘ जिझिया ’ ऊर्फ डोईपट्टी कर हा बादशहा पुन्हां जबरीनें वसूल करूं लागला. त्यानें आपल्या जुलमी कारभारानें सर्व हिंदूंना सर्व प्रकारें आपले शत्रु करून घेतलें होतें. दक्षिणेंत तो आपल्या साम्राज्याचा विस्तार जिवाचें रान करून वाढवीत होता. विजापूर आणि गोवळकोंडें हीं मुसलमानी राज्यें त्यानें बळकावलीं होतीं. त्याच्याही खालील दक्षिणेकडील राज्यें त्याला खंडणी देऊं लागलीं होतीं. परंतु दुसरीकडे त्याच्या मोगल साम्राज्याचा पाया रयतेच्या असंतोषानें समूळ पोखरला जाऊन झपाट्यानें ढांसळत चालला होता. चोहोंकडून शत्रू त्या साम्राज्याला खाऊं कीं गिळूं करीत उठत होते.

‘ जिझिया ’ कराविरुद्ध सारी कोटमाप हिंदु रयत तर इतकी गांजली होती कीं, अखेर सर्व हिंदूंच्या वतीनें बादशहाला एक अर्ज करण्यांत आला. त्यांत लिहिलें होतें, “ हा कर न्यायाच्या तोंडाला काळें फांसणारा आहे. तो राज्याच्या हितकारी धोरणाला सोडून आहे. भारतांतील धर्मशास्त्रांच्या नीतिनियमांची यामुळें पायमल्ली होत आहे. यामुळें देशांत दरिद्रता आणखी आणखी वाढेल .... जहांपन्हांच्या कारकीर्दीत पुष्कळच लोक बादशहातीशीं विरुद्ध झाले आहेत. देशांत सगळीकडे धनधान्यादिकांचा विध्वंस आणि लूटमार माजून राहिली आहे. यामुळें बादशाहीला आणखी आणखी प्रदेशांना मुकावें लागणें अटळ आहे. आपली रयत बेदरकारपणें आपल्या पायांखालीं तुडविली जात आहे. आपल्या बादशाहींतील एकूण एक प्रांत दरिद्री झाला आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस घटत आहे. संकटें रोज वाढतच आहेत.....”

असली ती औरंगजेबाची बादशाही. ती बादशाही अशी आंतील दुबळेपणामुळें अखेर नष्ट झाली. औरंगजेबाच्या धर्मवेड्या व हिंदुद्वेष्ट्या धोरणामुळें हिंदूंच्या ठायीं बंडखोरीची वृत्ति चांगलीच बळावली होती. तीही मोगल बादशाहीचा चुराडा होण्याला पुष्कळशी कारण होती.

ही हिंदुवृत्ति बादशहावर इतकी पिसाळली होती, याला कारण औरंगजेबाचें इस्लामवेडें धोरण. हें धोरण हें एक तोंड, तर हिंदूंतील फार काळापासून मजबूत पाळेंमुळें धरून बसलेला राष्ट्रवाद हें दुसरें टोंक. यामुळेंच औरंगजेबासारख्या इस्लामवेड्या वृत्तींत अधिक कडवट-पणा व माथेफिरूपणा निर्माण झाला असावा.

औरंगजेब बादशहा सन १७०७ रोजीं पैगंबरवासी झाला. तेव्हांच मोगल बादशाही खरी गतप्राण झाली म्हणायला हरकत नाहीं. नंतर दिसत होतें तें तिचें कलेवर. हत्तीचें धूड पुरलें तरी सडायला फार दिवस लागतात; तशीच औरंजेबानंतर मोगल बादशाहीची गत होती.

मुसलमानी राजवटींचीं पोटें फाडून मराठ्यांची राजसत्ता मोगल बादशाहीच्या चालत्या काळांत जोरदार मुसंडी मारून शिवछत्रपतींच्या शिवशाहीच्या रूपानें धडकून पुढें आली. ती मराठी सत्ता क्रमाक्रमानें मोगल बादशाहीला शोषून खात फोफावली. मराठशाहीची पेशवाई हिंदुपदपादशाहीच्या डौलानें फुलारली.

मराठ्यांसारखेच शीख, आणि दुसरेही हिंदु लोक. हीं सारीं मोगल राजवटींतील जुलुमाच्या व बेदादपणाच्या क्रियेची प्रतिक्रिया शोभणारीं इस्लामविरोधी भाल्यांचीं तीक्ष्ण टोकें होतीं. औरंगजेब बादशहा त्याच्या राजवटीला विटून उत्तर भारतांतील रयतेनें त्याच्याविरुद्ध उभारलेले उठाव निर्दयपणें मोडून काढूं शकला. मथुरेंतील जाट शेतकऱ्यांनीं सन १६६९ मध्यें औरंगजेबाविरुद्ध बंड केलें होतें. एकदां नव्हे, दोनदां नव्हे, तर हे जाट शेतकरी तेव्हां वारंवार औरंगजेबाच्या राज-वटीविरुद्ध बंड करून उठत. हे उठाव औरंगजेबाच्या अंतापावेतों वीस वर्षें एकसारखे अधून मधून होतच होते. बादशहानें उठाव मोडावा, व पुन्हां कांहीं काळानें त्यानें डोकें वर करावें.

तसाच सत्नामी नांवाच्या एका हिंदुधर्मपंथांतील अगदीं सामान्य लोकांचा उठावही तेव्हां बादशाही राजवटीला जाणवण्याजोगा झाला.

या उठावांत केवळ अगदीं खालच्या थरांतील सामान्य हिंदूच होते. राजेरजवाडे, नबाब, अशा कोणाही बड्या लोकांचा पाठिंबा त्या उठावाला नव्हता. असा हा केवळ रयतेचा बादशाही जुलमी अंमला-विरुद्ध उठाव होता. त्या काळच्या एका मोगल उमरावानें तिटकाऱ्यानें ह्या उठाव करणाऱ्या सामान्य रयतेचें 'सोनार, सुतार, भंगी, ढोर या आणि इतर क्षुद्र लोकांतील पाजी आणि हलकट बंडखोरांची टोळी' असें वर्णन केलें आहे. वरिष्ठांची सत्ता म्हणजेच सरंजामदारी तेव्हां खरोखर मृत्युपंथाला लागली असतांना देखील तिच्या ठायीं केवळ अहंकार व बहुजनसमाजाविषयीं किती पराकोटीची आणि बेदरकार तुच्छतावृत्ति होती हें यावरून चांगलें दिसून येतें.

हे उठाव औरंगजेब बादशहा निष्ठुरपणें दडपून टाकूं शकला. पण मराठे आणि शीख या जमातींचे उठाव त्याला असे दडपून टाकतां आले नाहींत. यांपैकीं शीख पंथ भारतांत मोगल बादशाही स्थापन होण्याच्याही पूर्वींचा. हिंदुधर्म आणि इस्लाम यांच्यांत समान भूमिका निर्माण करून हिंदु-मुसलमानांना सलोख्यानें सहजीवन जगतां यावें या-साठीं झटणारे जे अनेक थोर पुरुष तेव्हां निर्माण झाले, त्यांपैकींच शीख पंथाचा संस्थापक गुरु नानक हा एक होय. आरंभींच्या मोगल बादशहांशीं शिखांचे संबंध सलोख्याचे होते. शीख पंथ हा तेव्हां स्वभावतः शांततावादी पंथ होता. परंतु मोगल राजवटींत हळूहळू शीख आणि मोगल यांचे संबंध बिघडतां बिघडतां औरंगजेबाच्या कारकीर्दींत तर मोगलांच्या भयंकर अत्याचारी धोरणामुळें मोगल व शीख त्यांच्या आपसांतील कडूपणाचा अगदीं कहर झाला. शीख अशा अत्याचारांपासून स्वतःचें रक्षण करतां यावें यासाठीं सशस्त्र लष्करी बाण्याचे बनूं लागले. शिखांची शक्ति मोगलांच्या विरोधाला टक्कर देत दिवसेंदिवस वाढतच गेली. आणि पंजाबमध्यें त्यांना आपल्या सत्तेचा पाया घालतां आला. शीख सत्ता पंजाबांत हळू हळू वाढीला लागली.

तथापि ह्या सगळ्यांपेक्षां मोगल बादशाहीवर खरें जबरदस्त संकट कोसळलें तें मराठ्यांचें. माणसानें घोड्यावर स्वार व्हावें त्याप्रमाणें मोगल बादशाहीची अवस्था मराठ्यांच्या मर्दुमकीच्या काळांत झाली. मोगल पडले, आणि मराठे चढले. मराठ्यांच्या छत्रपतींची सत्ता अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमाराला शाहू छत्रपतींच्या अंतानंतर त्यांचे पंतप्रधान पेशवे यांच्या हातीं गेली. आणि छत्रपति नुसते गादीला नांव सांगण्यापुरते शून्यवत् होऊन उरले. पुढें पेशवेच वंशपरंपरेनें मराठशाही-पेशवाई राजवैभवाचे धनी होऊन बसले. दिल्लीचा बादशहा तर बिचारा अगदीं दुबळा होऊन निरुपायानें पेशव्यांच्या आहारीं गेला. पेशव्यांनीं बादशहाकडून दक्षिणेंत साऱ्या साम्राज्यभर चौथाई वसूल करण्याचा मराठ्यांचा हक्क बादशहाला मान्य करायला लावला.

औरंगजेब बादशहानंतर

मोगल बादशाही म्हणायला औरंगजेब बादशहानंतर टिकलीच कुठें ? भराभर मोगल बादशाहीचे सुभे मग मध्यवर्ती सत्ता लाथाडून स्वतंत्र कारभार करूं लागले. अयोध्या, रोहिलखंड हे प्रांत स्वतंत्र झाले. दक्षिणेंत मोगल बादशहाचा वजीर असफजाह यानें आपला सवतासुभा स्थापन केला. तोच नंतरचा निजाम. तसाच बंगाल प्रांतही मोगल बादशाहींत शिरजोर होऊन तो नबाबाचा सवता सुभा बनला. बंगालच्या नबाबानें दिल्लीच्या बादशहाला आणखी नमवून त्याच्यापासून बंगाल—बिहार—ओरिसा या प्रांतांची दिवाणी उपटली.

सन १७५६ मध्यें बंगालमध्यें सिराजउद्दौला ह्या तरुण व सर्वतोपरी बेजबाबदार नबाबाचा अंमल सुरू झाला. तोंपावेतों इंग्रजांनीं कोळ्याच्या जाळ्यासारखा भारतांत बऱ्याच टापूंत आपला राजवटीवजा व्यापारी दरारा बसावितां बसवितां बंगालही चांगलाच त्या जाळ्यांत गुरफटून घेतला होता. तरीदेखील बंगालच्या नबाबी सत्तेच्या झऱ्याचा

उगम दिल्लीच्या मध्यवर्ती मोगल बादशाहींत होता. ती बादशाही आतां केवळ कल्पनेंत उरली असली तरी तेवढी तरी होती. पण सन १७३९ सालीं नादिरशहाच्या स्वारींत ती मोगल बादशाहीची राहिली साहिली सावलीही पार गाडली गेली. तरी देखील इंग्रजांनीं बादशहाला नजराणे पाठवून आपण दिल्लीच्या बादशाहाची सत्ता मानतों असा देखावा कायम ठेवला होता.

परंतु बंगालचा नवा नबाब सिराजउद्दौला याच्याशीं इंग्रजांचें त्यांच्या मनाजोगें सूत जमेना. भांडण जुंपलें. तें विकोपाला जातां जातां अखेर त्याचें प्लासीच्या लढाईंत पर्यवसान झालें.

प्लासीच्या लढाईचा प्रसंग कर्नल क्लाइव्ह यानें फंदफितुरी, खोटे दस्तैवज, विश्वासघात, असल्या किळसवाण्या करणीनें घडवून आणला. आणि त्यांतच अखेर बंगालची नबाबी बुडवून गाडून भारतांतील इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला. असा प्लासीच्या रणांगणावर सन १७५७ सालीं मूळचा स्वतंत्र भारत परतंत्र झाला. इंग्रज भारताचे जेते ठरले. आणि भारत हें इंग्रजांचें जित राष्ट्र झालें.

भारताच्या स्वातंत्र्यावर हा घाला कां व कसा पडला, हें सांगणारी ही प्लासीची शोककथा !

प्लासीची शोककथा

प्रकरण पहिलें

बंगालला इंग्रजांचें ग्रहण

१ : एक उंदीर आणि दोन कावळे

इ. सनाच्या सत्राव्या शतकाच्या आरंभीं इंग्रज भारतांत आला.

अगदीं आरंभीं आर्यही असेच भारतांत आले. जीवनार्थकलहांत कष्ट करीत करीत परिस्थितीशीं लढले. त्यांनीं भारत नांवारूपाला आणला. प्राचीन काळीं दुधामधाच्या नद्या भारतांत वाहत्या झाल्या होत्या, त्या त्यांच्या कष्टांतून आणि कर्तबगारींतून. अर्थात् त्यांत मोठा वांटा त्यांच्या हुकमतीखालीं कष्ट करणाऱ्या आर्येतरांचा होता. तसेंच त्यांच्यापूर्वी भारतांत आलेले द्रविड. त्यांच्याही पूर्वींचे आदिद्रविड. या साऱ्यांचा वांटा भारताच्या मेहनत-मशागतींत होता.

आर्यांनंतर मुसलमान आले. मुसलमानांनीं कांहीं वाईट गोष्टी केल्या असल्या तरी चांगल्या गोष्टीही बऱ्याच केल्या.

पण आर्य, त्यांच्यानंतरचे राजपूत, हे सारे जसे मागें पडले, तसेच मुसलमानही मागें पडले. तळें राखील तो पाणी चाखील हें तर खरेंच. त्याला कोण नाहीं आणि नको म्हणतो ? कष्ट करावे, पराक्रम करावे, संपत्ति पिकवावी, राखावी, वाढवावी; आपण खावी आणि आपल्या-बरोबरच्या इतरांना खाऊं घालावी. असें सुखानें जीवन कंठावें. सुखानें जीवन कंठावें म्हटलें, कीं त्यांत सुजाणपणा, माणूसकी, सारें कांहीं आलें.

आर्य आले, एवढा तोल सांभाळून वागले, तोंवर ते भले आणि त्यांच्या सत्तेखालील रयत भली. आर्य आले, त्यांनीं समाजाची नवी

घडी नीट बसविली. ते राजे झाले, सम्राट झाले. ते भलेपणानें वागले तोंवर सारें ठीक चाललें. तो भलेपणा सुटत चालला, तसें राजा आणि रयत यांच्यांत अंतर पडूं लागलें. राजा रयतेपासून दूर दूर होऊं लागला. तशीच मग रयतही राजेलोकांशीं, त्यांच्याच मालिकेंतील बड्या लोकांशीं, दबकून भिऊन वागूं लागली. परस्परांत परकेपणा वाढूं लागला.

तेव्हांपासून हुकमतखोर राज्यकर्ते निराळे, आणि हुकमत ज्यांच्यावर गाजविली जाई ती रयत निराळी. रयत कष्टाची धनी; राजे वैभवाचे आणि मनसोक्त जीवनाचे धनी.

हा झगडा अगदीं पुरातनचा; माणूस जरा खाऊन पिऊन उरलेली माया अडीअडचणीसाठीं सांठवूं लागला तेव्हांपासूनचा. त्या सांठवणीच्या मायेच्या दौलती वाढल्या. त्या सांभाळायला रखवालदार आले. ते रखवालदार दौलतीचे धनी होऊन बसले. राज्यें कमावूं आणि गमावूं लागले. तेव्हांपासून राज्यकर्त्यांच्या भरती-ओहोटीची, उदयास्तांची मालिका भारतांत एकसारखी लागलेली आहे.

पुरातन आदिद्रविडादि लोकांना आणि द्रविडांना मागें रेंटीत आर्य पुढें आले. ते भरभराटले—भरभराटले, आणि आपल्याच कृत्यांनीं मागें पडले. सिंधुकांठच्या वसतीवरून असो कीं कांहीं असो, आर्यांचेच हिंदु होऊन पुढें सरसावले. नंतर त्यांचेच बौद्ध होऊन सरसावले. तेही रयतेच्या हिताला अपुरे पडूं लागले तसे मागें पडले. त्यांतलेच राजपूत नंतर पुढें आले. तेही जसे पुढें आले, तसेच मागें पडले. आणि मग मुसलमान येऊन त्यांना गुंडाळून ठेवून भारतावर राज्य करूं लागले.

सत्राव्या शतकाच्या आरंभीं इंग्रज भारतावर व्यापारी जाळें फेकीत आले. तेव्हांच अथवा त्याच्याही पूर्वीं युरोपांतून पोर्तुगीज आले. डच लोक आले. इंग्रजांच्या जरा मागाहून फ्रेंच लोक आले. त्या काळांत भारतांत मुसलमानी राजवट कधीं कमी तर कधीं जास्त पण बळजबर होती. इंग्रजांच्या अगोदरचें आपण सोडून देऊं. पण विलायतेंत पूर्वे-

कडील देशांशीं व्यापार करण्यासाठीं सन १६०० सालीं इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. त्यानंतर आठ वर्षांनीं पहिल्या इंग्रजाचे पाय भारताच्या किनाऱ्याला लागले. तेव्हां भारतांत मोगल बादशहांची मुसलमानी राजवट नांदत होती. परंतु तिचा सूर्य मावळतीकडे ढळला होता.

अकबर बादशहा हा मोगल राजवटींतीलच नव्हे, तर तोंपावेतोंच्या जगांतील साऱ्या राजवटींतील एक फार थोर बादशहा गणला जातो. तो अकबर बादशहा पैगंबरवासी झाला; आणि त्याचा खुशालचेंडू शहाजादा जहांगीर हा बादशहा झाला. या जहांगीर बादशहाच्या कारकीर्दींतच सन १६०८ सालीं कॅप्टन हॉकिन्स हा पहिला इंग्रज सात हजार मैल अंतरावरून आपल्या ‘ हेक्टर ’ जहाजांतून सप्तसमुद्र ओलांडून भारतांत आला.

कॅ. हॉकिन्स इंग्लंडच्या जेम्स राजाचें भारताच्या जहांगीर बादशहाच्या नांवानें शिफारसपत्र घेऊन आला. पहिल्याप्रथम त्यानें सुरत बंदरांत आपल्या जहाजाचा नांगर टाकला, आणि तो तिथून मग आग्रा नगरांत जहांगीर बादशहाला भेटायला गेला.

“ वा: ! किती छान बादशहा आहे हा ! ” असे जहांगीर बादशहाविषयीं धन्यतेचे उद्गार हॉकिन्सच्या तोंडून समाधानपूर्वक निघूं लागले. कां निघणार नाहींत ? बादशहाच्या दरबारांत त्याला घरजांवयासारखें मानानें वागविलें गेलें. पण बादशहानें रंगेलपणानें उदार होऊन एक फक्कडशी आर्मेनियन ख्रिश्चन तरुणी पाहून तिच्याशीं त्याचा संसार थाटून दिला. म्हणून बादशहा भला.

हॉकिन्स मनांत म्हणत होता, “ इथेंच राहूं आपण, आणि आपला इंग्रजी जम मनाजोगा बसवूं. आपणाला खूप मानमरातब आहे. बादशहा आपणावर खूष आहे. इथेंच राजधानींत सुखाचा संसार करून ऐषआरामांत राहायला काय हरकत आहे ? ”

पण ते त्याचे मनांतले मांडे मनांतच जिरण्याची वेळ आली.

दोन कावळे एका उंदरासाठीं एकमेकांवर चडफडूं लागावे, तसें ह्या इंग्रजांच्या अगोदर त्या उंदरावर डोळा ठेवून पोर्तुगीज ख्रिस्ती बादशहाच्या दरबारांत ठाण मांडून बसले होते. ते हॉकिन्सची दरबारांत चलती पाहून आपसांत खलबतें करूं लागले, " कानामागून आला आणि तिखट झाला हा इंग्रज. आतां कसा कांटा काढावा याचा ? "

हॉकिन्सला पोर्तुगीजांचा फार राग आला. पण करतो काय ! ते त्याच्याही अगोदर बादशहाच्या दरबारांत आणि परिवारांत आपला जम बसवून बसलेले. त्यांना दरबारची सारी परिस्थिति अनुकूल. त्यांनीं बादशहाच्या कुणा खुषमस्कऱ्याला हाताशीं धरून बादशहाकडे भलतीसलती चुगली केली, आणि बादशहाची लहर फिरली तर ?

" या विषाची परीक्षा पाहणें नको. " असें म्हणून हॉकिन्स एके दिवशीं घडपणानें गाशा गुंडाळून सुरतेला माघारा गेला. सुरत हें देखील तेव्हां दर्यावर्दी पोर्तुगीजांनीं आपलें बस्तान बसवून मजबूत केलेलें ठाणें खरें. पण तिथें कांहीं त्याला फारसा त्रास झाला नाहीं. कारण माणसाला लहरीप्रमाणें घटकेंत घोड्यावर आणि घटकेंत गाढवावर बसविणारा तो कांहीं मोगलांचा दरबारी अंमल नव्हे.

परंतु हॉकिन्सच्या मनांत मात्र पोर्तुगीजांच्या ठाणेदारीचें शल्य बोंचत होतें. त्याचा परिणाम व्हायला फार वेळ लागला नाहीं.

२ : इंग्रज बळावूं लागला

चार वर्षें कांहीं लोटलीं नाहींत. तोंच सन १६१२ सालीं तिकडून विलायतेहून कॅप्टन थॉमस बेस्ट हा दुसरा दर्यावर्दी इंग्रज लढाईच्या तयारीनें बरोबर चार जहाजें दारूगोळा व शस्त्रास्त्रें भरून घेऊन सुरतेवर चालून आला. तोफा-बंदुकांचा भडिमार करून थॉमस बेस्टनें सुरतेच्या पोर्तुगीजांचा अगदीं धुव्वा उडवून दिला.

" हे कोण पोर्तुगीजांना शेराला सव्वाशेर भेटले ? " सारे म्हणूं लागले.

मोगल बादशहाच्या दरबारांतील सारे रथीमहारथी सुरतेंत इंग्रजांना पोर्तुगीजांवर मिळालेला विजय ऐकून आश्चर्यचकित झाले. सुरत बंदर बादशहाचें खरें. पण इतक्या दूरवरून हजारों कोस अंतरावरून भारतांत येऊन पाय रोवून बसलेल्या पोर्तुगीजांकडे पाहूनच बादशहाच्या कारभाऱ्यांना अचंबा वाटे, "अहो काय शूर आणि धाडसी लोक आहेत हे! इतक्या दुरून जहाजांत बसून भारतांत येतात काय, मलबारांत भारताच्या किनारपट्टीवर पाय रोंवतात काय, तेथल्या राजेलोकांना भुरळ घालतात काय, धीटपणानें आपल्या ख्रिस्ती धर्माचा जम बसवीत सुटतात काय, भराभर लोकांना बाटवून ख्रिस्ती करतात काय; आणि आपण जसे कांहीं राज्यकर्तेंच अशा तोऱ्यानें वागून आपला दरारा बसवितात काय!"

नांव धर्माचें; आणि गांव व्यापारवाढ व राज्यस्थापना अशा मतलबसाधूपणाचें. हा सगळ्यांचाच खाक्या. तसाच पोर्तुगीजांचाही खाक्या. पण तिकडे तेव्हां कोण कशाला लक्ष देतात ?

पण पोर्तुगीजांनाही पाणी पाजणारे त्यांच्या सवाई इंग्रज भेटल्यावर बादशहालाही वाटूं लागलें, "यांच्यांत कांहीं विशेष पाणी आहे. अशा लोकांना पदरीं थारा दिला, तर अडीअडचणीला आपणाला यांचा उपयोग होईल."

"बादशहांचा आणि ईस्ट इंडिया कंपनीचा तह व्हावा." इंग्रजानें बादशहाला विनंति केली. बादशाही दरबार त्याला एकदम कबूल.

"इंग्रज वकील बादशहांच्या दरबारीं असावा." तेंही कबूल.

"सुरतेला वखार घालायला कंपनीला परवानगी असावी." मंजूर.

परंतु मोगलाई दरबार तो. बोलक्या शंखासारख्या वशिल्याच्या तट्टांच्या जिवावर मागण्या भराभर मंजूर झाल्या, तरी त्यांची अंमलबजावणी हीच खरी अवघड बाब. त्याचाही अनुभव इंग्रजांना आला. दोन वर्षांनीं सन १६१५ सालीं सर टॉमस रो हा इंग्रज वकील मोगल दरबारांत आला; आणि प्रत्यक्ष तहाच्या वाटाघाटींना तोंड

लागलें. तेव्हांपासून उणींपुरीं चार वर्षें वाटाघाटी होऊन अखेर कांहींसा इंग्रजांच्या मनासारखा तह झाला.

अशी एक इंग्रजी म्हण आहे कीं हत्तीच्या शेपटीचें टोंक यंत्रांत सांपडलें पुरे, कीं हळू हळू सबंध हत्ती त्या यंत्रांतून पिळला जातो. तशीच गत त्या मोगली हत्तीची. त्या बिचाऱ्याला काय कल्पना, आपल्या शेपटीचें टोंक यंत्रांत अडकतें आहे याची !

" कांहीं हरकत नाहीं. सुरतेला वखार घालण्याची परवानगी तर पदरीं पडली ! आतां त्या एकाचे एकवीस आणि पांचांचे पंचवीस करायची हिंमत आमच्या अंगीं आहे. " अशा आत्मविश्वासानें कंपनीचा इंग्रज तेव्हांपासून रेंटेबाज धोरणानें वागूं लागला.

सुरतेला वखार झाल्यावर पश्चिम किनाऱ्यावर ठिकठिकाणीं मोक्याच्या जागीं कंपनीच्या वखारी संसार थाटूं लागल्या. हळूहळू भारतांत किनाऱ्याकिनाऱ्यानें त्यांचें व्यापारी जाळें विणलें जाऊं लागलें.

तो व्यापार म्हणजे इतका किफायतशीर, कीं सहज मातीच्या ढेकळाला हात घालावा, आणि सोन्याचा दगड हातीं लागावा.

भारतांतील मातीदेखील सोन्याची आहे, असें वाटण्याइतपत भारतांतील संपत्तीच्या रसाळ सोनेरी कथा ऐकून तर हे युरोपांतील देशांमागून देशांतले संपत्तीला हपापलेले गोरे लोक भारताकडे धाव घेऊं लागले होते.

" अरे वाः ! आपण ऐकत होतों तें कांहींच नाहीं, इतकी संपत्ति भारतभर पायदळीं लोळते आहे. आम्हीं व्यापार करून कुठें कुठें आणि काय काय म्हणून लूट मिळवावी ? " असे जे कोणी गोरा पोर्तुगीज, डच, इंग्रज अथवा फ्रेंच इकडे येतील त्यांचे डोळे भारताचें वैभव पाहून फाटून जायचे.

तरी पण संपत्तीच्या लोभांतून माणूस कधीं सुटला आहे ? तशांत इंग्रज हा तर गोचिडासारखा संपत्तीचें शोषण करायला सरावलेला धूर्त

बनिया माणूस. त्यानें ऐकलें आणि पाहिलेंही, कीं बंगालचा टापू हें जणूं संपत्तीचें घबाड आहे.

" काय केलें म्हणजे हें घबाड आपल्या घशांत पडेल ? " अशी ईस्ट इंडिया कंपनींतील प्रत्येक इंग्रजाच्या जिवाला हुरहुर लागून राहिली.

बेबंदशाही मोगल राजवटींत भारतभर सन १६३० सालीं भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत अवर्षणांत समुद्रकिनारीं मरून पडलेल्या मासळीवर ताव मारायला कावळ्यांना फावतें तसा इंग्रजाला बंगालवर व्यापारी ताव मारायला सांपडला. तेव्हांपासून तर इंग्रजांच्या जिवाची हांवरी हुरहुर बेसुमार वाढली.

३ : बादशहाला कसें झुलवावें ?

" आतां आपण काय युक्ति करावी म्हणजे ह्या शहाजहान बादशहाला आमच्या मर्जीप्रमाणें झुलवतां येईल ? त्यानें कांहींही करून ह्या पोर्तुगीजांना बंगालमधून हाकलून लावलें पाहिजे." हा एकच विचार त्या दुष्काळांत मरणाच्या दारीं पडलेल्या बंगालवर ताव मारायला सोकावलेल्या ' आणखी खाईन ! आणखी खाईन ! ' अशी चटक लागलेल्या इंग्रजांच्या डोक्यांत घोळत होता. इतकें इंग्रजांच्या तोंडाला पाणी सुटायला कारण तो सन १६३० सालचा दुष्काळ !

तेव्हां सुरत हें इंग्रजांचें भरभराटलेलें मुख्य ठाणें. विलायतेतून जहाजें माल घेऊन यायचीं तीं सुरतेच्या बंदरांत नांगरून उभीं राहायचीं. ती मालाची मुख्य उतारपेठ. तिथून मग माल किनाऱ्यावरील निरनिराळ्या ठाण्यांवर पावता व्हायचा.

ठिकठिकाणचा माल, बंगालमधलें उंची कापड, सोरा वगैरे जहाजें भरभरून यायचा तोही मुख्यतः सुरतेला. तिथून मग मातीचें सोनें करायला चाललीं जहाजें भरभरून विलायतेला. तशींच युरोपांतील इतर बंदरी बाजारपेठांकडेही.

परंतु ही जशी इंग्रजांची व्यापारी चंगळ तेव्हां चालायची, तशीच त्यांच्या डोळ्यांदेखत पोर्तुगीजांचीही चंगळ चाललेली दिसायची. ती त्यांना पाहवायची नाहीं.

विशेषत: बंगालमध्यें आपणांसारख्या दुष्काळांत रंजीस आलेल्या विणकरांवर आणि पाटण्याच्या लहान लहान सोरा-खाणकारखानदारांवर मनसोक्त चरतांना पोर्तुगीजांचें एक पाऊल आपल्यापुढें पडलेलें इंग्रजांनीं पाहिलें. तेव्हांपासून त्यांना चुटपुट लागून राहिली होती, कीं काय पाहिजे तें करावें पण ह्या पोर्तुगीजांचा बंगालमधून कायमचा कांटा निघेल असें करावें.

वास्तविक तो देशावरचा दुष्काळाचा प्रसंग म्हणजे मानेवर पडलेली आकाशची कुऱ्हाड. पण ती आकाशची कुऱ्हाड कोसळली, ती नेमकी ह्या साहसी कावेबाज गोऱ्या व्यापाऱ्यांनीं अलगद झेलली. त्या कुऱ्हाडीच्या जोरावर इंग्रज आणि पोर्तुगीज या दोघांनींही त्या दोन तीन वर्षांत बंगालची बेसुमार शिकार साधली. तेव्हांपासून तर पोर्तुगीजांना आपण बंगालमधून कसे हांकलतोंसें इंग्रजांना होऊन बसलें होतें.

जिवावरच्या प्रसंगांतही जितका नाहीं, तितका माणूस पोटांतली भुकेची आग भडकली आणि विझेनाशी झाली कीं आपलें मरण आपण पाहावें तसा माणूसकीला विसरतो.

अगदीं तसेंच त्या दुष्काळांत झालें. लोक आपल्या बायकामुलांना वाऱ्यावर टाकून भुकेसाठीं वणवण करीत सुटले. स्त्रियांनीं कुळंबिणीच्या—गुलामांच्या—मोलानें स्वत:ला विकून घेतलें. आयांनीं आपलीं लेकरें पै-पैशाला अथवा घांसभर अन्नाला विकलीं. आईबापांना पारख्या झालेल्या मुलांनीं स्वत:ला पोटासाठीं गुलाम म्हणून विकून घेतलें. कांहीं कुटुंबांतील मंडळींनीं विष खाऊन एकदम जीव दिले. अनेकांनीं पोटांतली आग विझेना, त्या यातनांनीं नद्यांत उड्या घेऊन जीव दिले. आईनें लेकरांना घेऊन नदीकांटीं जावें, आणि आपल्या त्या चिल्यापिल्यांना पोटाशीं

कवटाळून त्यांच्यासह जलसमाधि घ्यावी. नद्यांतून जिकडेतिकडे प्रेतेंच प्रेतें वाहूं लागलीं. मेलेल्या प्राण्यांचें मांसदेखील वायां जाऊं द्यायला लोक तयार होईनात. इतकेंच काय, पण मेलेल्या माणसांचीं आंतडीं फाडून खाण्यापावेतों भुकेलेल्यांची मजल गेली. रस्त्यावर मरायला टेकलेलीं माणसें मुडदेमुद्दल पडलेलीं आढळलीं, कीं तीं धरावीं आणि फाडून खावीं. असें माणसांनीं माणसांना खाऊन जगण्याची धडपड करीपावेतों पाळी आली. त्यामुळें माणसांना रस्त्यानें हिंडण्याफिरण्याचीही पंचाईत झाली !

बंगालच्या लोकांना तेव्हां त्यांतल्या त्यांत जरा हायसें वाटत होतें याचें कारण त्यांचा मुख्य धंदा विणकरीचा. कितीतरी दिवसांपासून डाक्काचें तलम कापड साऱ्या जगभर प्रसिद्ध. युरोपांतील व्यापाऱ्यांनीं इकडे येऊन तें मातीमोलानें विकत घ्यावें, आणि सोनेंमोलानें आपल्या देशांत व आजूबाजूंच्या बाजारपेठांत विकावें.

गुजराथेंत दुष्काळाचा कडाका फार. तिकडील विणकर बहुतेक सारे पटापट ठार झाले. पण बंगाल्यांतले विणकर कसेबसे मरेमरेतों राबून जगत होते. कंपनीचे इंग्रज त्यांना जगवायला गेले.

त्या विणकरांना जगवायचें कशासाठीं? तर त्यांना राबवून त्यांच्या-कडून उत्तम कापड विणून घेऊन त्या व्यापारावर गब्बर होण्यासाठीं. बंगाल-बिहारचें कापड आणि पाटण्याचा सोरा. ह्या नेहमींच्याच तेव्हां इंग्रजांच्या दावणीला सांपडलेल्या कामधेनु. त्यांत आणखी या नव्या कामधेनूची दुष्काळाची भर.

दुष्काळ जरा जरा ओसरला, तरी इंग्रजांचा व्यापारी जम जो एकदां सगळीकडे व विशेषतः बंगाल्यांत बसला, तो कायमचा. पण त्यांतही एक अडचण होती. हें अफाट संपत्तीचें घबाड चावून खाण्याचे श्रम त्यांना पडत होते. पोर्तुगीज लोक आपलें व्यापारी जाळें बंगालभर अगोदरच पसरून बसले होते.

“ही पोर्तुगीजांची पीडा कशी टाळावी ?” ही इंग्रजांची डोकेंदुखी वाढत्या नफेबाजीबरोबर वाढत होती. पोर्तुगीज हुगळीला चांगलाच तळ देऊन बंगालला पिळून खात बसले होते.

पण ऊंस गोड लागला म्हणून पोर्तुगीज तो मुळापासून चावून खाऊं लागले. आणि तोंडांत माती पडली.

एके दिवशीं इंग्रजांना आनंद देणारी वार्ता येऊन धडकली. “दिल्लीच्या शहाजहान बादशहानें पोर्तुगीजांवर सैन्य पाठवून त्यांचा अगदीं धुव्वा उडविला. हुगळी बंदराचा अगदीं चुराडा झाला. बंदरांत एकही पोर्तुगीज जहाज शाबूत उरलें नाहीं.”

शहरांत म्हणे एकही पोर्तुगीज बाकी उरला नाहीं. एकेकाला धर, पकड, बांध मुसक्या, कीं पाठव आग्र्याला बादशहाकडे.

इकडे हुगळींत पोर्तुगीजांची बादशहाकडून अशी ससेहोलपट झाली, ही बातमी सुरतेला जाऊन थडकली. तेव्हां प्रत्येक इंग्रजाच्या तोंडून समाधानाचे उसासे सुटूं लागले.

“छान, छान झालें. सुंठीवांचून खोकला गेला. नाहीं गॅब्रिएल ?”

जो तो इंग्रज गालांतल्या गालांत खुदुखुदु हंसत डॉ. गॅब्रिएल बाउटन या आपल्या सहकाऱ्याच्या कानाशीं लागून मनांत उसळलेला आनंद बोलून दाखवूं लागला.

“पण आज जी पाळी पोर्तुगीजांवर आली, तीच उद्यां आमच्यावर आली तर ?” मध्येंच बाउटननें शंका घेतली, “बोलूनचालून मोगल बादशाही ही. आपली केव्हां उलटी अंबारी होईल याचा नेम नाहीं. बादशहाला ज्या अर्थी पोर्तुगीजांच्या डोळ्यांतलें कुसळदेखील दिसलें, त्या अर्थी इंग्रजांच्या डोळ्यांतलें मुसळ त्याला दिसणार नाहीं, एवढा भरवंसा आपण तरी कसा बाळगावा ? आपणांविरुद्ध ओरडणारे, बादशहाचे कान फुंकणारे भानगडी लोक बादशहासभोंवार कांहीं थोडेथोडके नाहींत.”

त्या बैठकींत परका कोणी नव्हता. म्हणून मनमोकळेपणानें बोलणें चाललें होतें. गोष्टीवरून गोष्टी निघतां निघतां एकेकजण आपल्या हिकमतीच्या आठवणी रसाळ जिभेनें सांगूं लागला.

त्या सगळ्या हिकमतींची गोळाबेरीज अशी कीं बादशहा—बादशहाच नव्हे तर शहाजादे, दिवाण, वजीर, नबाब अशा कोणाही खानदानी बड्याच्या मर्जींतलीं खास ठेवणींतलीं अशीं माणसें जीं असतील, त्यांना नीट हाताशीं जो धरील, त्याचें काम ताबडतोब फत्ते. फाटका यःकश्चित् दिवाणा हुजऱ्या जें काम करील, तें दिवाणालाही करतां यायचें नाहीं.

अशा गप्पागोष्टी होतां होतां पोर्तुगीजांच्याऐवजीं आतां आपल्या कंपनीनें बंगालमध्यें कसा जम बसवावा, त्यासाठीं काय काय आणि कसकशा हिकमती कराव्या, याचे आराखडेही रेखाटले जाऊं लागले.

बादशाही दरबारच्या डोळ्यांत कशी धूळ फेकावी, आणि बंगाल-मध्यें आपलें व्यापारी घरटें हळूहळू कसें मजबूत बांधावें, याविषयींच्या इंग्रजी गप्पा अगदीं ऐन रंगांत आल्या होत्या.

तेवढ्यांत सुरतेच्या मोगल सुभेदाराचा घोडेस्वार जासूद घोडा फेकीत वखारीपुढें उभा. तो सुभेदाराकडून तांतडीचा निरोप घेऊन आला होता.

त्यासरसा पहिल्या क्षणीं वखारींतील सर्व इंग्रजांच्या पोटीं भीतीचा गोळा उठला, " हुगळीचे पोर्तुगीज सुभेदारानें भेटीला बोलावले आणि एकदम कैद केले म्हणून आपण ऐकलें. तसाच हा प्रसंग आपणावर येऊं घातलेला नाहीं ना ? "

असे भीत भीत हळूच एकमेकांत विचारीत डॉ. डाउटनला सर्वांनीं पुढें केलें. कारण तो सुभेदाराच्या ओळखीचा होता. त्यानें बरोबर आणखी दोघे घेतले. हो ! परस्पर आंधारांत घाव पडल्यासारखी कैद झालीच, तर वखारीवर बातमी मिळण्याची तरी कांहीं सोय असावी !

डॉ. डाउटन आणि ते दोघे त्या जासुदाबरोबर सुभेदाराच्या वाड्यावर गेले.

वखारींतील प्रत्येक इंग्रज मनांतून मुंगीएवढा होऊन चिंता करीत होता, " काय प्रसंग ओढवूं घातला आहे न कळे ! "

४ : बंगालचा नबाब अलीवर्दीखान

तो दिवस सोनें मुखीं धरून सुरतेच्या इंग्रजांच्या वखारींत उगवला होता.

थोड्या वेळानें डॉ. डाउटन हंसतमुखानें माघारा आला. सारे त्याची वाटच पाहत होते. त्याची गाडी दुरून येतांना पाहिली तेव्हां सर्वांच्या जिवांत जीव आला.

" कांहीं नाहीं; आग्र्याला शहाजादी आजारी आहे. भाजली आहे. साऱ्या हकीम-वैद्यांनीं हात टेकले. तिला औषधोपचार करण्यासाठीं सुरतेच्या इंग्रजी वखारींत कोणी चांगला डॉक्टर असेल तो ताबडतोब पाठवून द्यावा, असा आग्र्याहून बादशहाचा तांतडीचा हुकूम घेऊन सांडणीस्वार आला आहे. मला आजच्या आज आतांच्या आतां तयारी करून निघालें पाहिजे." डॉ. डाउटन म्हणाला. आणि तसाच कपडे व औषधें आवरून बरोबर घेण्याच्या तयारीला लागला.

* * *

योगायोग असा कीं, डॉ. डाटउनच्या हातांना यश आलें. बादशहा शहाजहाननें तर शहाजादीची अगदीं आशा सोडली होती. त्याला शहाजादी चांगली बरी झालेली पाहून वाटलें, हा साक्षात् परवरदिगर अल्ला आपल्या हांकेला या डॉक्टरच्या रूपानें भेटला.

" मी तुमच्यावर अगदीं खूष आहें डॉक्टर ! माझ्या मुलीला तुम्हीं जीवदान दिलें. तुम्हीं त्या उपकाराबद्दल काय पाहिजे ती मागणी मागा." बादशहानें डॉ. डाउटनला सन्मानपूर्वक आपल्या दरबारांत बोलावून सांगितलें.

डॉ. डाउटन मुंगी होऊन साखर खाणारा हिकमती. तो अत्यंत नम्रपणानें म्हणाला, " बादशहांच्या पायांपाशीं माझी एकच अर्जी आहे."

" बोला. काय वाटेल तें मागा."

" आमच्या इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीला बंगालमध्यें जकातमाफ व्यापार करण्याची मोकळीक नबाबांनीं आम्हांला द्यावी."

" अलबत ! अर्जी मंजूर. एवढेंच ? आणखी कांहीं मागा."

" बंगालमध्यें आम्हांला आमच्या व्यापाराच्या सोईप्रमाणें वखारी घालण्याची परवानगी असावी. तसेंच आमचीं जहाजें सध्यां आम्हांला फक्त पिपलीपावेतोंच नेतां येतात. तिथून आयात निर्यात मालाची वाहतूक करतांना आम्हांला फार त्रास होतो."

" मंजूर. त्यासाठीं काय मागणें आहे ?"

" आम्हांला आमचीं जहाजें हुगळीपावेतों नेऊन नांगरण्याची परवानगी असावी. एवढी मेहेरनजर आमच्यावर असावी."

" मंजूर."

ताबडतोब तसें सर्व मागण्यांचें बादशाही फर्मान ईस्ट इंडिया कंपनीच्या नांवानें डॉ. बाउटनच्या हातीं पडलें. 'शुभस्य शीघ्रं' म्हणत तो तसाच तें फर्मान घेऊन परस्पर बंगालकडे रवाना झाला.

शहासुजा हा तेव्हां बंगालचा मोगल सुभेदार. त्याची राजधानी राजमहाल नगरांत. तिथें डॉ. बाउटन जाऊन त्याला भेटला.

तिथेंही भाग्योदयाची सुवर्णसंधि इंग्रजाची वाट पाहत अगदीं पायाच्या दासीसारखी हात जोडून उभी !— सुभेदाराची आवडती बेगम फार आजारी होती. तिलाही डॉ. डाउटननें औषध देऊन बरी केली.

मग काय ? सुभेदार निहायत खूष ! त्यानें बादशाही फर्मानाची अंमलबजावणी तर ताबडतोब सुरू केलीच. पण त्याखेरीज इंग्रज मग आपल्या व्यापारवाढीसाठीं सुभेदाराच्या अधिकारांतील सवलती मागेल तेवढ्या थोड्या !

* * *

असा इंग्रजी राजवटीचा सूर्य आतां भारतावर उगवूं घातला होता. बंगालमधून पोर्तुगीजांची उचलबांगडी झालीच होती. इंग्रज हा उपकारी माणूस. त्याच्यावर बादशहाची मर्जी बसली. बंगालच्या सुभेदाराची मर्जी बसली. इंग्रज लाख माणूस ठरला.

मग काय ! इंग्रज साऱ्या बंगालभर व्यापार करील आणि नफा मिळवील तेवढा थोडा. त्याला सर्वतोपरी रान मोकळें सांपडलें.

आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें, अशी ती मोगली राजवट. ती कांहीं अकबर बादशहाची मोगल राजवट नव्हे. अकबराला माहीत होतें, कीं रयत सुखी तर राजा सुखी. तोही हुकूमशहा बादशहाच खरा; पण— आला आपला राजाराणीच्या पोटीं जन्माला, आणि आयत्या राज्याचा राजा झाला, अशांतला बादशहा नव्हे. तो गादीवर आला तेव्हां जवळजवळ नांवापुरता बादशहा होता. तेव्हां नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा, तशी त्याच्या बादशाहीपणाची गत !

जी काय मोगल बादशाही भरभराटून उभी राहिली, ती अकबराच्या कारकीर्दींत. त्याच्यानंतर मुलगा, नातू हे जे एकामागून एक बादशहा गादीवर आले, ते थोडेफार कर्तबगार असले तरी ते एकाहून एक आयत्या बिळांत नागोबा. चांगलें असें फारसें कांहीं त्यांनीं केलेंच नाहीं. त्यांना चांगलें कांहीं करायला कधीं सुचलेंच नाहीं. आणि चांगलें कांहीं करतांही आलें नाहीं.

नाहीं तर मोगलांच्या कारकीर्दींत भारताचें साम्राज्यशाही वैभव जगांतील बादशहांना लाजवील असें होतें. एवढा मोठा राजसूय म्हणून जगांत प्रख्यात पावलेला फ्रान्सचा बादशहा चौदावा लुई. काय त्याचा दरबार ! काय त्याचें वैभव ! पण भारतांतील मोगलांच्या बादशाही वैभवापुढें फ्रान्सचें बादशाही वैभव किती थिटुकलें दिसायचें ! सारें जग तेव्हां म्हणे कीं मोगल बादशहासारखे ऐश्वर्यसंपन्न राजे साऱ्या पृथ्वीवर दुसरे नाहींत.

अकबरानंतरचा दिल्लीचा बादशहा जहांगीर, आणि जहांगीरनंतरचा वैभवशाली बादशहा त्याचा मुलगा शहाजहान. काय ते भव्य राजमहाल, आणि टोलेजंग, प्रचंड व सुंदर किल्ले त्यानें बांधविलेले ! साऱ्या जगांतील शिल्पसौंदर्याचा प्रकाश म्हणून शोभणारा, त्याच्या प्रेयसीची कबर शोभणारा, तो त्रिभुवनसुंदर ताजमहाल !

" जगांत जर सर्व सुखांचें आणि समृद्धीचें नंदनवन कुठें असेल, तर तें माझ्या बादशाहींत आहे." असें शहाजहान अभिमानानें म्हणायचा. ' दिवाण-ई-आम ' महाल त्यानें दिल्लीला बांधला. त्या महालाच्या महाद्वारावर सोनेरी अक्षरांनीं त्यानें कोरून ठेवलें होतें, तें अद्यापिही आढळतें. तें असें—

अगर फर्दौस बरु-इ-झमिन अस्थ,
हमिन अस्थ, वो हमिन अस्थ, वो हमिन अस्थ !

पण हा स्वर्ग—हें नंदनवन कुणाला ? तर ज्यांच्या हातीं सत्ता आणि संपत्ति, जे असे घोड्यावर स्वार झालेले माणूस, त्या थोड्या बादशहा-शहाजादे-दिवाण-नबाब-सुभेदार-जहागिरदार-जमीनदार-शेटसावकार-काजी-मुल्ला-मौलवी यांना, आणि त्यांच्या ताटापाशीं आपल्या वाट्या ठेवून सुखाचा मार्ग आक्रमण करणारे जे बिगरमुसलमान बडे असतील त्यांनाही. बाकीच्या कोटमाप रयतेसाठीं त्या स्वर्गलोकाखालीं नर्कलोकींचें कष्टमय जीवन ठेवलेलें होतें.

आधीं मुळीं अकबरानंतर मोगल बादशाही टिकली ती कशी ? आपसांत हाणामारी खून दंडेली करून. बादशहा मेला रे मेला, कीं त्याच्या शहाजाद्यांत झाली गादीसाठीं लठ्ठालठ्ठी सुरू. राजघराण्यांत व बाहेर ओंगळ कट व कारस्थानें किती. वारसाहक्कासाठीं डावपेंच आणि लढाया किती ! मुलगा बापाविरुद्ध बंड उरून उठायचा. बाप लेकाचे आणि लेक बापाचे डोळे काढायला, त्याला तुरुंगांत लोटायलाही कमी करायचा नाहीं. भावांविरुद्ध भाऊ उठाव करायचे. असे ते बादशहा.

जसे बादशहा तशी त्यांची राजवट ! रयतेकडून करा चोपून कर-वसुली, आणि करा ऐषआराम.

म्हणून तर त्यांच्या राजवटींत अधून मधून दुष्काळ पडायचे. रोगराईच्या भयंकर साथी यायच्या. आणि हजारों-लाखों लोक त्यांत पटापट मरायचे !

अकबर बादशहा सत्राव्या शतकाच्या अखेरीला (सन १६०५) पैगंबरवासी झाला मात्र, आणि मोगल बादशाही हळूहळू खालीं डोकें वर पाय करून डोकीवर चालूं लागली ! देशांत मुसलमान मूठभर तर हिंदु—बिगरमुसलमान सूपभर. पण ती मूठ सुपांतल्यांना हळूहळू चेंचीत बुकलीत-कुटीत सुटली.

"कुठवर सहन करावा असला जुल्म ?" असें रयतेला होऊन गेलें. तिला उठाव करतां आला नाहीं. जाचणारी राजवट उलथून पाडतां आली नाहीं. तरी रयत म्हणजे राजवटीच्या पायाचे दगड ते. एकेक चिरा ढांसळू लागला, कीं सारा पाया ढांसळायला आणि त्या पायावरची इमारत कोसळायला कितीसा उशीर !

सांचलेल्या पाण्यांत डांसांना अंडीं घालायला फावतें. शहाजहान बादशहाच्या कारकीर्दींत एवढा मोठा दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत इंग्रजांना भारतांत आपले हातपाय पसरायला फावलें.

त्या भयंकर दुष्काळांत तेव्हां रयतेवर बादशहाची मेहेरनजर काय ? तर शेतसाऱ्यांत अकरावा हिस्सा सूट !

"आं: ? माझ्या शेतांत कांहीं पिकलें नाहीं. घरांतलीं माणसें आणि गोठ्यांतलीं गुरेंढोरेंवासरें पटापट मेलीं; त्या भोगांत शेत मला पेरतांही आलें नाहीं. पेरलेंच नाहीं, तर उगवेल कुठून ? तरी हा राजा अकरावा हिस्सा सूट देऊन बाकीचा शेतसारा माझ्यापासून चोपून वसूल करणार ? तळपट होवो अशा राजाचें." अशी रंजली गांजली रयत अंत:करणांत दुःखानें काढायची.

" अरे, काय करायचे आहेत तुमचे राजमहाल आणि ताजमहाल? आम्हां रयतेला मरेमरेतों राबवून, आमच्या रक्तामांसाचा चिखल करून त्या चिखलांत रचलेलें तें बादशाही वैभव. कुठचा अल्ला आणि कुठचा राम-कृष्ण-गोविंद बरकत देईल असल्या बादशाही आणि राजशाही दौलतीला? आम्हां रयतांनाच पिळून कर उपटतां तुम्ही राजेमहाराजे-बादशहा. त्या वैभवावरचें लोणी तुम्ही आणि तुमच्या छेलछबेल्या अशा परि-वाराच्या ऐषआरामासाठीं जातें. खालीं ताकाचें पाणी राहतें; तें पाणी आम्हां कष्टकऱ्यांना पाजायचें. आम्हांला वर्षानुवर्षे उन्हातान्हांत मरे-मरेतों राबवायचें. आणि ताजमहाल आणि मशिदी उभारायच्या आमच्या कष्टांवर आमच्या थडग्यांसारख्या. तीं आमचींच थडगीं आमच्याच हातून बांधून घेतां जणूं तुम्ही."

असले हे रयतेचे मुके कढ. अफगाण सुलतान झाले काय, राजपूत राजे झाले काय, किंवा मोगल बादशहा झाले काय, सारखेच. कुठें उजवें तर कुठें डावें; पण एकूण सगळाच असा झोटिंगशाही कारभार.

असल्या झोटिंगशाही कारभारांतच मनगटाच्या जोरावर बंगालवर आपली सत्ता गाजवूं लागलेला बंगालचा मनगटमस्त नबाब अलीवर्दीखान.

" बस्स ! आपणही कां आपली स्वतंत्र सुलतानशाही स्थापन करूं नये? बंगाल, बिहार, ओरिसा हा हरजिनसी दौलतीनें ओसंडलेला मुलुख घ्यावा ताब्यांत, आणि व्हावें सुलतान. दिल्लीच्या बादशहाचें बुजगावणें हवेंच कशाला?" अलीवर्दीखानानें विचार केला.

त्याच्या मनांत विचार आला कीं पुरे. त्याची अंमलबजावणी व्हायला उशीर नाहीं. तेव्हां दिल्लीचा बादशहा म्हणजे जणूं बंगालच्या नबाबाच्या पिंजऱ्यांतला पोपट. घालावें तें गोडधोड खायचा; वदवावें तें वदायचा. कोणीही यावें, हिकमती कराव्या, जरा गोड बोलावें, जरा दटावावें, जरा तोंडावरून हात फिरवावा, तर कधीं चपराक लगावण्याचा आव आणावा.

"बंगाल, बिहार, ओरिसा हा मुलुख मीं माझ्या ताब्यांत ठेवणार." अलीवर्दीखान बादशहाला जरा ठांसून म्हणाला. मात्र म्हणाला तें नुसतेंच कोरडें म्हणाला नाहीं. त्या मागणीवर दोन कोटींची रोकड, आणि सोनेंनाणें असा मोलाचा सरपोस झांकण घातला होता.

अलीवर्दीखानाला स्वतंत्र राज्यकर्ता नबाब व्हायची हांव. त्यासाठीं दोन कोटी काय आणि दहा कोटी काय, त्याची कसली पर्वा! आणि अशा आयत्या कोटमाप वसुलावर आणि देणग्यांवरच बादशहाचा ऐष-आराम चालायचा.

खानानें मागितलें आणि बादशहानें दोन कोटींवर खूष होऊन दिलें.

"जा. तुला वंशपरंपरेनें बंगालची हवी तशी सुभेदारी बहाल."

५ : इंग्रज नबाबाला घेरूं लागला

हपापाचा माल गपापा करायचा. तें ज्याला जसें साधेल, तसें त्यानें साधायचें. तसाच अलीवर्दीखानानें डाव साधला. त्यानें दिल्लीच्या बुजगावणेवजा बादशहाकडून बंगाल, बिहार, ओरिसाची वंशपरंपरा सुभेदारी लाटली. आणि नबाब म्हणून गर्जूं लागला.

तों तिकडे मराठे मर्दुमकीच्या जोरावर सारी मोगल बादशाही पिळून खायला घोड्यावर खोगीर घालून तयारच होते. बंगाल्यांत नबाब अलीवर्दीखानाला त्याच्याचसारखे आयत्या बिळांतले नागोबा होऊं पाहणारे दायाद कांहीं कमी नव्हते.

"या रे कुत्र्यांनो! डसा माझ्या पायाला." म्हणावें त्यांतली गत.

"या रे मराठ्यांनो! करा आमच्या बंगालवर स्वारी. ह्या अलीवर्दीखान नबाबाला लोळवा. आणि तुम्हांला काय हवें तें खुशाल घेऊन जा." असें त्या दायादांचें आमंत्रण मराठ्यांना गेलें.

मराठे कशाला नाहीं म्हणतात? ते असल्या लूटमारीच्या संधीची वाटच पाहत होते. ते आले चालून चढ्या घोड्यांनिशीं बंगालवर.

एकदम रघुजी भोसले फौज घेऊन बंगालवर चालून आला तो खानाला खाशा चपराका लगावून अडीच कोटींचा ऐवज लुटून घेऊन गेला.

मराठ्यांना वाटलें, छान आहे ही बंगालची सोन्याची जमीन भुस-भुशीत. कोंपरांनीं खणून न्यायला हरकत नाहीं. त्यांनीं मग खानाला इतकें जेरीला आणलें कीं स्वाऱ्यांमागून स्वाऱ्या आणि लुटीमागून लूट."

"अरे बाबांनो ! गप्प बसायला काय घ्याल ?" बिचारा खान रघुजी भोंसल्याला-मराठ्यांना त्या अखेरच्या स्वारीच्या वेळीं गयावया करून विचारूं लागला.

"सालीना बारा लाखांची खंडणी आणि ओढ्या प्रांत घेऊं." हें त्यावर रघुजी भोंसल्याचें ठणठणून उत्तर.

"घ्या बाबांनो ! पण मेहेरबानी करून आतां तरी गप्प बसा." असें म्हणून नबाबानें मुकाटपणें ओढ्या प्रांत मराठ्यांना कायमचा देऊन टाकला. आणि वर सालीना बारा लाखांची दक्षिणा खंडणीच्या रूपानें कबूल केली.

बिचाऱ्या बंगालच्या शेतकऱ्यांना काय ! जो आयता येऊन असा मानगुटीला बसेल, तो मागेल तें त्याला मुकाटपणें द्यायचें. अशा जबरदस्तांच्या तुंबड्या भरण्यासाठीं मरेमरेतों राबायचें, आणि मगरी मगरी तुझी पाठ मऊ करीत कण्हत कष्टत जगायचें.

पिळणूक करणारांत ह्या सगळ्यापेक्षां इंग्रज जबर. पण हिकमती. पोटभर रक्त तर प्यायचा. पण जळूसारखें. घाव घालून मान तोडून रक्त प्यायचा नाहीं. इंग्रजानें दिल्लीच्या बादशहाचें, त्याच्या बंगालच्या सुभेदाराचें पाणी जोखलें होतें. सुभेदार मात्र दिमाखानें बंगालचा नबाब म्हणून मिरवूं लागला होता. त्याचें इंग्रजांना काय ? हुगळीपावेतों इंग्रजी व्यापारी जहाजें थेट विलायतेंतून येत. तीं नांगरून पडत. आणि सोनें-मोलाचें कापड, सोरा, असा बंगालचा हरजिनसी माल भरून घेऊन विलायतेला निघून जात.

रेशमी, सुती, तलम कापड विणायचें बंगालच्या कुशल विणकरांनीं. पण तें नेसायचें विलायतेंतील गोऱ्या मडमांनीं आणि त्यांच्या दादल्यांनीं. आणि बंगाली विणकराची बाईल जाड्याभरड्या, धड किंवा फाटक्या जुनेरानें अब्रू झांकायची. तसलेंच जाडेंभरडें कापड अब्रू झांकण्यासाठीं आणि थंडीवाऱ्याच्या निवारणासाठीं बिचारे बंगालचे विणकर वापरायचे.

कारण आतां दिवसेंदिवस ते विणकर इंग्रजाचे ताबेदार होत होते. इंग्रजाकडून पै-पैसा मजुरी घ्यायची, आणि त्यांना कापड-चोपड विणून द्यायचें. किंवा पदरचें विणलें असलें तरी तो मागेल त्या मातीमोलानें त्याला विकायचें. आणि कशीबशी गुजराण करायची. पण तीही त्या विणकरांना परवडे. कारण पोट ! सारा पैसा इंग्रजाच्या हातीं; आणि त्याला देशभर मोकाट खुला व्यापार करीत धुडगुस घालण्याची बादशहाची, सुभेदाराची सदर परवानगी. भटाला मिळाली ओसरी आणि भट हात-पाय पसरी, त्यांतली गत.

ज्या जिनसांचा व्यापार फुकट करण्याची इंग्रजांना मोकळीक, तो फुकट व्यापार तर सर्रास सुरूच. पण ज्याची परवानगी नाहीं, तोही बेधडक दडपून सगळीकडे सुरू.

बादशहाकडून व्यापाराची परवानगी मिळाली होती इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीला. पण ती परवानगी इतकी ताणली जाऊं लागली, कीं कंपनीचा नोकर देखील धडकून कधीं उघड तर कधीं चोरून फुकट व्यापार करायचा.

आणि देशी व्यापाऱ्यांना मात्र व्यापारावर कर !

" असें आम्हीं हिंदी माणसांनींच बादशहाच्या सरकारचें काय घोडें मारलें आहे, म्हणून आमच्या बोकांडीं तेवढा कर ? " देशी व्यापारी ओरड करायचे. पण ती ओरड ऐकणार कोण ?

इंग्रज हळूच फळांतल्या किडीसारखा पुढें व्हायचा. आणि त्या हिंदी व्यापाऱ्यांना कानांत सांगायचा, " अहो आम्ही देतों तुम्हांला फुकट

व्यापार करायचा परवाना. पण एका अटीवर. व्यापार मात्र आमच्याशींच करायचा."

असे मग देशी व्यापारीही इंग्रजांशीं हातमिळवणी करायचे आणि आपला व्यापार वाढवायचे. अर्थात् त्यांचा व्यापार वाढायचा तो इंग्रजांच्या पोटांत.

तरी ते व्यापारी म्हणायचे, "चालेल. कांहीं हरकत नाहीं. ताटभर नफा नाहीं तर नाहीं, वाटीभर मिळालें तरी पुरे."

हा कोण ? कलकत्त्याचा नगरशेट अमीरचंद. गगनाला गवसणी घालण्याजोगा बळिवंत धनकुबेर. त्याचा बंगालभर भरमसाट व्यापार चालायचा. हिकमतीही तसाच, सावकारही तसाच, आणि जळूसारखें व्यापारांत लोकांचें रक्त शोषण करणाराही तसाच. कोट्याधीश कुबेरालाही कर्ज देण्याची ऐपत असलेला, राजा-महाराजांचा आणि नबाब सुभेदारांचा सावकार तो. त्याची आणि इंग्रजाची गट्टी जुळली.

हा अमीरचंद इंग्रजांचा एक डोळा. आणि तसाच दुसरा कावळेकुशल सावकारी डोळा म्हणजे बरद्वानचा राजा त्रिलोकचंद. त्याला साथ हुगळीच्या काजी वसझितची.

हे सावकार—त्यांतही मुख्यतः हिंदु सावकार आणि त्यांच्या लाग्याबांध्यांतले आणखी कांहीं सावकार, तसेच कांहीं सरकारी अधिकारी, हे बंगाल पद्धतशीरपणें लुटून वशांत टाकायला निघालेल्या इंग्रजांच्या टोळीचे वाटाडे. घरचे चोर जिवें मारीत म्हणतात तसे. या सावकारांच्या हातीं काय नाहीं ? देशांतील—विशेषतः साऱ्या बंगालमधील व्यापार आणि उद्योगधंदे यांच्या मुठींत. ते बंगालचें नाक. आणि तें नाक इंग्रजांच्या मुठींत. सारे दिवस कांहीं सारखे नसतात. पण एके दिवशीं अलीवर्दीखानाच्या हेरांनीं बातमी आणली ती अगदींच विचित्र.

"नबाबांच्या राजवटीवर घाला घालायचे इंग्रजांचे गुप्त बेत चालले आहेत हे बडेबडे देशी व्यापारी आणि इंग्रज व्यापारी यांच्यांत." अशी ती बातमी.

हें कशासाठीं ? तर मोगल बादशाही राजवट उलथून टाकण्यासाठीं. हिंदी व्यापाऱ्यांना—अमीरचंदांना आणि त्रिलोकचंदांना—वास्तविक चालू होतें तें मुसलमानी राज्यच ठीक होतें. त्यांना काय हव्या त्या वालमेली करतां येत होत्या. बरें; तें बुडालें, आणि त्यामुळें चांगला लग्गा साधला, तरी त्यालाही त्यांची ना नव्हती. येऊन जाऊन मतलबाशीं गांठ. इंग्रज फायदा करून देतो ना ? पैसा मिळवून देतो ना ? करा त्याला मदत. असे रकसारखे पैसे समजून त्यांना चिकटणारे गोचीड ते सावकार !

असे हे इंग्रजी सोटे सावसावकारीनें राजांचे राजे आणि नबाबांचे नबाब शोभणाऱ्या अमीरचंदासारख्या मातबर व्यापाऱ्यांच्या हातीं होते. आणि दिल्लीच्या बादशहालाही आपणाविरुद्ध उठाव करूं पाहणारांच्या टाळक्यांत हाणायला हेच इंग्रजी सोटे त्यांना फार सोईचेसे वाटत होते.

म्हणून तर इंग्रजांच्या टोलेजंग वखारी कासीम-बझार, हुगळी, कलकत्ता, चंद्रनगर अशा मोक्याच्या जागीं उभारल्या जाऊन भरभराटीला आल्या. आणि इंग्रजी व्यापार खूप वाढला.

ठाण्यांसभोंवार तटबंदीही वाढली. टोलेजंग कलकत्ता बंदर इंग्रजानें बांधलें. आपल्या राजाच्या नांवानें तिथें फोर्ट वुइलियम किल्लाही बांधला.

किल्ल्याच्या आणि ठिकठिकाणच्या वखारींच्या रक्षणासाठीं, तसेंच चांचे लोकांपासून व्यापारी जहाजांचें व इतर वाहतुकीच्या जहाजांचें रक्षण करण्यासाठीं शिबंदी वाढली. अशीं चालली पावलें पुढें पडत.

त्यांत आणखी आंधळा मागतो एक डोळा तर देव म्हणतो दोन घे.—त्यांतली गत. इंग्रज आणखी नव्या सवलती बंगालमध्यें व्यापारासाठीं मागायला औरंगजेब बादशहाकडे गेला. तेव्हां बादशहानें अट घातली, "आमचे हाजचे यात्रेकरू मक्केला जातात. त्यांच्या जहाजांना समुद्रावर चांच्यांचा फार उपद्रव होतो. त्या जहाजांचें रक्षण तुमच्याकडून होईल ? तर मागा काय तें."

इंग्रज पडला पट्टीचा दर्यावर्दी. त्यानें अशी युक्तीयुक्तीनें बादशहाच्या राजवटीची रखवाली पत्करावी, आणि त्या नांवाखालीं आपली शिबंदी वाढवावी. वखारींसभोंवार अशी तटबंदी करावी कीं वखार म्हणजे तो एक लढाऊ किल्लाच व्हावा.

" मराठे फार माजले आहेत काय ? बंगालवर स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून तुमच्या व्यापाराला आणि मालमत्तेला धोका निर्माण करतात ? मग तुम्हांला काय पाहिजे ? " असें नबाबाकडे इंग्रज खरें खोटें गाऱ्हाणें घेऊन गेले, कीं त्यानें विचारावें.

इंग्रजानें त्यावर पड खाऊन नम्रपणानें सांगावें, " आपण बंगालचे नबाब ! आपल्या आसऱ्याला आमचा व्यापार चालतो. बादशहाचीं फर्मानें आम्हांला आहेत. पण संरक्षण नाहीं, तर त्याचा काय उपयोग ? आम्हांला संरक्षण हवें. "

उंदीर जाईना बिळांत, आणि शेपटीला बांधी सूप ! — त्यांतली नबाबाची अवस्था. आधींच इंग्रज बादशाही फर्मानें मिळवून आणि त्या काडीच्या आधारावर आपल्या व्यापारी सत्तेच्या भव्य माड्या बांधून चोरावर मोर शिरजोर झालेला. तो शिरजोर झालेला म्हणजे इतका, कीं जरा कुठें कुणीं कांहीं आगळीक केलीसें वाटलें तर दंडेली गाजवून परस्पर 'हम करे सो कायदा' या न्यायानें न्यायनिवाडे करण्यापावेतों त्याची मजल गेलेली. आणि नबाबाला हें सारें मुकाट्यानें पाहावें लागत होतें. असला तो नबाब ! तो स्वतःचेंच संरक्षण करायलाही असमर्थ. तिथें तो इंग्रजांसारख्या परक्या व्यापाऱ्यांचें काय संरक्षण करणार ?

मग इंग्रजानें हळूच विनंति केली, " नबाबांनीं मेहेरबान होऊन आम्हांला निदान आमच्या संरक्षणासाठीं कलकत्त्याच्या ठाण्यासभोंवार खंदक खणायची तरी परवानगी द्यावी. " मिळाली लगेच परवानगी. कीं हां हां म्हणतां झाला इंग्रजी ठाण्यासभोंवार प्रशस्त मजबूत मराठा खंदक खणून बांधून तयार.

मराठे आले, तर त्यांनीं त्या खंदकांत स्वत:ला गाडून घ्यावें. इंग्रजांना त्यांचा उपसर्ग व्हायला नको. बरें; नबाबाचें माथें फिरलें, त्याला इंग्रजांच्या शिरजोर चढाऊ धोरणाचा राग आला, इंग्रजी ठाण्यावर हल्ला करून ठाणें जमीनदोस्त करून टांकावेंसें वाटलें, तर त्यांनाही त्या खंदकांत उडी घालून जीव द्यायला मोकळीक !

अशी खव्यासाठीं भांडणाऱ्या दोन बोक्यांचा न्याय करणाऱ्या धूर्त माकडाची भूमिका घेऊन इंग्रज हळू हळू मुंबई-मद्रासकडून पाय पसरीत येतां येतां बंगालमध्यें आपलें चांगलें बस्तान बसविण्याच्या उद्योगाला लागला होता.

पण तरीदेखील या सगळ्या घालमेलीमागें ह्या इंग्रजांचा आणि त्यांच्या भाईबंदांचा कांहीं भयंकर दुष्ट राजकीय कावा असेल, अशी शंकाही नबाब अलीवर्दीखानाला नव्हती. ती शंका त्या दिवशीं त्या त्याच्या विश्वासू हेरानें येऊन इंग्रजी गोटांतील गुप्त बातमी त्याच्या कानीं घातली तेव्हां त्याच्या मनांत पालीसारखी चुकचुकूं लागली.

आणि भर दिवसा डोळ्यांपुढें काजवे चमकण्याची वेळ आली.

स्वाध्याय :

१ इंग्रजांचा दिल्लीच्या मोगल बादशहापाशीं जम बसायला काय कारणें झालीं ?
२ बंगालच्या नबाबाला इंग्रजांनीं आरंभीं कसें वश केलें ?
३ दिल्लीचा बादशहा बंगालच्या नबाबाच्या पिंजऱ्यांतील पोपट कसा ?
४ मराठ्यांनीं बंगालच्या नबाबाला कसें जेरीला आणलें ?
५ रघुजी भोसल्यानें ‘ गप्प बसायला ’ काय आणि कसें घेतलें ?
६ इंग्रजांनीं बंगालच्या नबाबाला कसें घेरलें ?
७ देशी व्यापारी इंग्रजांना सामील कां व कसे ?
८ नबाबाच्या डोळ्यांपुढें काजवे चमकण्याची वेळ कां आली ?

प्रकरण दुसरें

नबाब सिराजउद्दौला

१ : नबाबाच्या मनांतले मांडे मनांत

कर्नल मिलचें तें जें गुप्त पत्र यूरोपांतील राजांना गेलें होतें, त्याची ती सहीसही नक्कल होती. त्या हेरानें ती कशी संपादन केली कोण जाणे. पण केली खरी.

"असें काय आहे त्या पत्रांत?" नबाब अलीवर्दीखानानें आपल्या दरबारच्या दुभाषाला विचारलें. तों बंगाल, बिहार आणि ओरिसा हे प्रांत कसे बळकावतां येतील याविषयींच्या चर्चेचा आणि हिकमतीचा दारूगोळा त्यांत ठांसून भरलेला. तो दुभाषानें नबाबाला सांगितला.

'... मोगल बादशाही भरगच्च सोन्याचांदीनें नुसती ओसंडते आहे. बरें; राजवट पाहावी तर सदाची पंगू. स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचीही ताकद अंगीं नाहीं. तिथें स्वतःचें संरक्षण तरी कसें करणार? असें असतां सागरी बळ पाठीशीं असलेल्या कोणाही युरोपियन देशानें अजून हा सोन्याचा तुकडा–हा बंगाल–जिंकून हबकण्याचा प्रयत्नही कसा केला नाहीं, याचें मला मोठें नवल वाटतें. नुसता लहानसा एक धक्का दिला कीं पुरे. त्यासरशी ही अफाट संपदा झाडावरील पिकलेल्या फळासारखी आपल्या पायांशीं येऊन पडेल. तुमच्या ब्राझीलच्या आणि पेरूच्या सोन्याच्या खाणींची तरी यापुढें कसली प्रतिष्ठा? ... मोगलांचें राजकीय धोरण अगदींच भिकार आहे. त्यांचें लष्कर तर त्यापेक्षांही टाकाऊ आहे. आरमार कशाशीं खातात हें तर मोगलांना जणूं माहीतच नाहीं. राज्यांत नेहमीं पाहाव्या तेव्हां बंड-बंडाळ्या आणि झटापटी. मोगलांच्या राज्यांत चांगल्या नद्या आणि चांगलीं बंदरेंही आहेत. तिथें आपणांसारख्या परदेशीयांना मुक्तद्वार. मनांत आणलें तर हा देश बोल बोल म्हणतांना जिंकून घेतां येईल. निदान मांडलिकीचें दावें तरी तेथल्या राजांच्या गळ्याला खास अडकवतां येईल नबाब अलीवर्दीखान हा एक जबरदस्त बंडखोर आहे. त्यानें बंगाल,

बिहार आणि ओरिसा हे तीनही संपन्न प्रांत हिकमतीनें मोगल बादशाहींतून बळकावले आहेत. त्याचा खजिनाच तीन कोटी रुपयांचा आहे. त्याचें या मुलुखांतील वार्षिक उत्पन्नच जवळजवळ वीस लाख रुपये असेल. हे तीनही प्रांत अगदीं समुद्रकिनाऱ्याला लागलेले आहेत. दीड दोन हजार सोजिरांना घेऊन नुसतीं तीन जहाजें आलीं तरी तीं हे तीनही प्रांत बळकावयाला पुरेशीं आहेत....'

तें जुनेंच पत्र खरें. पण नबाबाला तें अगदीं ताजेंसें वाटलें. आज फार दिवसांपासून इंग्रजांचीं पावलें बंगालच्या बाबतींत कशीं विचित्र व उफराटीं पडत होतीं याचा त्याला रोजचा अनुभव होता. पण त्या विचारांच्या मुळाशीं इतकें कालकूट त्या इंग्रजी मनांत सांचलेलें असेल, हें त्याच्या ध्यानींमनींही नव्हतें.

"अलीकडे रोज ज्या इंग्रजी डावपेंचाच्या बातम्या कानीं येतात त्या खऱ्याच तर?" असे नबाबाचे सुस्कारे सभोंवारच्या मंडळीला ऐकूं येऊं लागले. त्यानें अधिक चौकशी चालविली. हा कोणी कर्नल स्कॉट कलकत्त्यांतील व्यापाऱ्यांना हातीं धरून सारा बंगाल फितवण्याच्या उद्योगाला लागला आहे म्हणतात तें खरें का?

तों तें सारें खरेंच!

तेवढेंच काय; पण बरद्वानचा राजा त्रिलोकचंदही असल्या दुष्कर्मांत कर्नल स्कॉटला सामील! ओस पडलेल्या झाडींतील घरटीं सोडून चाललेले कावळे!

"काय करूं या कर्नलला आतां? कसा गांठून ठार करूं याला?" हा विचार भुंग्यासारखा नबाबाच्या डोक्यांत भुणभुणूं लागला. आणि थोड्याच दिवसांत तसा बेत जुळून येऊं घातलाही. नबाबाचें स्कॉटला आपल्या राजधानी मुर्शिदाबादेला भेट देण्यासाठीं आग्रहाचें आमंत्रण गेलें. स्कॉटनें तें मान्यही केलें.

"आतां येऊं दे एकदांचा स्कॉट मुर्शिदाबादेला. मग पाहून घेतों." नबाब मनांत म्हणत होता.

नबाबाचा आवडता तरुण पण बेछूट हूड नातू सिराजउद्दौला जवळ होता. असल्या भानगडींच्या वातावरणांतच तो नबाबाच्या राजवाड्यांत वाढून लहानाचा मोठा झालेला. नबाबाला मुलगा नव्हता. सिराज हा मुलीचा मुलगा. हाच आपल्या पश्चात् गादीचा वारस म्हणून नबाबानें जवळ बाळगला होता.

" आतां तो गोरा साहेब हातीं सांपडला रे सांपडला कीं त्याला ठारच करावा, मी म्हणतों." नातू संतापून आजोबाला सल्ला देऊं लागला.

एथवर एकदम कठोर होण्याची कांहीं नबाबाच्या मनाची तयारी नव्हती. भारतांत इंग्रज कांहीं आतां वाऱ्यावर उघडा पडला नव्हता. भारतांतील त्याचे दीड शतकांतील भले अथवा बुरे पण भरीव उद्योग त्याच्या पाठीशीं होते. इंग्रज हा व्यापारी तर खराच. पण तो नुसता तागडीतुकाप्पा व्यापारी नव्हता. भारतांत इंग्रज हे आतां एक चांगलें जोरदार सामर्थ्य गणले जात होते. भारतांत नवी राजसत्ता शोभूं लागावी इतका इंग्रजांचा प्रभाव आतांपावेतों भारतावर पडला होता. बंगालमध्येंच नव्हे, तर साऱ्या भारतांत. विशेषतः दक्षिण भारतांत. तेथील कर्नाटकच्या—अर्काटच्या नबाबाचा बोलबाला कौशल्यानें खाऊन ढेकर देत आतां इंग्रज बंगालच्या नबाबाला खायला वंगभूमीवर उभा होता. त्यानें कलकत्ता आणि चंद्रनगर येथील ठाण्यांसभोंवार लढाऊ तटबंदी बांधायला सुरुवात केली होती. तीसुद्धां नबाबाच्या परवानगी-खेरीज!

आणि तो उभा होता, तो यूरोपांतून भारतांत नशीब काढायला आलेल्या डच, पोर्तुगीज, फ्रेंच अशा अनेक परदेशी लोकांपैकीं एक—इंग्रज म्हणून नव्हे. तर त्या इतर साऱ्या परकीयांना भारत ग्रासण्याच्या शर्यतींत मागें टाकून विजयी होत सर्वांच्या अग्रभागीं चमकूं लागलेला इंग्रज तो होता.

डच लोक तर केव्हांच भारतांत अस्त पावले होते.

पोर्तुगीजही डचांच्याच वाटेनें, पण नाममात्र भारतांत शिल्लक राहून, निजधामाला चालले होते.

फ्रेंच अजून इंग्रजांशीं झगडत होते; पण ते पड्या पहिलवानासारखे. कुस्ती मारावी, आणि कुस्तींत हरावें. कर्नाटकांत पाठोपाठ दोन युद्धें, बुद्धिबळांतील मोहरीं खेळाडूनें नाचवावीं तसें तेथील सत्ताधीशांना हातांतील कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें नाचवीत, फ्रेंच आणि इंग्रज लढले होते. केवळ भारतांतच तूं दादा कीं मी दादा याचा निर्णय करून घेण्यासाठीं त्या दोघांची ती लढत नव्हती. ‘ जगांत तूं दादा कीं मी दादा ’ याचा निर्णय करून घेण्याच्या खुमखुमीनें तिकडे यूरोपांत या इंग्रज-फ्रेंचांची सुंदोपसुंदी चालली होती. भारतांतील त्यांची युद्धखोर दादागिरी हा यूरोपांतील दादागिरीचा एक लहानसा कोपरा होता.

तरीदेखील कर्नाटकांत आतां सरशी इंग्रजाची होती. फ्रेंच पड्या पहिलवान ठरला होता. प्लेगाची लागण व्हावी, तशी इंग्रजांच्या राजकीय सामर्थ्याची सांथ देशी राजेरजवाड्यांना एकेकाला झपाटींत वाढत होती.

नबाबाला “ आतां याला काय करावें ? ” हा एक मोठाच पेंच होता. हें सारें त्याला कळत होतें. त्यानें आपल्या नातवाचा—सिराजचा— उत्साह उतूं जाऊं लागलेला पाहिला, तेव्हां त्याला समजावून सांगितलें, “ बेटा सिराज ! ही इतकी सोपी गोष्ट राहिली नाहीं आतां हे इंग्रज म्हणजे. आपण असा एकदम सापाच्या शेपटीवर पाय देऊं तर तो साप आपणांला डसायला कमी करायचा नाहीं. दगडाखालीं सांपडलेला आपला हात धीरे धीरे मोकळा करून घ्यायला हवा.”

म्हाताऱ्याच्या मनांत होतें कीं तो आपणांविरुद्ध आगलावीं कारस्थानें करणारा कर्नल स्कॉट हिकमतीनें हातीं लागला, तर त्याला कैदेंत डांबावा. आणि त्याच्या इंग्रजी चाळ्यांना पायबंद घालावा.

पण आपला तो बेत त्यानें आपल्या नातवाला सांगितला नाहीं. म्हाताऱ्याला त्याच्या अळवाची खाज चांगली माहीत ! त्याला आज-

काल राहून राहून नेहमीं भय वाटायचें, कीं "हा हूड बेताल बेटा मगरुरीच्या भरांत केव्हां कसा कुणाच्या नादीं लागेल, आहारीं जाईल, आणि माजलेल्या घोड्यानें गाडा आडवाटेला ओढून नेऊन मोडून टाकावा तशी आपल्या राजवटीची कशी दैना करून सोडील, याचा नेम सांगतां यायचा नाहीं."

असा तो म्हातारा आजोबा आपल्या तरण्याबांड पंचवीस वर्षांच्या नातवाला हा आपल्या गादीचा उद्यांचा वारसदार परंतु बेजबाबदारसा समजत होता.

पण तो नातू तेव्हां आजोबाविषयीं मनांत म्हणत होता, "साठी बुद्धि नाठी झाली आहे ह्या म्हाताऱ्याची. वाढून वाळलेल्या वयाबरोबर याच्या अंगची सारी मर्दुमकी मेली आहे. चांगलें इंग्रजाला तलवारीच्या धारेवर धरायचें, इंग्रज म्हणून कोणी माणूस बंगाल्यांत होतें कीं नव्हतें असें करून टाकायचें आणि बंगालची नबाबी राजवट दिल्लीच्या बादशाहीच्या थोबाडींत मारून चांगली उपजडाला आणायची, तें राहिलें बाजूला. पण जाऊं दे. पिकलें पान आहे. तें आज नाहीं उद्यां झडायचेंच. उद्यां माझ्या हातीं एकदां कारभार येऊं दे. कीं मी हां हां म्हणतां या इंग्रजांचे बंगालमधून सात पाट काढून त्यांना बारांच्या बंदरीं वणवण करीत पळ घ्यायला लावीन. त्यांत एवढें अवघड काय आहे ? फ्रेंच आणि इंग्रज एकमेकांना पाण्यांत पाहतात. त्याचा फायदा घेऊन फ्रेंचांना पाठीशीं घालायचें; त्यांना इंग्रजाच्या छाताडावर बसवायचें. कीं झालें काम फत्ते. कधीं एकदां मरतो म्हातारा न कळे. जितका लौकर मरेल तितका बरा. आणि हा कर्नल स्कॉट ! हातीं सांपडूं दे तरी खरा ! कीं हां हां म्हणतां त्याला सफा नाहींसा करतों. कंबख्त बदमाष !"

पण आजोबा नबाब; आणि त्याचा नातू उद्यांचा तरुण नबाब. त्या दोघांचेही कर्नल स्कॉटपुरते विचार मनांतले मनांतच राहिले.

कर्नल स्कॉट नबाबाच्या आमंत्रणावरून मुर्शिदाबादेला येणार होता. त्याची निघण्याची सारी तयारीही झाली होती. तो आपसांत मसलत करून इंग्रजी हेर म्हणून गुपचुप येत होता. नबाबाची दौलत, त्याच्या-वर हल्ला करून त्याला पुढेंमागें लोळवायचें झालें तर त्याच्या राजधानीचे सांधीकोपरे, त्याच्या दरबारांतील बोटचेपे अधिकारी कोण कोण, ते कसकसे कितपत इंग्रजी जाळ्यांत सांपडतील, या सगळ्या गोष्टींचा चोरटा अंदाज घ्यायला तो येणार होता. कारण आतां कर्नाटकांत फ्रेंचांचें कंबरडें चांगलें मोडलेंच होतें. तशीच बंगालमधूनही त्यांची उचलबांगडी करावी, आणि ईस्ट इंडिया कंपनीनें नबाबालाही बंगालमध्यें बुडवून आपण बंगालचे राज्यकर्ते व्हावें, हे बेत आजकाल इंग्रजांच्या मनांत घोळूं लागले होते.

इंग्रजांचा खरा दांत बंगालचा उद्यांचा नबाब सिराजउद्दौल्ला याच्यावर. "मुख्य म्हणजे उद्यांच्या त्या पोरट्या नबाबाच्या तंगड्या फार दौडूं लागायच्या अगोदर मुळांतच कशा तोडून टाकतां येतील याचा अचूक अंदाज मिळायला हवा. त्याचे धागेदोरे फ्रेंचांशीं आहेत. ते कसकसे, कुठवर आहेत याचा नीट छडा लागायला हवा. नाहीं तर खानदानी सापाचें पिल्लूं आहे तें. माजूं दिलें तर तें आपणाला केव्हां, कुठें आणि कसें उसळेल, याचा मुळीं भरवंसा देतां यायचा नाहीं." अशा आपसांत मसलती करून कर्नल स्कॉट मुर्शिदाबादेला नबाबाचा पाहुणा म्हणून येणार होता.

परंतु तेवढ्यांत कारोमांडेल किनाऱ्यावरचें वातावरण एकदम बिघडलें. इंग्रजांच्या दडपेगिरी सत्तेला तिथें पुन्हां कांहीं धोका उत्पन्न झाला. त्यासरसा मद्रासच्या इंग्रज गव्हर्नरकडून जासूद धापा टाकीत आला. त्यानें निरोप आणला, "शक्य तितक्या तांतडीनें निघून आमच्या मदतीला या. इकडे धोका आहे. फ्रेंच आणि नबाब गट्टी करून बळावणार असा संभव आहे."

तेव्हां मद्रासचें इंग्रजी ठाणें म्हणजे इंग्रजांची भारतांतील दिल्ली. बंगालमध्यें इंग्रजांचा एवढा मोठा व्यापारी दरारा असला तरी तेव्हां हुकमत मद्रासच्या इंग्रज गव्हर्नरची. त्याच्या हांकेला धांवून जाणें कर्नल स्कॉटला प्राप्तच होतें.

तो तिकडे गेला. आणि इकडे आजोबा नबाब अलीवर्दीखान व नवा नबाब होऊं घातलेला त्याचा नातू सिराजउद्दौला या दोघांच्याही मनांतले मांडे मनांत जिरले.

स्कॉट येत नाहीं, हें ऐकून म्हाताऱ्यानें कर्माला हात लावला.

आतां पुढें ?

२ : नबाब सिराजउद्दौला

आणखी कांहीं दिवस गेले. नबाब अलीवर्दीखान जलोदराच्या विकारानें आंथरुणाला खिळला होता. अगदीं म्हातारपण आलेलें. पिकलें पान केव्हांतरी झडायचेंच.

तें पिकलें पान केव्हां एकदां झडतें, याची नातू सिराजउद्दौला हा चातकासारखी वाट पहात होता.

त्यांत त्याचा आणखी एक हेवेखोर प्रतिस्पर्धी जोडीदार होता. एका कुत्र्याकडे पाहून दुसऱ्या कुत्र्यानें गुरगुरावें, तसा तो पूर्णियाचा नबाब शौकतजंग नबाबाच्या गादीवर डोळा ठेवून सिराजवर गुरगुरत होता. तोही नबाबाचा एक जवळचा नातलगच होता. इंग्रज त्याचे पाठीराखे होते. तें बाहुलें नाचवून बंगालच्या नबाबगिरीचा शकुनी खेळ खेळ-ण्याचा इंग्रजांचा डाव होता.

कलकत्ता आणि चंद्रनगर येथील इंग्रजी ठाणीं आतां मजबूत तट-बंदीनें लढाऊ ठाण्यांशीं शोभूं लागलीं होतीं.

रोज रोज नबाबाचे हेर बातम्या घेऊन यायचे. त्या बातम्या कानांत डसायला विंचू सोडल्यासारख्या नबाबाला तापदायक वाटायच्या.

त्या बातम्याही केवळ इंग्रजांच्या तटबंदीच्या नव्हेत; तर फ्रेंचधार्जिण्या सिराजच्या हालचालींच्याही.

" म्हाताऱ्याला काय कळतें ? " नातू मनांत म्हणत होता. आणि फ्रेंचांना हाताशीं धरून बंगालमधून इंग्रजांना नामशेष करण्याचे बेत रचीत होता.

असे सुलभपणें नामशेष व्हायला इंग्रज आतां लेचेपेचे उरलेले नाहींत, हें म्हाताऱ्याला कळे. पण तें त्यानें नातवाला कोणत्या तोंडानें समजावून सांगावें ? त्यानें जावें सांगायला, तर नातवानें न्यावें त्याला टांगायला. म्हणून मनांतून म्हाताऱ्याला भय वाटायचें, कीं हा हूड पोरगा करूं नये तसला दांडगावा करूं लागेल, आणि आपल्या हातानें आपल्या पायांवर दगड पाडून घेईल.

पण त्याला कांहीं इलाज नव्हता.

दुर्बलतेनें शरपंजरीं पडलेल्या त्या म्हाताऱ्याला आतां एकच मार्ग मोकळा होता. डोळे मिटण्यापूर्वी नातवाला दोन अखेरचे उपदेशाचे शब्द सांगायचे. तो उमजला, त्यानें मानलें, तर ठीक. नाहीं तर दौलतीचें आणि त्याचें नशीब !

तेवढें म्हाताऱ्यानें केलें. आपले दिवस भरत आले, आपण आतां चार-दोन दिवसांचे या जगाचे सोबती आहों, अशी त्याची जीविताची आशा सुटत चालली. त्यानें सिराजला जवळ बोलाविलें. आणि सांगितलें, " बेटा ! यूरोपांतील देश आपल्या सत्तांचें जाळें तुझ्या देशांत विणीत आहेत तिकडे नीट लक्ष ठेव. अल्लानें मला जर आणखी थोडें आयुष्य दिलें असतें, तर मीं तुला या भीतीपासूनही मोकळें केलें असतें. तें कार्य आतां बेटा ! तुला पार पाडायचें आहे. तेलंगणांत त्यांच्या लढाया चालल्या आहेत. राजकारणी लढती सुरू आहेत. तिकडे तूं डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवायला हवें. यूरोपांतील आपल्या राजांच्या खासगी लढायांचें निमित्त सांगून यांनीं इकडे आपल्या बादशहाचें राज्य आणि

रयतेची दौलत यांची आपसांत भाऊबंदांसारखी वांटणी चालविली आहे. पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रज या तिघांनाही एकदम सरळपणें वाटेला लावतां येईल असें समजूं नकोस. इंग्रज फार जबरदस्त आहे. त्यानें मराठ्यांच्या आंग्र्याची खंबीर दर्यावर्दी सत्ताही कशी धुळीला मिळविली, आणि त्याचा मुलूख कसा बळकावला, हें ध्यानीं घे. आणि प्रथम इंग्रजांना वाटेला लाव. त्यांचा मोड तुला करतां आला, कीं बाकीचे डच काय, पोर्तुगीज काय, तुला तितकेसे तापदायक होणार नाहींत. आणि हें पाहा, कोणालाही तटबंदी करायला व सैन्य वाढवायला मोकळीक देऊं नकोस. ती दिलीस, कीं तुझा देश तुझ्या हातून गेलाच समज."

असें सांगतां आलें तेवढें सांगून म्हातारा एके दिवशीं अल्लाघरीं गेला. आणि आजोबाच्या मागें नातू सिराजउद्दौला तारीख १० एप्रिल १७५६ रोजीं बंगालचा नबाब झाला.

हा नबाब म्हणजे इंग्रजांचा कपाळशूळ! नव्या नबाबाला देशांतील बाकीच्या नबाबांकडून अहेर व नजराणे आले. पोर्तुगीज, फ्रेंच, यांच्याकडूनही आले. पण—पण इंग्रज त्याच्या राज्यांत व्यापार करीत असून देखील त्यांनीं मात्र त्याच्या राज्यारोहणाची दखलही घेतली नाहीं.

पायांतली वहाण पायांत ठेवावी, आणि हातांतलीं फुलें मस्तकावर धारण करावीं, अशा माजोरी धोरणानें इंग्रज जाणूनबुजूनच नव्या नबाबाच्या राजवटीशीं आरंभापासून इतक्या ताठरपणानें वागत होते. इंग्रजांना हा फ्रेंचधार्जिणा तल्लख सिराज नबाब व्हायला नकोच होता. त्यांनीं त्या देव्हाऱ्यासाठीं देव योजून ठेवला होता तो त्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारा पूर्णियाचा नबाब शौकतजंग.

नबाब सिराजउद्दौल्यालाही इंग्रजांविषयीं तसाच अगोदरपासूनच तिटकारा होता. त्या आगींत आणखी ही तेलाची भर. तेव्हांच त्याला बातमी लागली कीं शौकतजंगच्या नांवानें दिल्लीच्या बादशहानें बंगाल, बिहार व ओरिसाच्या सुभेदारीच्या सनदाही दिल्या आहेत.

त्या काळांत दिल्लीचा बादशहा म्हणजे बिचारें शेतांतलें बुजगावणें. कुंकवाला आधार, म्हणून देशांत नबाब-निजामादि मातबर कारभाऱ्यांनीं त्याला इतमामानें पोसून पाळलेला. बादशाही खरोखर त्याच्या ताब्यांत कुठें होती, तो बंगालचा सुभा त्यानें कुणाला दिल्यानें त्याच्या हातून जाणार होता! फुकटच्या सनदांची गरगरीत नजराणे घेऊन खैरात करायला बादशहाचें काय जातें!

ती बातमी ऐकून नबाब सिराजउद्दौला खवळला.

"आँः? असा खोडसाळ डाव खेळतो काय इंग्रज माझ्याशीं? शौकतजंगला हाताशीं धरून त्याला बंगालचा नबाब करूं पाहतो? आणि मला बुडवूं पाहतो? थांबा म्हणावें हरामखोरांनो! तुमची दोघांचीही खाशी खोड मोडतों. माझ्या राजवटींत जमीनदोस्त करून टाकतों तुम्हां दोघांना; आणि तुमच्या ओंजळीनें आणखी कोणी पाणी पिणारे असतील त्या सगळ्यांनाही." अशी तो आग पाखडूं लागला.

तो रागाच्या भरांत पहिल्या सपाऱ्याला सैन्य घेऊन पूर्णियावर चालून गेला देखील. त्याचा बेत असा कीं, प्रथम शौकतजंग आपला प्रतिस्पर्धी, त्याला अगोदर धुळीला मिळवूं. आणि मग त्याला पाठीशीं घालणाऱ्या इंग्रजांचा समाचार घेऊं.

पण शौकतजंगनें तेवढी वेळ येऊंच दिली नाहीं. त्याला कुणकुण कळली मात्र. तसा तो आपण होऊनच नबाबाला मांडलिकाच्या पायरीवरून नजराणे घेऊन सामोरा गेला. मग लढण्याचा आणि तेढीचा प्रश्न उरलाच कुठें?

दोघांची दिलजमाई तोंडदेखली कां होईना पण झाली. शौकतजंगही कांहीं कमी हिकमती नव्हता. त्यानें प्रसंगावधान राखून विचार केला, "ही पिडा जाईना कां तिकडे इंग्रजावर चालून? आणि खुशाल मरूं दे. तिकडे दिव्यावर झडप घालून भाजून मरणाऱ्या पतंगासारखा. इंग्रज तिकडे परस्पर फडशा उडवूं दे त्यांचा.

आपला साकसुरतपणा सिद्ध करण्यासाठीं शौकतजंगनें आपणाजवळचीं इंग्रजांचीं खोडसाळपणाचीं पत्रेंही सिराजला दाखविलीं. आणि सांगितलें, "हें पाहा हे असे इंग्रज लोक मला भुरळ घालून तुमच्याआमच्यांत भाऊबंदकीचा विस्तव फुंकूं पाहत होते. पण असल्या कारस्थानांना बळी पडणारा कच्च्या दिलाचा मी नाहीं. त्याची मुळींच काळजी नको तुम्हांला."

असा त्या दोघांचा समेट झाला.

"बस्स ! आतां इंग्रजांना अगोदर बंगालमधून हाकलायचें." असें मनांत योजीत नबाब मुर्शिदाबादेला माघारा जातो, तों त्याला फार दिवसांपासून हवी असलेली त्याच्या त्या फरारी हिंदु नवकोटनारायण राजा वल्लभदासाविषयींची बित्तंबातमी घेऊन दरबारचा हेर हजर ! राजा वल्लभदास हा कोणी फालतुक माणूस नव्हे. डाक्क्याचा दिवाण !

"हा चोर कृष्णदास बापाच्या सांगण्यावरून सारी धनदौलत घेऊन आतां कलकत्तेकर इंग्रजांच्या आसऱ्याला गेला काय?" असें जळफळत नबाबानें त्या रागाच्या भरांत गर्जना केली, "स्वत:ला काय समजतात हे इंग्रज? त्यांना म्हणावें, आमच्या नोकरांना तुम्ही फितूर करतां; आमच्या शत्रूला तुम्ही आसरा देतां; त्या अर्थी तुम्हांलाही त्या शत्रूबरोबर शासन केलें जाईल."

३ : हे बंगालचे व्यापारी राजे !

दरबारी लोकांनाही तें ऐकून नवल वाटलें. राजा वल्लभदास हा परवांपावेतों नबाबाच्या गळ्यांतला ताईत. जो तो म्हणूं लागला, "तो ताईत असा एकाएकीं तुटायला काय कारण झालें असावें?"

पण आजकाल नबाबाची एखाद्यावर खप्पा मर्जी व्हायला त्याच्यावर इंग्रजांची मेहेरनजर एवढें एकच कारण पुरतें, हेंही लोकांना माहीत होतें. राजा वल्लभदास हा इंग्रजांच्या मेहेरनजरेंतील धनकुबेर. नबाबाचा

डाकथाचा दिवाण. त्या अधिकाराच्या जोरावर त्याचें इतर आणखी अनेक व्यापाऱ्यांप्रमाणें इंग्रजांशीं चांगलेंच सूत होतें.

" नबाब हा कोरडा ढग. या ढगांतून आतां आमच्या बंगालमध्यें काय पाऊस पडायचा आहे ? आणि काय शेत पिकायचें आहे ? इंग्रज करील ती पूर्वदिशा आहे आजकाल बंगाल्यांत. काय चाटायचा आहे असला अरेराव नबाब आम्हांला ? नबाबाला म्हणावें, हा डाकथाचा दिवाण वेळ पडली तर डाका खाईल आणि तुला तोंडीं लावील." असें तो एकटा सावकार राजा वल्लभदासच म्हणायचा असें नाहीं. आणखी-ही बडेबडे हिंदु सावकार म्हणायचे. तेव्हां बंगाल्यांत राजवट मुसल-मानी असली तरी बंगालच्या सगळ्या नाड्या अशा हिंदु सावसाव-कारांच्या मुठींत. बडेबडे जमीनदार आणि राजेमहाराजे ते. व्यापारी ते. कारखानदार ते. इंग्रजांचे अडते ते. मुसलमानांनीं बाटवून आपलेसे केलेले गोरगरीब शूद्र अतिशूद्र मुळचेच गरीब दरिद्री कष्टाळू शेतकरी. ते बाटले म्हणून त्यांची भिकेची हांडी शिंक्याला थोडीच चढते ! हिंदु राजेमहाराजे, जमीनदार आणि शेटसावकार यांची गुलामी करण्याचा त्या बिचाऱ्यांचा भोग बाटल्यानें थोडाच टळतो !

हे हिंदु धनकुबेर नबाबाच्या राजवटींतही शिरजोर असे, कीं अनेकदां नबाब-सुभेदार-शहाजादे त्यांचे ऋणको, आणि ते त्यांचे धनको असायचे. शिवाय त्यापेक्षांही सारा राज्यकारभार प्रत्यक्ष त्यांच्या हातीं. त्यांना नबाबाकडून ना कधीं व्यापारांत सवलती मिळायच्या; ना कधीं दरबारी लोकांना दिलेलीं कर्जें वेळेवर फिटायचीं. जिथें जावें तिथें लांचलुचपतीचा बुजबुजाट. आणि शिवाय सगळी परिस्थिति म्हणजे अळवावरचें पाणी. सकाळीं घोड्यावर तर संध्याकाळीं गाढवावर. नबाबाची आणि त्याच्या बड्या दरबारी मंडळींची मर्जी अशी क्षणभंगुर. अशा राजवटींत तळें राखणार तो पाणी चाखणार. पण आटलेलें तळें कोण राखणार ? आणि त्या तळ्यांत मासे तरी कशाला राहणार ?

राजा वल्लभदास हा असाच एक जातिवंत व्यापारी व बडा सावकार होता. त्यानें पाहिलें, कीं नबाबाच्या धोरणानें वागावें तर ना न्याय ना मनसुभा. ना कसलें संरक्षण. त्यापेक्षां इंग्रजांच्या तंत्रानें वागूं लागलें, कीं बंगालभर खुला व्यापार करण्याचीं दस्तकें तरी मिळतात.

सावसावकारी करावी, तरी ती इंग्रजांच्या मुठींत असलेल्या लोकांशीं. म्हणजे पैसा बुडण्याची तरी भीति नाहीं. इंग्रज जामीनदार मिळाल्यावर कर्जाला कसलें भय ?

बरें; इंग्रजही अनेकदां अशी जामीनकी आनंदानें पत्करायचा. कारण त्यांत त्याचा तोटा कांहींच नाहीं ! गाईच्या सडांतलें दूध काढून तिच्या सडांना लावायचें, आणि धार काढून फुकटच्या फुकट दूध प्यायचें. व्यापाराचीं नाकीं ठिकठिकाणीं इंग्रजानें काबीज केल्यावर शेतकरी काय, विणकर काय, कीं व्यापारी काय, कोणीही जाऊन कुठें जाईल ? माल पिकेल, कापडचोपड विणून तयार होईल, तें असें कर्जफेडीसाठीं इंग्रजी वखारींतच यायचें. राजा वल्लभदाससारखे धनकुबेर सावकार बंगालमध्यें कापडाचे लहानमोठे हातकारखाने घालून होते. शिवाय विणकरांना पोटाला म्हणा, सुताला म्हणा, पैसा देणारेही तेच. ते त्यांना आंगावर पैसे द्यायचे. आणि त्यांची सवाई-दिडी—दामदुप्पट सपाटून वसूल करायचे.

कारण, विणकऱ्यानें सूत विणलें, सुताचें कापड विणलें, तरी तें विकत घेणारे हे सावकारच. यांनीं खुशाल किंमती पाडून मातीमोलानें माल घ्यावा. आणि त्यावर भरमसाट नफा आकारून तो देशांत विकावा. तो इंग्रजाला विकला, तरीही मालाला किंमत भरपूर यायची. ती विणकरांच्या दृष्टीनें भरपूर. पण इंग्रजाच्या दृष्टीनें मातीमोल. कारण मातीचें सोनें करावें, तशा महागाईच्या दरांत तें उत्तमांतलें उत्तम तलम व भारी किंमतीचें कापड, तसाच इतर हरजिनसी माल त्यांना यूरोपांत नेऊन विकतां यायचा.

इंग्रज ज्या कापडावर यूरोपांत भरमसाट नफा मिळवायचे, तो माल कलकत्ता-मुर्शिदाबाद-डाक्काच्या राजा वल्लभदासांनीं आणि अमीरचंदांनीं मुळांतच मातीमोलानें खरीदून आपला गरगरीत नफा त्यावर आकारून इंग्रजाला विकलेला असायचा.

जगण्यापुऱ्या अन्नापेक्षां अधिक काय पदरीं पडत असेल अशा मालाबद्दल मूळ विणकर-शेतकरी-कारागिराच्या पदरीं ?

बरें; ते बिचारे कष्टाळू लोक दुसरा सावकार पाहतील, दुसरा व्यापारी पाहीन म्हणतील, तर मुळांतलें त्यांच्या गळ्याचें सावकारी दावें सुटल्याखेरीज ते दुसऱ्या गोठ्यांत जातात कुठें ? ते ज्या सावकाराच्या किंवा जमीनदाराच्या गोठ्यांत ऋणको म्हणून अगर कूळ म्हणून दावणीला बांधलेले, तें गळ्याचें दावें सुटून त्यांची सुटका होतेच कशी ?

नबाबाला वाटायचें कीं हे सावकार आपले प्रजाजन. या गाईम्हशींनीं आंबोण न खातां घागरी भरभरून धार द्यावी. तसें न करतां ते इंग्रजधार्जिणे असतात, म्हणून त्याचा त्यांच्यावर राग.

फ्रेंचांना वाटायचें कीं "आपले प्रतिस्पर्धी इंग्रज, त्यांची तुंबडी भरणारे हे सावकार लोक. नबाबाच्या कानाशीं लागून यांची खाशी खोड मोडायला लावली तर कसें होईल ?"

सावकारांना वाटायचें, "आजकाल इंग्रज ही आपल्या व्यापारउदिमाच्या व शेटसावकारीच्या दृष्टीनें दूधभरल्या कांसेची दुभती म्हैस. ती सोडून फ्रेंच अथवा नबाब, असल्या रोडक्या भाकड म्हशींना आंबोण वाढून त्या थोडेंच दूध देणार आहेत ?"

अशा कटकटींत राजा वल्लभदास आणि नबाब यांचा बेबनाव आला असेल. हा सावकार इंग्रजाला फितूर आहे अशीही खरीखोटी चुगली नबाबाच्या हेरांनीं केली.

चुगली असली कीं पुरे. ती मग खरी असो कीं खोटी असो. तीं नाणीं नबाबाच्या राजवटींत खऱ्या सोन्याच्या होन–मोहरा–पौंडांच्या

मोलानें चालायाचीं. इतर अनेक लबाडीच्या धंद्यांबरोबर चुगलखोरीचा धंदाही नबाबाच्या राजवटींत अगदीं वरपासून खालपावतों किफायत-शीर चालत असे.

लबाड लफंग्यांचे उचलेगिरीचे असे अनेक लहानमोठे उद्योग सुरू होते. ते चांगले भरभराटींत चालायचे. ह्या सगळ्या गोमाशा पोसल्या जायच्या त्या गरीब बिचाऱ्या शेतकरी-कारागीर-विणकरांच्या अंगावर बसून, त्यांचें रक्त शोषून.

कुणी असा चुगलखोर राजा वल्लभदासकडून कांहीं कारणानें दुख-वला गेला असेल. तो मग जो गेला, तो लागला नबाबाच्या कानाशीं.

नबाब भडकला. लगेच हुकूम सुटला, "राजा वल्लभदासशेटची मालमत्ता जप्त करा."

असलें भयंकर संकट आपणावर कोसळूं घातलें आहे, हें माहीत पडतांक्षणीं वल्लभदास आपली मालमत्ता मुर्शिदाबादेंत नबाबाच्या दाढेला ठेवतोच कशाला? झाडून सारीं गाठोडीं बांधून गुपचुप लेकाबरोबर देऊन कलकत्त्याला इंग्रजांच्या आसऱ्याला पसार.

हें नबाबाला कळलें, कीं ही मालमत्तेवरची धाड आपल्यावर आणि आपल्या बायकामुलांवर येणार हें राजा वल्लभदासला माहीतच. म्हणून कृष्णदासबरोबर गुपचूप सारी मंडळीही त्यानें रातोरात कलकत्त्याला पाठविली.

आणि उजाडलें नाहीं, तों स्वत: तोही नबाबाच्या पिंजऱ्यापार कल-कत्त्याच्या वाटेला लागला!

हेरानें बातमी आणली, तेव्हां ही सारी दाद नबाबाला लागली.

बस्स! लगेच नबाबाचे हुकुमांमागून हुकूम सुटले.

"राजा वल्लभदासची मालमत्ता जप्त करा."

"त्याच्या बायकामुलांना पकडून आणा."

"त्यालाही पकडून मुसक्या बांधून आमच्यासमोर आणा."

४ : इंग्रजांवर स्वारी

ते नबाबाचे हुकूम म्हणजे वाऱ्यावरच्या वराती !

मुर्शिदाबादेंत नबाबाला लुटायला राजा वल्लभदासनें आणि कृष्णदासनें केरकचरा देखील पेढीवर बाकी ठेवला नव्हता. नबाब जाऊन पाहतो तर सारी पेढी झाडून पुसून धुवून नेल्यासारखी झळझळीत.

नाहीं म्हणायला त्याचे कापडाचे कारखाने मात्र मुर्शिदाबादेंत होते. ते मात्र त्याला डोकीवरून उचलून नेतां आले नाहींत.

पण नबाबाला काय माहीत कीं तो सावकार त्याविषयीं अगोदरच जातेवेळीं मनाचा धडा करून बसला होता म्हणून ? देशभर या धनकुबेराच्या कारखानदारीचें आणि सावकारीचें जाळें पसरलेलें. सरकारदरबारही बराचसा त्याच्या मुठींत. त्याला चिरडण्याची नबाबाची काय छाती होती ? सारे धनकुबेर त्याचे पाठीराखे होते. शिवाय इंग्रज त्याचा पक्का पाठीराखा होता. त्याची खात्रीच होती कीं सरते शेवटीं इंग्रज या ना त्या हातानें आपणाला आपली सारी नुकसानभरपाई करून देईलच देईल. नबाब नाचून नाचून किती नाचेल ?

राजा वल्लभदासचें मुर्शिदाबादेहून कलकत्त्याला पलायन अथवा प्रयाण, आणि तेथला नगरशेट नवकोटनारायण अमीरचंद याच्या प्रशस्त प्रासादांत इंग्रजमान्य वास्तव्य, हा नबाबाला बांधण्यासाठीं इंग्रजानें सगळ्या वड्या कंपनीअधिकाऱ्यांच्या संमतीनें तयार केलेल्या मजबूत सांखळींतील एक दुवा होता.

कलकत्त्याचें इंग्रजी ठाणें झालें तरी कासीमबझार ठाण्याचें धाकटें भावंड. कलकत्त्याच्या वखारीचें आणि इंग्रजी व्यापाचें सारें नियंत्रण कासीमबझारहून चालायचें. कासीमबझारचा इंग्रजी वखारीचा व्यवस्थापक होता वुइलियम वॅट्ससाहेब.

" हा वॅट्ससाहेबच फार खोडसाळ आहे. सगळीकडे आगलावेपणा करणारा हा. " असे सारे नबाबाच्या कानाशीं लागून बोलायचे.

ते सांगायचे, "कलकत्त्याच्या तटबंदीलाही याचाच जोर कारण."

लगेच नबाबाचा वॅट्सला हुकूम सुटला.

"तावडतोब राजा वल्लभदासची सारी मंडळी आणि त्याची सारी धनदौलत कलकत्त्याला गेली आहे ती आमच्याकडे पाठवा. तसेंच कलकत्त्याला केलेली तटबंदी तावडतोब पाडून टाका. आणि तसें इकडे दरबारांत कळवा. यापुढें नवी तटबंदी आमच्या परवानगीखेरीज कराल तर चालणार नाहीं. या हुकुमाची तावडतोब तामिली झाली नाहीं, तर त्या आगळिकीचा सख्त विचार करण्यांत येईल. ही व्यवस्था करून लगेच येऊन भेटावें."

हा तटबंदी पाडून टाकण्याचा हुकूम जसा इंग्रजांना गेला, तसाच चंद्रनगर येथील फ्रेंच ठाण्याचा मुख्य जीन लॉ यालाही गेला.

लगेच थोड्याच दिवसांत त्यांचे जबाबही आले.

फ्रेंचांचें धोरण नरमाईचें. 'मगरी मगरी तुझी पाठ मऊ' या न्यायाचें. त्यांनीं डोळ्यांवर येण्याजोगी नवी तटबंदी केलीच नव्हती. तेव्हां ती पाडून टाकण्याचा प्रश्नच नव्हता. शिवाय फ्रेंच हे नबाबाला इंग्रजापेक्षां जवळचे. आणि इंग्रजांविरुद्ध फ्रेंचांनाही नबाब जवळचा. फ्रेंचांनीं गोड गोड पत्र लिहून नबाबाची समजूत केली.

पण वॅट्स कसला बिलंदर आणि खंबीर! त्यानें कलकत्त्याची तटबंदी पाडायचेंही मान्य केलें नाहीं, किंवा नबाबाला भेटायलाही आला नाहीं. त्यानें त्याला सफा धुडकावून लावलें.

नबाबाचा जासूद फर्मान घेऊन गेला; त्याच्याशीं वॅट्सची बेपर्वाईची वागणूक. "ऊं:! तुझा नबाब हा कुठल्या झाडाचा पाला? चल निघ येथून!"

नबाबाला तो उन्मत्तपणा कसा सहन व्हावा? जासूद गेला तसा तारीख २० मेला हात हालवीत माघारा आला. तें ऐकतांच लगेच सेनापतीला नबाबाचा हुकूम सुटला.

" बस्स. कासीमबझारवर सैन्य पाठवा. तेथील इंग्रजी ठाणें लुटून पाडून जमीनदोस्त करा. वॅट्सला पकडून आणा. ही इंग्रजी कीड मला माझ्या बंगाल्यांत नको आहे."

हुकूम होण्याचा अवकाश. लगेच तारीख २४ मे १६५६ रोजीं कासीमबझारच्या इंग्रजी ठाण्यावर स्वारी !

इंग्रजाला तेव्हां काय कल्पना, कीं हा नवा नबाब एकदम अशी डोक्यांत राख घालील म्हणून ? स्वतःच्या दर्यावर्दी आणि व्यापारी मजबुतीवर त्यांचा जेवढा भरंवसा, तेवढाच नबाबाच्या घाबरगुंडेपणावर आणि 'नमो नमो' वृत्तीवर भरंवसा. आबाखालीं गनीम मारतां येतात असा त्यांचा आजवरचा अनुभव. किती प्रकारांनीं आपण नबाबाची राजवट पोखरून ठेवली आहे, याचा त्यांचा त्यांना बरोबर अंदाज होता.

तरीपण इंग्रज एक विसरला होता. तें हें कीं नबाब सिराजउद्दौला हें जाळलेलें सुंभ असलें तरी तें पीळ न जळलेलें सुंभ होतें.

मागचा विचार मागें आणि पुढचा विचार पुढें. तसलें नबाबाला फारसें कांहीं कळत नव्हतें. त्यानें त्या दिवशींचा तेवढा तात्पुरता विचार केला.

पण वॅट्स पडला पक्का वस्ताद.

"उं:! नबाब काय आम्हांला जाब विचारायला येतो ? मातीचें भांडें तांब्याच्या भांड्याशीं काय टक्कर द्यायला येतें ? " अशा गुमींत झिंगून बसलेला तो. तो शब्दांनीं नाहीं तरी कृतीनें विचारायचा, "इंग्रजांच्या वाटेला जाण्याची आतां हिंदुस्थानांत कुणाची माय व्याली आहे ?" कर्नाटकांतील नबाब, साऱ्या देशभर रिंगण धरून बंगालवर गिधाडझेपा घालणारे मराठे, नामधारी कां असेना पण हिंदुस्थानचा बादशहा अशी बिरुदावळी मिरवणारा दिल्लीचा मोगल बादशहा, अशा सगळ्यांना तेव्हां जिकडे तिकडे साऱ्या हिंदुस्थानभर इंग्रजाचा तोच एक मगरूर सवाल असे.

तो सवालच कासीमबझारला वॅटसूच्या सोळा आणे अंगाशीं आला. आपण सगळ्यांचे दादा, या घमेंडींत कासीमबझारची वखार त्यानें कच्च्या पक्क्या संपत्तीनें जरी भरून ठेवली होती, तरी दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें या दृष्टीनें ती रितीच होती.

कावळा बसायला आणि डहाळी मोडायला गांठ पडली. कसें कां होईना; पण कासिमबझारला नबाबानें इंग्रजाचें नाक खासें कापलें खरें. त्यानें एकदम इंग्रजी वखारीवर असा जोराचा हल्ला केला, कीं तेथल्या इंग्रजाची सगळीकडून अगदीं दाणादाण उडाली. खरें म्हणजे नबाबाला तिथें इंग्रजाशीं लढावें लागलेंच नाहीं. नुसता सैन्य घेऊन धडक द्यायला तो चालून गेला मात्र. आणि धडक देण्यापूर्वींच पाहतो तों वखारीवर इंग्रजाचा शरणागतीचा पांढरा बावटा फडकला!

"आम्हांला नबाबाशीं लढायचें नाहीं. आम्ही शरण आहों." असें दांतीं तृण धरून अजीजीनें सांगत वॅट्‌स् नबाबाची करुणा भाकीत दोन्ही हात बांधून त्याच्यापुढें उभा!

नबाब एरव्हीं कसाही असला तरी वृत्तीचा उमदा. खानदानी दिलदारपणा त्याच्या रोमरोमांत भिनलेला.

त्यानें विचार केला, "शरण आलेल्याला मरण काय द्यायचें? इंग्रजाला झाली एवढी शिक्षा पुरे आहे."

आणि वॅट्‌सूला, तसेंच त्याच्याबरोबरच्या इतर इंग्रजांना त्यानें नुसतें कैद केलें.

त्या पहिल्याच विजयानें नबाबाला केवढा मोठा जोर चढला!

"मी समजत होतों इतके दिवस, कीं इंग्रज हे वाघ आहेत, आमच्या बंगालच्या वाघासारखे. पण हे पाहतों तों असे पेंढा भरलेले वाघ!" अशी आपल्या लोकांत शेखी मिरवीत नबाब जो कासीमबझारच्या इंग्रजाला खिशांत टाकून निघाला, तो थेट कलकत्त्यावर नजर ठेवून.

कारण डाक्काचा दिवाण राजा वल्लभदास आपला कुबेरखजिना, बायकामुलें, सारें कांहीं कलकत्त्याच्या इंग्रजाच्या लगामीं लावून स्वतः डावपेंच खेळत मोकाट सुटला होता. त्याच्या त्या सर्वस्वावर नबाबाचा डोळा होता. तो कलकत्त्याकडे जातांना दांतओठ खात मनांत म्हणत होता, "त्या लबाड वल्लभदासाचें कांहीं देखील आमच्या हातीं लागूं देणार नाहीं म्हणतो काय इंग्रज? त्याला म्हणावें, तें कसें हातीं लागूं देत नाहींस पाहतोंच मी."

इंग्रजांनीं बंगाल्यांत तेव्हां अनेक ठिकाणीं वखारी थाटलेल्या होत्या. कासीमबझारहून कलकत्त्याला जातांना मार्गांत खालीं पांच मैलांवर हुगळी नदीच्या पैलतीरावर ठाणें किल्ला होता. इंग्रजानें तो पूर्वीच्या नबाबाच्या बेबंद राजवटींत युक्तीनें बळकावून तेथें आपलें ठाणें केलें होतें. पण तें ठाणें फक्त व्यापाराचें, वखारीपुरतें. तें जिंकून घ्यायला नबाबाला कसला उशीर !

हुगळी आणि समुद्र यांच्यामध्यें अरुंदसा हुगळी नदीचा प्रवाह. त्या प्रवाहांत लुटुपुटीचें इंग्रजी आरमार ठाण्याच्या बंदोबस्ताला नांगरून उभें. तें आरमार म्हणजे फक्त तीनशें टनी दोन दुशिडी जहाजें. तोंच नबाब चालून आला रे आला, अशी हाकाटी कानीं येतांच तशींच आणखी दोन जहाजें त्याच दिवशीं ता. १३ जूनला नदींत आणून उभीं केलीं होतीं. बस्स. एवढेंच आरमार.

"काय करणार आहे नबाब येऊन? त्याला म्हणावें, अरे काय बुद्धिबळाच्या पटावर मोहऱ्यांऐवजीं सुंदर छेलछबेल्या उभ्या करून राजवाड्यांत ऐषआरामांत बुद्धिबळांची लढाई खेळतां तुम्ही नबाबजादे आणि तुमचे बादशहा-शहाजादे, तशी रंगेल लढाई खेळायची आहे इथें? इथें गांठ आहे म्हणावें खऱ्या जातिवंत दर्यावर्दी इंग्रज लढवय्याशीं !"

असली गुर्मीची अंगमस्ती, हाच ठाण्यावरचा इंग्रजांचा दारूगोळा आणि लढाईची तयारी !

नबाबासारख्या राज्यकर्त्यांना इंग्रज तेव्हां पिकल्या शेतावर भरारणारीं खुशालचेंडू पांखरें समजायचे. त्या पांखरांना भिववून उडवून लावायला त्यांनीं हुगळी नदींत उभारलेलें चार होडक्यांचें बुजगावणें त्यांच्या मतें पुरेसें होतें.

आणि तें बुजगावणें त्या पहिल्या दिवशीं नबाबाला भिववायला पुरेसें ठरलेंही. नबाबाचा आरंभींचा हल्ला अवघ्या पन्नास लोकांच्या तोफखान्याचा होता. तो पहिल्या तडाक्याला फूऽऽ करून उधळून लावायला तें बुजगावणें पुरलें.

पण दुसऱ्या दिवशीं हुगळीहून नबाबाच्या दोन हजार लष्कराची टोळधाड जेव्हां ठाण्यावर येऊन कोसळली, तेव्हां कुठचें काय आणि कुठचें काय; इंग्रजांना ढुंगणाला पाय लावून पळतां भुई थोडी झाली.

अशी नबाबाची फत्तेमागून फत्ते! कासीमबझार पडलें. ठाणें पडलें. नबाबाला अधिक जोर चढला. तसा त्यानें आपल्या सैन्याला हुकूम दिला, " चलो कलकत्ता ! "

" त्यांत काय आहे ? जसें कासीमबझार, जसें ठाणें, तसें कलकत्ता. हां हां म्हणतां घेऊं. आणि कलकत्तेकर इंग्रजांना नाक मुठींत घेऊन शरण यायला लावूं." अशा घमेंडीनें नबाबाच्या सैन्याची छातीही तट्ट फुगली होती.

पण इंग्रजानें इतक्या भल्याबुऱ्या मसलती योजून जें कलकत्त्याचें ठाणें बांधलें होतें, चांगला मजबूत फोर्ट वुइलियम किल्ला बांधला होता, आणि आजूबाजूचीं खेडीं फुकापांसरी किंमतीला पूर्वीच्या नबाबाकडून लाटून त्या आपल्या गोऱ्या वसाहतीची मजबूत तटबंदी केली होती, ती सहज जातां जातां नबाबाला लाटूं देण्यासाठीं नव्हे.

गोष्ट खरी; कीं इंग्रजांचें कलकत्ता ठाणें देखील त्या घटकेला लढाऊ दृष्टीनें नबाबाशीं तोंड देण्याइतकें सज्ज नव्हतें. त्याला कारण होतें. ह्या हिंदी राजेरजवाड्यांना आणि बादशहा-नबाबांना पंख कापून पिंजऱ्यांत

कोंडण्यासाठीं त्यांच्याशीं भल्या मोठ्या लढाया देण्याचीच आवश्यकता आहे, असें इंग्रजांना पूर्वी कधीं वाटलेंच नाहीं.

"खुळचट पांखरें हीं. यांना पकडून पंख कापून पिंजऱ्यांत कोंडायला लढायाच कशाला करायला हव्या? यांना कोंडण्यासाठीं फांस टाकतां आले, फांसेपारधीपणा साधतां आला, कीं बस्स!" हे अनुभवाचे बोल इंग्रज आपसांत बोलायचे.

ते फांस कसे टाकावे, आणि पांखरांची शिकार कशी करावी, हें प्रत्येक इंग्रजाला पुरेपूर माहीत.

"कांहीं फिकीर नाहीं म्हणावें त्या नबाबाला. येच तूं आमच्या कलकत्त्यावर चालून या इंग्रजांचें ठाणें जिंकून घ्यायला. तुला बरोबर फासांत पकडून तुझी मुंडी मुरगळली नाहीं तर आम्हांला विचार." अशा आत्मविश्वासानें कलकत्त्याचीं सारीं 'नाकीं' अडवून इंग्रज घट्ट पाय रोवून उभा राहिला. अर्थात् तीं नाकीं निराळीं. तीं कांहीं गांवाच्या वेशींचीं नाकीं नव्हेत. शेटसावकार, स्वार्थसाधु फितूर, लांचखाऊ, चुगलखोर, असे नबाबाच्या आजूबाजूचे लोक असलीं तीं नाकीं!

एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तरी इंग्रज ढिम करीना. तेव्हां नबाबालाही वाटूं लागलें, कासीमबझारठाण्यासारखी कलकत्त्याची जमीन भुसभुशीत नाहीं. इथें कोंपरानें खणून भागणार नाहीं. पहारी लागणार. आपणाला आपलें सारें बळ या ठिकाणीं शत्रूचा नायनाट करण्यासाठीं ओतावें लागणार."

कलकत्त्याचा कुबेरशेट अमीरचंद इंग्रजांना अचूक सल्ला देऊं लागला, "आबाखालीं गनीम मारला पाहिजे या वेळीं आपण, साहेबबहाद्दुर! आपणापाशीं पुरेसा दारूगोळा नाहीं, तोफा नाहींत, ही आपली उणीव नबाबाला मुळींच कळतां कामा नये. तें जर त्याला कळलें, आणि खुल्या रणक्षेत्रांत नबाबाशीं दोन हात करण्याचा प्रसंग आपणांवर आला, तर मात्र आपली मोठीच पंचाईत होईल."

पण अमीरचंदला काय माहीत, कीं आपणावर आणि आपल्यासारख्या इतर हिंदी धेंडांवर इंग्रज बेताबातानेंच विश्वास ठेवतो म्हणून? त्याची सारी मसलत इंग्रजानें ऐकून घेतली. होकारही दिला. आणि आपण इंग्रजाचा खरा विश्वासू सल्लागार या मोठेपणाच्या अहंकाराचें मूठभर मांस अंगावर वाढवून शेटजी बंगल्यावर माघारा जाऊन पोहोंचतो, तोंच मागोमाग त्याच्यावर धरणेकरी रवाना.

त्या रात्रीं शेटजींची झोंप इंग्रजांच्या अटकेंत !

एकटी अमीरचंदाची ही गत असें नव्हे. डाक्काच्या सुभेदाराचा लेक कृष्णदास त्याच्याकडे इंग्रजांनींच इतके दिवस पाहुणचारासाठीं म्हणून ठेवून दिला होता. अमीरचंदाचा मेहुणा हजारीमल हा नुक्ताच कलकत्त्यांत व्यापाराच्या निमित्तानें आलेला होता, तोही बंगल्यांत होता. त्या सर्वांना कैद ! आणि त्यांची चांगल्या बंदोबस्तांत बंदिवासांत रवानगी.

हो ! त्याचा काय नेम ? ऐन वेळीं हे सावकार अस्तनींतील निखारे होऊन आपल्या अंगाला चटके देऊं लागले तर ? नबाबाला फितूर झाले तर ?

" मलाही कैद ? आणि या माझ्या नातलगांना—माझ्या पाहुण्यांनाही कैद ? ती कां म्हणून ? " अमीरचंद शिपायांच्या स्वाधीन होतांना चिडून विचारूं लागला.

त्याला उत्तर एकच—" साहेबबहाद्दुरांची आज्ञा."

असा फंदफितुरीविषयीं कडेकोट बंदोबस्त केल्यावर इंग्रजानें आपलें नेहमींचें भेदनीतीचें हत्यार उपसलें. तें हत्यार असें, कीं तें डोक्यानें पेलायचें. हातांनीं पेलायचें नाहीं. त्या हत्यारानें लढायला साधे हडेहलप्पी गोरेकाळे सोजीर उपयोगाचे नव्हते. नीट जपून बासनांत बांधून ठेवल्यासारखे खिस्ती पाद्री त्या उपयोगाचे.

इंग्रजी सैन्य काय, फ्रेंच सैन्य काय, कवाइती. तसला एकेक सैनिक अनेक देशी सैनिकांना भारी असायचा. हें ध्यानीं घेऊन देशी राजे-

रजवाडे तेव्हां फ्रेंच म्हणा, इंग्रज म्हणा, गोरे सैनिक मुद्दाम आपल्या पदरीं नोकरीला ठेवायचे. आपसांत एकमेकांनीं एकमेकांच्या नरडीला झोंबायचें, तेव्हां आपली पकड अधिक अचूक आणि मजबूत व्हावी, यासाठीं हे अचूक हुकमी मारेकरी आपल्या पदरीं हवेसे राजा-महाराजा-नबाबांना तेव्हां वाटायचे.

बंगालचे नबाबही त्याला अपवाद नव्हते. त्यांतल्या त्यांत हा नवा तडफदार नबाब सिराजउद्दौला तर अधिक जाणता, अधिक शहाणा.

त्यानेंही मग इरेला पेटून चंग बांधला. " बस्स ! इंग्रज माझा बंगाल ग्रासायला टपला आहे काय ? थांब म्हणावें. तुझ्या जातभाई शिपायांकडून तुझे सात पाट काढायला लावतों. "

असें दूरदर्शी धोरण आंखून त्यानें मुळापासूनच पुष्कळ पोर्तुगीज आणि फ्रेंच सैनिक आपल्या नोकरीवर ठेवले होते. अशीं निवडक फलटणें घेऊनच तर तो आज कलकत्ता पादाक्रांत करायला आला होता.

तोंच मिशनरी पाद्री गोळा झाले. त्यांना इंग्रजानें कानमंत्र दिला, " आपणां ख्रिस्ती लोकांवर मोठा जिवावरचा प्रसंग आला आहे. कलकत्ता आपल्या हातचें गेलें, तर आपला व्यापार-धंदा, सारें-सारें हिंदुस्थानांत सफा बुडालें असें समजा."

" मग ? हा प्रसंग टाळण्यासाठीं आम्हीं काय करावें असें तुमचें सांगणें आहे ? " पाद्री इंग्रजांना विचारूं लागले. ते इंग्रज असोत कीं पोर्तुगीज असोत. गोऱ्या कातडीला गोरी कातडी ओळखीत होती.

' ता ' म्हणतां ' ताकभात ' ओळखणारे ते पाद्री. त्यांना फार सांगावें लागलेंच नाहीं. मसलती व्हायच्या त्या झाल्या. आणि त्या ख्रिस्ती धर्मगुरूंचे गुप्त फतवे निघाले. त्यांना हेरगिरीचे पंख फुटले. ते उडत नबाबाच्या गोऱ्या सैन्यांत जाऊन उतरले.

त्याचा लढाई पेटली तेव्हां नेमका उपयोग झाला. नबाबानें कांहीं काळ वाट पाहिली, कीं इंग्रज आज शरण येतील, उद्यां शरण येतील,

आणि त्यांच्यावर आपण फत्ते मिळवूं. आपणाला हव्या तसल्या अटी त्यांच्यावर लादून आपण त्यांना त्या कबूल करायला लावूं. परक्या देशांत व्यापारासाठीं आलेले आपण.—कधींही आपली पायरी सोडून वागूं नये इतकी अक्कल इंग्रजांना आली कीं नबाबाला तें पुरेसें होतें.

पण इंग्रज शरण येईनातच ! ते दिवसांमागून दिवस चालले तरी जागच्या जागीं तठलेले !

अखेर नबाबाचा धीर निघेना. त्यानें हल्ला केला.

पण पाहतो तों तोफखान्यांतील तोफांतून जसे गोळे सुटावे तसे सुटेनात. आधीं मुळीं तोफा नीट उडेनातच. आणि उडाल्या तरी नेम साधेनात !

कसे साधतील ? पाद्री लोकांनीं त्या ख्रिस्ती गोलंदाजांना धर्माची शपथ घालून कानमंत्र दिला होता. "आपण आपल्या जातभाईंशीं लढायचें ? आपल्या हातानें आपल्या पायांवर धोंडा पाडून घ्यायचा ?"

कांहीं थोडे गोरे गोलंदाज शिपाई असे फितले. आपल्या कामांत अंगचुकारपणा करूं लागले. म्हणून तोफखाना अगदीं सर्दल्यासारखा झाला होता.

तरी सारेच गोरे सैनिक कांहीं खाल्ल्या मिठाला बेइमान होणारे नव्हते. शिवाय नबाबाचेही सारेच गोलंदाज कांहीं गोरे नव्हते. त्यांत कांहीं स्वामिनिष्ठ हिंदीही होते. ते आपली कामगिरी चोख करायचे. त्यांनीं आपणांविरुद्ध कामकुचराईबद्दल नबाबाकडे तक्रार करूं नये म्हणून इमानामुळेंच केवळ नाहीं तरी भीतीमुळें देखील कांहीं गोरे गोलंदाजही नीट तोफा सोडायचे.

आणखी असें, कीं कलकत्त्यांत आंत किल्ल्यांत तरी दारूगोळा आणि तोफा लढाईला पुरेशा कुठें होत्या ? लढून पल्ला येण्याजोगा नव्हता.

इंग्रजांनीं आंतून लढा देण्याची खूप धडपड करून पाहिली. इंग्रज गव्हर्नर ड्रेक याचीं लोकांना फर्मानांवर फर्मानें सुटूं लागलीं.

" शत्रूला थारा देऊं नका. "

" नगरांतील रस्त्यांत थेटपासून दगडधोंड्याचे ढीग आणि झाडें तोडून त्यांचे अडथळे जागोजागीं उभे करा. नबाबाच्या सैनिकांना किल्ल्यांत धड प्रवेशही मिळणार नाहीं असें करा. "

" प्रत्येक नागरिकानें या वेळीं आपल्या शहराचा, आपल्या घरदार-दौलतीचा, आपल्या बायकामुलांचा बचाव करण्यासाठीं शिपाई बनून शत्रूशीं लढायला उभें राहिलें पाहिजे. "

किल्ल्यांत आणि शहरांतही बहुतेक वस्ती हिंदु-मुसलमानांचीच खरी. पण पोटार्थी मोलमजुरांची आणि व्यापारउदीम करणारांची वस्ती ती. त्यांना काय त्याचें ?

' ये रे दिवसा आणि मर रे पोटा ' असलें सर्वसाधारण रहिवासी लोकांचें जिणें. विणकर होते, कारागीर होते; पण ते बहुतेक सारे कुणा ना कुणा हिंदी अथवा गोऱ्या कारखानदारासाठीं अथवा व्यापाऱ्यासाठीं राबणारे. तो राबवून घेणारा गोरा असो कीं काळा असो, त्या बिचाऱ्या कष्टाळू लोकांचे कष्ट त्यामुळें थोडेच कमी होणार होते ?

बडे बडे धनकुबेर व्यापारी होते; त्यांनाही अशा आणिबाणीच्या वेळीं आपलें शहर म्हणून आपण कांहीं करावें असें वाटत नव्हतें. त्यांना वाटायचें, " शहर इंग्रजाच्या हातीं राहिलें काय, अथवा नबाबाच्या ताब्यांत गेलें काय; आपली सावसावकारी आणि व्यापार तर कुठें जात नाहीं ? इंग्रज आहे, तरी व्यापार जोरांत चाललाच आहे. बरें; उद्यां इंग्रज जाऊन निजाम आला, तरी व्यापार हा चालणारच. तशीच साव-सावकारीही चालणार. मग उगीच हात दाखवून अवलक्षण करून घ्या कशाला ? नबाब आणि इंग्रज यांच्या झगड्यांत जिंकतो कोण आणि हरतो कोण याचा काय भरंवसा ? आज आपण इंग्रजाची बाजू घेतली, आणि उद्यां इंग्रज तोंडघशीं पडून कलकत्त्यावर नबाबाचा अम्मल झाला तर ? मग नबाब आपणां फितुरांना उभा फाडून खाईल कीं ! त्यापेक्षां

आपण त्या वाटेला जावेंच कशाला ? शेवटीं लढाई जिंकून जो कोणी मानगुटीला बसेल तो आपला धनी. मग उगवत्या सूर्याला नमस्कार करणें आपणाला भागच आहे."

अशीं शहरांतील लोकांचीं गाभुळलेलीं मतें.

नाहीं म्हणायला गव्हर्नर ड्रेकच्या हुकुमाची प्रामाणिकपणें अंमलबजावणी करणारा एक मात्र इंग्रजनिष्ठ कलकत्तेकर प्रजाजन सावकार भेटला. तो शेठ गोविंदराम मित्र. त्यानें मात्र एकट्याला करतां आलें तेवढें केलें. पडेल ती मजुरी देऊन मजूर लावले. भराभर रस्त्यावरचीं झाडें तोडून तीं रस्त्यांत आडवीं घातलीं. दगडधोंड्यांच्या राशी रस्त्यांत उभ्या करून रस्ते अडविले.

फार काय, शत्रूला आसरा घेतां येऊं नये म्हणून तशीं उपयोगी पडणारीं घरें आणि हवेल्याही पाडून जमीनदोस्त केल्या. वेळ पडली तेव्हां त्यानें अनेक घरांना आगीही लावल्या.

पण नबाबाची लढाईची तयारी चांगलीच होती. त्या मानानें इंग्रजांची तयारी कांहींच नाहीं. त्यामुळें त्यांचा निभाव लागेना. अखेर इंग्रजांना कलकत्त्याहून जीव बचावण्यासाठीं आपल्या जहाजांतून पळ काढण्याची पाळी आली.

"आतां अखेरचा उपाय." असें म्हणून कलकत्त्याच्या ठाण्यांतील वडा इंग्रज हॉलवेल डोकें चालवून एका रात्रीं एकदम उठून एकटाच चालला. त्याच्या सहकाऱ्यांना हें कळेना, कीं या वेळीं हा माणूस कुठें जातो आहे भलत्याच वेळीं ?

तो गुपचुप चालला होता, मनांत कांहीं बेत योजून अमीचंदाला भेटायला. त्याला भरंवसा वाटत होता, कीं हा कवडीचुंबक दौलतहांवरा व्यापारी मतलबसाधुपणानें आपण सांगूं तें करायला मुळींच मागें पाय घ्यायचा नाहीं. स्वाभिमान, स्वदेशाभिमान, यापेक्षां पैशासाठीं जीव सांडणारे हे लोक !

६ : कलकत्त्याला इंग्रज पडला !

हॉलवेलसाहेब भेटायला आल्याची वर्दी घेऊन बंगल्यावरचा पहारेकरी भीतभीतच अमीरचंदशेटजींच्या शयनमंदिराकडे चालला. ती मध्यरात्रीची वेळ. आधींच शेटजी कावलेला. त्याची झोंपमोड करायला आपण गेलों, आणि तो आपणाला ठार करायला उठला तर ?

पण ती रात्र नेहमींच्या रात्रीपेक्षां वेगळी होती.

अमीरचंद आणि कृष्णदास वगैरे आणखी बडीबडी कैदी सावकार मंडळी यांचीं कलकत्त्याच्या किल्ल्यांत त्या सुरक्षित जागीं त्या रात्रीं एकत्र बसून खलबतें चाललीं होतीं.

" आतां काय करावें आपण ? इंग्रजाचा पराजय होणार, कलकत्ता पडणार, हें बहुतेक आतां ठरल्यासारखेंच आहे. अशा वेळीं आपण अजूनही इंग्रजांनाच चिकटून राहावें ? कीं—" हा सर्वांच्या गंभीर चर्चेचा विषय होता.

त्यांत एकाचें मत पडलें, " आपण आतां हर युक्तीनें एक चांगला विश्वासू माणूस हुडकून गुपचुप नबाबाकडे पाठवावा. आपण राजनिष्ठ आहों अशी त्याला खात्री द्यावी. आणि त्याचें सैन्य किल्ल्यांत शिरेल तेव्हां त्याचें स्वागत करायला किल्ल्यांतील हिंदी लोक मनापासून उत्सुक आहेत असें आश्वासन त्याला द्यावें."

तोंच त्यावर दुसऱ्यानें शंका काढली, " पण अजून तरी इंग्रजाचा पराभव झाला असें आपणाला कसें समजतां येईल ? माझा तरी असा तर्क आहे, कीं मद्रासहून एवढ्यांत ऐन वेळीं इंग्रजाला चांगली लष्करी कुमक होईल. तसें झालें, तर ह्या लढाईचें पारडें फिरून तिरपागडें व्हायला वेळ लागायचा नाहीं."

त्यावर अमीरचंद म्हणाला, "आपण कांहींही न करतां स्वस्थ बसायचें. इंग्रज विजयी झाला तर आपणांला हवाच आहे. आपल्या व्यापारधंद्याला

आणि सावसावकारीला इंग्रज काय, फ्रेंच काय, पोर्तुगीज काय— हे परके लोक जेवढे आपणाला धार्जिणे आहेत, तेवढा नबाब आपणाला धार्जिणा नाहीं. आपण नबाबाला मदत करायची म्हणजे बेबंदशाहीलाच मदत करायची कीं नाहीं? हा नवा नबाब तर फार बेताल आणि खाष्ट आहे. आपण हिंदु सावकार इंग्रजाची बाजू घेणारे आहों याची त्याला पूर्ण जाणीव आहे.—"

"त्याला म्हणावें, इंग्रज तरी काय असा आमचा सगासोयरा लागून गेला आहे, म्हणून त्याला आम्हीं वश व्हावें? इंग्रज काय इथें आम्हांला दूध द्यायला आला आहे? आणि नबाब काय, मराठे काय, अथवा इराणी-दुराणी-तुराणी काय, उद्यां कोणीही बंगालचे राजे झाले तरी ते थोडेच आमच्या केळी तोडणार आहेत? आम्हांला सारे सारखे. आमची सोय पाहील तो सोयरा. उद्यां नबाबच इंग्रजांना शेराला सव्वाशेर ठरून टिकला, आणि आमच्या उद्योगधंद्यांच्या आड आला नाहीं, तर तो तरी नको असें आम्ही कां म्हणूं?" मध्येंच तिसरा एकजण म्हणाला.

सर्वांच्या त्या वाटाघाटींचा सूर असा कीं, "आपण कांहींही हालचाल करूं नये. आयते अटकेंत सुरक्षित आहों. इंग्रज जिंकला, तर तो आमची आज ना उद्यां सुटका करीलच. इंग्रजाचें तरी आपणांखेरीज थोडेंच चालणार आहे? बरें, आमच्या कमनशिबानें नबाब जिंकला, तर आपली त्यालाही आरती ओंवाळायची तयारी आहे. उलट आम्हांला मग तोंडभर सांगतां येईल, कीं बरें झालें इंग्रजाची कीड येथून नाहींशी झाली ती. आम्ही त्याला नडत होतों. आम्ही नबाबाचीं माणसें म्हणून त्यानें आम्हांला अटक करून कोंडून ठेवलें होतें. तिथें आपला नाइलाज झाला. नाहीं तरी आम्ही खरीं आमच्या नबाबाचींच माणसें."

असा खल होऊन मंडळी आपापल्या ठिकाणीं झोंपायला गेली. अमीचंदशेट एकटाच स्वतःशीं विचार करीत बसला होता. आपल्या

इंग्रजनिष्ठेचा तो आपल्या मनाशीं टक्क्यांच्या भाषेंत आढावा घेत असावा. इंग्रजांशीं फितूर झाल्यामुळें अधिक अर्थलाभ म्हणून इंग्रज चांगला.

तेवढ्यांत पहारेकरी हॉलवेलसाहेब भेटीला आल्याची वर्दी घेऊन शेटजींपाशीं आला. त्याच्या पाठोपाठ स्वतः हॉलवेलही आला.

" इतक्या घाईनें मीं शेटजींना आणि त्यांच्या एथील इतर मंडळीला पकडून अटकेंत ठेवण्याचें नाटक कां केलें हें शेटजींच्या ध्यानीं आलेंच असेल." धूर्त हॉलवेल आपल्या केल्या कर्मांची संपादणी करूं लागला, " एकाएकीं कलकत्त्यावर ही नबाबाची धाड पडली. या वेळीं समोरासमोर सामना देऊन आमचा पल्ला येणार नाहीं अशी आमची कल्पना होतीच. तेव्हां आम्हांला सर्वांत विशेष काळजी आपणांसारख्या आमच्या मदतनिसांची होती. राजा वल्लभदासाची मंडळी जर नबाबाच्या हातीं लागली असती, तर त्यांचीं धडगत नव्हती. तशीच गत या हल्ल्यांत आमचा पल्ला आला नाहीं तर आपणां सर्वांची होण्याचा संभव. म्हणून असा डाव आम्हांला खेळावा लागला. आपण इंग्रजांच्या कैदेंत आहां, या गोष्टीचा रीतसर बोभाटा नबाबाच्या गोटापावेतों गेला आहे. अशी अडीअडचणीला उपयोगी पडण्यासाठीं आपली नबाबापाशीं पत आम्हीं चांगलीच वाढवून ठेवली आहे."

हॉलवेल बोलत होता; आणि अमीरचंद ऐकत होता. पण त्याच्या चर्चेवरून मासा जाळ्यांत सांपडण्याचें चिन्ह कांहीं हॉलवेलला दिसेना.

तरीही ' बोलावें कीं न बोलावें ' अशा हेलकावत्या मनानें त्यानें मनांत योजलेली गोष्ट काढलीच.

" शेटजी जर या वेळीं नबाबापाशीं जातील, आणि तहाची खटपट करतील, तर प्रसंग निभावून जाण्याजोगा आहे."

डावपेंचांत हॉलवेल शेर असला, तर शेटजी शेराला सव्वा शेर होता. नबाबाला हॉलवेलपेक्षां तो अधिक चांगला ओळखीत होता. असल्या लटक्या साखरघोळ गप्पांनीं फसण्याइतका कांहीं नबाब भोळा

नव्हता, हें तर खरेंच. आणि शिवाय, शेटजींनाही इंग्रजाविषयीं खुनस चढल्यासारखी झाली होती.

काय त्या पाताळयंत्री धनकुबेराच्या मनांतले तेव्हांचे काय बेत होते, ते त्याचे तो जाणे. वेळीं इंग्रज पडला आणि नबाब चढला, तर तें फुकटचें श्रेय पदरीं पाडून घेण्याचा डाव त्यांच्या मनांत होता कीं काय नकळे. पण त्यांनीं हॉलवेलच्या शब्दाला नकार दिला.

हॉलवेल आला तसा चिमणीएवढें तोंड करून हात हलवीत माघारा गेला.

आणि शत्रूचा अखेरचा मरणघाव मानेवर पडण्याची वेळ तर भरत आली. तोफा धडाडत होत्या. पेटते गोळे किल्ल्यांत पडत होते. सभोंवार वस्ती यूरोपियन लोकांची. त्या घरांतून इंग्रज गोळीबार करून हल्ला परतविण्याची शिकस्त करीत होते. पण कांहीं इलाज चालेना.

“ आपलीं जहाजें सारीं शत्रूचा मारा चुकवून किल्ल्यालगत येऊं देत. आणि भराभर आपल्या लोकांना त्यांत भरती करून फुल्टाच्या वाटेला लावा. शत्रूला दाद न लागतां ही हलवाहलव झटपट आटोपली पाहिजे.” हुकूम सुटला.

लगोलग हुकमाची अंमलबजावणी सुरू झाली. आतां धीर निघणें शक्यच नव्हतें. जहाजांतून पसार होण्यासाठीं देखील किल्ल्यांतील साऱ्या इंग्रजांची आणि त्यांच्या बायकामुलांची इतकी धांदल, गर्दी आणि रेंटारेंट झाली कीं हरे राम ! कांहीं पोरेंबाळें आणि शरीरदुबळीं माणसें त्या रेंटारेंटींत चेंगरलीं देखील.

इतकें सारें करूनही किल्ल्यांतली सारी इंग्रज मंडळी सुरक्षित किल्ल्याबाहेर पडूं शकली नाहींच. तिथें त्यांच्या लग्याबांध्याच्या देशी बाटग्यांना आणि इतर रहिवाशांना आतां कोण भेटणार ?

तरी बरें, कीं इंग्रजांनीं मथविलेल्या नबाबाच्या तोफखान्यावरील गोलंदाजांकडून तोफा डागण्यांत कसूर होत होती. म्हणून तर वरून गोळे

सुटत असतांना नदींतून लोक भरलेलीं जहाजें बहुतेक सुखरूपपणें निसटत होतीं. ती गोलंदाजी जर अचूक झाली असती, तर सहसा जहाजें नदीपार होऊंच शकलीं नसतीं. त्यांना त्यांतील इंग्रजांसह जलसमाधि मिळाली असती.

रविवार तारीख २० जून उजाडली, ती सैन्यासह विजयी नबाबाला किल्ल्यांत मोकळा प्रवेश मिळालेला पाहण्यासाठीं. किल्ला हातीं पडल्यावरचा हलकल्लोळ तर विचारायलाच नको. लूटमार काय आणि हाणामारी काय !

शेलके इंग्रज जे हातीं सांपडले, ते फांसावर लटकले. त्याहून जरा जे कमी गुन्हेगारसे वाटले, जखमी होऊन प्राणभयानें लपून राहिलेले सांपडले, त्यांचा न्याय होणार होता. त्यासाठीं तिथें किल्ल्यांत इंग्रजी तुरुंगाची एक लहानशी बिनहवेची आंधारी खोली मोकळी सांपडली. त्या खोलींत नबाबाच्या शिपायांनीं कोंडून ठेवलें.

दुसऱ्या दिवशीं पाहतात तों त्यांतले कांहीं मेलेले आढळले; आणि कांहीं जिवत सांपडले. अशी त्यांची उर्दशा झाली.

नबाब सिराजउद्दौल्यानें समारंभपूर्वक आपल्या विजयी सेनेसह किल्ल्यांत प्रवेश केला. असा अखेर कलकत्त्याला इंग्रज पडला !

७ : पण नंतर ?....

किल्ल्यांत मग नबाबाचा भव्य दरबार भरला. वाघांसारखे शूर इंग्रज. पण ते कैदी दरबारांत नबाबासमोर आणून उभे करण्यांत आले तेव्हां ते बोक्यांसारखे क्षुल्लक झाले होते. नबाबाला कःपदार्थ लेखून अरेरावासारखा वागणारा उन्मत्त हॉलवेलही हातापायांत लोखंडी बेड्यांचा शृंगारसाज चढविलेला त्या कैद्यांतच हात जोडून दीनवाण्या मुद्रेनें क्षमेची याचना करण्यासाठीं नबाबापुढें उभा होता.

सरदार, मानकरी व इतर अनेकांनीं नबाबाला नम्रतापूर्वक नजराणे दिले. जे मतलबसाधु व्यापारी आणि सावकार नबाबाविरुद्ध गुपचुप इंग्रजांची तळी उचलून धरून आपला कार्यभाग साधणारे होते, ते देखील त्यांत होते. त्यांत शेठ गोविंदराम मित्र पहिला!

कलकत्त्याचा तेव्हांचा पराभूत इंग्रज गव्हर्नर ड्रेक याच्या शब्दांत सांगायचें तर.... "याप्रमाणें आमच्या कलकत्ता येथील वसाहतीचें नबाबाहातीं वाटोळें झालें. कलकत्त्याचा विध्वंस झाला."

लागोपाठ चार दिवस कलकत्ता शहर नबाबाच्या विजयोत्सवानें दुमदुमत होतें. नबाबाविरुद्ध इंग्रजी मसलतींत मुरलेला कलकत्त्याचा सुभेदार माणिकचंद तर नबाबाविषयींच्या राजनिष्ठेनें इतका बेहोष झाला होता कीं त्याला पाहून नबाबाला वाटलें, "वा:! राजनिष्ठ अनुयायी असावा तर असा असावा."

इतकी उजळ राजनिष्ठा वायां कशी जाईल? त्याच दिवशीं नबाबाचें फर्मान निघालें, "आजपासून राजा माणिचंद आमच्या कलकत्ता ठाण्याचा सुभेदार नेमला जात आहे."

असा कलकत्त्यांतील विजयसमारंभ पार पडला. नंतर तसलाच समारंभ आणि दरबार साजरा करून आपल्या राजवटीची ग्वाही देण्यासाठीं नबाबाची स्वारी हुगळीकडे रवाना झाली.

नाहीं तरी नबाबाला आतां आनंदोत्सवाप्रीत्यर्थ असे दरबारसमारंभ आणि नृत्यगायनोत्सव असल्या ऐषआरामी कार्याखेरीज दुसरें काय काम होतें? त्या गर्दींत अवांतर गोष्टींचा विचार करायला त्याला सवड तरी कुठें होती? आणि तसलीं जबाबदारीचीं व दगदगीचीं कामें राज्यकर्त्यांच्या माथीं असतात, हें तरी कुणा बेट्याला माहीत होतें!

हुगळीला नबाबाचा केवढा टोलेजंग दरबार भरला! केवढा जयजयकार झाला! कित्येकांनीं आपल्या ह्या नव्या नबाबाला भरघोस नजराणे दिले, आणि त्याची मेहेरनजर संपादन केली.

हुगळी शहर म्हणजे गोऱ्यांच्या वखारींचें ठाणें. तिथें इंग्रजांची वखार, तशाच फ्रेंच आणि डच यांच्याही वखारी होत्या. दरबारांत फ्रेंच आले. त्यांनीं साडेतीन लाख रुपये, नजराणा आणि युद्धखर्च म्हणून नबाबाच्या पायांवर ओतले.

डच आले. त्यांनीं तसेच साडेचार लाख रुपये ओतले.

पण बिळांत दडालेला तो इंग्रज साप मात्र बाहेर आला नाहीं. इंग्रज दरबारांत आला नाहीं. तो कां व कसा नकळे; पण जसा कलकत्त्यांतून पसार झाला होता, तसाच हुगळींतूनही पसार झाला होता. फुल्टाच्या सुरक्षित बिळांत आपल्या मजबूत ठाण्यांत त्या सापानें आसरा घेतला होता. नबाब मात्र समजत होता, कीं इंग्रज संपला ! खलास झाला ! तो कसला आतां नबाबाविरुद्ध डोकें वर काढतो ?

असे आपल्या विजयाचे उत्सवसमारंभ साजरे करीत, नजराणे घेत, आणि मनाला येईल तशी मेहरबानीची खैरात करीत तारीख ११ जुलै रोजीं नबाबाची स्वारी समारंभानें मिरवत मिरवत आपल्या राजधानी मुर्शिदाबादेंत येऊन दाखल झाली.

पण तो दुसरा होऊं घातलेला नबाब ?

तेव्हां लोक कुजबुजत होते, कीं पूर्णियाचा शौकतजंग आपल्या नांवानें बंगाल-बिहार-ओरिसाच्या सुभेदारीचीं फर्मानें दिल्लीहून आपल्या नांवानें आणवून पुन्हा तिकडे डोकें वर काढतो आहे.

आरंभीं तर राजधानींतील आनंदोत्सवाच्या भरांत तिकडे कुणाचें लक्षच गेलें नाहीं. असे दिवसांमागून दिवस जाऊं लागले. त्यांत पावसाळा संपला. विजयोन्मादाची नशा डोळ्यांवरून उतरूं लागली. तेव्हां नबाबाचे जरा जरा जमिनीला पाय लागूं लागले. लोक शौकतजंगा-विषयीं कुजबुजत, तें खरें असल्याचें त्याच्या प्रत्ययाला येऊं लागलें. शौकतजंगाचें नबाबी बंड वाढूं लागलें. आतां त्याचा समाचार घेण्याची पाळी आली.

प्रकरण विकोपाला गेलें. अखेर राजमहाल मुक्कामीं दोन सैन्यांची समोरासमोर गांठ पडली. खडाजंगीची लढाई झाली. लढाईंत अखेर शौकतजंग ठार झाला.

पुन्हा एकवार 'बंगाल-बिहार-ओरिसाचे नबाब सिराज-उद्दौला साहेबकी जय !' असा जयघोष दुमदुमला.

नबाबाला हा त्याच्या प्रतिस्पर्धी नबाबावर जय मिळाला खरा. पण हें प्रतिस्पर्ध्याचें कळसूत्री बाहुलें नाचविणारा पडद्यामागील सूत्रधार निराळा होता. त्यानेंच फुल्टा, मद्रास अशा सुरक्षित ठिकाणांहून पुढील शिकारीच्या धोरणानें आपल्या शत्रूच्या सामर्थ्याचा अंदाज घेण्यासाठीं शौकतजंग हा बकरा सजवून शृंगारून बळी दिला होता. याचा नबाबाला अथवा कुणाला मागमूसही नव्हता.

तें नबाबाला कळलें केव्हां? इंग्रज प्रत्यक्ष नबाबाची शिकार करायला चालून आला तेव्हां !

स्वाध्याय :

१. कर्नल मिलच्या गुप्त पत्राचा आशय सांगा.
२. सिराजउद्दौल्याच्या मनांत म्हाताऱ्या आजोबा नबाबाविषयीं काय विचार घोळत होते?
३. स्कॉट मुर्शिदाबादेला येण्याचें कारण काय ?
४. म्हाताऱ्या नबाबानें मरत्या घडीला काय सांगितलें ?
५. नबाबाच्या राजवटींतील हिंदु धनकुबेर आणि शेटसावकार यांच्या मनांत काय होतें ?
६. नबाबाच्या कासीमबझारवरील स्वारीची हकिकत सांगा.
७. अमीरचंदला कैद कां झाली ?
८. नबाबाच्या कलकत्त्यावरील स्वारीची गोष्ट सांगा.
९. हॉलवेल व अमीरचंद यांच्या वाटाघाटी काय झाल्या ?
१०. कलकत्त्यांतील इंग्रजांच्या पराभवाचें वर्णन करा.
११. नबाबानें विजयोत्सव कसा साजरा केला ?

प्रकरण तिसरें

नबाबाचा बंगाल कोसळूं लागला

१ : दिवा विझला !

कशी नकळे; पण नबाबावर येऊं घातलेल्या संकटाच्या त्या बातमीची धूळ मुर्शिदाबादेला नबाबापावेतों उडाली. पण धूळच ती ! नबाबानें ती ऐकली, पाहिली आणि पुसून टाकली.

तरी पण आपल्या मतें सावधपणा म्हणून त्यानें एक मात्र केलें. कलकत्त्याहून सुभेदार माणिकचंदला बोलावून घेतलें. आणि विचारलें, " शेटजी ! इंग्रजांच्या काय हालचाली चालल्या आहेत ? "

माणिकचंद कसला वस्ताद ! उडत्या पांखरांचे पर मोजणारा. त्यानें क्षणांत गेल्या अनेक दिवसांतील घडामोडींचा मनाशीं आढावा घेतला. कोण आले, कोण गेले, काय झालें, सारीं चित्रें ध्यानीं आणलीं. आणि अस्वलाआधीं दरवेशानें आरोळी मारावी तसें सांगून टाकलें, " क्लाइव्ह-साहेबानें चढेलपणानें एक खलिता खाविंदांकडे रवाना करण्यासाठीं माझ्याकडे पाठविला होता. पण त्यांतील उर्मटपणाची भाषा पाहून मीं तो परत पाठविला. आणि साहेबाला सांगितलें, कीं आपली स्वतःची पायरी ओळखून, तसेंच नबाबांची थोरवी ओळखून रीतीच्या रीतीनें काय लिहायचें तें लिहा. अथवा काय लिहायचें तें परस्पर लिहा."

" शाबास ! खरें बोललास तूं." नबाबानें सुभेदाराला शाबासकी दिली. ती ऐकून सुभेदारानें हायसा उसासा सोडला. त्याला भय वाटत होतें, कीं नबाबाचे हेर ढेंकूण-पिसवांसारखे सभोंवार पसरलेले. आपलीं आणि इंग्रजांचीं गुप्त खलबतें झालीं, त्यांचा त्या हेरांना कितपत सुगावा लागला असेल, आणि तो नबाबाच्या कानीं कुठवर गेला असेल, याचा काय नेम ?

" एकूण इंग्रजांचे दाखवायचे दांत निराळे आणि खायचे दांत निराळे आहेत म्हणायचे ! " नबाब म्हणाला.

सुभेदार त्यावर कांहीं बोलला नाहीं. आणि नबाबही बरोबरीच्या नात्यानें असल्या मनमोकळ्या सल्लामसलतींची दखल कधीं घेत नसे.

" इतके दिवस इंग्रजांचें फुल्टाहून नमो नमो चाललें होतें, तें निव्वळ ढोंगच होतें म्हणायचें तर; आम्हांला चकवण्यासाठीं ?—कापड, सोरा, सारे जिन्नस बिनबोभाट आमच्याकडून कंपनीला पुरवले जावे म्हणून ? " नबाब पुढें म्हणाला.

पण तो जें बोलला, तें हातचे राखून बोलला. वास्तविक ती सामोपचाराची पायरी ओलांडून आक्रमणाचा चढ धिमेपणानें चढायला इंग्रजांनीं नुक्तीच सुरुवात देखील केली होती.

आज काय, अमक्या नबाबाचें पत्र आलें: " इंग्रज फार रागावले आहेत. ते त्यांच्यावर झालेल्या आगळिकीचा जाब विचारल्याखेरीज स्वस्थ राहणार नाहींत. प्रकरण अधिक विकोपाला जाऊं देणें दौलतीच्या हिताचें नाहीं."

उद्यां काय, असाच आणखी तमक्या फलाण्या बड्याचा खलिता.

परवां काय, इंग्रजांच्या रगेल दंडेलीच्या आणि युद्धाच्या खुमखुमीच्या तक्रारी.

तेरवां काय, नबाबाच्या जखमेवर मिठाचें पाणी ओतावें तसें मद्रासच्या गव्हर्नर पिगॉटचें नबाबाला बोचरें पत्र.

असें आपल्या राजवटीविरुद्ध सगळीकडून जिकडे तिकडे रान उठवण्याची इंग्रज तयारी करतांना नबाबाला दिसत होता. अजीजीची आणि नमोनमोची इतक्या दिवसांची भाषा हा केवळ वरवरचा पानपाचोळा होता. तो आतां बाजूला सारला जाऊन त्या खालचे साप, विंचू वळवळतांना दिसूं लागले होते. पण तिथें नबाबाचा कांहीं इलाज चालत नव्हता. तो तोंडानें म्हणे तेवढेंच. अधिक कांहीं बोलण्याइतका

जोर त्याच्या जिभेंत आतां उरला नव्हता. सगळीकडे आकाश अधिकाधिक फाटत चाललें होतें. त्याला त्यानें ठिगळें कुठें आणि कशीं म्हणून लावावीं?

व्यापाऱ्यांच्या तक्रारी येतच होत्या. "बादशहांनीं जिकडे तिकडे मोफत व्यापार करण्याचे परवाने इंग्रज कंपनीला दिले. त्यामुळें त्यांचा व्यापार भरभराटला, आणि आपला व्यापार बसला. व्यापारच चालत नाहीं, तर कर कशावर द्यायचा?"

नबाबाचे अधिकारी म्हणायचे, "कराचा पैसा वसूलच झाला नाहीं, तर हुजूर तिजोरींत भरणा तरी कसला करायचा?"

तोंडाला पानें पुसावीं तशा यासारख्या आणखी सबबी नबाबाच्या प्रत्येक सुभ्यांतून प्रत्येक अधिकाऱ्याकडून ऐकूं येत होत्या. एकटा माणिकचंद त्याला अपवाद कोठून असेल?

"वेळ पडली तर आपणांला इंग्रजांविरुद्ध पुन्हां हात उगारावा लागेल. त्या तयारीनें राहा." असें नबाबानें सांगितलें. आणि सुभेदारानें तें ऐकून घेतलें.

पण तो माघारा कलकत्त्याला जाऊन पोहोंचतो, तों इकडे नबाबाच्या दरबारीं दर्यावर्दी इंग्रज सेनानी ऍडमिरल वॉटसन याचें भडक पत्र येऊन धडकलें :

"साऱ्या जगभर ज्यांचें नांव आदरानें उच्चारलें जातें, त्या आमच्या राजानें मला बरोबर खंबीर आरमार देऊन हिंदुस्थानांत आमच्या ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापार, उद्योगधंदे, आणि तिनें संपादन केलेले हक्क यांचें संरक्षण करण्यासाठीं पाठविलें आहे. आमच्या राजाच्या प्रजाजनांनीं या देशांत व्यापार सुरू केल्यापासून मोगलांच्या राजवटीला किती फायदा झाला आहे आणि किती सवलती मिळाल्या आहेत, त्यांचा येथें पाढा वाचण्याची मुळींच गरज नाहीं. इतक्या त्या ढळढळीत आहेत. असें असतांना तुम्हीं आमच्या कंपनीच्या वखारींवर भलें मोठें सैन्य घेऊन अचानक घाला घातला आणि कंपनीच्या नोकरांना त्यांच्या सत्तेच्या ठाण्यांतून सक्तीनें पिटाळून

लावलें. कंपनीच्या मालमत्तेची लुटालूट केली. कंपनीची रोकड पळविली. आमच्या राजाच्या अनेक निरपराधी इंग्रज प्रजाजनांना ठार मारलें.

" त्या आमच्या कंपनीचा अंमल त्या कंपनीच्या वखारींत पुन्हां जारी करण्यासाठीं आणि कंपनीच्या नोकरांना त्यांच्या त्यांच्या ठिकाणीं काम करण्याचा मार्ग मोकळा करून देण्यासाठीं मी कंपनी सरकारच्या हुकुमानें मुद्दाम बंगालमध्यें आलों आहें. मला आशा आहे कीं, तुम्ही आमच्या लोकांना हा न्याय मिळवून देण्याच्या कामीं आणि कंपनीचा अंमल त्यांच्या दौलतीवर त्यांच्या पुरातन हक्कांसह स्थापन होऊं देण्याच्या कामीं अडथळा करणार नाहीं.

" तुमच्या देशांत इंग्रजांनीं वास्तव्य केल्यापासून तुमच्या देशाला जो फायदा झाला आहे, त्याची तुम्हांला आठवण असली पाहिजे. आणि त्यामुळेंच वरील हल्ल्यांत कंपनीची जी नुकसानी झाली असेल, तिची भरपाई करून देऊन तुम्ही कंपनीचें समाधान करालच. तसेंच अशा न्यायाच्या वागणुकीनें ह्या कटकटीचा समजुतीनें शेवट करून आमच्या राजाशीं मित्रत्वाचे संबंध जोडालच. याविषयीं मला मुळींच शंका नाहीं. याहून अधिक काय लिहावें ? "

हें धमकीवजा पत्र म्हणजे कांहींच नव्हे ! असें पत्र वॉटसनचा जोडीदार, त्याच्या साथीनें नबाबाची शिकार करायला सोडलेला खुनशी चित्ता रॉबर्ट क्लाइव्ह याचें. वॉटसन हा नबाबावर तुटून पडायला टपून बसलेला इंग्रजी आरमाराचा सेनानी, आणि क्लाइव्ह हा गोऱ्या लष्कराचा सेनानी.

" आमच्या आगमनाची कल्पना तुम्हांला आमचा गव्हर्नर विगॉट याच्या पत्रावरून आलीच असेल. आणि आम्हीं आमच्याबरोबर आजवर बंगालनें कधीं पाहिलें नाहीं आणि ऐकलें नाहीं असें खंबीर आरमार व गोरें लष्कर घेऊन तुमचा समाचार घ्यायला आलों आहों, याचीही तुम्हांला कल्पना असेलच.

" तुमच्या मुलुखांत येऊन स्थायिक झालेल्या इंग्रजांना तुम्हीं आणि तुमच्या लोकांनीं किती अन्यायानें आणि धोकेबाजपणानें वागविलें, हें नीट ध्यानीं आणा. तुम्हीं त्यांचीं घरेंदारें धुळीला मिळविलीं. त्यांची घसघशीत

मालमत्ता लुटली. कंपनीच्या अनेक नोकरांना आणि त्यांच्या नातलगांना क्रूरपणें ठार केलें. असले अत्याचार प्रत्यक्ष तुम्हांला पसंत नसतील असें मी मानीनही. पण केव्हां ?—"

" 'तुमचें सामर्थ्य आणि शौर्य तर साऱ्या जगांत गाजतच आहे.' अशी तोंडदेखली स्तुति केल्यासारखे शालजोडींतले हाणून क्लाइव्ह त्या पत्रांत पुढें म्हणतो, " पण मीं देखील आज गेलीं दहा वर्षें या तुमच्या देशाच्या किनाऱ्यावर हिंमत गाजवून नांव केलें आहे. आणि प्रभूची कृपाही अशी कीं मीं जिथें जिथें गेलों, तिथें तिथें हटकून विजयीच होत आलों. तसाच या प्रदेशांतही मी विजयी होईन, असा माझा प्रभूवर भरंवसा आहे."

" या थरापावेतों गोष्टी आल्या, तर आपणां दोघांपैकीं एकाचा नाश होणार, हें अटळ आहे. आपण दोघेही विजयी होऊं शकणार नाहीं हें निश्चित. युद्धांत जय-पराजय किती बेभरंवशाचे असतात, याचा तुम्ही विचार करा; माझें ऐका. इथवर विकोपाला गोष्टी जाऊं देऊं नका."

पण त्यासाठीं काय करा ? तर युद्धप्रसंग टाळण्यासाटीं कंपनीचें आणि तिच्या नोकरांचें झालेलें सारें नुकसान भरून द्या. त्यांच्या वखारी निमूटपणें त्यांच्या हवालीं करा. त्यांच्या पुरातन सवलती त्यांना द्या. आणि कोणीही त्यांच्या हितसंबंधांच्या आड येणार नाहीं अशी हमी त्यांना द्या. एवढें करा, म्हणजे तुम्हांला आमची मैत्री लाभेल आणि स्वर्गीय आनंद उपभोगतां येईल. त्याप्रमाणेंच युद्धांत दोहींकडचे हजारों निरपराधी सैनिक जे ठार होणार, त्यांचेही प्राण वांचतील !

हीं त्या दोघां इंग्रज सेनानींचीं पत्रें म्हणजे केवळ कुरापत काढण्याचा कावा होता.

त्या पत्रांचें उत्तर येईपावेतों ते दोन चित्ते नबाबाच्या बंगालवर तुटून पडण्याचे खोळंबणार होते, अशांतली गोष्ट मुळींच नव्हती. डिसेंबरच्या १७ तारखेला दोन्ही पत्रें रवाना झालीं. तेव्हांच त्या पत्रांपाठोपाठ, नबाबाला विचार करायला मुळींच वेळ न देतां एकदम चाल्हून जाऊन कलकत्त्यावर तुटून पडण्याचा त्यांचा बेत होता.

परंतु सैन्य घेऊन लढाऊ जहाजें हाकारायचीं. त्यासाठीं हुगळी नदींतील हवामान सोईचें पाहिजे. त्यासाठीं दहा दिवस खोळंबा झाला. आगेकूचला खरी सुरुवात २७ तारखेला झाली. २८ तारखेला इंग्रज सोजीर मायापूरला कंपनीच्या लष्कराला जाऊन मिळाले. आणि दुसऱ्या दिवशीं शत्रू सज्ज होऊन बजबज ठाण्याला येऊन भिडला.

नदीकिनाऱ्यावर गोरें लष्कर अशा धोरणानें झाडीझुडुपांआड असें उभें राहिलें कीं जहाजांच्या डोलकाठीच्या टोंकांवरून त्याचा सुगावा तर लागावा. परंतु किल्ल्यांतून पाहणाराला मात्र त्याचा मागमूसही लागूं नये.

तरीदेखील नबाबाची सावली—त्याचा संशय—क्लाइव्हला भिववीत होताच. त्याच्यापेक्षांही त्याच्या फितूर अधिकाऱ्यांचा जास्त संशय. फितुरच ते. त्यांची फितुरी मतलबसाधु व दुतोंडी असली तर ?

"त्याचा काय नेम ? आमच्याकडून मलिदा खाऊन आमच्या तंत्रानें वागणारे हे नबाबाचे अधिकारी खादाडीला लालचावलेले. त्यांना आमच्यापेक्षां आमच्या शत्रूकडून अधिक घसघशीत खाद मिळाली असली, तर ते आमच्यावरही उलटायचे. खाल्ल्या घरचे वांसे मोजूं लागायचे. ह्या सुभेदार माणिकचंदचा तरी काय नेम सांगावा ? तो 'इंग्रजांविरुद्ध आपण किल्ला लढवणार नाहीं.' असें लांचखाऊ वचन देऊन गेला खरा. पण बोलून चालून लांचखाऊ माणूस तो. दिल्या वचनाला जागेलच याचा काय भरंवसा ?"

नबाबाचें सैन्य दोन मैलांवर येऊन सामना द्यायला खडें आहे अशी बातमी इंग्रजाच्या हेरांनीं आणली. तेव्हां तर त्या त्याच्या संशयाला अधिकच जोर आला.

लगेच त्यानें चपळाई करून आपल्या बहुतेक सैन्याच्या लहान लहान टोळ्या करून चौफेर रवाना केल्या. त्याचा काय नेम ? इथल्या रहिवासी बंगाली लोकांच्या पायांखालचा तो मुलूख. मारगिरीच्या

जागा त्यांना नेमक्या माहीत असायच्या. भुसकन एकदम ते पुढें यायचे आणि धाड घालायचे.

तरीदेखील इतकी दक्षता घेऊनसुद्धां इंग्रजावर त्याच्या शत्रूची अचानक अचूक धाड पडायची ती पडलीच. तीही खात्रीच्या माणसानें केंसानें गळा कापावा तशी.

क्लाइव्ह अवघे १६० हत्यारी सोजीर घेऊन मोक्याच्या जागीं ठाण मांडून उभा होता. तों एकदम त्याच्यावर किल्ल्यांतलें दोन हजार सैन्य तुटून पडलें. त्या सैन्याचा सेनापतीही दुसरा तिसरा कोणी नव्हे. खुद्द कलकत्त्याचा सुभेदार राजा माणिकचंद !

"काय ? इतका उरफाट्या काळजाचा आहे हा सुभेदार आम्हांला वचनें देऊन असें हातोहात फसविणारा ? कीं नबाबाच्या फौजेनें आमच्यावर प्रथम हल्ला केला म्हणून मग आम्हीं हल्ला केला असें कारण हवें म्हणून त्याला आपण म्हणालों होतों, तें हें कारण पुरवतो आहे हा ?" असें मनांत म्हणत क्लाइव्ह त्या प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आपल्या लोकांना हुकूम करणार, तोंच त्याचें नशीब जोरावर. नबाबाचा बजबज किल्ला घ्यायला मद्रासकडून पाठीमागून चालून आलेली दुसरी सुसज्ज सेना जवळ गोळीबाराचा आवाज होऊं लागलेला ऐकून अधिक वेगानें वेळींच मदतीला धाऊन आली, म्हणून वेळ चांगलीच निभावली गेली.

त्या इंग्रजी फौजेनें हल्ला करण्याचा अवकाश. नबाबाचा सेनापति हादरला. तेवढ्यांत एक गोळी त्याच्या पागोट्यांत घुसून आरपार गेली आणि पागोटें पेटूं लागलें. त्याबरोबर तर कुठचें काय आणि कुठचें काय, माणिकचंदाला ढुंगणाला पाय लावून पळतां भुई थोडी झाली. तो जो पळाला, तो थेट मुर्शिदाबादेकडे ! आणि तोही कसा ? तर आवो जावो घर तुम्हारा असा अगदीं साकसुरत पवित्रा मांडून. किल्ल्याचे दरवाजे शत्रूला असे सताड मोकळे ठेवून !

इंग्रजासारख्या प्रबळ शत्रूशीं गांठ आहे, हें ओळखून नबाबानें त्या आधींच मजबूत असलेल्या बजबज ठाण्याची आणखी कडेकोट मजबुती करून ठेवली होती. असली कडेकोट तटबंदी शत्रूच्या तोफा-बंदुकांना दाद देणारी नसली तरी ती फितुरीच्या तोफगोळ्यांपुढें थोडीच टिकाव धरते !

ही सारी पोरखेळवजा लढाई डिसेंबरच्या २९ तारखेला रात्रीं जेमतेम चारदोन घटका लढली गेली. कॅप्टन कुक तेव्हां किल्ल्यावर हल्ला करण्यांत आघाडीला होता. तो किल्ल्यापाशीं आपल्या जहाजावर उभा होता. तोंच त्याच्यासमोर एका दारू पिऊन धुंद झालेल्या सोजिरानें त्या दारूच्या नशेंतच जहाजावरून किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळील होडक्यावर उडी मारली. त्याच्या हातीं बार भरलेलें पिस्तुल होतें. त्या पिस्तुलानें त्यानें अवघी एक गोळी झाडली. आणि एकदम हर्षवायु झाल्यासारखी आरोळी ठोकली, "आपण किल्ला जिंकला."

त्या धाडसी धटिंगण सोजिराशीं या कानाची त्या कानाला न कळतां माणिकचंदच्या त्याच्याचसारख्या ढालगज हस्तकानें गुपचुप आगाऊ ठरविलेली ही सारी मसलत होती. त्याची क्लाइव्हला दादही नव्हती.

लगेच मेलेल्या जनावरावर गिधाडें तुटून पडावीं तसे इंग्रज सोजिर किल्ल्यावर तुटून पडले. ते जहाजावरून भराभर उड्या मारीत किल्ल्यांत घुसले, आणि आंतील लोकांची सपासप कत्तल करीत सुटले. आंत दारूगोळ्याची जय्यत तयारी होती. पण सुभेदारच दगा देऊन आंतील सारें सैन्य घेऊन निघून गेल्यावर तो दारूगोळा काय चाटायचा होता !

नबाबाच्या दराऱ्याचा बुडबुडा असा फूऽऽ म्हणतां फुटला. त्यासाठीं इंग्रजांना फारशी यातायात मुळींच करावी लागली नाहीं.

विझतांना दिवा मोठा होतो आणि भडकतो, तसा नबाब सिराज-उद्दौल्याचा नबाबी अंमल कलकत्त्यावर अवघा सहा महिने टिकला. तो दिवा सहा महिने तेवून असा एकाएकीं भक्कन विझला !

२ : नबाबाच्या नाकांत घालण्याची वेसण !

दिवा विझला. आंधार झाला.

इंग्रजांना कलकत्त्याचा किल्ला लुटायला व हवी तशी जुल्मजबरदस्ती करायला मोकळा सांपडला. पण लुटण्याजोगें फारसें कांहीं किल्ल्यांत बाकी नव्हतेंच. जें काय पूर्वीं होतें, तें सहा महिन्यांपूर्वींच इंग्रजानें कलकत्त्याहून पसार होतांना लांबविलें होतें. राहिलेंसाहिलें तें सुभेदार माणिकचंदानें, गाय कसायाला विकतांना अगोदर धार काढून तिची कांस मोकळी करावी तसें, केव्हांच पसार केलें होतें. ज्यांना संरक्षण नाहीं, अशीं नबाबाच्या तेथील औट घटकांच्या सहा महिन्यांच्या नांवापुरत्या कारकीर्दींत गुरफटलेलीं माणसें मात्र इंग्रजांच्या हातीं सांपडलीं. त्यांची सोजिरांनीं केवळ सूडबुद्धीनें निष्ठुरपणें शिकार केली.

कलकत्त्यांत मनाजोगी लूट मिळाली नाहीं, म्हणून ते सोजीर निराश झाले नाहींत. त्यांची खात्रीच होती, कीं आपला नेता क्लाइव्ह आपणांला लुटीसाठीं कुठूनही कोठेंही भगदाड पाडून दरवाजा सताड उघडून देणार.

तसेंच झालें. क्लाइव्हला माहीत होतें, कीं हुगळी शहर ही कुबेरनगरी आहे. तशीच दुसरी कुबेरनगरी डाक्का ही आहे.

त्यानें सोजिरांना हुकूम केला, “सोजिरांनो ! पाहतां काय ? चला चालून हुगळीवर, डाक्क्यावर. आतां बंगाल आपलाच आहे. लुटाल तेवढें थोडें !”

हुगळीला ही लूट तर आयती होतीच. पण ह्या साऱ्या लुटीहून महत्त्वाची साऱ्या बंगालच्या मोलाची बोलतीचालती बहुमोल लूट हातीं तिथें लागण्याजोगी होती.

क्लाइव्हला आतां बंगाल हातीं पडल्यासारखाच वाटत होता. पण तो रीतसर हातीं पडण्यासाठीं त्याला एक सोईचें बुजगावणें पाहिजे

होतें. बंगालचा नबाब म्हणून तेथील लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याकरितां उभें करण्यासाठीं. त्या बुजगावण्याच्या शोधांत क्लाइव्ह आणि त्याचे साथीदार इंग्रज होते. क्लाइव्हचे माणिकचंद–अमीरचंद–राजा वल्लभदास–त्रिलोकनाथ आणि मंडळींच्या चांडाळचौकड्यांतील तेथले हिंदु व्यापारी शेटसावकार धनकुबेरही अशा अधिक सोईच्या नव्या नबाबाच्या शोधांत होते.

असा नवा नबाब शोधायचा तर तो इतर सर्व इंग्रजधार्जिण्या गुणांनीं संपन्न तर हवाच. पण शिवाय तो गादीवरील नबाबाच्या नात्यागोत्याचा हवा. तसेंच तो नबाबाच्या गादीवर आपला वारसा सांगायला उभा राहण्याइतका दौलतीला लालचावलेला व धीट हवा.

अशा साऱ्या गुणांनीं संपन्न असा होतकरू इच्छुक नबाबांचा एक तांडा डाक्क्याला होता. आऊचा काऊ तो माझा मावसभाऊ असला नबाबाच्या नात्यागोत्यांतला सर्फराजखानाच्या मुलांचा तो तांडा नबाब सिराजउद्दौल्यानें वहिमावरून कैदेंत ठेवला होता.

त्या मुलांत एकजण विशेष बोटचेपा होता. त्यावर क्लाइव्हचा डोळा होता. त्याला मथवतां आला तर पाहावा, या धोरणानें क्लाइव्हची नजर डाक्क्याकडे वळली होती.

हुगळींत नबाबानें अन्नधान्यापासूनच्या सामानाचा मोठा सांठा करून ठेवला होता. त्यावर क्लाइव्हचा डोळा होता. त्याला नबाबाची सर्व बाजूंनीं कोंडी करायची होती.

"जा. हुगळी लुटा. अगदीं मनसोक्त लुटा. तिथें नबाबाची नांवरस देखील बाकी राहतां कामा नये." अशी कामगिरी सांगून खलाशी सोजिरांची एक तुकडी क्लाइव्हनें जहाजांतून हुगळीकडे रवाना केली.

"जा, डाक्का लुटा. आणि सर्फराजखानाच्या शहाजाद्यांना कैदेंतून सोडवून मानानें माझ्याकडे पाठवा." हुकूम झाला. या कामगिरीवर डाक्क्याकडे दुसरी तुकडी रवाना झाली.

अशीं बंगाल ग्रासण्याच्या इंग्रजी मसलतीच्या यंत्राचीं चक्रें जोरानें फिरूं लागलीं. हुकूम होण्याचा अवकाश. इंग्रज सोजीर तयारी करून हुगळीच्या रोखानें चालले. हुगळीचा किल्ला म्हणजे काय ? जणूं झाडावरचें पिकलें फळ. ना तेथें शिबंदी, ना दारूगोळा. सोजिरांची धाड पडण्याचा अवकाश. दगड मारून पिकला आंबा पाडावा तसा किल्ला पाडाव झाला. हुगळींत देखील राजा माणिकचंदाच्या फितूर जातीचे अनेक जातभाई असणारच. व्यापारधंदा म्हणून, सावसावकारी म्हणून, ते तेथील रयतेला नकळत साऱ्या रयतेच्या मुसक्या आंवळून दोरी आपल्या हातीं धरून बसलेले. आणि साऱ्या परदेशी व्यापाराची त्यांच्या नाकांतील वेसण कंपनीकर इंग्रजांच्या हातीं !

दहाबारा दिवसांत सारी तयारी करून इंग्रजानें तारीख ११ जानेवारीला हुगळीवर धाड घातली. पहिल्या सपाट्याला धाड पडली किल्ल्यासभोंवारच्या घरांवर. दिसलें घर कीं फोड. लूट. दे आग लावून. असा धडाका सुरू झाला. तो सतत आठ दहा दिवस चालू होता.

ती लुटालूट आणि जाळपोळ पसरतां पसरतां तिची झळ हुगळींतील डच वसाहतीलाही जाऊन भिडली. डचांना लुटावें म्हणून नव्हे, तर नबाबाचे प्रजाजन डच वसाहतींत घरेंदारें करून राहत असतील या संशयानें त्यांचा बींमोड करण्याकरितां.

कलकत्त्यांतून धनदौलत घेऊन पळालेले तालेवार हिंदी व्यापारी, शेटसावकार कलकत्त्यावर संकट कोसळतें असें पाहातांच तेथून धूम पळाले. त्यांनीं हुगळींत थारा घेतला असावा, असा वास इंग्रजाला येत होता. त्या वासावर ते शिकारी कुत्रे मोकाट सुटले होते.

बिचारा नबाब मुर्शिदाबादच्या आपल्या राजवाड्यांत बसून आपल्या मुनशीमार्फत इंग्रजाला कधीं धमकावीत तर कधीं चुचकारीत कागदी घोडे नाचवीत होता. नाहींतरी आतां आणखी दुसरें त्याच्या हातीं काय होतें ? त्याची सारी राजवट मुळांतच बेदाद कारभाराची. तशांत

बडे व्यापारी शेठसावकार इंग्रजांना फितूर. माणिकचंदासारखे अव्वलींचे मोहरे गणले जाणारे सुभेदाराच्या दर्जाचे बडे लोकही काळजावरील काळपुळीसारखे पडद्यामागून इंग्रजांचे हस्तक बनलेले.

ती फितव्याची पेरणी कुठवर ? व्यापाऱ्यांपलीकडे, सैन्यापलीकडे थेट नबाबाच्या जनानखान्यापावेतों. पण त्याची खुद्द त्याला दाद नाहीं !

नबाबाला काय माहीत, कीं आपल्या राजघराण्यांतील कांहीं पैसेवाल्या बेगमाही इंग्रजाच्या हातांत हात घालून त्यांच्यापासून फुकापांसरी व्यापाराचीं दस्तकें मिळवून आपल्या अडत्यांमार्फत आपल्याच राज्यांतील रयतेची व्यापारी लूट करीत होत्या म्हणून !

आधीं कधीं जबरदस्त इंग्रजाविरुद्ध जोरानें पाऊल टाकण्याचा नबाबाचा बेत बसायचा नाहीं. इतकेंही करून बसूं लागलाच, तर ही बेगम उठावी, ती उठावी, आणि तिनें रयतेचा कैवार घेऊन शांतिपाठ गाऊं लागावे.

" इंग्रज इतका जोरावर आहे; म्हणून त्याच्याशीं पुन्हा पुन्हा भांडण उकरून काढून आपणाला साऱ्या बंगालचा कलकत्ता-हुगळीसारखा होम का करायचा आहे ? जरा सबुरीनें वागायला हवें." ही बेगमांची सल्लामसलत ! ती ऐकून नबाब इंग्रजाशीं सबुरीनें वागून आपल्या बंगालचा बचाव करूं पाहत होता !

नबाबाचे कारभारी सल्लागारही त्याला तसेंच सांगत होते. त्या सर्वांच्या मतानें नबाबानें ठरविलें, कीं इंग्रजाला ह्या झाल्या आगळिकीबद्दल कांहीं गोड, कांहीं कडू असा एक खलिता लिहावा.

खलिता लिहावा म्हणतांक्षणीं दरबारी मुनशी कागद-कलमदानपुष्टिपत्र घेऊन हजर.

त्यानें खलिता लिहिला :

" तुम्हीं आमचें हुगळी शहरही घेतलें. आणि तेथल्या आमच्या रयतांशीं लढाई केली. हें व्यापाऱ्यांना शोभणारें नाहीं. त्यामुळेंच मी मुर्शिदा-

बाद सोडून फौज घेऊन हुगळीला आलों आहें. मी नदी ओलांडून येत आहें. माझी कांहीं फौज तुमच्या तळावर चालूनही जात आहे. तथापि अजूनही पूर्वीच्या परंपरेला अनुसरून कंपनीला आपल्या व्यापाराचा जम माझ्या राज्यांत बसवितां यावा असें जर तुम्हां इंग्रजांना वाटत असेल, तर तशीं बोलणीं करण्यासाठीं जबाबदार लायक माणूस माझ्या दरबारीं रवाना करा. त्यानें तुमच्या वतीनें तुमच्या मागण्या काय असतील त्या माझ्यापुढें मांडून चर्चा करावी. अजूनही कंपनीला तिच्या सर्व वखारी पूर्ववत् चालू करण्याचे परवाने द्यायला माझी हरकत नाहीं. त्याप्रमाणेंच पूर्वीच्याच अटींवर माझ्या राज्यांत खुला व्यापार करण्याचीं फर्मानेंही कंपनीला मिळतील. इंग्रज लोक जे माझ्या राज्यांत स्थायिक झाले आहेत, ते अजूनही जर केवळ व्यापारी या नात्यानेंच वागतील, माझे हुकूम पाळतील, आणि मला त्रास देणार नसतील, तर त्यांचा आजवर झालेला तोटाही भरपाई करून दिला जाईल असा विचार मी करीन. आणि त्यांना समाधान होईल असा मार्ग सुचवीन.

"युद्ध म्हटलें, कीं सैनिकांकडून होणारी लुटालूट आणि नासधूस टाळणें किती अवघड असतें हें तुम्हांलाही माहीत आहेच. हें ध्यानीं घेऊन माझ्या सैनिकांकडून तुमचें झालेलें नुकसान थोडेंफार वजावाटीला धरायला तुमची तयारी असेल, तर तुमची मैत्री संपादन करण्यासाठीं आणि तुमच्या देशाशीं यापुढें गोडीचें नातें जोडून टिकविण्यासाठीं तुमची नुकसानभरपाई करून देण्याचाही प्रयत्न मी करीन.

"तुम्ही ख्रिस्ताचे अनुयायी आहां. आपसांतील बेबनाव तसाच चिघळत ठेवण्यापेक्षां त्याचें जेव्हांचें तेव्हां समजूतदारपणानें निराकरण करणें अधिक सोईचें होय हें तुम्हांला पटेल. तथापि केवळ लढाईपायीं तुमच्या कंपनीचे हितसंबंध व तुमच्या खासगी व्यापाऱ्यांचें कल्याण या सगळ्यावर पाणी सोडण्याचाच जर तुमचा निर्धार असेल, तर तो माझा दोष नव्हे. असल्या विनाशकारक युद्धापासून निर्माण होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या उद्देशानेंच मी हें पत्र लिहीत आहें."

आबाखालीं गनीम मारण्याचा वडिलार्जित बाणा नबाबाच्या अंगीं परंपरेनें मुरलेला. पण मजबूत सत्ता पाठीशीं असली, कीं असला बाणा शोभतो. नाहीं तर तो थट्टेचा विषय होतो.

इथें कसली सत्तेची मजबुती होती ? बडें घर आणि पोकळ वांसा होता. ही नबाबाच्या धाकाची आणि सत्तेची किंमत. क्लाइव्ह काय, वॉटसन काय, हुगळीला नवा नेमला गेलेला इंग्रज गव्हर्नर ड्रेक काय, सारे हें पुरेपूर ओळखून होते.

नबाब लढाईचें नांव घेऊन आपली तरवार परजीत होता. पण ती तरवार लोणी कापण्याच्याही उपयोगाची नाहीं इतकी ती बोथट झालेली आहे, हें इंग्रजांसारख्या धूर्त व धोरणी माणसांना नव्यानें कोणीं सांगायला नको होतें.

" पडलों तरी माझेंच नाक वर म्हणत इथवर नरम आला ना नबाब ? ठीक आहे. त्याच्या नाकांत वेसण घालण्याची हीच वेळ आहे. म्हणावें, तुला इंग्रजांशीं मैत्री टिकवायची आहे, तशीच इंग्रजांनाही तुझी मैत्री हवी आहे. तडजोड तुला हवी, तशी ती आम्हांलाही हवी." असा सर्व धूर्तांचा बेत ठरला.

आणि सर्वानुमतें नबाबाच्या नाकांत घालण्यासाठीं खाशी वेसण विणली गेली.

३ : ती काळरात्र !

बेडकांनीं देवापाशीं राजा मागितला, आणि देवानें त्या गोष्टींतील बेडकांना खाऊन टाकणारा साप राजा दिला. तशा नबाबानें इंग्रजांना मागण्या विचारल्या आणि इंग्रजांनीं मागण्या सांगितल्या !

मागणी पहिली : इंग्रजांचें झालेलें सारें नुकसान नबाबानें भरून दिलें पाहिजे.

मागणी दुसरी : कंपनीला बंगालमध्यें यापूर्वी मिळालेल्या सर्व सवलती आणि हक्क यांचा मनसोक्त उपभोग घेतां आला पाहिजे.

मागणी तिसरी : इंग्रजांना आपल्या वसाहतींच्या संरक्षणासाठीं मनाप्रमाणें तटबंदी करण्याचा अनिर्बंध अधिकार असला पाहिजे.

मागणी चौथी : कंपनीला कलकत्त्यांत स्वतःची टाकसाळ घालतां आली पाहिजे.

इंग्रज किती धूर्त ! त्याला इतक्या सोप्या वाटेनें बंगालमधील कटकटी मिटवायचाच नव्हत्या. त्यांना फक्त प्रथम नमुन्यादाखल वानगी पाहायची होती, कीं हा नबाब कसा आणि किती दबला जातो. त्यासाठीं या मागण्यांचा अंदाज त्याला हवा होता.

"एकदम एक घाव दोन तुकडे करायचे नाहींत." क्लाइव्ह बंगालच्या शिकारीवर ताव मारायला टपलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना सावधगिरीच्या सूचना देत होता. "झाड मुळांतून किडलें असलें तरी त्याचीं पाळेंमुळें फार खोलवर गेलेलीं आहेत. काय नेम सांगावा ? बंगाली लोकांनीं इंग्रजांवर निष्ठा ठेवावी, इतका आपलेपणा त्यांच्या मनांत उपजण्याजोगे उपकारांचे डोंगर कांहीं आपण त्यांच्या माथ्यावर रचिलेले नाहींत."

दुसरा तेथील एक जुना इंग्रज अधिकारी म्हणाला, "पण आपल्या कंपनीनें लोकांना निदान नबाबाच्या बेबंदशाही राजवटीपेक्षां तरी पुष्कळ दिलासा दिला आहे. एथल्या विणकाम करणाऱ्या कारागिरांना इंग्रजच भरपूर काम देतो. त्यांच्याकडून चांगलें कापड विणून घेऊन त्यांना पोटाला घालतो. आम्हीं बंगालमध्यें पाय ठेवला नव्हता, तेव्हां प्रामाणिक कष्टाळू लोकांना तरी उदरनिर्वाहाची इतकी शाश्वति कुठें होती ? तशीच येथील शेतकऱ्यांची शेतसंपदा. तिला खरा बाजारभाव आम्हीं आणला. त्या अन्नधान्याला सुव्यवस्थित बाजार मिळवून दिला म्हणून आज त्यांना सुखानें गोळाभर अन्न खायला तरी मिळतें."

तिसऱ्याचेंही तसेंच मत पडलें. "आज काय, बंगालवर मराठे चालून आले. त्यांनीं लूटमार केली, जुलूम जबरदस्ती केली, आणि देशाची दैना करून संपत्ति गोण्या भरभरून घेऊन चालते झाले. उद्यां काय, इराणी धाड पडली. परवां काय, दुराणी संकट ओढवलें. अशी आपल्या

जन्माची नबाबाच्या बेदाद कारभारापाईं दैना दैना चालली आहे. यांत काय बंगाली गोरगरीब शेतकऱ्यांना समाधान वाटत असेल ? क्लाइव्ह-साहेब बंगालमध्यें आज आले. पण आम्हीं इतके दिवस—इतकीं वर्षें कंपनीच्या व्यापारासाठीं बंगालच्या भूमींत स्वतःला गाडून घेतलें आहे. आम्ही बंगाली लोकांची नस बरोबर ओळखतों."

त्या मसलतींत असलेला इंग्रजांच्या पूर्ण विश्वासांतील एक धूर्त बंगाली कायस्थ व्यापारी म्हणाला, "आमच्या शास्त्रांत असें सांगितलें आहे, कीं ऊंस, तीळ, शूद्र, स्त्री, सोनें, धरणी हीं जितकीं पिटावीं—जितकीं पिळावीं, तितकीं अधिक धार्जिणीं असतात. त्या सहांच्या जोडीला आमचे नबाब सातवे. जितकें त्यांना दडपावें, तितके ते दडपले जातील. जितकें नमवावें, तितके ते नमतील. जबरदस्त भेटला कीं त्याच्यापुढें शरणागति पत्करतील. समजूतदारपणानें नमून वागणारा भेटला, कीं त्याच्याशीं 'तेरे उपर मेरा पाव' अशा अरेरावीनें वागूं लागतील. फार दूर कशाला ? कंपनीकडून तडजोडीच्या अटी नबाबा-कडे ॲमियन आणि हेस्टिंग्स हे दोघे घेऊन गेलेच होते. त्या अटींनीं नबाबाच्या पहिल्या पोकळ पत्रांतील वारा कसा आपोआप फुटून बाहेर जातो तें दिसेलच आतां. आम्ही इथले मिरासदार आहों. आमच्यावर नबाबाचें राज्य आहे. आणि आमच्या राजाला आम्ही इतरांपेक्षां चांगला ओळखतों."

आणि खरोखरच नबाबाकडे गेलेल्या दोघां इंग्रजांचें उत्तर जेव्हां आलें, तेव्हां क्लाइव्हलाही मान्य करावें लागलें, कीं नबाबाविषयींचा इथल्या माहितगार मंडळींचा अंदाजच आपणांपेक्षां बरोबर आहे.

त्या दोघां इंग्रजांनीं पत्रांत लिहिलें होतें, "नबाबानें चारींपैकीं तीन अटी तेव्हांच मान्य केल्या होत्या. आणि चौथी अट देखील त्यानें मान्य केली असती; कलकत्त्याला टांकसाळ घालण्याची. पण तो अधिकार स्वतःला त्यालादेखील नाहीं. दिल्लीच्या बादशहाच्या अल्या-

रांतील ती बाब आहे. ती बाब सोडली, तरी आम्ही तिकडे येण्यापूर्वी आमचें राजकारण आणखीही बरेंच पुढें रेटीत नेऊं असा आम्हांला ठाम विश्वास वाटतो. पाहूं."

" एकूण शेवटच्या मागणीची भरपाई करून घेण्यासाठीं आम्हीं इंग्रजांनीं दिल्लीच्या बादशहाला नबाबासारखा मऊ केला पाहिजे !" क्लाइव्ह माजोरी स्वरांत म्हणाला.

सर्वजण एकमेकांकडे पाहून कांहींशा उपहासानें हंसले. सर्वजण आतां ओळखीत होते, कीं दिल्लीचा बादशहा म्हणजे केवळ बोलतें-चालतें कळसूत्री बाहुलें आहे. कुणींही माहितगारानें त्याची कळ फिरवावी आणि त्याला पाहिजे तसें नाचवावें.

तीच अवस्था नबाबाची आहे. असें नबाबाकडे वाटाघाटींसाठीं गेलेल्या त्या दोघां धूर्त इंग्रज अधिकाऱ्यांनीं प्रत्यक्ष प्रमाणानेंच सिद्ध करून बोलून दाखविलें.

" आम्हीं आमच्या अधिकारांत पण आपल्या कंपनीच्या धोरणाला धरून ठरल्याप्रमाणें आणखी अधिक कामगिरी केली आहे." असें म्हणून त्या माघारे आलेल्या दोघां इंग्रजांनीं आपण बजावलेल्या कामगिरीचा खर्डा क्लाइव्हपुढें ठेवला. त्या नबाबावर लादलेल्या नव्या अटी !

" कलकत्त्यांतील कोणाही व्यापाऱ्याला नबाबानें आपल्या ताब्यांत मागतां कामा नये, अथवा त्यांना कोणत्याही प्रकारें त्रास देतां कामा नये." अट पहिली.

" इंग्रजांना मिळालेला बादशाही परवाना (दस्तक) इंग्रजांचीं जहाजें आणि त्यांचा माल देशांत कुठेंही जाण्याला मोकळीक देणारा आहे, असा त्या दस्तकाचा स्पष्ट अर्थ आमच्या बाबतींत नबाबाकडून ध्यानीं घेतला गेला पाहिजे." अट दुसरी.

" पूर्वी सांगितलेल्या अटींवर मान्यतेचा सहीशिक्का नबाबाचा हवा, तसाच त्याच्या दिवाणांचाही हवा." अट तिसरी.

त्या नव्या तीन पुरवणी-अटी नबाबाकडून कबूल करून घेतलेल्या क्लाइव्हनें पाहिल्या. आणि आपल्या तालमेंत तयार झालेल्या त्या हस्तकांची तारीफ केली. तो म्हणाला, "शाबास तुमची. मी तुम्हां दोघांना नबाबाकडून दाणे आणायला पाठविलें, तों तुम्ही त्याच्याकडून दाणे दळवून पीठ तयार करून घेऊन आलां!"

"होय." हेस्टिंग्स म्हणाला, "आणि त्या पिठाची गोणी देखील नबाब आपल्या पाठीवरून इकडे घेऊन येतो आहे!"

नबाब आपल्या सैन्यासह मुर्शिदाबादेहून बरोबर आपलें सैन्य घेऊन कलकत्त्याकडे यायला निघाला होता. पण त्याच्या सैन्याचा जोर किती, आणि त्याच्या अंगीं लढण्याची ताकद किती, हें कलकत्त्याच्या झटापटींतच इंग्रजांनीं चांगलें ओळखलें होतें. शिवाय सुभेदार माणिकचंद कलकत्त्याकडून पळून गेलेला अजूनही नबाबाचा सेनापति होताच. त्या दोघां इंग्रजांच्या सांगण्यावरून क्लाइव्हनें अचूक अंदाज बांधला, "अग अग म्हशी, मला कुठं नेशी" करीत नबाब इंग्रजांशीं लाडीगोडी करण्यासाठीं कलकत्त्याकडे यायला निघाला आहे. त्याचा काय एवढा विचार करायचा?"

नबाब खरोखर येत होता तो इंग्रजांशीं त्यांच्या तंत्रानें वागून कां होईना पण गोडी करण्यासाठीं. कारण आतां त्यालाही थोडीफार नीट कल्पना आली होती, कीं यापुढें इंग्रजांच्या विरुद्ध जाऊन आपला पल्ला येणार नाहीं. म्हणून तहाच्या वाटाघाटी करायला तो मुर्शिदाबाद सोडून कलकत्त्याला येत होता.

"ही फार चांगली गोष्ट आहे." क्लाइव्ह म्हणाला.

"वाटाघाटींसाठीं कंपनीचे दोन इंग्रज आपल्याकडे यावे, अशी नबाबाची इच्छा आहे." हेस्टिंग्स म्हणाला.

"आपली तीही तयारी आहे." क्लाइव्ह म्हणाला.

कांहींही करून कसेंही राजकारण खेळवून वाल्श आणि स्क्रॅफ्टन हे दोन लोक कंपनीच्या आगाऊ संमतीनें क्लाइव्हनें निवडून चांगले पढवून तयार करून ठेवले होते. कंपनीच्या पदरचे नाणावलेले हेर म्हणून ते दोघेही प्रसिद्ध होते.

नबाब आयता हातीं आला. आतां त्याला त्याच्या दर्जाला साजेशी जागा उतरायला कोणती द्यावी? कारण त्याला किल्ल्यांत तर पुन्हा शिरकाव करूं द्यायचा नाहीं.

सर्वांनुमतें मसलत होऊन ठरलें. कलकत्त्याला शहराबाहेर दूर अमीरचंदाचा ऐसपैस भव्य बगीचा होता. त्या बगीच्यांत त्याचें प्रशस्त विश्राममंदिर होतें. त्या बागेंत नवे बादशाही तंबू ठोकून नबाबाच्या पाहुणचाराची तयारी झाली.

त्याच्याकडे तहाची वाटाघाट करण्यासाठीं जाणाऱ्या इंग्रजांचे सुसज्जित तंबू नबाबाच्या तंबूपासून थोड्या अंतरावर उभारले होते. नबाबाचें सैन्य घेऊन त्याचा सेनापति मिरजाफर हाही जणूं इंग्रजावर तरवार उगारल्यासारखा बागेंतच सभोंवार नबाबाच्या डेऱ्यानजीक तळ ठोकून सज्ज होता. त्याच्या शेजारींच नबाबाच्या दिवाणांचे डेरे.

ठरल्याप्रमाणें त्या दिवशीं नबाब आपल्या प्रशस्त लवाजम्यासह कलकत्त्यांत आला. त्याची काय सरबराई! काय तैनात! नबाबाला वाटावें, कीं केवळ मोठा माणूस मी बंगालचा नबाब! आमच्या लढाईच्या जय्यत तयारीला क्लाइव्हही भ्याला. म्हणून आतां ह्या मनधरण्या चालल्या आहेत आमच्या.

तो दिवस गेला. दुसरा दिवस गेला. इंग्रज प्रतिनिधींबरोबर वाटाघाटींचा कीस पडत होता. नबाबाला काय माहीत, कीं क्लाइव्हनें आपणाला पकडण्यासाठीं हा बेमालूम सांपळा लावला आहे म्हणून! आणि वाटाघाटींसाठीं आलेले ते इंग्रज हेरगिरीसाठीं आले असून त्यांचें काम फक्त नबाब कुठें बसतो, कुठें विश्रांति घेतो, कुठें झोंपतो, याचा

अचूक अंदाज घेण्याच्या खास कामगिरीवर नेमले होते, हें तरी त्याच्या कसें ध्यानीं येणार ?

वाटाघाटी मोठ्या डौलांत चालल्या होत्या. इंग्रज तेव्हां किती नमत्या नुरानें वागत होते ! दुसऱ्या दिवशींची प्रहर दीडप्रहर रात्र मागें पडली. त्या दिवशींच्या वाटाघाटी आटोपून ते दोघे इंग्रज आपल्या तंबूंत माघारे आले. ते झोंपतात कसले ! आपल्या तंबूंतील दिवे मालवून त्यांनीं झोंपल्याची बेमालूम बतावणी मात्र केली.

आणि साप वळचणीला दडावे तसे ते दोघेही रातोरात काळोखांतून गुपचुप पसार ! इकडे नबाब आपल्या महालांत ऐषआरामांत झोंपीं गेलेला ! तोंच.... !

४ : जाळ्यांतील सावज निसटलें !

दुसऱ्या दिवशीं उजाडलें नाहीं, तोंच क्लाइव्हच्या पुढारीपणाखालीं इंग्रजी सोजिरांची नबाबाच्या तळावर धाड !

रात्रींच जाऊन त्या दोघां हेरांनीं आपली कामगिरी पूर्ण केली होती. नबाब झोंपतो कुठें, त्याच्या आजूबाजूला सशस्त्र चौकीपहारे कितपत आहेत, रखवालीसाठीं काय व्यवस्था आहे, ही सारी बित्तंबातमी काढण्यासाठीं तर ते दोघे हेर नबाबाच्या दरबारीं आले होते. तहाच्या वाटाघाटींचा नुसता बुरखा !

मोगली मसलत ज्याला म्हणतात, तसलें कुकर्म करून नबाबाशीं लढाई करण्याचा क्लाइव्हचा दुष्ट डाव होता. नबाबाला अवेळीं अचानक एकटें गांठावें आणि काटावें, यासाठीं त्याच्या त्या साऱ्या मसलती !

क्लाइव्हला नबाबाच्या सैन्याची काळजी नव्हती. नबाबाचा सेनापति मिरजाफर हा आंतून इंग्रजांना वश होऊं लागलेला बोटचेपा माणूस होता. पण नबाबाच्या महालासभोंवार कडव्या, शूर व स्वामिनिष्ठ मुसलमान संत्र्यांचा खडा पहारा असे. त्या पहाऱ्यांतून धडकेसरसा

आंत प्रवेश मिळविणें ही सोपी गोष्ट नव्हती. समजा, ओरड झाली, आणि चकमक उडण्याची वेळ आली तर ? आणि मग—नबाबाचें मुसलमान सैन्य तें. त्याचा काय नेम ? तें जर एकदम खवळलें आणि छापेवाल्या इंग्रजांची कापाकापी करीत सुटलें तर ? नबाबाचा सेनापति इंग्रजांना विकला गेलेला खरा. पण तो एक विकला गेला, याचा अर्थ सारें सैन्य विकलें गेलें असा नव्हे कांहीं.

शिवाय मिरजाफर तरी असा एकदम उघडेपणानें आपल्या धन्याची मान खाटकाच्या सुरीखालीं बकरा द्यावा तशी क्लाइव्हच्या तरवारी-खालीं कशी देईल ? फंदफितुरीचीं आंधारांतील अधम कर्में आंधारांतच नीट साधतात.

क्लाइव्हला एकदम उघडी लढाई तर करायची नव्हती. त्या प्रसंगाला तो भीत होता. कदाचित् या उघड्या छाप्यांत प्रकरण बोभाटा होऊन विकोपाला गेलें असतें, तर बंगाल एकदम बिथरण्याचा फार संभव. फंदफितुरीच्या दावणीला सेनापति, सुभेदार, शेटसावकार, व्यापारी असें मूठभर बडे बडे लोक बांधणें फार सोपें. पण ते गणंग दावणीला बांधले गेले, म्हणजे सारा बंगाल—सारा देश—सारी रयत—त्या दावणीला बांधली गेली असा त्याचा अर्थ घेणें धाडसाचें होतें.

तरवारीनें गळा कापून बंगाल आपल्याला घशांत टाकतां यायचा नाहीं.—आणि इंग्रजी राजवट बंगाल्यांत रुजवतां यायची नाहीं.—केंसानें गळा कापूनच फार बोभाटा न करतां हा कार्यभाग उरकला पाहिजे—अशी मनांत विचारपूर्वक खूणगांठ बांधूनच क्लाइव्ह नबाबाचा बंगाल बुडवण्यासाठीं धिमेपणानें पूर्वयोजनेनुसार पावलें टाकीत चालला होता.

आणखी एक महत्वाची गुप्त गोष्ट त्याच रात्रीं त्या दोघां हेरांकडून क्लाइव्हच्या कानीं गेली होती. खास कुठेंतरी, कसातरी आपल्या मोगली मसलतीला तडा गेला आहे; नबाबाला कळलें असो वा नसो; पण त्याच्या गोटांत ही कुणकुण जाऊन भिडली आहे, हें त्याला कळलें होतें.

तो तडा कुठून कसा गेला म्हणून क्लाइव्हनें समजावें ? संशय एकदां जन्माला आला, कीं त्याला गोमेच्या पायांसारखे सहस्र पाय फुटतात. न जाणो, नबाबाचा सेनापति मिरजाफर तर आंतून आपल्या धन्याशीं सामील नसेल ना ? तो आंतून खरा राजनिष्ठ नसेल कशावरून ? तो उलट आपणाविरुद्ध मोगली मसलत योजण्याचा बेत मनांत रचीत असला तर ?

किंवा असेंही असेल. एवढें मोठें कारस्थान रचून मिरजाफरला नबाबाचा परस्पर कांटा काढून स्वतःच स्वतःच्या हिंमतीवर नबाबगिरी लाटायची असेल ! राजपद मिळविण्यासाठीं विश्वासघात, खून, दगाफटका, हे तर मुसलमानांच्या राजवटींत सर्रास रुळलेले प्रकार. राजवाड्यांतल्या राजवाड्यांत असली रक्ताळलेली झटपट क्रांति घडवून आणण्याचा डाव त्या लबाड सेनापतीच्या पोटांत असणें कांहीं अशक्य नव्हतें.

आणि—अमीरचंदापासून सारे बडे बडे धनकुबेर, माणिकचंदासारखे सुभेदार, हे इंग्रजांना वश खरे. पण अमीरचंदाला इंग्रजांनीं कलकत्त्यावर नबाब अचानक चालून आला तेव्हां दगलबाजी करून दुखविलें होतें. त्याची नंतर सारवासारव झाली होती व पुन्हा अमीरचंद क्लाइव्हचा दोस्त बनला होता, सारें खरें. पण आपल्या राजाविरुद्ध फितूर होणाऱ्या विश्वासघातकी लोकांची दोस्ती ती. तिच्यावर उशाखालीं हात ठेवून झोंपण्याइतका विश्वास क्लाइव्हनें कसा ठेवावा ?

या सगळ्या अरिष्टांहून जबरदस्त असें एक अरिष्ट इंग्रजांच्या मानगुटीला येऊन बसण्याचाही संभव होता. क्लाइव्हनें आणि त्याच्या साथीदारांनीं बंगाल जो इतका पोखरला होता, तो वरवरचा बंगाल. नारळाच्या सुंभसालीसारखा. खरा बंगाल—तो शेतकरी, विणकरी, कामकरी अशा कष्टाळू लोकांचा खरा बंगाल—त्या सालीखालीं होता.

नबाबाचा कारभार अगदीं बेदाद होता. कबूल.

रयतेनें राजनिष्ठ राहावें असा कोणताही गुण नबाबाच्या ठायीं नव्हता. कबूल.

नबाबाच्या राजवटींत बंगालची अवस्था लांडग्यांना मेंढवाड्याचें कवाड उघडून द्यावें तशी झाली होती. कबूल.

पण म्हणून काय तीं मेंढरें धन्याच्या रागामुळें खुषीनें लांडग्यांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याइतकीं खुळींभोळीं असतील ?

क्लाइव्ह अथवा कोणताही इंग्रज घेतला, तरी तो कावेबाज आणि लबाड खरा. धूर्तही खरा. पण मूर्ख मात्र नव्हे. त्यांना पूर्ण कळत होतें, कीं आपण तरी या बंगालच्या रयतेच्या माथ्यावर अशी काय सोन्याची खोळ घालतों आहों, ते हे रयत आपल्याला दुवा देतील ? आणि नबाबाची राजवट जाऊन इंग्रजी राजवट आपणांवर यावी असें मनांत आणतील ?

तीं गांवीलमाशांचीं पोळीं एकदमच उठविण्याची क्लाइव्हची छाती नव्हती. बरें; नबाबालाही इंग्रजांविरुद्ध कारवाया करण्याइतकी यापुढें सवड द्यायला तो तयार नव्हता. हो! त्याचा काय नेम ? नबाब एकवार आपल्याकडून दुखवला गेल्यावर जर मोकळा सुटला, तर तो आणि त्याचे मुल्ला–मौलवी–मौलाना वेळीं इंग्रजाविरुद्ध 'जिहाद' पुकारायचे. आणि अशा वेळीं नेमके शेलके हिंदुदेखील 'धर्मयुद्ध' घोषित करून बंड करून उठायचे!

असलें बंड भडकलें, तर हिंदु आणि मुसलमान एकमेकांच्या माना चिरीत आपसांत झगडूं लागतीलच याचा काय भरवंसा ?

असेल. मुसलमानांना तेव्हां वाटत असेल, कीं साऱ्या हिंदुस्थानवर आपला अंमल असावा. तसेंच हिंदूनाही वाटत असेल, कीं आपला अंमल असावा. पण म्हणून काय आपणां दोघांच्या भांडणांत तिसरा जबरदस्त बळजोर आपल्या बोकांडीं येऊन बसतो आहे हें कळूं लागल्यावर देखील हिंदु-मुसलमान हात जोडून तोंडें पाहात स्वस्थ

बसतील ? किंवा एकमेकांच्या नरडीला झोंबून आपल्या हातांनीं आपले पाय तोडून घेऊं लागतील ?

"इतक्या खोल पाण्यांत उतरून दौलतीसह, व्यापारासह जीव धोक्यांत घालणें असला वेडेपणा नकोच. एवढा बोभाटा होण्याच्या अगोदर हिकमतीनें आपण आपला कार्यभाग साधला पाहिजे." असें क्लाइव्हचें ठाम मत होतें. त्या धोरणानें त्यानें नबाबाला न कळत त्याच्याविरुद्ध फंदफितुरीचें मजबूत जाळें विणलें होतें. त्या जाळ्यांत आपणांला शिकार साधतां येईल अशी त्याची खात्री होती.

ती नबाबाची पहिली शिकार क्लाइव्हला त्या दिवशीं उजाडत्या आंधारांत साधायची होती. म्हणून त्यानें निवडक सोजीर बरोबर घेऊन रात्रौ त्या हेरांकडून मिळालेल्या बित्तंबातमीनुसार बोक्याच्या चोरपावलांनीं नबाबाच्या गोटावर घाला घातला. बोभाटा नको, म्हणून तर त्यानें तो अचूक ठावठिकाणा माहीत पडण्यासाठीं ते हेर पाठविले होते !

त्या मिळालेल्या माहितीनुसार क्लाइव्ह गाजावाजा न करतां सारे लोक साखरझोंपेंत असतांना पहांटेच्या काळोखांतून तिकडे गेला. नेमकें नबाब झोंपतो त्या दालनांत घुसावें, आणि नबाबाला झोंपेंतच एकटा गांठून त्याची गर्दन कापावी, हा त्याचा डाव.

परंतु काय विचित्र योगायोग ! चोरटा क्लाइव्ह नबाबाच्या महालांत जाऊन पाहतो, तों नबाब तेथें झोंपलेलाच नाहीं !

क्लाइव्हला नवल वाटलें. तो तोंडांत बोट घालून विचार करूं लागला, हें जाळ्यांतलें सावज कसें निसटलें

५ : अडला नबाब .... पाय धरी !

रखरखीत उजाड वाळवंटांत एखादचें हिरवळलेलें रोप दिसावें, तसा तो सुभेदार माणिकचंदाचा नोकर कबीर. त्यानें वाड्यांत काय

कुणकुण ऐकली नकळे. तो तसाच नबाबाच्या पाठोपाठ मुर्शिदाबादेहून धापा टाकीत कलकत्त्याला आला.

त्यानें येऊन सांगितलें, त्यावरून नबाबाला तरी शंका आली.

"खरेंच का हे दोघे इंग्रज अशी हेरगिरी करायला माझ्याकडे येऊन राहिले असतील? आणि मला ठार करण्याचा राक्षसी बेत खरेंच का कंपनीसरकार मनांत धरून तशीं पावलें टाकीत असेल?"

पण बराच वेळ ती शंकाच होती. नबाबाला तें खरेंच वाटेना. "एवढीं मोठीं माणसें हे इंग्रज, आणि इतकें खोटें कसें बोलतील? इतका किळसवाणा विश्वासघात करायला ते तयार होतील? छे! असें कधींच व्हायचें नाहीं." असा स्वतःला स्वतःच निर्वाळा देत नबाब उलट त्या बिचाऱ्या नोकरावरच उखडला.

"लबाड! बदमाष!– चोरा! तूंच इंग्रजांचा हेर आहेस. सुभेदाराचा आणि माझा बेबनाव आणण्यासाठीं इंग्रजानें कड्याळ रचून तुला पैसे चारून फितवलें; म्हणून स्वतःच्या धन्यावर असा उलटतोस काय? कोण आहे रे? या बदमाषाला घेऊन जा आणि पोत्यांत बांधून याला नदींत फेंकून द्या."

नबाब लहरीसरसा कडाडला. पण तरीदेखील स्वामिनिष्ठ कबीर डगमगला नाहीं. मात्र जी अगदीं ओंगळ गोष्ट आपल्या धन्याविरुद्ध नबाबाच्या कानांपावेतों त्याला मुळींच येऊं द्यायची नव्हती, ती त्याला निरुपायानें, आतां आपल्या प्राणांवर बेतलेंसें पाहून, उजेडांत आणावी लागली.

प्रसंगच पडला, तर ती गोष्ट पुढें करायची; तीही नबाबाचा जीव वांचविण्याला दुसरे सर्व उपाय हरल्यावर, असा त्याचा मुळांतला निर्धार. नुसतें आपल्या प्राणांवर बेतलें, म्हणूनही तो आपल्या धन्याविरुद्ध वागायला तयार झाला नसता. परंतु या ठिकाणीं प्रश्न धन्याच्या पोशिंद्याचा होता. स्वतः बळी गेल्यानेंही तो पोशिंदा वांचत नाहीं असें

पाहून त्यानें निरुपायानें ती कलकत्त्याहून इंग्रजांकडून माणिकचंदला गेलेली गुप्त चिठ्ठी नबाबाला दाखविली. आणि सर्वांच्या गळ्याची शपथ घालून त्याला सांगितलें, "खाविंद! कसेंही करा. कांहींही करा. पण अगोदर इथून बाहेर निघून जा. आणि कुठें चाललां तें मलाही सांगूं नका."

अमीरचंदानें सुभेदार माणिकचंदाला लिहिलेली ती चिठ्ठी. त्या रात्रीं नबाबाची इंग्रजांकडून शिकार करण्याचा कसा डाव आहे, याचें उत्तर त्या चिठ्ठींत सूत्ररूपानें नमूद करण्यांत आलें होतें.

नबाब ती चिठ्ठी पाहून भांबावल्यासारखा झाला. आपल्याविरुद्ध आपल्या पदरचेही लोक इंग्रजाला फितुर झाल्याचें तो ऐकत होता. पण त्या फितुरीचे हात इतक्या खोल आपल्या काळजापावेतों जाऊन भिडले असतील, अशी त्याला कल्पना नव्हती.

"बदमाष! माझें अन्न खाऊन माझ्यावरच असा उलटतो काय? थांब म्हणावें. हातीं तर सांपड, कीं तुझे तोडून तुकडे करून कुत्र्यांना खायला घालतों." असें आवेशाच्या भरांत नबाब एकदम उद्गारलाही. तेव्हां त्याच्या मनांत आलेंही, कीं आतांच्या आतां माणिकचंदला बोलावून त्याचा निकाल लावावा. पण पुन्हां त्यालाच वाटलें, "असें नको. तें जिवावरच्या संकटाला आमंत्रण देणें होईल."

तोंच त्याच्या विश्वासू राजनिष्ठ कबिरानें त्याला हात जोडून जरा हळू बोलायला विनविलें. आणि नबाबानेंही काळवेळ ध्यानीं आणून आपला स्वर जरा खालीं उतरविला.

"खाविंद! आपली सुटका ही आपणाला वाटते इतकी सोपी गोष्ट नाहीं. शत्रूचे आणि शत्रूला फितुर झालेल्यांचे पापी डोळे काळोखांतून आपणावर सख्त पहारा करीत असले पाहिजेत. नबाब म्हणून उघड्या वेशानें आतां आपली सुटका होणें अवघड आहे."

"मग?" नबाबानें विचारलें.

कबिरानें आगाऊ माफी मागून नम्रपणानें सुचविलें, "आपण वेश पालटून इथून पाय काढा. नोकराचे कपडे आपल्या अंगावर असले, म्हणजे कोणाला संशय येणार नाहीं."

नबाबानें तावडतोब त्याप्रमाणें केलें. त्यानें कपडे बदलले; आणि लगेच गुपचुप एकट्यानेंच आपल्या एका खात्रीच्या दिवाणाच्या तंबूचा मार्ग धरला.

नबाब सुखरूप नजरेआड झाल्याची खात्री करून घेतल्यावर कबीरही आपल्या वाटेला लागला.

आणि पहाटेचा कोंबडा आरवला.

पहांटेच्या वेळीं क्लाइव्हबरोबर ते दोन साथीदार हेर कांहीं मारेकरी व आणखी कांहीं सोजीर घेऊन चोराच्या पावलांनीं नबाबाच्या गोटांत शिरले. आणि लगेच पाठोपाठ गोऱ्या लष्करानें नबाबाचा गोट वेढून कापाकापीला सुरुवात केली.

पण क्लाइव्ह—तो लांडगा—नबाबाच्या गोटांत शिरून पाहतो तो नबाब जाग्यावर नाहीं. तो जो रात्रीं पसार झाला, तो कसाबसा निसटला मात्र, आणि इकडे इंग्रजाचा छापा.

पुष्कळ कापाकापी झाली. तरी बरें, कीं सेनापति मिरजाफर आयत्या वेळीं तोंडदेखला कां असेना परंतु थोडें लष्कर घेऊन धावून आला. म्हणून लुटुपुटूची शोभण्याजोगी कां होईना पण झटापट झाली. थोडे लोक बळी पडले. बरेच पळाले. नबाबाच्या सैन्याची दाणादाण उडाली. आणि नबाबाला सेनापतीबरोबर म्हणून सुखरूपपणें कलकत्त्या-बाहेर पाय तरी काढतां आला.

परंतु परिस्थिति अशी विचित्र, कीं नबाब माघारा पाय काढूं लागला, तरी सेनापति मिरजाफर लढाईचें कारण दाखवून रणांगणांतून पाय बाहेर काढायला तयार झाला नाहीं. अखेर नबाबाला कशीबशी सोबत घेऊन कलकत्त्यांतून पाय काढावा लागला.

पंधरा सोळा मैल अंतर तोडून धोक्यापार होईपावेतों माघारीं धावतां धावतां मागें वळून पाहण्याचेंही धैर्य नबाबाला झालें नाहीं. अथवा उसंत मिळाली नाहीं.

नबाबाचे दिवाण मागें होते. सेनापति मिरजाफरही दोन्ही डगरीं-वर हात ठेवून उभा होता. सगळेजण इंग्रजांना कोणत्या ना कोणत्या मतलबासाठीं विकले गेले होते. तरी देखील सेनापति हें सर्वांत बडें धेंड ! त्याला तसें कोणीं म्हणावें ?

" हा एक अडसर तरी आमच्या वाटेंत कशाला हवा ? याला बाजूला सारून दुसरा एखादा याहून कमी महत्त्वाचा व आपल्या मानाला आणि राजवैभवाला अधिक हपापलेला लायक माणूस हातीं लागला तर पाहूं. मग नबाबाला फेकून देऊन त्याच्या जागावर तें नवें बाहुलें नबाब म्हणून कुंकवाला आधार बसवूं. आणि त्याला आपल्या ओंजळीनें पाणी प्यायला लावून बंगालचा कारभार हातीं घेऊं." हा क्लाइव्हचा पोटांतील डाव. परंतु तो कांहीं अजून सन १७५७ च्या जानेवारीपावेतों तरी साधण्याच्या बेतांत आला नव्हता. त्याला हवा तसा बंगालच्या गादीवर चपखल बसणारा, नबाब बनविण्याजोगा कोणी अजून त्याच्या हातीं लागला नव्हता. मिरजाफर हा तसा सोईस्कर मासा आतां जाळ्यांत सांपडला होता खरा. पण तो हातांत मिळायला अजून बराच अवघड होता.

" पण कांहीं हरकत नाहीं. आतां हा नबाब जाऊन जाणार कुठें ? त्याच्या साऱ्या नाड्या आतां नीट आपल्या मुठींत आहेत. " असें क्लाइव्ह धीरानें म्हणे. त्याला अर्थ होता.

आतां नबाब जाऊन जाणार होता कुठें ? त्याचे सारे कारभारी कुणी कसे तर कुणी कसे पण इंग्रजाला मधलेले. असे नबाबाचे पाय तुटलेले, पंख जळालेले.

" एवींतेवीं आतां बंगाल इंग्रजांच्या हातीं जाणारच. आपण तो थोडाच राखूं शकतों ? अशा वेळीं आपण आपल्यापुरता हात मारून घेतां येईल तेवढा मारून घ्यावा झालें. " असला मतलबसाधुपणा हें नबाबाच्या प्रत्येक हिंदु-मुसलमान अधिकाऱ्याचें केव्हांपासूनचें धोरण बनलें होतें. त्या धोरणानें सारीं चक्रें फिरूं लागलीं होतीं.

नबाब कलकत्त्याहून पळून मुर्शिदाबादला गेला खरा. पण समुद्रांतून काढून वाळूवर टाकलेल्या मासोळीसारखी त्याची केविलवाणी अवस्था झाली होती. अशा परिस्थितींत बुडत्याला काडीचा आधार !

तहाची भाषा अर्धवटच पडली होती. तें सूत्र हातीं घेऊन नबाबानें मग पुन्हा इंग्रजाशीं बोलणीं सुरू केलीं.

" इंग्रजांशीं सलोख्याचा तह व्हावा, आणि त्यांच्या-आमच्यामधील कटकटी समाधानपूर्वक मिटून आम्हांला आमच्या इंग्रज दोस्तांना बंगालमध्यें सुखासमाधानानें राहूं देतां यावें अशी आमची अजूनही इच्छा आहे."

त्याला क्लाइव्हचें तसेंच सहानुभूतीचें खुलें खुलें उत्तर. " आमचीही तयारी आहे."

नाहीं तरी क्लाइव्हला मनांतले बेत तडीला जायला व सारीं कारस्थानें मनाजोगीं बेमालूम रंगवायला कांहीं अवधि हवाच होता. पुन्हा वाटाघाटी सुरू झाल्या. आतां वाटाघाटींची जागा अलिनगर ही ठरली. या वाटाघाटींत कंपनीच्या बाजूनें बोलायला क्लाइव्ह होता. त्याचे ते दोन गोरे हस्तकही होते. नबाबानें इंग्रजांची कासिमबझारची वखार जी लुटली, त्या धाडींत होरपळून निघालेला त्या वखारीचा मुख्य इंग्रज वॅट्स हा होता. तसाच कलकत्ता नबाबापासून हिसकावून घेण्याच्या कामीं आरमारी करामत क्लाइव्हच्या बरोबरीनें करणारा ॲडमिरल वॅटसनही होता. असे सारे धूर्त इंग्रज आपसांत खासगी वाटाघाटी करीत होते.

एकविचारानें नबाबाचे सगळीकडून लचके कसे तोडावे याचा नक्की आराखडा काढून त्याप्रमाणें सारे धूर्त मोक्यामोक्यानें उभे होते.

इंग्रजाचा मोठा गुण हा, कीं ते सारेजण व्यापारी बाण्याचे चांचे खरे. पण सारेच जरी आपापल्या आर्थिक मतलबाला डोळ्यांत तेल घालून जागणारे, तरी ते दूरवर अशा परक्या देशांत आपसांतील मतभेद आणि भांडणें चवाठ्यावर आणून स्वतःचें हंसें करून घेणारे नव्हते.

नबाबावर घाव हाणून त्याला कलकत्त्यांत दुबळेपणानें पळवून लावल्यावर इंग्रजांना कलकत्ता, हुगळी हीं नगरें हातीं सांपडलीं. त्या निमित्तानें त्या टापूंतली नबाबाची आणखी मालमत्ता लुटायला सांपडली.

"त्या लुटींत मोठा वांटेकरी तूं कीं मी ?" असा झगडा वॉटसन आणि क्लाइव्ह यांच्यांत तेव्हां चांगलाच माजला. तो झगडा अजून मिटला नव्हता हें खरें. पण म्हणून एक तरी इंग्रज त्या नादांत ह्या परदेशांत एकजुटीनें हिंदी लोकांवर वरचष्मा बसविण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यांत कुचराई करील तर शपथ !

इंग्रजाची बाजू ही अशी खंबीर. आणि नबाबाची बाजू सांवरून धरणारी गळेकापू माणिकचंद, मिरजाफर आणि मंडळी ! मग तहाच्या वाटाघाटी बिनबोभाट व्हायला कसली अडचण !

पडद्याआड काय बोलणीं झालीं आणि होत होतीं, तीं दोन्ही पक्षांतील त्यांचे ते लोक जाणोत. पण उघडपणें नबाब आणि इंग्रज यांच्यांत अलिनगरला तह ठरला, तो इंग्रजाच्या टोपींत यशाचा आणखी एक नवा तुरा रोंवला गेला. इंग्रजांनीं मागावें आणि नबाबानें द्यावें. त्याला आयतें विनासायास मिळालेलें राजवैभव. तें लुटून द्यायला कसली दिक्कत !

"दिल्लीच्या बादशहानें इंग्रजांना जे खास हक्क फर्मानांनीं दिले आहेत, त्यांना नबाबानें मान्यता द्यावी."....कबूल !

" इंग्रजांना मिळालेल्या परवान्यांनुसार व्यापारी मालाची वाहतूक इंग्रजांना साऱ्या बंगाल-बिहार-ओरिसांत अगदीं मोफत करतां यावी." ....कबूल !

" कंपनीच्या वखारी, व त्यांतील कंपनीची आणि कंपनीच्या नोकरांची मालमत्ता, जी नबाबाकडून व त्याच्या लोकांकडून अपहरण केली गेली, लुटली गेली, तिच्या किंमतीची भरपाई नबाबाकडून इंग्रजांना मिळावी."....कबूल !

"कलकत्त्याची तटबंदी इंग्रजांनीं आपल्या मताप्रमाणें करावी ".... कबूल !

" इंग्रजांना स्वतःचा स्वतंत्र शिक्का वापरण्याचा अधिकार असावा " ....कबूल !

हा तह स्वत: नबाब आणि त्याचे सर्व दिवाण, सुभेदार या सर्वांनी मान्य करावा."....कबूल !

" ह्या सर्व अटी जोंवर नबाबाकडून नीटपणें पाळल्या जातील, तोंवर कंपनीच्या वतीनें ॲडमिरल वॉटसन आणि कर्नल क्लाइव्ह यांनीं नबाबाशीं गोडीनें वागावें."....कबूल !

ही नव्या तहाची अगोदरच्यापेक्षां जड गोणी इंग्रजानें नबाबाच्याच मध्यस्थांच्या मदतीनें नबाबाच्या पाठीवर लादली. ती गोणी निमुटपणें कुरकुर न करतां उचलून नबाब चालूं लागला. त्याला वाटलें, आतां तरी आपल्या कर्माची कटकट टळली.

पण ती कटकट कशी टळणार ? एवढें ओझें न कुरकुरतां पाठी-वर लादून घेऊन सुरळीत चालूं लागलेल्या त्या बादशाही ओझेवाहूच्या पाठीवर आणखी ओझें लादतां येईल तेवढें लादावें असें इंग्रजाला वाटलें नसतें, तर तो इंग्रज कसला ? नबाबामागें त्याचें टुमणें सुरूच !

" अहो ! कंपनीची धनदौलत तुमच्या लोकांनीं लुटली ती जेवढी तुमच्या आमच्या जमाखर्चीं नमूद आहे, तेवढ्याचा असा हिशेब लागला.

पण जमाखर्चांत नसलेली आम्हां इंग्रजांच्या नोकरांची आणखी कितीतरी दौलत लुबाडली गेली आहे कीं ! तिचीदेखील नुकसान-भरपाई होऊन मिळायला हवी. निदान तीन लाख तरी. ”

नबाब म्हणाला, “ कबूल ! ”

“ तसेंच आम्हीं दोघांनीं—वॉटसन आणि क्लाइव्ह—तह केला, म्हणून झाला ना ? त्या आमच्या मेहेनतीला कांहींच का मोल नाहीं ? ”

“ तेंही कबूल ! काय सांगाल तें, मागाल तें कबूल ! ”

असा तह अलिनगरला तारीख ९ फेब्रुवारी १७५७ ला झाला. आतां ह्या तहाची अंमलबजावणी. नाहीं तर नुसते कागदी घोडे नाचत राहून त्यांचा उपयोग काय ?

त्या तहाच्या अंमलबजावणीसाठीं नबाबाच्या दरबारीं मुर्शिदाबादेला जाऊन ठाण मांडण्यासाठीं इंग्रजानें आपला प्रतिनिधि नेमला, तोही खास गुलदस्तांतला वॅट्ससाहेब ! तो आतां घोड्यावर !

“ ठीक आहे. नबाब ! कासीमबझारच्या वखारींत माझी कुतर-ओढ करणारा तो तूंच नव्हे का ? आतां तूं आहेस आणि हा वॅट्स आहे.” अशा खुनशी स्वार्थसाधुपणानें मिशीला पीळ भरीत वॅट्स मुर्शिदाबादेला नबाबाच्या दरबारीं जो जाऊन बसला, तो जसा कांहीं नबाबाचा घरजांवई ! आणि त्याच्या जोडीला माहीतगार अमीरचंद हा वॅट्सचा सल्लागार आणि माहीतगार !

नबाबालाही हें कळत होतें, कीं आपणाकडून दुखवला गेलेला हा साप आतां आपणाला विळखा घालून डसायला आला आहे. पण त्याला इलाज काय होता ?

तो म्हणाला, “ एवढ्यावर तरी निभावो म्हणजे झालें.”

तरी नबाबाला तें इंगीत कुठें माहीत होतें ? वॅट्सला जो आपल्या दरबारीं इंग्रजांनीं आणून बसविला होता, तो केवळ अलिनगरच्या तहाची अंमलबजावणी करण्यासाठीं नव्हे. नबाबापाशीं अजून किती-

तरी सोन्याची माती होती. ती कोपरांनीं खणण्यासाठीं वॅट्स हा त्या मुलुखांत बरेच दिवस राहिलेला. त्याला नबाबाचीं सारीं अंडींपिलीं माहीत, आणि बंगालच्या सगळ्या थरांतील लोकांच्या नसाही माहीत. ओळखीचे चोर जिवें मारीत ते असे !

आणि समजा, तेंही नबाबाला माहीत असतें, तरी तो बिचारा काय करणार होता ! म्हणतात त्यांतली अवस्था. अडला नबाब....पाय धरी !

तरीदेखील नबाबाला हा विवेक सुचेना, कीं आपली काय लायकी, म्हणून ही आयती नबाबगिरी आपल्या हातीं टिकावी ? ती टिकायची, तर त्यासाठीं कांहीं लायकी, कांहीं बळ पदरीं लागतें. हें त्याला सांगणार कोण ?

स्वाध्याय :

१. माणिकचंद हा कोण ? त्यानें नबाबाला कसें चकविलें ?
२. वॅटसनचें नबाबाला कोणतें पत्र गेलें ?
३. क्लाइव्हचें नबाबाला कोणतें पत्र गेलें ?
४. इंग्रजांचा कावा काय होता ?
५. क्लाइव्हला माणिकचंदाविषयीं काय व कां वाटलें ?
६. इंग्रजांनीं ता. २९ डिसेंबर सन १७५६ रोजीं कलकत्ता कसा घेतला ?
७. हुगळीवरील हल्ल्याची माहिती सांगा.
८. नबाबाला फितुरीनें आंतबाहेर कसें पोखरलें होतें ती माहिती सांगा.
९. नबाबानें इंग्रजांना खलिता केव्हां व कां लिहिला ?
१०. नबाबाकडे वाटावाटींसाठीं कोण इंग्रज गेले ? त्यांनीं वाटाघाटी काय केल्या ?
११. इंग्रजांच्या विश्वासघातकी हल्लयांतून नबाब कसा बचावला ?
१२. मिरजाफर हा कोण ? त्याच्या इंग्रजांशीं काय मसलती ठरल्या होत्या ?
१३. नबाबाची मुर्शिदाबादेला गेल्यावर कशी अवस्था झाली ? कां ?
१४. अलिनगरच्या तहाची माहिती द्या.

प्रकरण चौथें

नबाब पोखरला गेला !

१ : वॅट्सनें पेंचांत पकडलें !

" वॅट्ससाहेब भेटायला येतो आहे." असें पहारेकऱ्यानें येऊन सांगितलें मात्र. आणि नबाब मुकाटपणें आपल्या दरबारी पोशाकाच्या तयारीला लागला.

कारण आतां वॅट्ससाहेब ही सासूबाई ! आणि नबाब ही त्याची सूनबाई ! सासू—तीही नुसती सासू नव्हे, खाष्ट आखाडसासू !

वॅट्स कशाला येतो आहे, याची नबाबाला कल्पना होती.

इंग्रजांच्या मागण्या संपल्या नव्हत्या. जुन्या तीन राक्षसांच्या गोष्टी-सारखा त्यांचा वेलविस्तार रोज रोज अधिकाधिक वाढत होता. आणि त्या विस्ताराच्या जाळ्यांत नबाब अधिकाधिक गुरफटला जात होता.

अलिनगरच्या तहाची शाई वाळते न वाळते, तोंच हा भयंकर गोरा माणूस वॅट्स क्लाइव्हनें तहाविषयीं खुलासेवार वाटाघाटी करण्या-साठीं आपल्या दरबारीं नेमला आहे, ही बातमी कानीं आली. तेव्हांच नबाब ओळखून चुकला होता, कीं ही जळू क्लाइव्हनें मुद्दाम आपलें रक्त शोषण करण्यासाठींच आपल्या अंगाला बळेंबळें चिकटवली आहे.

ती नबाबाची शंका वॅट्स समोर येतांक्षणीं त्याच दिवशीं तर्कांत न सामावेइतक्या पटीनें खरी ठरली. पहिल्या भेटींतच वॅट्सनें तहाच्या वाटाघाटींच्या घातक अटींचे नवे विंचू नबाबाच्या काळजाला डसविले. आणि नबाबालाही ते मुकाटपणें डसवून घ्यावे लागले.

अट पहिली : ' नबाबांनीं कबूल केलेलीं फर्मानें आणि इंग्रजांच्या बाबतींत सोडलेले हुकूम यांची खास बादशाही दप्तरांत नोंद झाली पाहिजे. आणि तसे बादशहाचे जाहीर हुकूम सगळीकडे सुटले पाहिजेत.'

त्याखेरीज आम्हीच बादशहाचे वारस असें तोंडभर सांगायला, आणि त्या जोरावर सारा भारत इंग्रजी राजवटींत गुंडाळून घ्यायला इंग्रजाला वाट बेणी कशी होईल?

बंगालच्या खेड्यांतून वारेमाप नबाबी मेहेरबानीनें अनेक कंपनी-नोकरांनीं आणि अनेक इंग्रजांनीं जमीनदाऱ्या संपादन करून काळपुळी-सारखीं बंगालच्या काळजांत घरें केलीं होतीं. कांहीं इंग्रज लोक तर नबाबाची पडत्या फळाची आज्ञा घेऊन जमीनदाऱ्या बळकावून बसले होते. आणि कांहींनीं परस्पर कुणाला न विचारतांच व्यापाराच्या जोरावर गुपचुप दंडेलीनें गांवेंचीं गांवें बळकावलीं होतीं. आतां नबाबाशीं तेढ आली; तेव्हां न जाणो उद्यां हा नाहीं तर दुसरा नबाब कोणी येईल. तो कदाचित् तेवढ्याचपुरता दांत कोरून पोट भरूं लागायचा. मग पुन्हां कटकट! तें नकोच. म्हणून वॅट्सच्या तोंडानें इंग्रज बोलूं लागला होता.

ती अट दुसरी : 'कंपनीला आणि व्यक्तिशः इंग्रजांना खेडोपाडीं ज्या जमीनदाऱ्या मिळाल्या आहेत, त्यांचे ज्यांना त्यांना रीतसर परवाने नबाबाकडून मिळावे.'

'कलकत्त्यांत टांकसाळीची परवानगी कंपनीला मिळावी.' ही तिसरी अट.

'नबाबाकडून कंपनीला साऱ्या देशभर कुठेंही जकातीखेरीज खुला व्यापार करण्याचीं दस्तकें मिळालीं आहेतच. त्यांची अंमलबजावणी करतांना कोणीं अडथळा केला, तर त्यांना शिक्षा करण्याचा अधिकार कंपनीला असावा.' ही अट चौथी.

'कंपनीला नुकसानभरपाई देण्याचें नबाबानें तहनाम्यांत मोघमपणें कबूल केलेंच आहे. त्याचा स्पष्ट आंकडेवार खुलासा झाला पाहिजे. तसेंच खाजगी इंग्रज व्यापाऱ्यांचेंही नबाबाच्या चढाईमुळें फार नुकसान झालें आहे. त्याचीही योग्य भरपाई झाली पाहिजे. हें कबूल नसेल, तर इंग्रजांनीं नबाबाच्या प्रजाजनांचीं कर्जें घेतलीं आहेत, त्यांची फेड

करण्याची जबाबदारी नबाबानें उचलली पाहिजे. नबाबाच्या लोकांनींच सगळीकडे दंगे आणि लुटालूट माजविल्यावर इंग्रजांनीं तरी कर्जे फेडावीं कोठून ? ' ही चौथी अट.

' इंग्लंडच्या राजाकडून कंपनीला जी सनद मिळाली आहे, त्या सनदेनुसार कंपनीला इथें आपल्या आदालती स्थापन करतां याव्या. आणि त्या आदालतींत नेटिव्ह (हिंदी) लोकांवर खटले चालवितां यावे. त्या त्या गुन्ह्यानुसार गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा, देहान्त शिक्षा करण्याचाही अधिकार कंपनीला असावा.' अट पांचवी.

' नबाबानें आपल्या दरबारांत इंग्रज लोकांना नेमून घेण्याचें कबूल केलेंच आहे. यापुढें जेव्हां जेव्हां कंपनीचा गव्हर्नर अथवा कौन्सिलचे सभासद यांना दरबारांत हजर रहावें असें वाटेल, तेव्हां त्यांचा दरबारी थाटांत आदरसत्कार व्हावा, व त्यांचा मानमरातब ठेवण्यांत यावा. यापुढें इंग्रजांनीं दरबारांत नबाबाला नजराणे नजर करण्याचें कारण पडूं नये.' अट सहावी.

' नबाबानें कलकत्त्याखालीं नदींत मैलाच्या अंतरांत कांहीं तटबंदी करूं नये अशी कंपनीची इच्छा आहे.' ही सातवी अट.

' कंपनीला पाटणा येथें पुन्हा वखारी घालणें झाल्यास आणि ठाणें उभारणें झाल्यास त्यासाठीं कंपनीला दरबारला कांहीं मोबदला द्यावा लागूं नये.' अट आठवी.

' इंग्रजांच्या हिशेबाच्या वह्या व इतर कागदपत्र जे नबाबाच्या अधिकाऱ्यांनीं लांबविले असतील, ते त्यांनीं परत करावे.' अट नववी.

ह्या नव्या मागण्यांचे दुष्ट नवग्रह वॅट्सनें मुर्शिदाबादेंत येतांच नबाबाला सादर केले होते. अर्थात् आतां तो जो नबाबाकडे येऊं घातला होता, तो नबाबाला साळसुदपणें पण रोखठोक याचा जाब विचारण्यासाठीं.

" नबाब आमच्या मागण्यांचा काय विचार करूं चाहतात ? "

आतां नबाबाची गत पंख कापून पिंजऱ्यांत कोंडलेल्या पंगू पक्ष्या-सारखी झाली होती.

आतां त्याचे दिवाण त्याच्याबरोबर नव्हते. आग लागलेल्या घरांतून काय हातीं लागेल तें घेऊन पसार व्हावें, तसा त्यांचा चोरटा उद्योग चालला होता. अथवा चिनी लोकांत आजारी मनुष्य जगण्याची आशा सुटली कीं त्याला मारून खाण्याची प्रथा पूर्वी होती म्हणतात, तसे ते मनानें निगरगट्ट बनले होते. त्यांच्या अथवा नबाबाच्या वागणुकींत विशेष बदल झाला होता असें नाहीं. तरी पण त्यांच्या पायांतळची सत्तेची जमीन खचत होती. आणि ते खालीं खालीं जात होते. म्हणून खालीं जातां जातां नबाबाला पायांखालीं आधारासाठीं दडपून त्याच्या उरावर तरी आपल्या धनदौलतीसह तालेवारपणानें टिकण्याचा प्रयत्न ते करीत होते ! नबाब आतां रसातळाला जाणार, आणि इंग्रजी सत्ता बंगाल-बिहार-ओरिसाभर बलवत्तर होणार. हें उघड होतें. ह्या नव्या उलथापालथींत आपला कुठें, काय व कसा मतलब साधतां येईल, याचे आराखडे रेखाटण्यांतच ते दंग. ही झाली राज्यकर्त्या अधिकाऱ्यांची गत.

बरें; रयतेचा संबंध तरी होईल ती पिळणूक सोसून द्यावा लागेल तो करभार मुकाटपणें देण्याखेरीज राज्यकर्त्यांशीं येतच होता कुठें ?

तसेच नबाबाचे जमीनदारही. त्यांनीं खंड वसूल करावा. त्यांतला नबाबाचा वांटा नबाबाला द्यावा, आणि बाकीचा वसूल स्वतःच्या ऐषआरामीसाठीं खर्च करावा. नबाबाला वसुलाचा पैसा आल्यावर मग जमीनदार आपल्या कुळांना भाजून खातो, कीं उकडून खातो, याचा विचार करण्याचें तरी त्याला काय कारण ?

अशी आई जेऊं घालीना आणि बाप भिकेला घाडीना त्यांतली रयतेची दैना. त्या दैन्यवाण्या जीवनांत रयतेला ओझ्याच्या गाढवाप्रमाणें मानून तिच्यावर हुकमत गाजवीत तिला हुकमतीखालीं राबविण्याखेरीज इंग्रजांना काम नाहीं. जमीनदाराचा आणि सरकारचा ज्याचा वांटा

त्याला सरकारकडून बोकांडीं बसलेलें देणें देऊन राहिल्यासाहिल्यांत गुजराण करण्यापलीकडे रयतेच्या ठायीं आणखी कांहीं करायचा हुरूप तरी कुठें होता ? आणि आशा तरी कुठें ताजीतवानी उरली होती ?

तेथें कोणीं येऊन कांहीं सांगावें, आणि हुकमत गाजवावी. म्हणून रयतेला तरी माहीत व्हावें, कीं अमका फलाणा आपला नबाब. त्या नबाबाच्या डोक्यावर बादशहा म्हणून कांहीं वस्तूचा बोजा आहे, याची जाणीव बाळगण्याची पाळी रयतेवर कधीं येतच नसे. आणि नबाबाची तरी आठवण केव्हां व्हायची ? तर जिवापाड करांचें आणि खंडांचें ओझें, लूटमार, अवर्षण, दुष्काळ, असल्या अडचणींमुळें नबाबी सत्तेच्या नांवावर वाढता जाच होऊं लागला म्हणजे.

जवळ कोणीही येवो. नबाबाचे अधिकारी येवोत, जमीनदारांचे मुनीम येवोत, व्यापाऱ्यांचे–शेटसावकारांचे गुमास्ते येवोत, मुलुखगिरी गाजवीत मराठे येवोत, अथवा इराणी, दुराणी, तुराणी येवोत. डच येवोत, फ्रेंच येवोत, इंग्रज येवोत, कोणीही येवोत. जे कोणी येतील ते मानगुटीला बसून बुचाडायलाच येणार. ते आले काय, गेले काय, जगले काय किंवा मेले काय. कशाला म्हणून रयतेला त्याची काळजी अथवा कळकळ वाटेल ? मेलें मेंढरूं आगीला थोडेंच भितें ?

बरें; दिल्लीच्या बादशहाचा अंमल, म्हणून तिकडून कांहीं उपराळा होईल म्हणावें, तर या नबाबा-निजामादि बादशाही कारभाऱ्यांनीं आणि पराक्रमी मराठ्यांनीं बादशाला केवळ शेतांतील बुजगावणें करून ठेवलेलें. तें यांनीं सांवरून धरावें, तेव्हां बादशहा सांवरून कसाबसा उभा राहणार. अशी त्याच्याच शाश्वतीची त्याला काळजी. तिथें तो आणखी नबाबाला कुठें सांवरणार ? आई जेवूं घालीना, आणि बाप भिकेला धाडीना, अशी रयतेची सगळीकडून कुचंबणा झालेली. त्यांतून सुटका होण्याची आशाच नव्हती. ती रयत तरी नबाबाला कां म्हणून जपेल ?

असें वॅट्सनें आतां नबाबाला चांगलेंच पेंचांत पकडलें होतें.

२ : एका दगडानें तीन पक्षी

नबाबापुढें आतां दोनच मार्ग होते. आणि त्यांपैकीं कोणत्याही मार्गानें तो गेला, तरी आगींतून उठून फुफाट्यांत पडणार होता. त्यांतून सुटका नव्हती.

इंग्रजाच्या मागण्या मान्य कराव्या, तर यापुढें केवळ इंग्रजाच्या मेहेरबानीवर, तो जगूं देईल तसें जगण्याइतपत शून्यवत् होऊन राहावें. दडपून मांडीखालीं घातलेल्या प्रदेशांत कंपनीसरकार राजरोस आपली इंग्रजी राजवट चालविणार. सत्ता त्याची आणि न्यायमनसुभा करणाराही तोच. बाकीच्या नबाबाच्या मुलुखावर इंग्रजाची व्यापारी सत्ता. म्हणजे राज्यसत्तेचें गळफांसवजा मंगळसूत्रच तें. व्यापार इंग्रजाच्या मुठींत म्हणजे सारा पैसा आणि पैशाच्या उत्पादनाचीं साधनें त्याच्या मुठींत. तो व्यापारही विनाजकात ! असे चोहींकडून सत्तेचे व उत्पन्नाचे झरे इंग्रजानें आपल्या मुठींत घेतल्यावर नबाबानें तग तरी कशावर धरावी ? असा तिकडेही नाश !

बरें; या गोष्टींना नकार द्यावा, तर ढेंकणासारखा नबाब दुबळा झालेला. आणि इंग्रज नखानें हा ढेंकूण चिरडून टाकण्याइतका बळजोर मातलेला. तिकडेही नाश.

" अलिनगरचा करार नबाबानें मोडावाच. त्यानें आमच्या अटी कबूल करूंच नये. कीं आपणाला त्याला दडपून टाकायला खासें कारण मिळेल." असा दुष्टावा मनांत इच्छीत वॅट्स नबाबावर त्यानें केलेल्या आपल्या अवहेलनेचा सूड तर घेत होताच. परंतु त्याबरोबरच तो भारतांत इंग्रजी साम्राज्याचा पायाही रचीत होता !

" बस्स ! ह्या पायांत या बंगालच्या नबाबाला गाडलेंच पाहिजे. आणि आम्हां इंग्रजांविरुद्ध नबाबाचा पाठपुरावा हे फ्रेंच करतात काय ? तर त्यांचाही नबाबाबरोबर ठेचून कांटा काढला पाहिजे. त्याखेरीज

बंगालमध्यें आमची वाट बेणी व्हायची नाहीं." असा वॅट्सनें मनांत बेत योजला.

प्रश्न असा होता कीं, इंग्रजांनीं फ्रेंचांवर हात टाकला, तर नबाब काय करील? गप्प राहील? कीं अलिनगरच्या तहाला अनुसरून इंग्रजांविरुद्ध फ्रेंचांचा पाठपुरावा करायला उभा राहील? तसा उभा राहिला तर? त्याचे कारभारी, सेनापति त्याच्या शब्दाला जागतील? कीं—

पुढें विचार करतां करतां वॅट्स अडला. तें कोडें कसें सोडवावें, याबद्दल त्यानें कंपनीच्या सिलेक्ट कमिटीशीं खलबतें केलीं. पण त्यावरून नबाबाच्या मनाचा नक्की थांग त्याला लागेना; आणि सभोंवारची परिस्थितीही अचूक अजमावतां येईना.

सगळ्यांत मोठें भय इंग्रजाला हें होतें, कीं नबाबानें मुसलमानांना 'जिहाद'साठीं उठण्याची हांक दिली तर? बंगालचा मुसलमान त्या हांकेसरसा हातीं शस्त्र घेऊन इंग्रजांशीं लढण्यासाठीं त्याच्या पाठीशीं उभा राहील का?

ऍडमिरल वॉटसन् हा दुसरा डोकेबाज इंग्रजही त्या खलबतांत होता. तो चटकन अलिनगरचा तह पुढें करून म्हणाला, "हें पाहा."

त्या तहांत ओढूनताणून चंद्रबळ आणून त्याचा ऐसपैस अर्थ लावून त्या पत्रांतील तें वाक्य वॉटसननें वाचून दाखविलें.

"....जोंपावेतों माझ्या जिवांत जीव आहे, तोंपावेतों मी तुमचे शत्रु ते माझे शत्रु मानीन. आणि तुम्हांला गरज पडेल तेव्हां त्यांच्याविरुद्ध माझ्या आवाक्यांत असलेली सगळ्या प्रकारची मदत मी तुम्हांला करीन."

नबाबाला इंग्रज काय आणि फ्रेंच काय, दोघेही सारखेच. सोय पाहील तो त्याचा सोयरा. फ्रेंच इंग्रजांकडून नाडले गेलेले, त्यांना बचावाची गरज. म्हणून इंग्रजांना शह देण्यासाठीं नबाबाला त्यांची गरज. पण प्रश्न नबाबाचा मित्र कोण आणि शत्रु कोण असा नव्हताच.

इंग्रजापुढें प्रश्न होता नबाबाला फ्रेंचांपासून अलग पाडण्याचा, आणि कमी सायासांनीं नबाबाची शिकार करण्याचा. पण कोणतेंही झालें तरी शेण तें शेण. त्याला घाण असायचीच. इंग्रज कुठें नबाबाला मिळायला बसले होते? आणि फ्रेंच तरी थोडेच त्याच्या मस्तकावर सोन्याची खोळ चढवायला बसले होते? ते तरी नबाबाच्या दाढेला हात लावून वागत होते, त्याच्याशीं मैत्री ठेवीत होते, ते इंग्रजांच्या नादानें त्यानें बंगालमधून आपला उठाव करण्यासाटीं उठूं नये म्हणून.

नबाब काय! स्वार कोणी फ्रेंच असो कीं इंग्रज असो. जो कोणी पाठीवर स्वार होईल त्याचा तो घोडा! कलकत्त्याहून माघारीं पळतांना फ्रेंचांची त्याला मदत झाली; झाला प्रसन्न. ज्या सवलती त्यानें इंग्रजांना दिल्या होत्या, त्याच फ्रेंचांना दिल्या. त्यानंतर योगायोगानें आज अखेर इंग्रज त्याच्या पाठीवर स्वार झाले! त्यांनीं दटावलें, "फ्रेंचांशीं घनदाट दोस्ती ठेवशील तर याद राख. आमच्याशीं गांठ आहे."

त्यालाही नबाब तोंडदेखला तरी कबूल. न होऊन करतो काय?

तरी देखील इंग्रजांना बरेच दिवस पेंच असा होता, कीं हे फ्रेंच इतक्या जवळ चंद्रनगरला डोकेंदुखी होऊन बसले आहेत. त्यांचा काय नेम! ते अकस्मात् नबाबाशीं दोस्ती करायचे; आणि आपणांला कर्नाटकांतल्यासारखा अपशकून करायला उभे राहायचे. ती कीड बोभाटा होऊं न देतां वाटेंतून कशी नाहींशी करावी?

तोंच तिकडे यूरोपांत इंग्रज व फ्रेंच यांचें पुनः युद्ध जुंपलें. त्याबरोबर इंग्रज भारतांतही फ्रेंचांवर गुरगुरूं लागला. तिकडे यूरोपांत इंग्रज-फ्रेंचांचें युद्ध सुरू, कीं इकडे भारतांतही युद्ध सुरू. हा नेहमींचा पायंडाच पडलेला. जुळ्यांचें दुखणें.

क्लाइव्हनें विचार केला, कीं बंगालमधून फ्रेंचांना हांकलायला आणि नबाबाला उघडा पाडून आपलें बस्तान बसवायला ही अगदीं छान संधि आहे.

इंग्रजांना त्यांच्या दृष्टीनें ती खरोखरच छान संधि होती. त्यांचा कर्नाटकांत तर फ्रेंचांवर वरचष्मा होताच. शिवाय बंगालमध्यें देखील इंग्रजच बळजोर होते. नेहमीं इंग्रजांचे गुप्त हेर कोणाचें बळ किती, कोणाच्या हालचाली काय, इकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवून असायचेच. तिकडे यूरोपांत युद्ध जुंपल्याची वार्ता येतांच इंग्रज हेर चंद्रनगरकडे रवाना झालाच—फ्रेंचांचें बळ किती, त्यांची स्थिति काय, याची बित्तंबातमी आणायला.

तो हेर बातमी घेऊन आला. "रेनॉल्ट हा फ्रेंचांचा चंद्रनगर ठाण्याचा मुख्य आहे. त्याच्या दिमतीला अवघे दीडशें गोरे फ्रेंच आणि तीनशें हिंदी शिपाई आहेत."

आणि त्याबरोबर तिकडे दुसरीही एक मोठी हूल उठलेली हेरानें सांगितली. "दिल्लीचा बादशहा बंगालवर चालून येतो आहे."

क्लाइव्हला त्या हुलीचें विशेष कांहीं वाटलें नाहीं. तो ओळखून होता, कीं जसा बंगालचा नबाब, तसा त्याचा बादशहा. आतां बंगालवर स्वारी करणें ही काय तोंडची गोष्ट होती? इंग्रजासारखा जबरदस्त वाघ बंगालवर मांडी घालून बसला असतांना उंदीर आणि बोके यांचें तिथें काय चालणार होतें?

"ये म्हणावें बादशहाला, इथवर चालून येववलें तर खुशाल चालून ये. तूं आलासच, आणि प्रसंग पडलाच, तर हा इंग्रज बसलाच आहे म्हणावें तुझा समाचार घ्यायला." ॲडमिरल वॅटसन बेदकारपणें म्हणाला. आतां तो कलकत्त्यांत कंपनीचा दादा!

मनगटमस्त इंग्रजांचें तें बरोबर होतें. पण मुंगीला मुताचा पूर! तशी बादशहाची स्वारी म्हणजे नबाबाला प्राणसंकट! सगळ्या हिंदुस्थानचा बादशहा मी, अशा आवेशानें जर बादशहा चालून आला, तर आपली गत काय होईल? ही नबाबाला मोठीच चिंता होती. या नबाबाचें सोडा. तो आजोबाच्या—अलीवर्दीखानाच्या आयता गादीवर

येऊन बसलेला. पण अलीवर्दीखानानें तरी बंगाल-बिहार-ओरिसा जणूं काय आपलें स्वयंभू राज्यच बादशहाला धुडकावून बळकावलें होतें. त्याचा जबाब देण्याची पाळी आली, तर जबाब द्यायला त्या नबाब सिराजउद्दौल्याला तोंड कुठें होतें?

म्हणून तर मध्यें बादशहानें व त्याच्या कारभाऱ्यांनीं शौकतजंगला बंगालच्या सुभेदारीच्या सनदा देऊन परस्पर कांट्यानें कांटा निघतोसा पाहिला होता. तेव्हां नबाबाला अचानक कलकत्त्याला इंग्रजांवर विजय मिळाला होता; त्यामुळें त्याला अस्मान ठेंगणें झालें होतें. पण तो जमाना आज सहा महिन्यांनंतर राहिला नव्हता.

बादशहा चालून आला, तर त्याच्याशीं लढायचें कशाच्या जिवावर? त्याच्या दिवाणापासून लष्करापावेतों कुठेंच त्याचे पायपोस त्याच्या पायीं नव्हते. ते त्याच्या डोक्यावर बसल्यासारखे डोईजड झाले होते. तें नबाब आतां अनुभवानें चांगलें ओळखून चुकला होता.

"या वेळीं मदत करतील तर फ्रेंचांपेक्षां इंग्रजच." त्याला वाटलें. इंग्रजांची मदत त्याला दोन दृष्टींनीं घ्यावीशी वाटली. समजा, धीर धरला आणि आपण आपल्याच पायावर उभे राहूं लागलों, तर तेच इंग्रज आपला फडशा करण्यासाठीं बादशहाला जाऊन मिळणार नाहींत कशावरून? आणि एवढ्या उपकारांबद्दल बादशहा इंग्रजांना काय पाहिजे तें द्यायलाही कमी करायचा नाहीं. वेळीं बंगालची सुभेदारी देखील तो इंग्रजांना देऊन बसायचा.

तें तेव्हां बरोबरच होतें. बादशहाला तरी राजवंशांत योगायोगानें जन्म घेण्याखेरीज बादशहा व्हायला काय सायास पडले होते, म्हणून बंगाल इंग्रजांच्या हवालीं करतांना त्याला खंत अथवा खेद वाटेल? वडिलार्जित बादशाही दौलत. खातां येईल तशी गरजेनुसार मोडून खावी, आणि आरामांत दिवस काढावे, एवढ्यासाठीं बादशहाचा जन्म! त्याच्या मेल्याजित्याची कुणाला कशाला पर्वा असेल?

अशी बादशहा आणि इंग्रज यांची बंगालमध्यें तरी युति होऊं नये अशीही नबाबाची इच्छा असेल. अथवा खरोखरच बादशहाशीं टक्कर देण्यासाठीं इंग्रजांची खंबीर मदत त्याला खरोखरच हवीशी वाटली असेल. पण त्यानें ताबडतोब इंग्रजांना लिहिलें, “ बादशहाची फौज बंगालवर चालून येते आहे. तिच्याशीं मुकाबला करण्यासाठीं आम्ही फौजफांटा घेऊन पाटणाला निघण्याच्या जय्यत तयारींत आहों. या वेळीं आम्हांला तुमच्याआमच्यामधील अलिनगरच्या तहानुसार आम्हांला इंग्रजांची मदत दोस्त या नात्यानें होणें जरूर आहे. आम्ही इंग्रजी फौज आमच्या दिमतीला फौज असेपावेतों तिचा दरमहा एक लाख रुपये खर्च देऊं.”

लगेच ॲडमिरल वॉटसन आणि क्लाइव्ह, उभयतांचा बेत सोळा आणे जुळला. त्यांना तरी आपली फौज घेऊन बाहेर पडायला कांहीं कारणच पाहिजे होतें. तेंही असें पाहिजे होतें, कीं फ्रेंचांवर घाला घालून त्यांना लोळवण्याचा डाव व नबाबाला आणखी कोंडींत आणून बंगाल अधिक गिळण्याचा डाव, दोन्ही एकदम साधावे. तें साधतांच तो एकदम फौजा घेऊन निघालाही.

असा इंग्रज अगोदर कमिटींत कट शिजवून एका दगडानें तीन पक्षी मारायला चालला. त्याची एका पक्ष्याला तर अजिबात दादच नव्हती.

बरें; दुसऱ्या पक्ष्याला तर वाटत होतें कीं हा शूर इंग्रज सशस्त्र फौज घेऊन लोळवायला निघाला आहे तो आपल्याच शत्रूला; आपला उपकारकर्ता म्हणून.

तोंच ऍडमिरल वॉटसनचें पत्र नबाबाच्या हातीं आलें. “तुम्ही पाटणाला फौजा घेऊन चाललां आहां. आम्ही तुमच्या मदतीला यायला हवें होतें. पण आमचा शत्रु मागें मोकळा सोडून आम्हांला कसें येतां येईल? कारण एक तर तुम्ही आतां आमच्यापासून फार

दूर पाटणाकडे असणार. आम्ही इकडे एकटेच पडणार. आमचें रक्षण आम्हांलाच एकट्यानें करावें लागणार.'

"यांतून मी एक उपाय सुचवतों. आम्हांला अगोदर चंद्रनगर घेऊन या बाजूचा धोका आटोक्यांत आणूं दे. नंतर आम्ही आमच्या हरएक शिपायांसह आमची ताकद आहे तिथवर तुम्हांला मदत करूं. तुमची इच्छा असेल तर तुमच्याबरोबर आम्ही थेट दिल्लीवरही हल्ला चढवायला येऊं."

तें पत्र वाचतांक्षणीं नबाबाच्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले. त्याला असें होऊन गेलें, कीं करायला गेलों काय, आणि हें झालें काय? हें निमित्त साधून आतां इंग्रज फ्रेंचांना झोडणार! आपला तोही आधार तोडणार!

परंतु नबाब इंग्रजाला भीत होता, तसाच इंग्रजही अजून थोडा फार नबाबाला भीत होताच. कारण नवरा कुंकवाला आधार इतक्याच मोलाचा असला तरी तो नवरा ना? भलाबुरा कसाही असला तरी तो बंगालचा नबाब!. त्याच्या राज्यांत घुसून आपण रोज रोज बखेडे माजवीत आहों, हें वेळीं अंगाशीं येण्याचाही संभव आहे, ही जाणीव एकट्या वॉटसनला आणि क्लाइव्हला नसली, तरी कमिटींतील बाकीच्या कांहीं इंग्रजांना होती.

तोंच पुन्हा जुनी अडचण पुढें आली. जो तो म्हणूं लागला, "पण आपण अशी वेळ साधून फ्रेंचांची कुरापत काढली, आणि चंद्र-नगरवर स्वारी केली, तर नबाब रागावेल ना! कारण कांहीं झालें तरी जसे आम्ही इंग्रज, तसेच फ्रेंचही नबाबाचे मित्र आहेत. नबाबाला आम्ही चंद्रनगरवर चालून गेलों तर तें रुचायचें नाहीं."

त्याला आधार तें वॉटसनला नबाबाचें आलेलें पत्र.

तेव्हां अनेकांचें मत पडलें, कीं एवढ्यावर भागणार नाहीं. तिकडे विलायतेंत आधींच इकडील कंपनीच्या कारभाराबद्दल बोभाटा होता.

त्यांत या दंडेलीची आणखी नवी भर पडायची ! सारेजण आपल्या तोंडावर थुंकूं लागायचे.

पण वॉटसन मोठा धडाडीचा. मनांत आणील तें करणारा. त्यानें ठाम सांगितलें, "नबाबाची फ्रेंचांवर चालून जायला संमति आहे."

"कुठें संमति आहे? दाखवा. तें पत्र म्हणजे कांहीं संमति नव्हे." क्लाइव्ह म्हणाला. कारण त्याला माहीत होतें, कीं नबाब एरव्हीं कितीही भोंगळ असला तरी अशी आपल्या हातानें आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घ्यायला तो कसा तयार होईल? तो तर उलट फ्रेंचांना खूष ठेवून त्यांच्या धीरावर दिवस काढूं पाहत होता.

आणि इकडे क्लाइव्ह सहज जातां जातां वॉटसनचें नाक कापतां आलें तर कापूं पाहत होता. एका उंदराची शिकार साधतांना दोन धूर्त बोके एकमेकांवर गुरगुरावे, तसे बंगालमधील धनदौलतीवर आपणालाच आडवा उभा हात अधिक मारतां यावा यासाठीं त्यांची मनांतून एकमेकांत चुरस होती. पण इंग्रजांतील चुरशीचा विशेष हा कीं देशाचा मतलब साधतांना कधीं असली व्यक्तीव्यक्तीची आपमतलबी चुरस आड येत नसे.

क्लाइव्हच्या कोंपरखळीवर वॉटसन तितक्याच जोरांत म्हणाला, "ज्या गांवच्या बोरी त्यांच गांवच्या बाभळी, हें सन्मान्य सभासदांनीं ध्यानी ठेवावें. नबाबाची संमति माझ्या खिशांत आहे असें माना. ती मिळाली आहे. आपल्या कचेरीची वाट चालते आहे. यापेक्षां त्याची अधिक चर्चा तूर्त नको. ज्यानें त्यानें आपापल्या कामाला लागावें."

वॉटसन होता कमिटीचा प्रमुख. तो इंग्रजी आरमाराचा ॲडमिरल होता. त्याच्या शब्दावर उलटून असें नव्हे असें कोण बोलणार?

पण क्लाइव्हला मात्र मनांत हुरहुर लागून राहिली होती, "आं? हा माझ्यापेक्षांही पाताळयंत्री आहे? नबाबाची संमति मिळवायला मीं देखील जिथें हात टेंकले, तिथें यानें डाव साधला तरी कसा?"

या कामांत वॅट्सचा हात आहे अशी कुणकुण तेवढ्यांत क्लाइव्हच्या कानीं आली. पक्का धूर्तच तो! त्यानें लगेच ओळखलें, कीं आरंभीं नबाबानें वॅट्सला छळलें, पकडलें, त्याचा आतां वॅट्स पुरेपूर दावा उगवून घेणार!

तरी पण क्लाइव्हला भय वाटत होतें, कीं नबाब आणि वॅट्स यांच्या चुरशींत वॅट्स अखेरपावेतों टिकाव धरील, कीं लहरी नबाबाच्या कोपाला बळी पडेल?

पण क्लाइव्हला फार वेळ ती चिंता करीत बसावें लागलें नाहीं. वॉटसनसह सारी मंडळी ज्या जासुदाची वाट पहात होती, तो तेवढ्यांत मुर्शिदाबादहून माघारा आला.

सारेजण पाहत होते; तों तो जो आला तो विजयी हंसतमुखानें.

"काम फत्ते?" वॉटसननें जासुदाला विचारलें.

"होय महाराज! काम फत्ते!" जासूद उत्तरला. आणि लगेच त्यानें नबाबाच्या शिक्कामोर्तबाचें फर्मान आपल्या कातडी जुगदानांतून काढून वॉटसनसमोर ठेवलें.

"तुम्हांला नबाबाची संमति पाहिजे होती ना कर्नल?" वॉटसन तें फर्मान वाचून पाहून क्लाइव्हपुढें ठेवून म्हणाला, "ती ही घ्या संमति."

सारेजण तें पत्र पाहून चकित झाले.

३ : चक्रव्यूह

इतक्या वेगानें नबाबाच्या दुर्भाग्याचीं चक्रें यापूर्वीं कधींच फिरूं लागलीं नव्हतीं.

आज काय, इंग्रज चंद्रनगरवर चालून आले.

उद्यां काय, त्यांनीं फ्रेंचांवर हल्ला केला.

परवां काय, चंद्रनगरला फ्रेंच पडले आणि इंग्रज चढले.

अशा एकसारख्या एकीमागून एक दुर्वार्ता ! बादशहाची बंगालवर स्वारी ही अखेर हूल ठरली खरी. परंतु त्यानंतर हायसा उसासा सोडायलाही नबाबाला अवसर मिळाला नाहीं.

तरी त्यानें आपल्या परीनें इंग्रजांना पायबंद घालण्याची खबरदारी घेतली होती. हुगळीचा आपला विश्वासू सुभेदार नंदकुमार याला त्यानें तांतडीचा हुकूम सोडला होता कीं, "तावडतोब तोफखाना घेऊन चंद्रनगरच्या लगत बंदोबस्तानें हजर राहा. वेळ पडली, फ्रेंचांनीं मदत मागितली, तर आपलें सर्व बळ खर्चून त्यांना पाठबळ द्यायला कचरूं नको."

परंतु त्या खबरदारीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. इंग्रजानें सुभेदाराच्या तोफखान्यांतून एक तरी गोळा सुटण्याच्या अगोदरच सुभेदार सारा तोफखाना घेऊन मागच्या पायीं मागें पसार !

ती वार्ता कानीं येतांक्षणीं मात्र नबाबाच्या मनाला धक्का बसला. त्याला हेंच कळेना, कीं असें कसें झालें ? मुळींच लढाई न देतां आपला सुभेदार माघारा फिरतो याचा अर्थ काय ?

काय, सुभेदाराच्या तोफखान्यांत इंग्रजानें फितुरी केली ? गोलंदाज फितले, कीं दारूगोळा शत्रूनें भिजवून निकामी करून सोडला, कीं दारूखान्यावरच्या अंमलदारानें सुभेदाराला नकळत इंग्रजाची लांच खाऊन दारूच्या पोत्यांऐवजीं मटक्यांचीं पोतीं भरून ठेवलीं ? कीं सारे गोलंदाज एकदम दगाफटका करून ठार केले ? ना एक तोफ उडाली, कीं ना एक बंदूक उडाली. असें कां ? म्हणून नबाब कर्माला हात लावून चिंता करीत बसला आहे, तेवढ्यांत जासूद बातमी घेऊन आला. पण तोही आला तो मेल्याची बातमी घेऊन आलेल्या रडतराउतासारखा.

त्यानें मेल्याची बातमी आणली असती, तरी ती देखील नबाबाला मानवली असती. पण फितूर झाल्याची बातमी मेल्यापेक्षांही वाईट. सुभेदारही तेवढीच एक भांगेंत तुळस कोठून रुजणार ?

“ हा हरामखोर सुभेदार इंग्रजांकडील तोफेचा गोळा लागून ठार कां नाहीं झाला ?” जासुदाच्या तोंडून सुभेदार नन्दकुमार इंग्रजांना फितूर झाल्याची वार्ता ऐकतांक्षणीं नबाब खवळून कडाडला.

हा फितवा कलकत्त्याच्या धनकुबेर अमीरचंदशेटजींमार्फत सिद्ध झाला असें जेव्हां नबाबाला कळलें, तेव्हां तर त्याला रागापेक्षां तिरस्कारच जास्त जास्त आला.

आणि ती फितवाफितवीची कामगिरी अमीरचंदानें कुणाच्या सांगण्यावरून पत्करली ? तर वॅट्स आणि क्लाइव्ह या दोघांच्या सांगण्यावरून ! वॅट्स तर कासीमबझारचा सूड नबाबावर उगविण्यासाठीं टपलेलाच होता. पण क्लाइव्ह एवढा मोठा माणूस, कर्नलच्या दर्जाचा, त्यानें असली हलकी कामगिरी करून आपले हात चिखलानें बरबटून घ्यावे ?

परंतु खरा क्लाइव्ह अजून नबाबाला पाहायला मिळाला होताच कुठें ? झालें हें त्याच्या कुकर्मांच्या काळ्या सावलीचें ओझरतें दर्शन होतें.

अशी एकेक पीस उपटून घायाळ केलेल्या पक्ष्यासारखी आपली केविलवाणी दशा झाली आहे याची नबाबाला जरा जरा जाणीव होऊं लागली होती. राजवटीचा पाहावा तो अधिकारी शत्रूला फितूर !

तरी अजून त्याचा त्याच्या सेनापति मिरजाफरवर विश्वास होता. तोही चंद्रनगर इंग्रजाच्या हातीं पडेपावेतों कां स्वस्थ राहावा हें त्याला कळत नव्हतें. “ इंग्रजानें त्याला हुसकावण्या दाखविल्या असतील. तो फसला असेल. हरामखोर अमीरचंदानें त्याला धोका दिला असेल.” अशी तो आपल्या मनाची समजूत करीत होता. रागवत होता. पण अजून सेनापति त्याचा होता !

“ बस्स ! मी या इंग्रजांना खाशी अद्दल घडवतों. थांबा म्हणावें चोरांनो ! माझ्या राज्यांत येऊन माझ्याशीं अशी मात्रागमनी दगलबाजी करतां काय ? थांबा. माझ्या मुलुखांतून सफा पाळेंमुळें खणून

काढतों तुमचीं. 'जिहाद'ची हांक तुम्हांला तेवढी देतां येते, त्या हांकेच्या जोरावर माझ्या चाकरींतले गोरे ख्रिस्ती तुम्हांला फोडून नेतां येतात; आणि मला जिहाद पुकारतां येत नाहीं असें तुम्हांला वाटतें काय? माझी रयत माझ्या हांकेसरशी तुमच्याविरुद्ध खवळून उठेल तेव्हां दिसेल."

नबाबानें आपल्या मुनशीला ताबडतोब बोलावणें पाठविलें. तो येतांच त्याला हुकूम केला, "सेनापति मिरजाफरला ताबडतोब येऊन भेट असें फर्मान लिही. आणि इंग्रजांना जाब विचार, कीं आमची परवानगी न घेतां तुम्ही चंद्रनगरवर हल्ला कां केला? या आगळिकीची दखल आम्हीं कां घेऊं नये?"

मुनशी खाविंदांना कुर्निसात करून फर्मान लिहायच्या तयारीला लागतो, तोंच चंद्रनगरला पाडाव होऊन निराधार झालेले फ्रेंच,—त्यांच्या वखारीचा मुख्याधिकारी व नबाबाचा दोस्त जीन लो देखील—धापा टाकीत आसऱ्याला आले.

त्यांनीं विचारलें तेव्हां नबाबाला उमजलें, कीं सेनापति मीरजाफरही इंग्रजधार्जिणा आहे.

जीन लोनें सरळ विचारलें, "नबाबांचा आणि आमचा मैत्रीचा तह झालेला असतांना, आणि आम्ही नबाबांना इंग्रजांविरुद्ध सर्वतोपरी कुमक करीत असतांना आमच्यावर स्वारी करायला नबाबांनीं इंग्रजांना परवानगी द्यावी, याचा अर्थ काय?"

"आम्हीं परवानगी दिली?" नबाबानें आश्चर्यानें तोंडांत बोट घालून विचारलें, "कोण म्हणतो आम्हीं परवानगी दिली?"

"तुमचा सेनापति म्हणतो."

हें जीन लोचें उत्तर ऐकतांच तर नबाब सर्दच झाला. त्याला हेंच कळेना, कीं आपल्या राजवटीला अशीं आणखी कुणीं कुणीं कुठें कुठें कशीं कशीं भगदाडें पाडलीं आहेत तरी!

असे लागोपाठ दोन तीन दिवस गेले. पोरांनीं वाळूचे किल्ले बांधावे तसे इंग्रजांच्या बींमोडाचे शेखमहंमदी मनोरे रचण्यांत नबाब दंग होता. मुळी तुटलेल्या रोपस्यासारखी फ्रेंचांची गत आतां इंग्रजांनीं निदान बंगालपुरती तरी चंद्रनगर पाडाव करून सोडली होती. तरी जीन लोला अजूनही आशा वाटत होती, कीं आज ना उद्यां आपण पुन्हा नबाबाच्या मेहेरबानीनें बंगालमध्यें आपला जम बसवूं.

तेवढ्यांत अचानक माथ्यावर कडा कोसळून पडावा तसें वॉटसनचें नबाबाच्या खलित्याला सणसणीत धमकावणीचें उत्तर येऊन धडकलें.

४ : गांठ पडली ठका ठका....

वॉटसननें आपल्या उत्तरांत पहिला सणसणीत कोरडा नबाबाच्या पाठीवर लगावला होता.

" नबाबांच्या शिक्कामोर्तबानिशीं संमति घेऊनच आम्हीं चंद्रनगरवर स्वारी केली असतांना आतां नबाब फ्रेंचांना फितूर होऊन त्याबाबत कानांवर हात ठेवूं पाहत आहेत. असल्या नबाबांच्या धोकेबाज धोरणाबद्दल कंपनीला गंभीर विचार करावा लागेल. "

ही धमकी ! आणि त्या जखमेवर मिठाचें पाणी शिंपडावें तशा अनेक भरमसाट अरेरावी मागण्या ! त्या मागण्या देखील नबाबाला पाण्यांत पाहणाऱ्या वॅट्सकडून त्याला सादर केल्या होत्या.

मागणी पहिली : 'फ्रेंच लोक, जे नबाबाच्या आसऱ्याला गेले आहेत, त्यांना ताबडतोब आमच्या हवालीं करावें.'

मागणी दुसरी : 'कासीमबझार, डाक्का, पाटणा, फेवडा, बालासिनोर एथल्या फ्रेंचांच्या वखारी ताबडतोब आमच्या हवालीं कराव्या.'

मागणी तिसरी : 'कासीमबझारच्या फ्रेंच वखारींतील सर्व मालमत्ता, तसेंच त्यांचीं कासीबझारबाहेर ठाणीं असतील तींही सारीं ताबडतोब आमच्या स्वाधीन करावीं. कारण फ्रेंच लोक आतां आमचे कैदी आहेत.'

तें इंग्रजांचें धमकावणीचें पत्र आलें मात्र, आणि नबाबानें रागाच्या भरांत वॅट्सला आपल्या दरबारांतून चालता व्हायला सांगितलें.

'आहे. नबाब आपला खरा दोस्त आहे.' जीन लो भरदरबारांत तो प्रकार पाहून आपल्या सहकाऱ्यांच्या कानांत म्हणाला. त्याला वाटलें, नबाब आतां इंग्रजांना खातो, कीं गिळतो, कीं काय करतो नकळे.

तशी वेळ आलीच, तर आपण नबाबाला पाठीशीं घालून चंद्रनगरच्या पराभवाचा सूड इंग्रजांवर कसा उगवावा, याविषयीं त्या सारी रात्रभर फ्रेंचांच्या गोटांत गुप्त खल चालला होता.

फ्रेंचांच्या नजरेनें काय अवघड होतें त्यांत? नबाब तसें पाहतां बादशहाचा बादशहा होता. बादशहा केवळ नांवाला. तो त्याच्या मुठींत होता. खजिन्यांत कुजण्याइतकी विपुल संपत्ति होती. इंग्रजांशीं तोडीला तोड लढाई देण्याचीं सुधारलेलीं युद्धसाधनें मोगलांपाशीं नसलीं तरी फ्रेंचांपाशीं तर होतीं? तसेच पोर्तुगीज होते. डच होते. इंग्रज हा त्या सर्वांनाच भारतांत आपल्या राशीस आलेला खलग्रहसा वाटत होता. त्याचा नायनाट करण्यासाठीं तेवढ्यापुरती तरी त्या सर्वांची एकी होणें मुळींच अशक्य नव्हतें.

अशा एकजुटीनें एकदांची ही इंग्रजाची ब्याद जर फ्रेंचांना बंगालमधून टाळतां आली असती, तर मग काय उद्यां सारा बंगाल आणि परवांपासून हळुहळू सारा भारत त्यांचा होता.

ते मनांत म्हणत, "नबाब काय! जो कोणी वेसण पकडून लगाम धरून पाठीवर स्वार होईल, त्याचा तो घोडा!"

"डच काय, या देशांत असून नसल्यांत जमा. तसेच पोर्तुगीजही. सारे एकेका घांसाचे. एवढा नबाब पाठीशीं घालतां आला, आणि इंग्रजांना हाकलून देऊन बंगाल, बिहार, ओरिसा पायांखालीं घालतां आला, तर ह्या देशांत आमची फ्रेंचांची सत्ता रुजून फोफावायला कितीसा उशीर?"

अशीं एकाहून एक रम्य जागतीं स्वप्नें पाहून त्यांत रमतां रमतां त्या रात्रीं सारी रात्र जीन लो आणि त्याचे सहकारी फ्रेंच लोक यांचा डोळ्याला डोळा लागला नाहीं. ते एकसारखे जागत उद्यां-परवांचे गोड गोड बेत करीत बसले होते.

तोंच पहांट झाली. त्यांच्याशीं फितूर असलेला नबाबाच्या परिवारांतील एक माणूस गुपचूप येऊन जीन लोला भेटला. त्याचें आणि लोचें एकान्तांत घटका अर्धी घटका काय बोलणें झालें तें त्यांचे ते जाणोत.

उजाडतांच जीन लोनें जाऊन नबाबाची एकान्तांत भेट घेतली. त्या भेटींत त्यांचीं काय तीं गुप्त खलबतें झालीं. आणि लगेच तो आपल्या मकाणावर माघारा गेला. तो जो माघारा गेला, ती त्यांची आवराआवर सुरू झाली. आणि सूर्यास्ताच्या आंत प्रयाणाची सर्व तयारी करून रात्रौ या कानाची दाद त्या कानाला लागूं न देतां बोटींत बसून फ्रेंच पसार झाले देखील !

"हें काय चाललें आहे तरी काय ?" नबाबाच्या दरबारांतील मानकरी अधिकारी देखील तें पाहून एकमेकांना विचारूं लागले. त्यांना कुणाला कांहींच खबर नव्हती.

"नबाबांनीं फ्रेंचांना पकडून इंग्रजांकडे पाठविण्याचा आपला हेकाच शेवटीं खरा केलेला दिसतो." एकजण म्हणूं लागला.

कदाचित् आम्ही त्या बेतांत खो घालूं, म्हणून नबाबांनीं आम्हांला त्या बेताची दाद लागूं दिली नसेल." दुसरा म्हणूं लागला.

तिसरा जो त्यांत अधिक धूर्त होता, आणि जो अमीरचंद शेटजींमार्फत इंग्रजांना विकला गेला होता, तो तेव्हां मनांत भावी काळांत इंग्रजांकडून आणखी मोठें घबाड मिळविण्याचे मनोरथांचे शेख महंमदी मनोरे मनांत रचीत होता.

"नबाबांना ही सल्ला मीं दिली असें वॅट्ससाहेबाला सांगेन. आणि—"

मग इंग्रज प्रसन्न झाल्यावर आपलें भाग्य कसें फळफळेल, याचे आडाखे बांधायला त्याचें मन त्याला अगदीं अपुरें वाटूं लागलें. शेखमहंमदी भराऱ्या मारतांना आकाश ठेंगणें वाटूं लागलें.

उजाडत्या दिवशीं नबाबानें आपल्या दरबारांत सांगितलें तेव्हां दरबारी लोकांना कळलें, कीं फ्रेंचांनीं इंग्रजांविरुद्ध सर्व प्रकारची कुमक करण्याचें वचन दिलें आहे, व ती कुमक मद्रासहून अगदीं थोड्या दिवसांत मुर्शिदाबादेला येऊन पोहोंचेल. ती आली, कीं मग आपण आहों आणि इंग्रज आहेत.

आणि लगेच पाहावें तों काल दरबारांतून घालवून दिलेल्या वॅट्स-साहेबाला आज दरबारांत आणायला नबाबाचा मानकरी रवाना! एप्रिलच्या २० तारखेला जो वॅट्स नबाबाच्या दरबारांत कोळसा ठरून फेकून दिला गेला होता, तोच दुसऱ्या दिवशीं हिरा ठरला! नबाबानें त्याला भर दरबारांत बहुमानाचीं वस्त्रें देऊन त्याचा मनधरणीवजा गौरव केला.

त्याचा नुसताच गौरव करून नबाब स्वस्थ बसला नाहीं. ॲडमिरल वॉट्सनला लिहिलेलें गौरवपत्रही त्यानें त्याच्या स्वाधीन केलें.

"वॉट्सनसाहेबांना आमचा उगीच घुस्सा आला होता. तो वेळींच दूर करणें आमचें काम होतें." नबाब त्या पत्रांतील मजकुराचीच वॅट्सला आडपडद्याच्या भाषेंत ओळख करून देत म्हणाला, "आमचा आणि इंग्रजांचा आपसांत असा ठराव आहे, कीं एकमेकांचे शत्रु ते एकमेकांनीं आपले शत्रु मानावे."

"होय. बरोबर आहे नबाबांचें म्हणणें." वॅट्सदेखील दरबार-शोभेच्या भाषेंत बोलत होता.

"आम्हीं, जीन लो आणि त्याचे साथीदार फ्रेंच यांना आमच्या राज्याबाहेर हद्दपार केलें आहे."

"चांगलें केलें."

" शत्रूचें पारिपत्य करण्याच्या कामीं आमचा इंग्रजांना पूर्ण पाठिंबा आहे. "

" आम्ही त्याबद्दल नबाबांचे आभारी आहों. "

" यापुढें कधींही फ्रेंचांनीं जर आपल्या फौजा गोळा करून तुम्हां इंग्रजांशीं लढाई मांडलीच, तर तुम्हीं आम्हांला कळवावें. आम्ही आपल्या सर्व सामर्थ्यानिशीं तुमचे मित्र म्हणून तुमच्या मदतीला धावून येऊं. आम्हीं आजवर इंग्रजांना जीं वचनें दिलीं आहेत, जे करार केले आहेत, जीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यांचें आमच्याकडून सदैव यथावत् पालन केलें जाईल अशी खात्री बाळगा. "

" सारें मान्य. पण फ्रेंचांच्या वखारींची आणि इतर दौलतीची मागणी कंपनीनें नबाबांकडे केली आहे, त्याचें काय ? " वॅट्स मध्येंच हळूच विचारलें. तो जो मुद्दाम येऊन नबाबाच्या दरबारीं ठाण मांडून बसला होता, तो केवळ माशा मारण्यासाठीं नव्हे. नबाबानें साखरघोळ शब्दांत त्याच्या तोंडावरून हात फिरविण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी तसल्या थुलथापांना आणि हुलकावण्यांना भाळून फसण्या-इतका तो कच्च्या गुरूचा चेला नव्हता !

" त्याचें असें आहे, " नबाबानें कांहीं क्षण डोकें खाजवून हळूच सांगितलें, " फ्रेंचांच्या वखारी आणि आणखी काय जी थोडीफार माल-मत्ता असेल ती आमच्या स्वाधीन आहे खरी. त्या बाबतींत साहेबांना माझें असें सांगणें आहे, कीं फ्रेंच कंपनीनें आमच्या लोकांचें लाखों रुपयांचें देणें आहे. त्या घेणेकऱ्यांचे एकसारखे तगादे आमच्याकडे येत आहेत. ती सारी मालमत्ता जर मीं इंग्रजांच्या हवालीं केली, तर त्या धनकोंची समजूत मला करतां येणार नाहीं. "

" ठीक आहे. मी नबाबांचें म्हणणें आमच्या वरिष्ठांना कळवितों. त्यांच्याकडून जें काय उत्तर येईल तें नबाबांना मी कळवीनच. " एवढें सांगून वॅट्स दरबारांतून आपल्या निवासस्थानीं माघारा गेला.

असा तेव्हां नबाब दोन डगरींवर हात ठेवून खालच्या खोल दरींत लोंबकळत उभा होता. खालीं काळ्या किर्र्र दरीची खोली त्याला स्पष्ट जाणवत होती. त्या दरींत आपण पडलों कीं आपला सर्वनाश ठेवलेला, याचीही त्याला कल्पना होती.

तरी पण त्याला मोठा धीर वाटत होता, कीं इंग्रज व फ्रेंच या दोन डगरींपैकीं दोन्ही नाहीं तरी कोणती तरी एखादी तरी डगर आपण दोन्ही हातांनीं घट्ट पकडून धरूं. आणि त्या आधारावर आपली ढांसळूं पाहणारी राजवट सांवरूं.

५ : नव्या नबाबाची तयारी

आपली नुसती राजवट सांवरण्याइतपत नव्या नबाबाची महत्त्वाकांक्षा चिमुकली नव्हती. त्याची नजर आजोबाच्या नजरेपेक्षांही दूरवर झेंपावत होती.

"दिल्लीची बादशाही काय, असून नसून सारखी आहे. बंगालच्या नबाबाखेरीज ती थोडीच चालणार आहे! ती मी पक्की मुठींत आणीन."

"हा इंग्रज मध्यें बखेडे करतो आहे. पण कांत्यानें कांटा काढीन. फ्रेंचांना त्यांच्या छाताडावर नाचवून बंगालमधून त्यांना उखडून टाकीन. माझी फौज आणि फ्रेंचांची मदत अशा दुहेरी बळाशीं टक्कर देऊन इंग्रज इथें कसा टिकतो तोच मला पाहायचा आहे."

कोट्यावधी रुपयांची गडगंज दौलत नबाबाच्या खजिन्यांत सांचून पडून होती. दौलती सांचायला काय हरकत? हवी तशी लूटमार करायला भारताची सर्वधनसंपन्न सुवर्णभूमि पायातळीं होती. बळी तो कान पिळी या न्यायानें 'हम करे सो कायदा' म्हणून कसें वागावें हें पिढ्यानपिढ्यांच्या खानदानी हुकूमशाही नबाबी वैभवांत मुरून जन्माला आलेल्या नबाबाला कोणी शिकवायला नको होतें. राज्य त्याचें होतें. सारे दरवाजे त्याला मोकळे होते.

कोण त्याला अडवणार होता ? इंग्रज ? तो कशाच्या जोरावर ? आपल्या सुधारलेल्या युद्धसाहित्याच्या आणि कवाइती सोजिरांच्या जोरावर ?

" देशांत आपण सारे देशी-परदेशी प्रतिस्पर्धी रसातळाला नेले, या घमेंडींत आहे काय इंग्रज ? त्याला म्हणावें, हाड्या वर्णाला गजकर्ण, तसा तुझ्या इंग्रजी मर्दुमकीवर फ्रेंचांचा हमखास तोडगा या नबाबापाशीं आहे. तशीच वेळ आली, तर मी माझ्या कोट्यावधी रुपयांचा धनंतर खजिना मोकळा सोडीन. भराभर पैशांची खैरात करून हजारों-लाखों फौज खडी करीन. मनांत आणीन तर सारी दुनिया जिंकायला पुरून उरेल इतकी दौलत खर्चायला, आणि इतकीं माणसें लढतां लढतां मरूनही पुरून उरायला माझ्यापाशीं माझी कोटमाप रयत आहे. वाऱ्या-वर भूस उडवून द्यावें तशी इंग्रजांच्या मगरूर सत्तेची भंबेरी उडवून देईल हा नबाब ! काय समजला हा इंग्रज मला ?" असली खुम-खुमीची भाषा !

बरें; फ्रेंचांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं, तर त्याचा हजरजबाब असा कीं आपण इंग्रजांचे तरी कुठें वैरी आहों ? फ्रेंचांविरुद्ध म्हटल्या घटकेला आमचा तुम्हांला पाठिंबा आहे असें इंग्रजांना आपण सांगतच आहों. करतील ! इंग्रज व्यापार करतील ! तरीही व्यापारासाठीं त्यांना या नबाबाशीं जपून नमत्या नूरानें वागावें लागेलच कीं नाहीं ? त्यांना मनपसंत व्यापार करायचा असेल, नफा मिळवावयाचा असेल, तर ते तळें राखतील, आणि पाणी चाखतील. त्यांतही भरभराट आपल्या राज्याचीच होणार !....

असा नबाब दोन्ही डगरींवर हात ठेवून आपल्या उज्ज्वल भविष्य-काळाचीं बहारदार कल्पनाचित्रें आपल्या मनोराज्यांत रंगवीत होता.

पण त्या दोन्ही डगरी ढांसळल्या तर आपली काय गत होईल, ही कल्पनाही पूर्वार्जित खानदानी सत्तावैभवावर पुष्ट झालेल्या त्याच्या मनाला शिवत नव्हती.

अशीं इकडे नबाबाचीं शेखमहंमदी मनोराज्यें चाललीं होतीं. तेव्हांच तिकडे कलकत्त्यांत अमीरचंद, माणिकचंद, राजा वल्लभदास, त्रिलोकचंद, नंदकुमार, या साऱ्या धनकुबेर शेटजींच्या निराळ्याच मसलती चालल्या होत्या. "हा नबाब सिराजउद्दौला तर आतां खलास होणारच. आतां याच्या ऐवजीं नबाब म्हणून आपण इंग्रजांपाशीं वजन खर्च करून कोणाला पाठीशीं घालावें. म्हणजे सारें कांहीं आपल्या मनाजोगें होईल?"

त्यांतल्या त्यांतही आणखी जो तो आपल्या मतलबाला जागरूक.

राजा वल्लभदास वगैरे जैन शेटजींनीं इंग्रजांपाशीं यार लुत्फखान याची नबाबगिरीसाठीं जोराची शिफारस चालवली होती.

त्यांचें बरोबर. यार लुत्फखान होता नबाबाचा दोन हजारी शिबंदीचा एक शिलेदार. स्वारी ह्या जैन शेटजींना पक्की धार्जिणी. थेट नबाबाशींही त्याचा चांगला जम बसलेला.

"आमचा लुत्फखान करील, तें नबाब तरी काय करील?" अशी राजा वल्लभदास वगैरे मंडळी आपसांत बोलायची. इतका त्याला त्यांनीं लांच चारून चारून आपला मिंधा करून ठेवला होता. तो खान नबाब होण्यानें या व्यापाऱ्यांचें उखळ पांढरें होणार होतें.

क्लाइव्ह, वॅट्सन वगैरे कंपनीचे बडे बडे इंग्रज अधिकारी म्हणत होते, "अंहं! खान नबाब होऊन नाहीं शोभायचा. तो एरव्हीं लाख माणूस खरा. पण हलक्या कुळांतला ना? नबाबाला नबाब नगाला नग निवडायला हवा तो तशाच थेट खानदानी पेशाचा हवा. नाहीं तर लोक म्हणायचे—"

अशा त्या टोळक्याच्या वाटाघाटी होऊन अखेर सर्वांच्या मतानें कौल मिळाला. नवा नबाब करायचा तो नबाबाचा सेनापति मिरजाफरलाच करायचा. कारण तो नबाबाचा जवळचा नातलगही होता; आणि शिवाय तो नबाबगिरी मिळाली तर सर्वांचें सर्व प्रकारचें प्रिय करायला राजी आहे असा बहुतेकांचा कयास होता.

अशा वेळीं क्लाइव्हनें नबाबाला मित्रत्वानें गौरवून चण्यांच्या झाडावर चढविणारें खास मिष्ट पत्र लिहिलें. आणि तें जासुदाहातीं मुर्शिदाबादला नबाबाच्या दरबारीं दबा धरून बसलेला कंपनीचा प्रतिनिधि वॅट्स याच्या मार्फत नबाबाकडे रवाना केलें.

आणि त्याच जासुदाबरोबर वॅट्सला पत्र लिहून कळविलें, "कराराचा मसुदा दोन दिवसांत पाठवितों. मिरजाफरला सांगा, कीं कांहींही भय बाळगण्याचें कारण नाहीं. आपलें ठरल्याप्रमाणें कर्नल क्लाइव्ह रणांगणाला ज्यांची पाठ कधीं दिसली नाहीं आणि दिसणार नाहीं असे करोल पांच हजार सोजीर घेऊन तुझ्या कुमकेला येतो आहे म्हणावें. त्याला असें आश्वासन द्या कीं मी रात्रीचा दिवस करून दौडत तुझ्या मदतीला येतों आहें. माझ्या पदरीं अखेरचा इंग्रज बाकी असेपावेतों मी तुझ्या बाजूनें उभा राहीन."

खुद्द नबाबाचा ज्याच्यावर सारा भडिभार, त्या त्याच्या सेनापति मिरजाफरला क्लाइव्ह असा नबाबाला भाजून मारण्यासाठीं अस्तनींतील निखाऱ्यासारखा फुंकर घालून फुलवीत होता!

स्वाध्याय :

१. वॅट्सनें नबाबावर कोणत्या नव्या अटी लादल्या?
२. नबाब पंख कापून पिंजऱ्यांत कोंडलेला पक्षी कसा?
३. नबाबाची इंग्रजांना फ्रेंचांवर चालून जायला संमति कशी?
४. नंदकुमार कोण? तो कसा वागला?
५. वॅट्सनें नबाबाला कसें पेंचांत पकडलें?
६. फ्रेंच कासिमबझारहून कसे पसार झाले? त्यावर नबाबाच्या दरबारी मानकऱ्यांची काय समजूत झाली?
७. वॅट्स नबाबाच्या दरबारांतून गेला कां? व माघारा आला कां? कसा माघारा आला?
८. नबाबाच्या सावकार मंडळींचीं नबाबीबाबतचीं कारस्थानें स्पष्ट करा.
९. मिरजाफर हा कोणाच्या अस्तनींतील निखारा? कसा?

प्रकरण पांचवें

शोककथेची अखेर

१ : नबाबाचा गळेकापू

दोन दिवस गेले. कराराचा मसुदा तयार झाला. आतां तो मुर्शिदाबादला वॅट्सकडे मिरजाफरची सही मिळवण्यासाठीं रवाना व्हावयाचा. इथवर शिकारीची सगळी मनाजोगी सिद्धता झाली. आणि ऐन वेळीं अमीरचंदशेटजी नेमकें क्लाइव्हचें नाक दाबून अडून बसला.

"तें सगळें ठीक आहे कर्नलसाहेब! पण आमची व्यवस्था काय?" असा त्याचा क्लाइव्हला उघड सवाल होता. कारण कराराचा मसुदा सर्वांशीं चर्चा होऊन तयार झाला आणि वाचलाही गेला. नव्या नबाबानें आपल्या नव्या राजवटींत कंपनीच्या दुय्यम नोकरांपासून तों बड्यांपावेतों क्लाइव्ह, वॉट्सन वगैरेंना कुणाकुणाला कसकसें मोकाट मनमुराद चरूं द्यावें, या साऱ्या शर्ती त्या करारांत होत्या. परंतु त्यांत अमीरचंदचें नांव मात्र नाहीं! त्याच्या मोत्यांच्या चाऱ्याची सोय त्यांत नाहीं.

क्लाइव्ह शेटजीला आपल्या पोटांत धरीत होता. पण क्लाइव्ह मोठा हिकमती इंग्रज बनिया, तर हा शेटजी आपल्या मतें इंग्रजाच्या बापाच्या बारशाला जेवलेला सवाई बनिया!

"आमची व्यवस्था त्या करारांत झाली नाहीं, तर आपण कांहीं त्या गांवचे नाहीं. मग आपल्या कानीं हात." अमीरचंद क्लाइव्हकडे आला तोच कानांवर हात ठेवून म्हणाला.

क्लाइव्हला ते हात दुष्ट कृतान्तकाळाच्या हातांसारखे भासले. कारण प्रसंग कोण आणीबाणीचा. क्लाइव्ह तर कपटकारस्थानी होताच. पण नबाबही कांहीं बोंडल्यानें दूध पिण्याइतका अजाण व बेसावध नव्हता.

जसा इंग्रज नबाबाला खेळवीत होता, तसाच नबावही इंग्रजाला खेळवीत होता. इकडे क्लाइव्हशीं 'अहो रूपम् अहो ध्वनिः' पत्रापत्री आणि निरोपानिरोपी चालली असतांना तिकडे फ्रेंचाशींही त्याचें संधान सुरू होतेंच.

खरें असो, कीं केवळ हूल असो; पण फ्रेंच सैन्य जय्यत तयारी-निशीं नबाबाच्या मदतीला येऊं घातलें आहे, अशा दाट बातम्या वातावरणांत तरंगत होत्या खऱ्या.

आणि नबाबाची आंतून फ्रेंचांना पूर्ण सामीलगिरी आहे, अशी नबाबाच्या दरबारची अस्सल बित्तंबातमी वॅट्स वारंवार कंपनीसरकारला कळवीतच होता.

बरें; नबाबाचे दिवाण, सुभेदार वगैरे सारे आंतून पोखरलेले खरे. पण त्यांना पोखरणारा मुख्य भुंगा हा धनकुबेर अमीरचंदशेटजी. त्याला साऱ्यांचीं सारीं अंडींपिल्लीं माहीत.

समजा, शेटजी उलटला, आणि ऐन वेळीं नबाबाला जाऊन मिळाला तर ? त्यानें सारें कारस्थान फोडलें तर ? नबाब मग बंगालभर इंग्रजांचा सफा नायनाट करायला कचरणारा नव्हता. खालपासून वरपावेतों नबाबाचा सारा दरबार इंग्रजांना फितूर खरा. पण तो फितूर केव्हां ? आंधारांत नबाबाच्या मानेवर इंग्रजांचा घाव पडेल, तेव्हां. पहिला घाव इंग्रजांचा पडणार तेव्हां मागाहून बाकीच्या साऱ्यांचे घाव.

तोंच ऐन वेळीं हें मांजर आडवें जायला उभें ! अमीरचंद असा ऐन वेळीं अपशकून करायला आडवा आलेला पाहून क्लाइव्हला मनांतून त्याचा मनस्वी संताप आला. पण करतो काय ! संतापाच्या आहारीं जावें तर ऐन वेळीं सर्वनाश ओढवून घ्यावा !

कांहीं क्षण—फक्त कांहीं क्षण—क्लाइव्हनें मनाशीं विचार केला. कुटिलपणाची खूणगांठ काय मारायची ती मनांतल्या मनांत मारली. आणि पिचत्या निखाऱ्यांतील राखेसारखी शांतपणानें साळसूद हंसरी

चर्या करून म्हणाला, " असें पाहा शेटजी ! आमची कांहीं तुम्हांला नाराज करण्याची मुळींच इच्छा नाहीं. आमचे शेटजी म्हणजे आमच्या पाठीचा कणा. तुम्ही सांगाल तें करायला मी तयार आहें. बोला, काय काय करूं ?"

क्लाइव्हचे ते अनपेक्षित उद्गार ऐकून बरोबरच्या सर्व इंग्रजांना मोठा अचंबा वाटला.

प्रत्येकाला वाटूं लागलें, " इतका अगदीं या शेटजीला डरल्यासारखा, त्याच्या सर्वस्वीं आहारीं गेल्यासारखा, हा आमचा बिनीचा मोहरा कर्नल वागतो, याचा अर्थ काय ?"

" असें पाहा कर्नल ! एवढें नबाबाचें धनंतर राज्य तुमच्या पदरीं पडावें म्हणून माझ्या पुण्याईची खैरात मीं केली. त्या राज्याबरोबर क्रोडों रुपयांचा ऐवजही राज्याच्या दानावर दक्षिणा मिळाल्यासारखा तुम्हांला मिळणार. असें मिष्टान्न भोजन तुम्हीं साऱ्यांनीं करावें, आणि या शेटजीनें काय आशाळभूतपणानें नुसतें तुमच्या उष्ट्या तोंडांकडे आणि ताटांकडे पाहत बसावें ? जिथें तुमचें ताट, तिथें शेटजीची वाटी देखील नाहीं ?"

असें होय नाहीं करतां करतां शेवटीं अमीरचंदशेटजीनें आपल्या सहकार्याची किमान किंमत सांगून टाकली.

" मला तीस लाख रुपये नबाबाच्या खजिन्यांतील क्रोडों रुपयांतून रोख मिळाले पाहिजेत. आणि खेरीज जो काय एकंदर ऐवज नबाबाच्या जामदारखान्यांत इंग्रजांच्या हातीं लागेल, त्यांतले पांच टक्के."

एकदम एवढा मोठा राक्षसघांस शेटजी गिळूं पाहूं लागला. तें ऐकून त्या बैठकींतील सर्व इंग्रजांची छातीच दडपली. पण क्लाइव्हला त्याचें कांहींच वाटलें नाहीं.

" बस्स एवढेंच ना ? एवढा वांटा मिळाला म्हणजे तरी शेटजी इंग्रजांवर अगदीं प्रसन्न आहेत ना ?" त्यानें शांतपणानें विचारलें.

" होय कर्नलसाहेब ! " शेटजी म्हणाले. तेव्हांच ते मनांत म्हणत होते, " साहेब आतां कसा आला नरम रिंगणावर धरला तसा ! "

" तर मग शेटजींची अट आपल्याला मान्य. ती शर्त घालून आम्ही नबाबाकडून करून घेण्याचा करार लिहवितों. कबूल ? "

" कबूल. पण त्याची एक प्रत नबाबाच्या आणि कंपनीच्या अधिकाऱ्याच्या सहीची माझ्यापाशीं हवी. "

" कबूल. प्रत मिळेल. "

मिरजाफरकडे सहीसाठीं पाठविण्याचा तो तेरा कलमी करारनामा तयार होताच. तोच पुन्हा वाचला गेला. मिरजाफरनें नबाब झाल्यावर इंग्रजांना काय काय सवलती व कुणाकुणाला काय काय देणग्या द्यायच्या, या सगळ्या गोष्टींची त्यांत खुलासेवार नोंद होती. तसेंच मिरजाफर बंगालचा नबाब झाल्यावर इंग्रज आणि नबाब यांची संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही बाबतींत दोस्ती कशी असावी याचीही खुलासेवार मांडणी त्या करारांत होती.

" बंगालमधील सारे फ्रेंच लोक आणि त्यांच्या साऱ्या वखारी यांचा ताबा भावी नबाबानें इंग्रजांना द्यावा. पूर्वीच्या नबाबानें कलकत्त्याचा नाश केल्यामुळें इंग्रजांचें झालेलें नुकसान, तसेंच कलकत्ता परत घेण्यापायीं इंग्रजांना आलेला खर्च, यांच्या भरपाईदाखल नबाबानें एक कोटी रुपये कंपनीला द्यावे. कलकत्त्यांतील इंग्रज रहिवाशांना पन्नास लाख रुपये, हिंदूंना वीस लाख रुपये, आणि आर्मेनियन लोकांना सात लाख रुपये कलकत्त्यावरील हल्ल्यांत त्यांचें नुकसान झालें असेल त्याबद्दल मिळावे. कलकत्त्यांतील मराठा खंदक आणि त्याच्या आजूबाजूचा सहाशें वारांचा टापू कंपनीच्या ताब्यांत मिळावा. आणि कलकत्त्याच्या दक्षिणेकडे हुगळी नदी व काल्पीपावेतोचें लवण सरोवर (सॉल्ट लेक) ह्या टापूंतील प्रदेशाची जमीनदारीही मिळावी. भावी नबाबाला स्वसंरक्षणासाठीं इंग्रज फौजेची जेव्हां गरज लागेल, तेव्हां त्यानें त्याचा खर्च द्यावा. त्यानें

हुगळीच्या खालीं नदीला तटबंदी उभारूं नये. ह्या सर्व अटी मिरजाफरनें त्याच्या नबाबीला कंपनीकडून मंजुरी मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आंत पुऱ्या करायच्या आहेत. हा करार जोंवर या भावी नबाबाकडून नीट पाळला जाईल, तोंवर कंपनी त्याला त्याच्या शत्रूंविरुद्ध मदत करील."

असा तो तेरा कलमी करारनामा. त्यांत शेटजींच्या तीस लाख रुपयांचें आणि लुटींतील पांचवा हिस्सा वांटपाचें चौदावें कलम नमूद करून मसुदा पक्का तयार झाला.

" आतां पुढील काम तुमचें. ह्याच्या दोन नकला करायच्या. एक पांढऱ्या कागदावर, आणि दुसरी तांबड्या कागदावर. त्या नकलांवर तुम्हीं ॲडमिरलच्या सह्या मिळवायच्या. आणि ही पांढऱ्या कागदावरची अस्सल प्रत कंपनीच्या दप्तरीं ठेवून तांबड्या कागदावरील अस्सलबरहुकूम कंपनीच्या सहीशिक्क्याची शेटजींकडे पावती करायची." क्लाइव्हनें शेटजींच्या देखत जवळ हजर असलेल्या कंपनीच्या इंग्रज चिटणिसाला डोळ्यानें हळूच खुणावीत हुकूम दिला.

आज आपले हात स्वर्गाला लागले अशा आनंदांत शेटजी आपल्या प्रासादांत गेला.

सभोंवारच्या सर्व लोकांना मोठें नवल वाटलें. जो तो आ वासून एकमेकांकडे पाहत कुजबुजूं लागला, "काय हें ! तीस लाख रुपये आणि नबाबाची क्रोडों रुपयांची कुबेरदौलत मुर्शिदाबादेंत नबाबाच्या राजधानींत लुटली जाईल त्या लुटींतला पांचवा हिसा ! कसली म्हणून ही एवढी जबर किंमत शेटजींना मिळायची ? "

तों दुसरा कोणी त्याच्या कानाशीं लागून हळूच कुजबुजावा, " ही किंमत नबाबाचा केंसानें सफा गळा कापण्याबद्दलची."

नबाबाची मान कापण्याजोगा धारदार सुरा म्हणून क्लाइव्ह अमीरचंदशेटजीचा उपयोग करूं पाहत होता. आणि शेटजी त्या होळीवर आपली पोळी भाजून घेऊं पाहत होता.

२ : निर्वाणीचा खलिता

दुसरा दिवस उजाडला नाहीं, तों ॲडमिरल वॉटसनच्या सहीची आणि कंपनीच्या रीतसर शिक्कामोर्तबाची तांबड्या कागदावरील करारनाम्याची नक्कल तयार. ती नक्कल शेटजींच्या प्रासादापावेतों चिटणिसाच्या पायांनीं वाट चालत गेली देखील.

शेटजींनीं ती वाचून पाहिली. आणि तशीच परत करून त्यासोबत चिटणिसाहातीं क्लाइव्हसाहेबांना निरोप पाठविला, " कर्नलसाहेबांना म्हणावें, आतां हा करार सेनापति मिरजाफरांच्या सहीशिक्क्यानिशीं माझ्या हातीं पडला, कीं मी सर्वस्वीं इंग्रजांचा जिगरदोस्त आहें. पुराणांत तान्ह्या वासुदेवाला घेऊन वसुदेव यमुनेपार गोकुळाकडे निघाला, तेव्हां महापुरानें दुथडीं तुडुंब भरून धो: धो: वाहणाऱ्या यमुनामाताजीनें जशी सुखरूप वाट वासुदेवाला दिली, तसे तुमचे पुढील सारे बेत आतां सुखरूप पार पडतील याविषयीं खात्री बाळगा म्हणावें."

लगेच एक जबाबदार जासूद तारीख ४ जून रोजीं करारनाम्याच्या दोन्ही नकला आणि वॅट्सला निराळी चिठी घेऊन मुर्शिदाबादला रवाना झाला.

" प्रिय वॅट्स ! आतां पुढील काम तुमचें आहे; नबाबाच्या सेनापतीच्या सह्या आणण्याचें. तें सावधगिरीनें आणि कसोशीनें या कानाची त्या कानाला दाद न लागतां ताबडतोब पार पाडावें. आणि दोन्ही कागद लगेच इकडे कचेरींत पावते करावे."

वॅट्सनें ते तांबडे-पांढरे करारनामे पाहिले. तशीच त्यांवरची ॲडमिरल वॉटसनची सही पांढऱ्या कागदावर निराळी आणि तांबड्या कागदावर निराळी पाहिली. आणि मनांतल्या मनांत खालीं मान घालून स्वत:शीं कबूल केलें, " हा कर्नल आणि हा बेमालूम बनावट सह्या तयार करणारा ल्युशिंग्टन या दोघांनाही आपला कोंपरांपासून हात जोडून नमस्कार ! "

तसा नमस्कार करण्याजोगाच तो सारा प्रकार होता. वॅट्सही त्यांतलाच, म्हणून त्याला तें सारें तावडतोब ओळखतां आलें. उंटाच्या घरीं लग्न, आणि मंगलाष्टकें म्हणणारें गाढव. अहो रूपं अहो ध्वनिः !

त्या करारनाम्याच्या तांबड्या कागदावरील नकलेवर चौदा कलमांची नोंद, आणि पांढऱ्या कागदावरील नकलेंत तेराच कलमें ! ऍडमिरल वॅटसनची स्वाक्षरी तिच्या कान्याकोंपऱ्यांसह वॅट्सच्या माहितीची. तांबड्या कागदावरची 'त्याची' सही त्याची नव्हे, हें वॅट्सला तेव्हांच ओळखतां आलें. आणि लगेच त्यानें सुतानें स्वर्ग गांठला, "ही बनावट सही करण्याचें कसब आमच्या ह्युशिंग्टनचें. कर्नलचा तो अगदीं विश्वासू उजवा हात. त्याच्याखेरीज असलें साहस दुसरा कोण करणार ?"

वॅट्सला ते कागद पाहतांक्षणीं तो सुतानें स्वर्ग गांठतां आला खरा. परंतु त्याहून जवळचा मिरजाफरचा बंगला कांहीं त्याला दिवसाउजेडीं गांठण्याचें धैर्य होईना. एवढ्या भयंकर पापाचे वांटेकरी आपण कसें व्हावें, असें त्याचें मन आंत जरा जरा खाजूं लागलें होतें हें तर खरेंच. परंतु त्याहीपेक्षां मोठें भय त्याला वाटत होतें तें हें कीं, हें कुकर्म करण्यासाठीं सेनापतीकडे जातांना आपणाला कोणी पाहील का ? ओळखील का ? कांहीं म्हणेल का ? "

कारणपरत्वें सेनापति मिरजाफरकडे जाण्याचा वॅट्सवर आलेला हा कांहीं पहिलाच प्रसंग नव्हता. तो जायचा, तोही आपण इंग्रज म्हणजे कोणी बडे माणूस आहों या अहंकाराचीं किरीटकुंडलें धारण करून राजरोस सेनापतीच्या—किंवा नबाबाकडे जावें लागलें तर नबाबाच्या हुजरे-प्यादे-पहारेकऱ्यांचे आणि दरबारी मानकऱ्यांचे मुजरे घेत जायचा. असा त्याचा इंग्रजी रुबाब आणि दबदबा !

पण आज त्याला तिकडे दिवसाउजेडीं जाण्याचें धैर्य होईना. जणूं काय अमीरचंदशेटजी त्याला गांठायला वाटेंत उभा होता. आणि तो त्याला हटकणार होता, " चोरा ! मला फसवण्यासाठीं तूं हा तांबड्या

कागदावरचा खोटा करारनामा सेनापतीच्या सहीला घेऊन चाललास काय ?"

अखेर चांगल्या तिन्ही सांजा झाल्या. काळोख पडला. दिवे लागले. तसा वॅट्स तें काळोखांतलें कर्म करायला उठला. त्यानें आपल्या आर्मेनियन खोजा हुजऱ्याला हांक मारली. आणि सांगितलें, " पेट्स ! मेणा बाहेर घे. आपणाला आतां गुपचुप सेनापति मिरजाफरच्या बंगल्यावर जायचें आहे. "

खोजा पेट्सनें मेणा आणविला. आणि पाहतो तों मडमेचा वेश घेऊन वॅट्स बंगल्याच्या बाहेर पडला ! तो मेण्यांत जाऊन बसला !

पण खोजा पेट्स सेनापति मिरजाफरच्या जनानखान्यांत हुजऱ्या म्हणून ऐसपैस वावरलेला. तेथील साऱ्या भानगडी त्याला माहीत. तसेंच त्याला आपल्या ह्या नव्या गोऱ्या धन्याचे डावपेंचही माहीत. तो कशाला कांहीं बोलतो अथवा विचारतो !

इतक्या बंदोबस्तानें वॅट्सनें जाऊन मिरजाफरला बनवून करारावर त्याचे सहीशिक्के आणले. आणि ते रातोरात बंदोबस्तानें त्याच आलेल्या जासुदाहातीं कलकत्त्याला रवाना केले.

अलीकडे बरेच दिवस नबाब सिराजउद्दौला आणि त्याचा सेनापति मिरजाफर यांची जन्मांत पूर्वी कधीं नव्हती इतकी गोडी झालेली दिसत होती. ना कसली कटकट, ना काळजी. नबाब आपल्या ऐष-आरामांत दंग ! नेणे कोण तिकडे त्याचे दिवाण राजवटीची 'काळजी' घेत होते. सेनापति राज्याचें 'सोळा आणे चोख' संरक्षण करीत होता. इंग्रजही आतांशा नबाबाशीं इतक्या गोडीनें व साळसूदपणानें वागायचे, कीं गोगलगाई देखील त्यांच्याहून कमी गरीब.

इंग्रजांचें बंगालमधील राजकीय कारस्थान आतां अगदीं कडे-लोटाच्या थराला येऊन पोहोंचलें होतें. इकडे जसा वॅट्सनें क्लाइव्हच्या पाताळयंत्रीपणाला लवून मुजरा केला, तसाच मुजरा कंपनीच्या व्यव-

स्थापक कमिटीनेंही केला. ॲडमिरल वॉटसन यानें कलकत्ता नबाबापासून हिसकावून घेतांना लुटींत वांटा माझा मोठा कीं तुझा मोठा म्हणून क्लाइव्हशीं खळखळ केली होती. त्याला तेव्हां कदाचित् असेंही वाटलें असेल, कीं मी ॲडमिरल. मी मोठा. बंगाल इंग्रजी संकल्पाप्रमाणें इंग्रजांच्या घशांत पडला, कीं आपल्या भांडवलदारांच्या इंग्रजी राष्ट्रानें आणि आपल्या राजानेंही भारतांत इंग्रजी राजवटीची भरभक्कम मेढ रोंवल्याबद्दल निरंतर 'वॉटसन की जय' म्हटलें पाहिजे. परंतु त्यानें देखील ह्या एकाहून एक अवघड, हिडीस पण तितक्याच स्वार्थाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या गुंतागुंती निर्माण होतांना जेव्हां पाहिल्या, तेव्हां त्यालाही उदार मनानें कबूल करावें लागलें, कीं "आपली अक्कल या ठिकाणीं अगदीं गुंग होते. वॅट्स आणि कर्नल, ते दोघेच नबाबाशीं हा डाव खेळूं जाणोत."

असा बंगालबाबतचा सारा भडिभार आतां कंपनीनें आपल्या वॅट्स आणि क्लाइव्ह या दोघां कर्तबगार पाताळयंत्री इंग्रजांवर सोंपविला होता.

सारें वातावरण वरून दिसायला तरी आतां किती शांत होतें.

नबाब आणि इंग्रज आतां दोस्त बनले होते.

नबाबाचा सेनापति मिरजाफर कोणत्याही परिस्थितींत नबाबाच्या धनंतर दौलतीची रखवाली करायला डोळ्यांत तेल घालून उभा होता.

जो जो कोणी दिवाण, सुभेदार, व्यापारी, शेटसावकार पाहावा, तो आपला नबाबापुढें हांऽजी हांऽजी करीत जोडल्या हातांनीं उभा असायचा.

पडद्यामागून इंग्रजांच्या आणि आपल्या व्यापारी शेटसावकाराच्या मदतीनें चोरटा व्यापार करून नफेबाजी करायला चटावलेल्या अनेक बेगमांनाही हें निवळलेलें वातावरण पाहून समाधान वाटत होतें.

नबाबाला आतां काय कमी होतें? त्याच्या खुशाल जगांत युद्धाचे ढग आतां निवळले होते. फ्रेंच सारी परिस्थिति ओळखून आतां नबाबाची कड घेऊन पुन्हा इंग्रजांविरुद्ध लढाईच्या पेटत्या खाईत उतरायला तयार नव्हते. आणि नबाबालाही आतां रोज वाटूं लागलें होतें, "काय

करायचे आहेत फ्रेंच अथवा कोणी झाले तरी अलबते-खलबते आतां ? उगीच एक ना धड भाराभर चिंध्या. इंग्रज फ्रेंचांना खाऊन आणि डच-पोर्तुगीजांना तोंडीं लावून बसला आहे. तोच खरा ह्या साऱ्या गोऱ्यांत जबरदस्त बळिवंत. परक्यांशीं दोस्ती राखावी तर अशा बळिवंतांशीं राखावी. उष्टें खावें तर तुपासाठीं खावें. तेंच आपल्या खानदानी मोठेपणाला शोभून दिसतें."

आणि इंग्रजासारखा जबरदस्त पाठीराखा दोस्त मिळाल्यावर नबाबाला इतर कुणाचें भय बाळगण्याचें तरी काय कारण ? परस्पर ह्या गोऱ्या पाहुण्यांच्या हातून साप मरत होते, मरणार होते. एकेकाला खासें झोडपून काढून आपली राजवट निर्वेध करून द्यायला ढालीसारखा इंग्रज नबाबाच्या पाठीशीं उभा होता.

मिरजाफरची त्या करारावर सही झाली मात्र; आणि सारा बेत नक्की झाला. त्या दिवसापावेतों नबाबाच्या दरबारीं हा असा घटोत्कचाचा मीनाबाजार भरला होता. आणि त्या मीनाबाजारांत ऐषआरामाची लयलूट नबाब भोगीत होता. त्याला वाटत होतें कीं दिल्लीचा बादशहा कुणीकडे, आणि हा बंगालचा नबाब सिराजउद्दौला कुणीकडे. बादशहा म्हणजे केवळ शोभेचा ताबूत. खरा बादशहा मी !

तोंच इकडे तारीख १२ जून रोजीं मिरजाफरकडून आणि त्याच मालिकेंतील इंग्रजांच्या इतर दरोबस्त साथीदारांकडून वॅट्समार्फत क्लाइव्हपाशीं खात्रीशीर गुप्त संदेश येऊन धडकला, "आमची सारी जय्यत तयारी आहे."

त्याच दिवशीं वॅट्स व इतर कोणी इंग्रज मुर्शिदाबादेंत होते ते सारे कांहींतरी तोंडदेखलें निमित्त काढून नगराबाहेर पसार झाले.

अशी सारी जय्यत तयारी झाली मात्र. आणि लगेच दुसऱ्या दिवशीं क्लाइव्हकडून नबाबाकडे अकस्मात् आकाशाची कुऱ्हाड मानेवर कोसळावी तसा निर्वाणीचा खलिता रवाना झाला !

३ : फाटलेल्या आभाळाला ठिगळें !

तो इंग्रजांचा खलिता म्हणजे अंधारांत घातलेला मरणघाव होता.

" नबाबांकडून केलेल्या कराराची नीट पाळणूक झालेली नाहीं. त्यामुळें कंपनीच्या वतीनें आपण आपलें गाऱ्हाणें तावडतोब कासीमबझार येथें जनाब मिरजाफर यांच्यापाशीं घेऊन जात आहों. आम्हांला आमच्या तक्रारी नबाबांच्या राजवटींतील मिरजाफर व अमीरचंद, रायदुल्लभ, जगतशेट वगैरे नामवंत शेटसावकार या लवादापुढें मांडून न्याय मागायचा आहे. लवादांनीं जर आमची तक्रार रास्त मानली नाहीं, तर आम्ही करारानुसार आमच्या बाकीच्या सर्व मागण्या सोडून देऊं. परंतु कराराचा भंग नबाबांकडून झाला आहे, असा जर लवादांचा निर्णय झाला, तर इंग्रजांना नबाबांमुळें सोसावी लागलेली सर्व नुकसानी नबाबांकडून भरपाई करून घ्यावी लागेल. तसेंच त्या कारणें आरमार आणि लष्कर यांच्या हालचालींबाबत झालेला खर्चही नबाबांना भरून द्यावा लागेल. "

आतां पावसाळा अगदीं डोक्यावर आला होता. म्हणून तर क्लाइव्हचा अगदीं नाइलाज होता ! त्यानें त्यासाठीं चपळाई करून तावडतोब या गाऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठीं नबाबाच्या दरबारी भेटीला जाण्याचा निर्णय घेतला होता.

तेव्हां नबाब आपल्या राजधानी मुर्शिदाबादेंत आमोदप्रमोदांत दंग होता. सभोंवार जणूं घटोत्कचाचा मीनाबाजार गजबजला होता.

कालीमातेसमोर बकरा बळी देण्यापूर्वीं पुजाऱ्यानें कालीमातेचा नमस्कारपूर्वक नामोच्चार करावा, तशा स्वरूपाचें इंग्रज आणि नबाबाचा दरबार यांच्यांतील पत्रोपत्रीं देवाणघेवाणीचें एरंडाचें गुऱ्हाळ दोन्ही बाजूंनीं सुरू होतें. धुराची झांपड निर्माण करून त्या झांपडीआड व्यूह-रचना करावी तसें. तिकडे लक्ष देण्याचें नबाबासारख्या खाशाचें काय काम ? राजाराणीच्या पोटीं जन्म घेण्याचा पराक्रम गाजवून राजा झालेल्याची गोष्ट सामान्य जनांपेक्षां निराळी असते. राजा म्हटला कीं त्याला गादीवर बसून ऐषआरामांत रंगून जाण्याखेरीज कांहीं काम त्या जमान्यांत तरी कधीं नसे. आणि राजाला दुसरें कांहीं करतांही येत नसे.

पण त्या दिवशीं त्या घटोत्कचाच्या मीनाबाजारांत हा मस्त गोरा हत्ती एकदम घुसून नासधूस करीत सुटला, तेव्हां मात्र त्याला पाहतांच नबाब भांबावून गेला. आतां काय करावें हेंच त्याला कळेना.

आणि प्रसंग तर अगदीं गळ्याशीं येऊन बेतलेला. अशा स्थितींत नबाब मग स्वस्थ बसणार कसा? आणि त्याला बसवणार तरी कसें? एरव्हीं तो खुशालचेंडू असेल. सरधोपट वाटेनें जातांनाही ठेंचाळणारा असेल. प्रसंगीं ठेंच लागल्यावरही शहाणा होण्याइतका धूर्त नसेल. आणि इर्षेनें रणांगणावर घालून घेऊन निकरानें लढणारा सिंहाचा छावाही नसेल. तरी पण संकटाची चाहूल लागतांक्षणीं तो अगदींच हातपाय गाळून ढुंगणाला पाय लावून सूं बाल्या करणारा शेंदाडशिपाई नव्हता.

"काय; क्लाइव्ह असा पाठींत सुरा खुपसल्यासारखा माझ्यावर चालून येणार? या नबाबावर? धन्याचें नांव गण्या व चाकराचें नांव रुद्राजीबुवा ठेवण्याइतका बहकला काय हा कर्नल? माझ्या विरुद्ध तक्रारींची दाद माझ्या चाकरांपाशीं—माझ्या आसऱ्यावर वैभवांत जगणाऱ्या माझ्या रयतांपाशीं मागणार?"

ताबडतोब इंग्रज चालून आलाच तर त्याच्याशीं मुकाबला करून त्याला अडविण्यासाठीं नबाबानें ताबडतोब कांहीं लष्कर प्लासीला मोक्याच्या जागीं नाकें धरून बसण्यासाठीं पिटाळलें. आणि लगेच त्याच क्षणीं मुनशीला बोलावून त्यानें आपल्या सेनापतीला सक्त हुकूम पाठवायला सांगितलें: "यापुढें इंग्रजांशीं सबुरीची भाषा नाहीं. युद्ध. मी जातीनें चालून येतोंच आहें, असें सेनापतीला कळव. म्हणावें, कासिमबझारच्या रोखानें कर्नल क्लाइव्ह फौजफांटा घेऊन येतो आहे. तो आणि त्याच्याबरोबर आणखी जे कोणी इंग्रज येतील त्या सर्वांना ताबडतोब पकडून कैदेंत डांबून ठेवा. यापुढें शत्रूची कोणत्याही प्रकारें क्षणभरही गय होतां कामा नये."

अशीं तावडतोब जिकडे तिकडे तांतडीचीं फर्मानें कुमकेसाठीं पाठवून नबाबानें आपल्या खाशा सैन्याला हुश्शार राहण्याला फर्मावलें. आणि कासीमबझारच्या रोखानें आपल्या खास विश्वासांतील सेनापति मिरमदन याला कूच करण्याचा हुकूम करून पाठोपाठ प्लासीला पाठविलें. आणि स्वत: थोडें निवडक सैन्य घेऊन लढायला निघाला.

परंतु तो पुढें जातो, तों मागाहून खासें सैन्य पाठपुरावा करायला कुठें आहे? कांहीं जें आलें, तें आपल्या फितूर बाजारबुणग्यांसारखें कुठें गेलें न कळे. कांहीं जागेवरून हललेंच नाहीं! कारण त्या सुभेदारानें जागच्या जागींच खिळून बसण्यासाठीं पैसे खाल्ले असतील! आणि कांहीं लष्करी तुकड्या तर पूर्वसंकेतानुसार प्लासीच्या रणांगणाकडे इंग्रजी फौजांच्या पाठीमागेंही जाऊन खुशालीनें उभ्या राहिल्या असतील. त्याला त्याची काय कल्पना?

आपल्या पाठीमागें आपल्या फळीला तिची बांधणी होतां होतां कशीं भगदाडें पडलीं आहेत, आणि पडत आहेत, इकडे वळून पाहायला नबाबाला उसंत तरी कुठें होती? कासीमबझारच्या अर्ध्या वाटेवर त्याच्याकडे मिरमदन घोडा फेकीत रणांगणाची भलतीच वार्ता घेऊन आला.

"आपल्या प्लासीच्या सैन्यांत फितूर झाल्याचीं लक्षणें दिसतात खाविंद!" मिरमदन सांगूं लागला.

"कशावरून?"

"इंग्रज सैन्य चालून येत आहे हें माहीत असून देखील त्याच्याशीं मुकाबला करण्याची कांहींच हालचाल प्लासीला आपल्या लष्कराच्या गोटांत दिसत नाहीं."

"पण माझा हुकूम? तूं माझा हुकूम जमादाराला नाहीं सांगितलास?"

"जमादार हुकूम मानायला अळंटळं करतो आहे. उलट मला तर अशी शंका येते, कीं हा फितूर इंग्रजांची बाजू घेऊन आपणावरच ऐन वेळीं तुटून पडणार कीं काय?"

नबाबानें तें ऐकून कमरेला हात लावला. आणि विचारलें, "आणि इंग्रजांचें लष्कर तिथवर येऊन धडकलें देखील?"

"होय खाविंद!"

"आम्हांला त्या गळेकापू कर्नलच्या पत्राचा विचार करण्यापुरती-देखील उसंत न देतां?"

बिचारा मिरमदन त्यावर काय बोलणार? माथ्यावर आकाश कोसळून पडतांना त्याला उघड दिसत होतें.

"आणि आमचा सेनापति मिरजाफर काय करतो आहे तिकडे? एवढी मोठी फौज हाताशीं असूनही शत्रूचा खुर्दा उडवितां आला नाहीं त्याला? कीं इंग्रज आपले दोस्त, त्यांच्यावर एकदम हात कसा टाकावा या फिकिरींत पडला आहे?"

मिरजाफरविषयीं वाइटांतल्या वाईट बातम्या मिरमदननें त्या दोन दिवसांच्या अवधींत अनेक ऐकल्या होत्या. पण बोलूनचालून त्या बातम्या. त्या खऱ्या धरून कसें चालावें? तो मनांत भीत होता. कदाचित् असेंही असेल; कीं कर्नल क्लाइव्ह फार धोकेबाज माणूस आहे. त्यानें नबाबांच्या बाजूला घबराट उडविण्यासाठीं मुद्दाम बनावट आगलाव्या बातम्यांच्या वावड्या हवेंत सोडून दिल्या असतील. त्या आपण नबाबांपाशीं बोलाव्या, आणि त्या खोट्या ठरल्यावर दोघांनीं मिळून बोलणाराला गुन्हेगार ठरवून तोफेच्या तोंडीं द्यावें. म्हणून तो नबाबाच्या शब्दावर कांहींच बोलेना.

"तावडतोब माझा हुकूम जाऊं दे सेनापतीकडे. म्हणावें, माझ्या हुकुमाची तामिली कां नाहीं? इंग्रजाला घरांत येऊं द्यायचें आहे का तुला म्हणावें? तावडतोब चढाई झाली पाहिजे शत्रूवर. इथें प्लासीवर आपलें इतकें मस्त लष्कर तोफखान्यासह जय्यत खडें आहे तें काय माशा मारायला?"

अशीं फाटलेल्या आकाशाला ठिगळें लावीत नबाब झपाट्यानें प्लासीकडे चालला.

४ : प्लासीची लढाई

....पण फाटलेल्या आकाशाला ठिगळें थोडींच लावतां येतात !

नबाब प्लासीला जाऊन पोहोंचतो, तों क्लाइव्हच्या आधिपत्याखालीं इंग्रज सोजिरांची फौज नदीच्या तीरावर अगदीं उंच व सुरक्षित जागा पाहून पवित्रा ठोकून उभी होती. फौज अगदीं थोडीच होती. दोनशें सोजीर, आणि पांचशें हिंदी शिपाई. पण क्लाइव्हला आणखी फौज तिथें हवीच होती कशाला ? फौजेच्या जोरावर त्याला लढाई थोडीच जिंकायची होती ! त्याला फक्त नबाबाचा निकाल लावायचा होता.

नबाबाची सुसज्ज फौज जी मोक्याची जागा धरून बसली होती, ती त्याचीच होती.

नबाबाचा सेनापति मिरजाफर, जो नबाबाची बहुतेक फौज आणि युद्धसामग्री घेऊन लढायला म्हणून आला होता, तो दूर स्वस्थ बसला होता. तो इंग्रजांचाच फितूर. तो इंग्रजांविरुद्ध थोडाच लढणार होता ! नबाबाचा पहिला हुकूम त्याला मिळाला, दुसराही हुकूम मिळाला. ते त्यानें एका कानानें ऐकले आणि दुसऱ्या कानानें सोडून दिले.

एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तरी लढाईला तोंड कांहीं केल्या लागेना. फौजेंतील लोकही गुपचुप टोळ्याटोळ्यांनीं काढता पाय घेऊन पसार होत होते. बरें; समजुतीची भाषा काढावी तर त्याला आतां जागाच नव्हती.

सभोंवारचा अंदाज घेऊन येण्यासाठीं हेर सुटत होते. त्यांतला जो फितूर नसेल अथवा फितूर झाला नसेल, असा विरळा. तेवढाच चुकून-माकून माघारा यायचा. पण त्यानें बातम्या सांगायाच्या त्या नबाबाला कानांनीं ऐकवणार नाहींत असल्या.

इतकें सारें झालें, तरी देखील नबाबाचा त्या बातम्यांवर विश्वास बसेना. त्याला वाटे, आपला राजनिष्ठ सेनापति आपणाला पकडून शत्रूच्या हवालीं करायला टपला असेल ?

" काय पुरावा याला ? कशावरून तूं सांगतोस हें ? " एका विश्वासू हेरानें बातमी आणली तेव्हां नबाबानें त्याच्यावर खवळून विचारलें.

तो बिचारा गरीब निमकहलाल हेर ! तो तिथें मग संतापलेल्या नबाबाची खात्री कशी पटवणार ?

आणि नबाब तर आतां स्वतःच्या खास विश्वासांतील खाशी फौजही फंदफितुरीनें बुजबुजलेली पाहत होता.

" त्या फितुरांचाच साथीदार असेल हा बदनेक निमकहराम." असें म्हणत भडकलेल्या माथ्याच्या नबाबानें तरवारीच्या एका घावासरसें त्या ' बदनेक ' हेराचें मुंडकें धडावेगळें केलें. मग इतर हेर तरी खरी बातमी आणतात कशाला ? आणि त्या कामगिरीवर गेलेले असल्या धोक्यांत परत येतात कशाला ?

मिरमदनला हें असें उघड्या डोळ्यांनीं स्वतःचें मरण पाहवेना. त्यानें नबाबाला निक्षून सांगितलें, " तें कांहीं नाहीं खाविंद ! आतां वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. अजून शत्रूचें बळ फार कमी आहे, तोंवरच आपण त्याला चेंचून काढलें पाहिजे. निदान माझ्या हाताखालील फौज तरी माझ्या खात्रीची आहे. तेवढी देखील आज शत्रूला धूळ चारायला पुरेशी आहे. "

तो तें नुसतें सांगूनच नबाबाच्या होकाराची वाट पाहत थांबला नाहीं. त्यानें एकदम खाळून इंग्रजांवर तोफा डागायला धडाक्यानें सुरुवात केली. त्या गोलंदाजीला इंग्रजांकडील गोलंदाजीनें जशास तसें उत्तर मिळूं लागलें.

तेव्हां कुठें मिरमदनचे डोळे उघडले, कीं आपली फौज देखील कांहीं आकाशांतून खालीं उतरलेल्या देवदूतांची नाहीं. त्याचे गोलंदाज एरव्हीं अगदीं खात्रीचे. आंधारांत देखील अचूक अंदाज घेऊन नेमके गोळे सोडायचे. तेच आजही गोळे सोडीत होते. परंतु ते अचूक चुकत होते. याचें नांव लांचखाऊ ओशाळेपणा !

तरी देखील मिरमदनच्या दराऱ्याला भिऊन एखाददुसरा गोळा सुटून चुकूनमाकून इंग्रजांवर जाऊन पडायचाच. आणि तेवढ्यापुरता एखाद-दुसरा सोजीर मरायचा. कांहीं जखमी व्हायचे.

तशीच लढत देत मिरमदन हिंमतीनें इंग्रजी फौजेवर चालून निघाला. तों फुटक्या भांड्यांतील गळत्या पाण्याप्रमाणें त्याच्या शिपायांना गळती लागली. मागें नबाब हत्तीवर बसून लढायला चालला होता. पण तेवढ्यांत इंग्रजांकडील तोफेचा एक गोळा नेमका मिरमदनच्या छाताडावर येऊन कोसळला. त्यासरसा तो नबाबाचा एकुलता एक विश्वासू पाठीराखा ठार !

ती संध्याकाळची वेळ होती. सूर्य मावळायला चालला होता. त्या सूर्यालाही मागें टाकून नबाबाचा भाग्यसूर्य मावळतीकडे धावत होता.

आतां मात्र नबाबाचा धीर खचला. आतां तो लढणार तरी कुणाच्या जिवावर ? तसाच जो आपल्या पळत्या फौजेच्या गर्दीतून हत्तीला पिटाळीत चालला. तो पाहतां पाहतां इंग्रजांच्या कावळेनजरेच्या टापूपार पसार ! करतो काय ! जीव सगळ्यांनाच प्यारा.

लढाईत इंग्रजांचे फार तर पांचपंचवीस गोरे काळे शिपाई ठार झाले असतील. नबाबाच्या बाजूलाही दीडदोनशें शिपायांचे मुडदे पडले असतील. आणि प्लासीची लढाई संपली. जय इंग्रजांचा झाला.

आतां पुढें काय ?

५ : नबाब फकीर झाला !

नबाब बहुतेक आटोपलाच होता. असून नसल्यासारखा झाला होता. मुर्शिदाबादेंत येईपावेतों त्याचा फुगा फुटला होता. त्यांतील सारी हवा बाहेर निघून गेली होती.

प्लासीच्या रणमैदानावर त्या लुटुपुटूच्या लढाईत नबाबाचा नबाबी दबदबा चक्काचूर झाला होता. तो मुर्शिदाबादेला जाऊन पोहोंचला, तो

नबाब नव्हता. त्याला आतां कोणीही नबाब म्हणून मानायला तयार नव्हतें. त्याचे दिवाण, सुभेदार, नात्यागोत्याचीं जवळकीचीं माणसें देखील. खुद्द त्याचा सासरा देखील. महंमद एरुकखान ही एरव्हीं नाणावलेली, भली व तालेवार बडी आसामी. त्याच्या शब्दाला सगळीकडे बऱ्यापैकीं मान होता. त्याला लोक बऱ्यापैकीं मानीत. दरबारी बडे लोकही मानीत. आणि इंग्रजही मानीत. परंतु वणव्यांत करपून सारीं पानेंफुलें जळून भुंडा झालेल्या वृक्षावर पक्षी थारा घेत नसतात, तशी गत त्या भल्या माणसानें केली.

सासरा त्या संकटकालीं जांवयाला धीराचा हात देण्याचें सोडून आपल्या सुरक्षित मकाणाकडे चालला.

" या वेळीं जाऊं नका. मला मदत करा. आपण फौजफांटा गोळा करूं आणि अडचणीला नेटानें तोंड देऊं." नबाब त्याची मनधरणी करूं लागला.

परंतु खानानें तें बिलकुल ऐकलें नाहीं. तो तडक आपल्या वाड्याकडे चालता झाला.

" जाणार तर जा! कोणीही माझ्या सोबतीला उभा राहिला नाहीं तरी माझा क्रोडों रुपयांचा खजिना तर माझ्या पाठीशीं आहे? मी पाण्यासारखा पैसा ओतीन, फौजफांटा गोळा करीन, आणि इंग्रजांशीं टक्कर देईन." असें कांहींशा वैतागानें, कांहींशा संतापानें, आणि पैशाच्या जोरावर आपण काय वाटेल तें करूं अशा कांहींशा आत्मविश्वासानें नबाबानें आपल्या खजिन्याचा दरवाजा मोकळा केला. त्याला वाटत होतें, पैसा काय करीत नाहीं?

" चला. हा पैसा घ्या. पगार आगाऊ घ्या. घोड्यांचे पैसे घ्या. आणखी हवे तेवढे पैसे घ्या. आणि चला भराभर फौजेंत भरती व्हा पाहूं!" असा नबाबाचा सोन्यारुप्यानें मढविलेला जाहीरनामा फडकूं लागला.

लोक भराभर पुढें येऊं लागले. पैसे घेऊं लागले. घोड्याचेही पैसे घेऊं लागले. पण पैसे घेऊन जे जायचे, ते तिकडेच ! ते पुन्हा फौजेंत भरती व्हायला येतील तर अल्लाची कसम.

कारण लोकही आतां चांगलें ओळखून चुकले होते कीं, आतां नबाब संपला. निदान हा तरी. आतां याच्या जागीं दुसरा कोणी तरी नबाब सारेजण बोलतात तसा आयत्या पिठावर रेघोठ्या ओढीत ऐषआरामांत नबाबी गाजवायला येईल. तो आणि त्याच्या राजवटीचे लोक म्हणजे घोड्यांवरच्या ताज्या गोमाशा. आधाशीपणानें रक्त शोषूं लागायच्या. नवे कर वाढायचे. जुलूमजबरदस्ती वाढायची. त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडतां पडतां बंगालच्या रयतेला नको जन्मसा व्हायचा. एवढा पैसा सरकारच्या तुंबड्या भरायला आणायचा कोठून ? आयता नबाब खजिन्याची खैरात करूं लागला आहे; ती चोराची लंगोटी काय हातीं लागेल ती घ्या. पुढच्या कठीण काळाची कांहीं तरतूद करा. आणि घरीं जाऊन स्वस्थ बसा कसे !

बेसुमार पैसा नबाबानें असा सढळ हातानें वांटला. आणि मनांत मनोरथांचे मनोरे रचीत बसला होता, "मी नवी फौज उभी करीन. ती घेऊन पुन्हा इंग्रजांवर हल्ला चढवीन. त्यांना झोडपून होते कीं नव्हतेसे करून सोडीन."

अशी फौजेच्या जुळवाजुळवीची वाट पाहत नबाबानें लागोपाठ दोन दिवस वाट पाहिली. पण पैशापरी पैसा गेला, आणि फौज तर मुळींच उभी राहीना ! तेवढ्यांत त्या दिवशीं प्रहरभर रात्रीला भयंकर बातमी येऊन धडकली, कीं सेनापति मिरजाफर क्लाइव्हसह गोऱ्या सोजिरांची फौज घेऊन मुर्शिदाबादेवर चालून येतो आहे.

"कंबख्त ! कुत्तेकी अवलाद !" नबाबानें सेनापतीला आणि पैसे घेऊन पसार होणाऱ्या साऱ्या लोकांना संतापाच्या भरांत शिव्या दिल्या. पण त्या शिव्या म्हणजे कांहीं तोफांचे गोळे नव्हते. पराजयानें

आणि कोंडमाऱ्यानें चिमणीएवढें तोंड झालेल्या नबाबाच्या तोंडची ती फुकट वाफ निघायची, एवढीच त्याची फलश्रुति. तरीपण मनांतून मात्र नबाब नवल करीत होता कीं, माझ्या अन्नावर पोसलेले हे सारे लोक माझ्याशीं बेइमान होतात याचा अर्थ काय ?

मिरजाफर क्लाइव्हला पुरता फितूर झाला आहे हें नबाब आतां पुरतेपणीं ओळखून चुकला होता. तरी देखील द्विधा मनानें तो ती बातमी ऐकतांक्षणीं गुपचुप वेषांतर करून फकीर बनून तसाच राजधानीबाहेर पडण्याच्या तयारीला लागला. बरोबर फक्त तसेच फकिरी वेशांतील दोन हुजरे होते. दरारा दाखवून सेनापतीला फितुरीचा जाब विचारण्याची पोकळ उमेद आतां त्याच्या ठायीं मुळींच बाकी उरली नव्हती. आपण सर्वतोपरी अगतिक आहों, हें तो आतां चांगलें जाणत होता. तरी देखील अंगीं होतें नव्हतें तेवढें चातुर्य आणि धीर सावरीत तो चालला होता.

" जनाब ! हा अविचार बरा नाहीं. सेनापति मिरजाफर हा पक्का दगलबाज आहे. आपलें सारें घर फिरलें आहे; आणि त्याबरोबर घराचे वांसेही फिरले आहेत. आपण मेहेरबानी करून आमचें ऐका. इंग्रजाला आपण शरण जाऊं, म्हणजे आपला कांहींतरी पल्ला लागला तर लागेल. "

पण नबाबानें तें मानलें नाहीं. आतां विश्वास असा त्याचा कोणावरही नव्हता. एक संशयी मन त्याला सांगायचें, " हे फुकटची सल्ला देणारे लोक देखील इंग्रजाचे फितुर नसतील कशावरून ? "

आणि लगेच खानदानी नबाबी मोठेपणानें भारलेलें दुसरें मन सांगायचें, " नबाब, आणि त्या दगलबाज टोपीवाल्यांना शरण ? ज्यांना मीं दातीं तृण धरून शरण आणलें त्यांना मी शरण जाऊं ? "

त्यानें तो सल्ला ऐकला नाहीं. तो रातोरात राजवाड्याबाहेर पडून भगवान गोलाच्या वाटेला लागला.

" आपण जर झालें गेलें सारें विसरून सेनापतीशीं सलोख्याची भाषा काढली, तर तो तरी ऐकेल का ? इतका तरी तो नबाबाच्या खाल्ल्या अन्नाला जागेल का ? काय मागेल तें मी त्याला देईन. पण वश करून घेईन. आणि इंग्रजाला आम्ही खासा हात दाखवूं. " असे शेखमहंमदी बेत आंखीत फकीर चालला !

६ : नबाब पळाला !

ती बातमी खरीच होती. मिरजाफर आणि क्लाइव्ह खरोखरच बंगालच्या नबाबगिरीची राख सावडायला मुर्शिदाबादेच्या मार्गावर होते.

प्लासीची लढाई काय, चटावरच्या श्राद्धासारखी चटपट झुंपली आणि संपलीही. पण त्या लढाईंत मिळालेलें नबाबीचें घबाड कसें कोणत्या बाजूनें घशांत टाकावें, त्या शिकारींत आपला पूर्वी मिरजाफरशीं करारमदार होऊन ठरलेला सिंहाचा वांटा निर्वेधपणें आपल्या मुखीं कसा पडेल, याची क्लाइव्हला चिंता ! क्रोडों रुपयांच्या मोलाचा नबाबाचा खजिना सांपडला समजा, आणि आपण आतां नबाब झालों या घमेंडींत मिरजाफर तिकडे जाऊन हजम करूं लागला तर ? कारण नबाब सिराजउद्दौला आतां निकालांत निघाल्यांत जमा होता. नबाबाची दांडगी फौज मिरजाफरच्या हुकमींत होती. त्या फौजेच्या जोरावर जर त्यानें मुर्शिदाबाद गांठलें, आणि सारें बळ बळकावून बसला तर ?

तो फितूर, तसेंच नबाबाचे सारे दिवाण व सुभेदार फितूर. सारे एका माळेचे मणी. ज्यांनीं प्रत्यक्ष आपल्या नबाबाला हां हां म्हणतां इतक्या शिताफीनें दगा दिला, ते आपणाला देखील दगा देणार नाहींत कशावरून ? तो सारा दगलबाज फितुरांचा कंपू जर आपल्या नजरेआड नबाबाच्या खजिन्यावर गिधाडांसारखा परस्पर तुटून पडण्यासाठीं एकजूट झाला, तर आपणाला आणि आपल्या साथीदार इंग्रजांच्या तोंडाला पानें पुसलीं जातील. पण अशी एकजूट झाली तर !

बंगालची नबाबी पायापासून समूळ ढांसळली होती, खऱ्या अर्थानें कंपनी आतां बंगालचा नबाबच नव्हे तर नबाबांचाही नवाब झाल्यांत जमा होती, सारें खरें. पण ती नबाबी पडली कंपनीच्या यशांत. त्यांत क्लाइव्हचा यशाचा मोठा वांटा होता हें तर खरेंच. पण प्रत्यक्ष नबाबाच्या घबाडांतील लाखों रुपये मोलाचा वांटा जो करारानुसार क्लाइव्हला लाटतां येणार होता, तो हपापाचा माल गपापा झाल्यावर नुसती आदळआपट आणि कुरकुर करण्यांत काय अर्थ होता ? त्यापेक्षां हजीर तो वजीर.

सारेच चोर ! आणि सारेच चोरांचे भागीदार ! म्हणून क्लाइव्ह त्या दिवशीं बहिरीससाण्यासारखा प्लासीहून नबाबाच्या पाठोपाठ निघाला. नबाबाचा पाठलाग करण्यासाठीं नव्हे, आपला मतलब साधण्यासाठीं. मिरजाफरला गांठून कराराची अंमलबजावणी करून घेण्यासाठीं त्या रोखानें तो रातोरात चालला. तो सकाळीं प्रहरभर दिवसाला दादपुरला येऊन पोहोंचला. कारण पूर्वीं त्यांचा आपसांत गुप्त संकेत ठरला होता, कीं मिरजाफरनें वाटेंत त्याला दादपुरला येऊन भेटायचें. त्या धोरणानें क्लाइव्हनें प्लासीहून निघते वेळींच वॅट्स आणि स्क्रॅफ्टन या आपल्या शिकारी कुत्र्यांना मिरजाफरच्या मागावर सोडलें होतें.

दादपुरला कर्नल आला आहे असें कळतांच त्या शिकारी कुत्र्यांच्या पहाऱ्यांत मिरजाफर बरोबर मुलगा मिरान आणि सरदार उमरबेग यांना घेऊन क्लाइव्हला भेटायला आला.

स्वतःची त्याची बदकरणी त्याला भेडसावीत होती, म्हणून कीं काय, मिरजाफराला एकदम जाऊन क्लाइव्हची भेट घेण्याचें धैर्य होईना. शिपायांनीं त्याची मनस्थिति ओळखली. आणि त्याला साहेबाची भेट घेतांना संकोच वाटूं नये, यासाठीं हळूच नम्रतापूर्वक तेथून काढता पाय घेतला.

मिरजाफरला क्लाइव्हच्या भेटीला जातांना मनांतून धास्ती वाटत होती. कुणींही चांगलेपणा देण्यासारखें त्यानें तरी काय केलें होतें? तो फौज घेऊन प्लासीच्या रणांगणावरून मुद्दाम दूर राहिला होता. आपल्या पोशिंद्या नबाबाला तर त्यानें दगा दिला होताच. पण इंग्रजांच्या बाजूनें तरी त्यानें काय केलें होतें? नबाबाचा मोड करणेंही अशा परिस्थितींत अवघड मुळींच नव्हतें हें तर खरेंच. पण त्यासाठीं देखील या फितुरानें पाऊल उचललें नव्हतें. क्लाइव्हलाच ती 'लढाई' लढावी लागली होती.

"कर्नलनें तरी कां म्हणून मला किंमत द्यावी?" स्वतः तोही मनांत स्वतःच्या भल्याबुऱ्या वागणुकीचें मूल्यमापन करीत होता. "माझ्यासाठीं आतां कर्नलचें काय नडतें आहे? नबाबाला त्यानें सफा पालथा घातलाच आहे. आतां कां म्हणून तो आपल्याला बंगालचा नबाब करील? नबाबाची सारी धनदौलत, तीनही सुभे, आतां पायांखालीं पायघड्या पसराव्या तसे इंग्रजांच्या पायदळीं पडले आहेत...."

क्लाइव्हसमोर जातांना मिरजाफरच्या छातींत धसकूं लागलें. तोंच क्लाइव्हनें पुढें येऊन त्याला हंसतमुखानें आलिंगन दिलें, आणि त्याचें अभिनंदन केलें. "बंगाल, बिहार व ओरिसा या तीन प्रांतांच्या सुभेदारांना माझें अभिवादन असो."

तेव्हां कुठें मिरजाफरला हायसें वाटलें. त्यानें समाधानाचें पळतें पीक अचानक पदरीं पडलें तें घेत 'सुटलों एकदांचा' अशा अर्थाचा उसासा सोडला.

"सुभेदारांनीं खात्री बाळगावी कीं सुभेदाराशीं केलेला तह इंग्रज अतिशय प्रामाणिकपणें–अगदीं अक्षरशः पाळतील" असें आमिष दाखवीत क्लाइव्ह म्हणाला, "आपण आतां मुळींच वेळ वाया न दवडतां सिराजउद्दौल्याचा पाठलाग केला पाहिजे. आपण पुढें होतां, तों आपल्या पाठोपाठ मी फौज घेऊन येतोंच आहें."

" कर्नलसाहेबांचा मी फार आभारी आहें. " मिरजाफर सिराजच्या शिकारीला निघतां निघतां म्हणाला, " मीं कर्नलसाहेबांना असें आश्वासन देतों, कीं आपणांत झालेल्या करारांतील सर्व शर्ती अगदीं वक्तशीर आणि प्रामाणिकपणें पाळण्याचा माझा निर्धार आहे. "

अशा परस्परांच्या प्रशंसेच्या वातावरणांत तो बहिरीससाणा नबाबाची शिकार करायला बाहेर सुटला.

७ : नवा नबाब मिरजाफर

तो फितूर मुर्शिदाबादेला येऊन पोहोंचण्याचा अवकाश. तों समोर प्रश्न उभा.

" कर्नलसाहेबांनीं अभिवादनपूर्वक नबाबसाहेबांना विचारलें आहे, कीं इंग्रजांनीं मुर्शिदाबादेंत नबाबांचें अभिनंदन करण्यासाठीं केव्हां प्रवेश करावा." नबाब मिरजाफर मुर्शिदाबादेला येऊन पोहोंचला. आतां सारें स्थिरस्थावर झालें अशी हेराकडून खबर मिळतांच वेळ न दवडतां वॅट्स आणि वॉल्श हे दोघे क्लाइव्हच्या सूचनेप्रमाणें नबाबाच्या राजवाड्यांत येऊन नबाबाला भेटले. त्यांनीं कुशल समाचार घेतां घेतां हळूच पाजवा उंदीर चिंवचिंवतो तसा प्रश्न काढला.

त्यांना माहीत होतेंच कीं मिरजाफरनें चार दिवसांत मुर्शिदाबादेंत आणि नबाबाच्या राजवाड्यांत चांगलें बस्तान बसविलें आहे. त्या पाहुण्याच्या हातून आपण परस्पर साप मारला आहे. आतां कराराची अंमलबजावणी करून मागण्यासाठीं राजवाड्यांत जायला हरकत नाहीं.

नबाब मिरजाफर जूनच्या २५ तारखेला राजधानींत आला. तेव्हांपासून कुठें गोड, तर कुठें खारटतुरट, तर कुटें कडू बोलून वागून आपला जम त्यानें चार दिवसांत नीट बसविला होता. तेंच तर त्याला स्वतःला आणि क्लाइव्हलाही मोठें भय होतें.—कीं आपल्या नबाबाचा केंसानें गळा कापणाऱ्या ह्या फितुराला मुर्शिदाबादेंत थारा तरी मिळेल कीं नाहीं ? कीं नबाबाची रयत त्याच्याविरुद्ध खवळून

बंडबंडाळी माजवते? तशी वेळ आलीच, तर आपण चापूनचोपून घड-विलेल्या नबाबाची बाजू राखण्यासाठीं राजधानीवर चढाई करून बंड भरडून काढावें, अशा तयारीनें क्लाइव्ह फौज घेऊन जवळच सहा मैलांवर तळ ठोकून बसला होता.

परंतु क्लाइव्हाला शंका होती तसा कांहींही अनुचित प्रकार घडला नाहीं. राजधानींत नबाबाचे जे बडे अधिकारी व दरबारी मानकरी होते, ते तर ज्या गांवच्या बोरी त्याच गांवच्या बाभळी. मिरजाफरला त्यांचें मतलबसाधूपणानें कां होईना, पण सर्वतोपरी साह्यच मिळालें. कारण त्यांना माहीत होतें, कीं आपण हत्ती होऊन लांकडें मोडीत बसण्यांत अर्थ नाहीं. आपली धनदौलत, आपला मानमरातब, आपला ऐषआराम, चरायला मोकाट मोकळें रान, आणि आपण काय करतों असा खडसून जाब विचारायला कोणी नाहीं.—असें सर्व बाजूंना मन-सोक्त चरायला मोकळें कुरण सांपडल्यावर त्यांचें तरी काय जातें ?

बरें, हा मतलब नव्या नबाबाशीं बिनबोभाट फितूर होऊन जितका चांगल्या प्रकारें साधणार होता, तितकाच नव्या नबाबाविरुद्ध दुरदुर करण्यांत धोका होता. असल्या आडमार्गाला ते कां म्हणून जातील?

बरें; सामान्य रयत घेतली, तरी त्यांना तरी नबाब कोण आला आणि कोण गेला, याच्याशीं काय करायचें होतें ? कांहीं झालें तरी रानांत वाढणाऱ्या झाडाझुडपांसारख्या त्यांच्या क्रमप्राप्त जीवनांत बदल थोडाच होणार होता ? लोकांचें तिकडे मुळींच लक्ष नव्हतें. नबाब आणि इंग्रज यांच्यांत अलीकडे कटकटी घांसत आहेत याची त्यांतल्या त्यांत कांहीं थोड्या, साधारण पण सुजाण नागरिकांना कल्पना असेल-ही. त्याचा त्यांना उपयोग कोणता? तर जो कोणी येईल त्याला नमो नमो करून वागावें. कीं बस्स.

नबाब सिराजउद्दौला राजधानींतून फकिराचा वेष घेऊन पळाला, ही बातमी साऱ्या शहरांतून हळूहळू पसरत होती. पण त्याबद्दलही

कुणाला कांहीं विशेष विधिनिषेध वाटत नव्हता. लोकांच्या दृष्टीनें नबाब जिवंत असला काय अथवा मेला काय, सारखाच होता.

ही सगळी वस्तुस्थिति लक्षपूर्वक चार दिवस न्याहाळून, नबाबाच्या राजधानींत सगळें कांहीं ठीक आहे अशी खातरजमा झाल्यावरच इंग्रज आतां राजधानींत घुसण्याच्या मार्गाला लागला होता.

तो मुहूर्ताचा दिवस तारीख २९ जून हाच ठरला. कारण नव्या नबाबालाही वाटत होतें, कीं शुभस्य शीघ्रम्. एकदांचा इंग्रजांकडील दादा कर्नल क्लाइव्ह याच्या मुखानें ‘ बंगाल-बिहार-ओरिसाचा नबाब मिरजाफर अल्लीखान ’ असें आपलें नांव जाहीर झालें, कीं आपणाला नंतर कसलाही धोका नाहीं.

कर्नल क्लाइव्ह बरोबर दोनशें गोरे सोजीर आणि पांचशें हिंदी शिपाई घेऊन डौलानें मुर्शिदाबादेंत प्रविष्ट झाला. तेव्हां ती मिरवणूक पाहायला शहरांतील रस्त्यांनीं दुतर्फा नागरिकांच्या रांगा त्या नवलाईचें कौतुक करीत उभ्या होत्या. असल्या नबाबाच्या मिरवणुका नागरिकांनीं अनेक पाहिल्या होत्या. परंतु आजचा मनू सगळ्या लोकांच्या अपेक्षेबाहेर पालटला होता. नबाब सिराजउद्दौला याचा पत्ता नव्हता. परंतु तो कुठें गेला असेल याची फारशी चिंताही कुणाला नव्हती. नबाबाचें जग निराळें आणि रयतेचें जग निराळें. रयतेच्या सुखदुःखांचा नबाब तरी कधीं कळकळीनें विचार करीत असत, ती रयतेला नबाबांच्या सुखदुःखांची ओळख असेल ?

लोक बोलूं लागले, “ नबाब सिराजउद्दौला पळाला. त्याच्या जागीं सेनापति मिरकासीम नबाब झाला आहे.”

लोकांना तेवढीच एक नवी गंमत !

त्याहूनही मोठी गंमत क्लाइव्हच्या डामडौली नगरप्रवेशाची. आतां-पावेतों इतकी वर मान करून नबाबाच्या राजधानींत प्रवेश करण्याची कोणाही इंग्रजाची छाती झाली नव्हती. उलट इंग्रज कांहीं ना कांहीं

मागणी घेऊन जेव्हां केव्हां नबाबकडे यायचे, तेव्हां ते नमत्या नुरानें यायचे. त्यांचाच आज हा एवढा डामडौल. नबाबाचा प्लासीच्या रणांगणावर पराजय करून नबाबाला पळवून लावणारा हाच तो कर्नल क्लाइव्ह, एवढी उडतबातमी साऱ्या नगरभर अगोदरच पसरली होती. मिरजाफर आतां नबाब होत होता, हेंही सर्वांना आतां जाहीर झालें होतें. त्यांतही कोणाला कांहीं विशेष वाटलें नाहीं.

मात्र विशेष वाटलें तें एकच.

" आँ: ? हा गोरा क्लाइव्ह इतक्या डौलानें वाजत गाजत आमच्या राजधानींत येतो ? आणि आमचा नवा नबाब त्याला अजीजीनें हंसत-मुखानें सामोरा जातो ? वाः ! केवढी बहादुरी ही इंग्रजांची ? "

त्या दिवशीं एका सुशृंगारित राजप्रासादांत कर्नल क्लाइव्हचें वास्तव्य होतें. सारें नगर नबाबानें आनंदाप्रीत्यर्थ वांटलेल्या मेवा-मिठाईनें गोड तोंड करून आश्चर्यांत पोहत होतें.

बहुतेकांना प्रथम वाटलें, कीं नवा नबाब बंगालच्या गादीवर बसला, त्या आनंदाप्रीत्यर्थ ही रोषणाई आणि मेवामिठाई. परंतु मागाहून त्यांना कळलें, कीं इंग्रजांच्या शुभागमनाप्रीत्यर्थ आनंदीआनंद म्हणून नव्या नबाबानें हें प्रजेचें तोंड गोड केलें आहे.

त्याच दिवशीं सायंकाळीं नबाब मिरजाफरचा मुलगा मिरान हा नबाबी इतमामानिशीं क्लाइव्हला नबाबाच्या दरबाराकडे न्यायला आला. त्याच्याबरोबर हा बडा साहेब क्लाइव्ह मिरवत मिरवत निघाला होता.

दरबारांत उच्चासनावर सोन्यानें आणि हिरेमाणिकमोत्यांनीं सजविलेल्या सिंहासनवजा दोन खुर्च्या मांडलेल्या होत्या. पण नबाब कांहीं आपल्या सिंहासनावर बसला नव्हता. त्यानें सामोरें जाऊन क्लाइव्हला हाताशीं धरून बरोबरच्या बड्या गोऱ्या अधिकाऱ्यांसह वर नेलें; आणि एका खुर्चीवर बसविलें. बाकीचे बडे बडे गोरे आजू-बाजूला मांडलेल्या सुशोभित खुर्च्यांवर बसले. दरबारी मानकरीही सारे

वरच पण मागच्या बाजूला बसले होते. हा देखावाही त्या दरबारांत अगदीं नवीन होता.

अगदीं थोडया वेळांत, क्लाइव्ह आपल्या आसनावर बसल्यासारखें करून उठला व मिरजाफरपाशीं आला. त्यानें त्याला हाताशीं धरून नबाबाच्या सिंहासनावर नेऊन बसविलें.

"बंगाल-बिहार-ओरिसाचे नवाब मिरजाफर अल्लीखान झिंदाबाद!" असा क्लाइव्हनें जयजयकार करून, लवून नबाबाला नजराणा सादर करून त्याला त्रिवार मुजरा केला.

नंतर सारे दरबारी मानकरी आणि गोरे अधिकारी यांनीं नबाबाला नजराणे देऊन मुजरे केले.

अशा थाटामाटांत नवा नबाब मिरजाफर अल्लीखान गादीवर बसला. त्याप्रीत्यर्थ नगरांत रोषणाई झाली. आनंदोत्सव झाला. त्या उत्सवांतच संधि साधून क्लाइव्ह आणि नबाब यांची खाजगी मुलाखत झाली. अमीरचंद क्लाइव्हबरोबर होताच.

"आतां आपण आपल्या कराराची अंमलबजावणी करायला केव्हां बसायचें तें नबाबांनीं ठरवावें." दोघांनींही सुचविलें.

तिघांच्या मतानें अगदीं नजीकचा सोईचा एक दिवस ठरला.

त्या कराराची अंमलबजावणी करणें म्हणजे नबाबानें जणुं आपल्या अंगाची कातडी सोलून देण्यासारखेंच होतें. पण अकल्पितपणें आपणाला इंग्रजांच्या कृपेनें नबाबगिरी वैभव प्राप्त झालें, या खुषींत नबाबाला त्याचा जरा देखील विषाद वाटत नव्हता.

आपला डाव सोळा आणे साधला. आतां आपण म्हणूं तें व म्हणूं तसें घबाड आपल्या घशांत पडणार, याबद्दल क्लाइव्ह खुषींत होता.

आणि आपलें नशीब त्या दिवशीं कुबेरसंपदेच्या लाभानें फळफळणार, म्हणून अमीरचंदशेटही खुषींत धुंद होता.

त्याच्या डोळ्यांवरची धुंदी लौकरच उतरणार होती.

८ : नबाब सिराजउद्दौल्याचा खून !

त्या ठराविक दिवशीं ठरल्या वेळीं नबाबाच्या राजप्रासादांत तो गिधाडांचा मेळावा जमला. क्लाइव्ह आणि अमीरचंद हे एका बाजूचे शेलके लोक. दुसऱ्या बाजूनें एकटा नबाब मिरजाफर. तो एकटाच. याला कारण असें कीं, आंधारांत मुक्रर झालेली पापकर्मांची योजना आंधारांतच उरकणें श्रेयस्कर होतें.

पहिला प्रश्न नबाबाच्या खजिन्यांत एकूण शिल्लक किती, आणि अवांतर मालमत्ता किती, याचा अचूक अंदाज मोजदाद घेऊन करणें. त्याखेरीज करारांतील कोणत्या कलमांची भरपाई तावडतोब होऊं शकेल, हें तरी कसें कळावें ?

ती मोजणी झाली. खजिन्यांत पुष्कळ शिल्लक होती खरी. पण ती सारीच्या सारी एकदम धुवून दिल्यावर मग नबाबानें कारभार तरी कशाच्या जिवावर चालवायचा ? राजबाबतींत व इतर नेहमींचे भरमसाट खर्च कसे भागवायचे ?

आणि शिवाय, खजिना मोजून पाहतां करारांतील सर्व मागण्या पुऱ्या होण्याइतकी शिल्लक नव्हतीच. खजिन्याचा केरकचरा झाडून झटकून काढल्यावरही त्या बकासुरी कराराचें पोट भरणें शक्य नव्हतें.

शेवटीं तडजोड ठरली.

" कराराप्रमाणें रकमेपैकीं निम्मी रकम तावडतोब आदा करावी. आणि राहिलेली रक्कम पुढील तीन वर्षांत तीन हप्त्यांनीं द्यावी."

ही योजना सर्वानुमतें मान्य झाली. मग क्लाइव्हनें तो पांढऱ्या कागदावरील करार बाहेर काढला. त्यांतील एकेक कलम वाचलें गेलें. आणि रोकड खैरातीचा हातोहात हिशेबी उलगडाही होत गेला. अमक्या फलाण्याचा या लुटींत गिधाडवांटा एवढा, हें ठरून गेलें.

पहिला लुटीचा मानकरी कलकत्त्याचा गव्हर्नर ड्रेक. त्यानंतर क्लाइव्ह. त्याचा मान गव्हर्नरनंतरचा असला तरी लुटींत त्याचा वांटा

सर्वांत मोठा. त्याच्यानंतर बाकीचे सारे गोरे त्याच लुटारूंच्या पंक्तींत त्या मिष्टान्नभोजनासाठीं पाटावर येऊन बसले.

हा कोण; गव्हर्नर ड्रेक. त्याला बक्षीस रुपये ४७२५००.

हा कर्नल क्लाइव्ह. याचा सगळ्यांत मोठा वांटा. कारण बंगालच्या नबाबाला रसातळाला नेऊन मिरजाफरला नबाब करण्याची खरी करामत याची. त्याला रोख बक्षीस रुपये ३५७२५००. त्याखेरीज 'चौवीस परगणे' मुलूख सालीना रुपये २२५०००० उत्पन्नाचा कंपनीच्या नांवें तात्पुरता कागदोपत्रीं टाकला गेला. तोही नंतर जमीनदारी अथवा जहागिरी म्हणून क्लाइव्हलाच मिळाणार होता. सालीना रुपये ४५०००० फक्त सरकारी सारा सरकारांत भरावा, आणि सालीना साडेबावीस लाख रुपये आयते जहागिरदार म्हणून बसून खावे !

अशी क्रोडों रुपयांची खैरात करणारीं त्या करारांतील तेरा कलमें वाचून झालीं. अमीरचंद अधाशी कानांनीं ते खैरातीचे आंकडे ऐकत होता. आणि अधाशी नजरेनें आपल्या हातांतील तांबड्या करारांतील आपल्या वांट्याबाबतचें शेवटचें कलम मिटक्या मारीत वाचीत मनांत म्हणत होता, " आतां मी."

कलम १४ वें : शेठ अमीरचंद यांना रोख तीस लाख रुपये, आणि नबाबाच्या बाकीच्या सर्व दौलतींतील शेंकडा पांच टक्के मिळावे.

परंतु क्लाइव्हच्या हातांतील करारामधील तेरावें कलम वाचून संपलें; आणि सारा करार वाचून आटोपला. त्या धक्क्यानें अमीरचंद एकदम दचकून भानावर येऊन विचारूं लागला, " म्हणजे ? हें काय ? करार वाचून कसा होईल शेवटचें चोदावें कलम वाचल्याखेरीज ? हें पाहा– हें पाहा !" असें सांगत शेटजी आपल्या हातांतील तांबड्या कागदावरील तें चौदावें कलम त्यावर बोट ठेवून दाखवूं लागला.

वॅट्सनें स्क्रॅफ्टनला डोळ्यांनीं खुणावलें. क्लाइव्हची नजर दोघांच्याही नजरेला भिडली. ते दोघे त्या कुकर्मांत क्लाइव्हचे डावे उजवे हात. तिघेही एकमेकांशीं पुरते मथलेले.

स्क्रॅफ्टन लगेच उठून अमीरचंदपाशीं गेला आणि त्याच्या कानाशीं लागून निलाजऱ्या मिस्किलपणें मोडक्या हिंदींत म्हणाला, " शेटजी ! तो तुमच्या हातीं पडलेला तांबडा करार ही तुमच्या लबाडीची त्याच नाण्यांत आम्हीं केलेली फेड होती. खरा करार हा पांढरा. या खऱ्या करारानुसार तुम्हांला आतां कांहीं देखील मिळणार नाहीं."

खाजगी गुप्त पूर्वयोजना क्लाइव्हशीं बोलून मुक्रर झालीच होती. तिला अनुसरूनच स्क्रॅफ्टननें सडेतोड बोलून अमीरचंदला त्या कठोर शब्दांच्या लाथेसरसें दूर भिरकावून दिलें.

" शेटजी ! आतां जा. जाऊन तुमच्या नबाबापाशीं चुगली करा, आणि वॅट्सला ठार करायला सांगा." वॅट्स खऱ्या खलनायकाला शोभेशी ती वेळ साधून बेडरपणें उद्गारला. कारण त्याला आणि सर्वांना माहीत होतें, कीं नबाब सिराजउद्दौला पराभूत होऊन काळें करून चालता झाला, तो कांहीं आतां शेटजीची चुगलखोरी ऐकायला पुन्हां नबाब म्हणून गादीवर येत नाहीं. मग आतां शेटजींची भाडभीड आणि भीति बाळगण्याचें काय कारण ?

जणूं आकाश कोसळून शेटजींच्या माथ्यावर पडलें. त्या धक्क्यानें तो तिथल्या तिथें बेशुद्ध पडला. तसाच तो जिवंत मुडदा त्याच्याच गाडींत घालून गाडी बंद करून गोऱ्या सोजिरांच्या सक्त देखरेखीखालीं त्याच्या राजप्रासादाकडे रवाना करण्यांत आला.

आपल्या मकाणीं गेल्यावर शेटजी शुद्धीवर आला. पण आला तो कायमचा वेडा होऊन !

इंग्रजांच्या हातांतील कळसूत्री बाहुलें बनलेल्या नव्या नबाबाच्या राज्यारोहणाच्या आनंदोत्सवांत शेटजीकडे अधिक लक्ष द्यायला सवड तरी कुणाला होती ? आणि आतां त्याची गरज तरी काय होती ?

तरी पण तेव्हां देखील ह्या नव्या नबाबाच्या आणि क्लाइव्ह वगैरे इंग्रजांच्या मनांत एक लहानशी पाल मात्र चुकचुकत होती, " पण

नवाब सिराजउद्दौला कुठें आहे ? तो ह्या सगळ्या गोष्टीचा पुरेपूर सूड उगविण्याच्या खुनशी बेतानें भारावून फ्रेंचांसारख्या शत्रूंना सामील होऊन नवीन बखेडे निर्माण करण्याच्या तयारींत तर नसेल ना ?"

आतां या भीतीचें निराकरण करण्याचा एकच मार्ग होता.

"सिराज कुठें असेल तेथून त्याला हुडकून काढून त्याला या जगांतून नाहींसा करावा. हें काम जो करील, त्याच्या जन्माचें कोटकल्याण होईल असें इनाम नबाबांकडून मिळेल." असें नबाबी फर्मान जाहीर झालें.

तें नव्या नबाबाचें मानस लोकांना कळण्याचा अवकाश. लगेच मारेकरी हेर अहमहमिकेनें सिराजच्या शोधाला निघाले.

"सिराज जाऊन जाऊन कुठें जाणार ? अस्मान फाडून अस्मानाच्या पोटांत तर गडप होत नाहीं ना ? तो असेल तेथून हुडकून काढायचाच." अशा निर्धारानें त्याच्या पाठलागावर चौफेर हेर निघाले. त्यांना नक्की खबर मिळायला फार वेळ लागला नाहीं.

राजमहालहून एका हेरानें बातमी आणली, "जुने नबाब फकिराच्या वेशांत राजमहालच्या एका मशिदीचा आसरा घेऊन बसले आहेत."

तो वास मिळण्याचा अवकाश. शिकारी त्या रोखानें निघाले. सगळ्यांचे फकिरी वेश. आणि कफन्यांखालीं हत्यारें बेमालूम लपविलेलीं. असें हें फकिरांचें टोळकें राजमहालला गेलें. तों त्यांना हवी होती ती शिकार त्यांना नेमकी मशिदींत सांपडली. त्यांच्या हातीं घेरला जाऊन पकडला जाईपावेतों हे आपलेच राजवाड्यांतील हेरगिरी शिपाई आपली शिकार करायला आले आहेत याची नबाबाला दादही नव्हती.

फकिरी वेशांतच बंदिवान झालेला सिराज शिपायांच्या सख्त पहाऱ्यांत राजमहालहून मुर्शिदाबादेला माघारा आणून नबाब मिरजाफरच्या सुपूर्द करण्यांत आला.

कालपरवांपावेतों त्या दुर्दैवी नबाब सिराजच्या गळ्यांतला ताईत असा जमादार महंमद बेग तेव्हां नव्या नबाबाच्या दिमतीला होता. त्यानें

शिकार हातीं सांपडली ही बातमी लगेच धावत जाऊन नव्या नबाबाचा शहाजादा मिरान याला कळविली.

ती सायंकाळची वेळ होती.

बंदिवान सिराज पुढें चालत होता; आणि मृत्यु त्याच्या पाठमोरा सावलीसारखा त्याचा पाठलाग करीत होता.

" रात्रभर नबाब आमच्याकडेच रखवालीला असूं दे. " महंमद बेगच्या सांगण्यावरून मिराननें मिरजाफरला सुचविलें. तें मिरजाफरनें मान्य केलें. क्लाइव्ह, वॅट्स आणि जगतशेट यांसारखे वेंचक बडयांतले बडे व्यापारी यांच्या खाजगी बैठकींत चर्चा झालीच होती. त्या चर्चेला अनुसरून केव्हां, काय व कसें करायचें, याचा त्या बापलेकांत महंमद बेगला विश्वासांत घेऊन अगोदरच खल झाला होता.

उजाडत्या दिवशीं मुर्शिदाबादेंतील लोक सकाळींच उठून पाहतात तों रस्त्यानें नबाबाच्या स्वारीचा हत्ती मिरवत चाललेला आढळला. तो हत्ती नबाबाचें धडावेगळें मुंडकें पाठीवर घेऊन मिरवत चालला होता !

आणि इकडे नबाबाच्या राजवाडयांत तीं गोरीं गिधाडें संपत्तीच्या लुटीवर ताव मारीत होतीं !

९ : ही प्लासीची शोककथा !

फार दिवस कांहीं गेले नाहींत. तोंच 'घी देखा लेकिन बडगा नहीं देखा' अशी नष्टकर्म्या फितूर नबाब मिरजाफरचीही अवस्था झाली.

त्याला आरंभीं मायदेशाशीं बेइमान होऊन इंग्रजांच्या आहारीं जाणें गोड वाटलें. पण थोड्याच दिवसांत त्याचेही डोळे उघडले. त्या नबाबीची किंमत त्यानें देऊन देऊन द्यावी तरी किती ? गादीवर बसतांनाच सारा खजिना अगदीं कोरडा ठणठणीत झाला; तरीही त्यांत त्याला कबूल केलेलें इच्छाभोजन इंग्रजांना घालतांच आलें नाहीं. कबुलीप्रमाणें देण्याचा पहिल्या हप्त्याचा तिसरा हिस्सा कसाबसा फिटला

होता. तोंच पुढील दुसरा हप्ता नबाबाच्या उरावर बसायला समोर उभाच होता. आणि त्याच्या पाठोपाठ तिसरा हप्ता !

हें इंग्रजांचें देणेंच भागण्याची जिथें पंचाईत, तिथें राज्यकारभाराच्या खर्चाला पैसा कोठून आणावा ? अशा परिस्थितींत मग राज्यकर्ते घरच्या म्हातारीचे काळ ! लोकांची उपासमार ! त्यांना पगारच मिळेना.

पगार मिळेना, म्हणून भुकेल्या पोटावर हात दाबून बाकी सारी रयत निरुपायानें कण्हत कळकळत कांहीं काळ तरी कर्माला दोष देत बसेल. पण लष्कर असें थोडेंच उपासमार काढीत स्वस्थ बसेल ? त्याच्या हातीं शस्त्रें. नीट पोटाला मिळतें तोंवर लष्कर राज्यकर्त्यांच्या हुकमतींत तो सांगेल त्याच्या छातीवर नेम धरून ठार करायला उभें. पण पोटाला मिळेनासें झालें, पोटांत भुकेचे कावळे कोकलूं लागले, कीं त्याच धन्यावर तींच शस्त्रें रोंखून बंड करून उलटायला तेंच लष्कर तयार !

राज्याची सर्वतोपरी आबाळ झाल्यावर रयत तरी सरकारला कर कोठून देईल ? आणि करच वसूल झाला नाहीं, तर नबाब तरी इंग्रजाचें नबाबगिरीच्या किंमतीचें शिल्लक बाकी देणें कुठून देईल ?

कीं मग रयतेवर जिकडून तिकडून जुलूम ! त्या जुलुमामुळें कारभार ढांसळायचा नबाबाचा; आणि तुंबडी भरायची इंग्रजाची !

त्या कर्माला नबाब मिरजाफर पुरा पडेना. तो वर्ष-सहा महिन्यांतच अगदीं घाईला आला.

आतां काय करायचें ?

आतां पुढें काय करायचें तें इंग्रजाला कोणीं नव्यानें शिकवायला नको होतें. " काय ? नबाब नाहीं पुरा पडत ? तर हांकला त्याला. आणि दुसरा नबाब आणून बसवा त्याच्या उरावर. "

नबाब होऊन आयतें राजशाही वैभव आणि ऐषआराम भोगायला मिळावा, असे एका मिरजाफरसारखे त्याच्या सवाई आयतखाऊ मिरजाफर काय कमी ? त्याच्या घरांतच तसा दुसरा तयार.

" मी आहें कीं ! मला इंग्रज नवाब करतील तर इंग्रजांना ते काय मागतील तें द्यायला आणि ते सांगतील तसें वागायला मी कबूल आहें." असें सांगत मिरजाफरचा जांवई नबाब व्हायला एका पायावर तयार.

" काय म्हणतां ? काय किंमत पाहिजे तुम्हांला नबाबगिरीची ? मागाल तें देतों. साऱ्या इंग्रजांचीं तोंडें सोनें-माणिक-मोत्यांनीं गच्च भरून टाकतों. बोला कुणाकुणाला काय काय हवें ? देणग्या हव्या ? कबूल. काय ? बरद्वान, चितागांग, मिदनापूर हे तीन जिल्हे मीं कंपनीला तोडून द्यायला हवे ? घ्या, खुशाल घ्या. "

" तेवढयानें नाहीं भागत ? आमच्यासाठीं कंपनी गोरें लष्कर स्वत:च्या हुकमतींत ठेवणार, आणि त्याचा खर्च आम्हीं चालविला पाहिजे ? कबूल."

" आणखी काय पाहिजे म्हणतां ? देशांतल्या देशांत देखील इंग्रजांना जकातमाफ व्यापार, आणि तोही देशांतल्या देशांत तयार होणाऱ्या मालाचा सुद्धां—करायला मोकळीक हवी ? हो हो ! ही घ्या दिली मोकळीक. "

अशा हव्या त्या मागण्या मिरकासीमकडून कबूल करून घेऊन इंग्रजांनीं सासऱ्याच्या जागीं हा जांवई नबाब आणून बसविला.

पण मिरकासीमही इंग्रजाला पुरा पडेना. जी पहिल्या नबाबाची कुत्तरओढ, त्याहून दुसऱ्याची अधिक. दुसऱ्याहून तिसऱ्याची अधिक. मीठ, तंबाकू, असला देशी व्यापार देखील इंग्रजांनीं बळकावल्यावर सारे देशी व्यापारी ठार. आणि तो व्यापार बुडाल्यानें कराचा पैसा खजिन्यांत मुळींच येईनासा झाला म्हणून नबाब ठार !

" काय ? नबाबाला आमच्या मागण्या नाहीं पुऱ्या करवत ? खळखळ करतो ? हाकला त्याला. त्याच्याहून चांगला लायक नबाब हवा आपणाला. जरा देखील न कुरकुरतां आपण मागूं तें देईल आणि सांगूं तें करील असा." इंग्रज म्हणाला.

पुन्हा जांवयाला ढकलून देऊन इंग्रजांना हवा तसा नबाब व्हायला ‘ क्लाइव्हचा गाढव ’ म्हणून प्रख्या पावलेला मिरजाफर तयार!

पुन्हां इंग्रजांची बकासुरी भूक भागविण्यासाठीं हा नबाब तरी रयतेची वाढती पिळवणूक करण्याखेरीज आणखी काय करणार ? रयत ही आपली खाजगी मालमत्ता समजून रयतेच्या पिळणुकीवर—शिकारीवर आयतें सत्तावैभव आणि ऐषआराम भोगण्यासाठीं असे नबाबांमागून नबाब इंग्रजांच्या हातांतील बाहुलीं बनून झटत होते. धडपडत होते. पडत होते. मरत होते. आणि त्यांच्या सत्तेसह त्यांना गाडून इंग्रज भारताचे राज्यकर्ते म्हणून पुढें येत होते.

हे नबाब जसे आयत्या बिळावरचे नागोबा, तसा त्या नागोबां-पेक्षांही दुबळा परंतु आपण ह्या साऱ्यांचा शेषशाई भगवान म्हणून मिरवणारा ‘ दिल्लीचा बादशहा ’ असें नांव सांगणारा शहाआलम अशा नांवाचा एक नामधारी बादशहा होता. तो तर खरा नबाबाचाही बादशहा ! त्यानेंही मग आपल्या आयतखाऊपणाची सुखसोयी शाबूत राखण्यासाठीं एकदां इंग्रजांशीं बक्सार येथें लढा देऊन पाहिला (१७६०). ती लढाई अर्थात् इंग्रजांनीं जिंकली.

पण पराजय झाला म्हणून बादशहा डरला नाहीं. नांवापुरतें कां होईना; पण साऱ्या भारताचें साम्राज्य इनामा-लिलावानें मातीमोलानें फुंकून मोडून खाण्याजोगें त्याच्या नांवानें चालत होतें. त्याचा सौदा करण्यासाठींही त्यानें इंग्रजांलाच जवळ केलें.

“ काय पाहिजे इंग्रजांना आमची आबादीआबाद राखण्यासाठीं ? ” बादशहानें विचारलें.

“ आम्हांला बादशहांकडून बंगालची दिवाणीची सनद पाहिजे.” क्लाइव्ह उत्तरला. त्या संपन्न प्रदेशावर इंग्रजांचा डोळा होताच.

पुराणांतील वामनावताराची ही पुनरावृत्ति होती. वामनानें बळी राजापाशीं अवघीं तीन पावलें जमीन मागून घेतली, आणि दोन पावलांत

सारें जग व्यापून तिसऱ्या पावलाखालीं बळीलाही चिरडून नाहींसा करून टाकला. तशीच इंग्रजानें बंगाल, बिहार, ओरिसाची कायमची दिवाणी बादशहाकडे मागितली.

बादशहाचें दिवाणी द्यायला काय वेंचतें ? नाहीं तरी बादशहाला कोण जुमानीत होता ? आपल्या मांडीखालीं जें घोडें नाहीं, त्याला पकडून आणून त्याच्या पाठीवर स्वार व्हा असें नुसतें लेखींपत्रीं सांगण्यासाठीं त्याला इंग्रजाकडून निर्वाहाकरितां चांगल्या वर्षासनाची आणि संरक्षणाची हमी मिळत होती. एरव्हीं बादशहाला पोटाला घालणारा आणि निवारा देणारा तरी दुसरा कोण होता ?

"काय दिवाणीचे कायमचे हक्क हवे ? घ्या." असें म्हणून शहाआलम बादशहानें कंपनीला दिवाणीची सनद देऊन टाकली.

असे इंग्रज दिल्लीच्या बादशहाचेही जणूं 'अज्ञान पालन करणारे' झाले. आणि सारा भारत हें इंग्रजांना मोकळें रान सोडून बादशहा अलाहाबादेला जाऊन इंग्रजांच्या कृपाकटाक्षाखालीं जगूं लागला.

असा प्लासीला विजयी झालेला इंग्रज दिल्लीच्या बादशहाचा दिवाण या नात्यानें सारा भारत वाढत्या सत्तेच्या जोरावर हवा तसा व्यापारी नांगरानें नांगरीत सुटला.

पण त्याला कांहीं इलाज नव्हता. राजा कोण आला आणि कोण गेला, तरी कधीं कमी तर कधीं अधिक, पण पिळणूक ही रयतेच्या पांचवीला पुजलेली. हिंदु राजे-महाराजे काय, छत्रपतींचे पेशवे काय, बादशहांचे नबाब-निजाम-सुभेदार काय, आणि त्या सर्वांवर सर्वतोपरीनें ताण करणारे शहाआलम बादशहाचे पेशवे-दिवाण इंग्रज काय, सारे राज्यकर्ते म्हणून रयतेवर स्वार झालेले. ते मोठे, म्हणून त्यांचें ओझें रयतेनें वाहायचें !

भारत तरी जगावेगळा थोडाच होता ! हजारों वर्षांपासूनची, पुरातन काळापासूनची भारतांतील जनतेची ती कष्टमय जीवनकथा.

भारतांतील माणूस जरा 'माणूस'सा शोभूं लागला, आणि शासन-संस्थेंत 'राजा' येऊन रयतेच्या बोकांडीं बसला, तेव्हांपासून ही रयत आपली आपण धनी राज्यकर्ती होईतों तें तसेंच चालणार होतें. त्या सगळ्या राजांवर ताण इंग्रजाची.

भारताच्या अशा अनेक जीवनकथांतील अतिशय भयंकर अशी ही भारताच्या स्वातंत्र्याची गळेचेपी करणारी प्लासीची शोककथा.

स्वाध्याय :

१. नव्या नवाबाशीं होणाऱ्या कराराच्या मसुद्यावर अमीरचंद कां नाराज होता ? त्याला त्यांत काय तरतूद हवी होती ?
२. क्लाइव्हनें अमीरचंदचें समाधान करतांना कोणतें कपटनाटक रचिलें ?
३. नवाबाच्या दरबारीं भरलेल्या घटोत्कचाच्या मीनाबाजाराची ओळख करून द्या.
४. क्लाइव्हचा नवाबाला गेलेला खलिता हा अंधारांतील मरणघाव कसा ?
५. मिरमदनला सैन्यांत फितूर झाला असें कां वाटलें ?
६. प्लासीच्या लढाईचें वर्णन करा.
७. नव्या फौजेची भरती करण्याचा नवाबाचा डाव त्याच्याच कसा अंगाशीं आला ?
८. मिरजाफर नवाब कसा झाला ? त्यानें क्लाइव्हचा गौरव कां व कसा केला ?
९. अमीरचंदाला अखेर वेड कां लागलें ?
१०. नवाब सिराजच्या खुनाचें वर्णन करा.
११. नवाब मिरजाफरला व मिरकासीमला गादी कां सोडावी लागली ?
१२. इंग्रजांना बंगालची दिवाणगिरी कशी मिळाली ? त्याचा परिणाम ?

सालीं प्रथमच जालियनवाला बागेंतील हजारों निरपराधी भारतीय आबालवृद्धांची कत्तल करून हा लढा पेटविला. ती करुणकथा.


● सन १८५८ ते १९१९ ●

दांडीयात्रा गांधीयुगांत प्रारंभीं गांधीयोगाला बिचकून वागणारी काँग्रेस अखेर गांधीजींच्याच मार्गावर आली. अशा काँग्रेसनें गांधीजींच्या नेतृत्वाखालीं उभारलेल्या देशव्यापी सत्याग्रही चळवळीची यशस्वी सत्याग्रहकथा. ● सन १९१९ ते १९३१ ●

नऊ ऑगस्टचा अखेरचा लढा भारताचे स्वातंत्र्यसंपादनाचे सामोपचाराचे सर्व उपाय निरुपयोगी ठरल्यावर 'भारत सोडून जा' असें इंग्रजांना रोखठोक बजावणारा स्वातंत्र्ययुद्धांतील अखेरचा 'नऊ ऑगस्ट' देशव्यापी लढा भारतानें दिला. आणि इंग्रजांना भारत सोडून जायला लावून अखेर स्वातंत्र्य मिळविलें. त्या अखेरच्या लढ्याची कमालीच्या कष्टांनीं आणि हालअपेष्टांनीं शोभणारी विजयमंडित सुयशकथा.

● सन १९३१ ते १९४७ ●

स्वतंत्र नवभारत 'नऊ ऑगस्ट'च्या अखेरच्या लढ्यांत भारत स्वतंत्र झाला. पण अखंड भारताचा द्विखंड भारत होऊन 'पाकिस्तान' ह्या नव्या स्वतंत्र इस्लामी राष्ट्राचा आपल्या देहांतून मोठा लचका तोडून देऊन ! या संतापाच्या भरांत आपल्या जन्मदात्या राष्ट्रपित्याचा—गांधीजींचा वध करणाऱ्या स्वतंत्र नवभारताची करुणकथा. ● सन १९४७ ते १९५० ●



चित्रशाळा प्रकाशन पुणे